अनुभव अमृत

मधुकर सोनवणे

अनुभव अमृत

मधुकर वि. सोनवणे

अनुभव अमृत

मधुकर वि. सोनवणे

20, विजय नगर कॉलनी
नवा आडगाव नाका पंचवटी
नाशिक-3
422003

९४२२७५६३३३

msonavane@hotmail.com

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ फेब्रुवारी २०२१ (गणेशजयंती)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून आपण हे कायदेशीररित्या कोणालाही विनामूल्य पाठवू शकता.



अल्प परिचय

मी मधुकर विठ्ठलराव सोनवणे. आता ८२ वर्ष चालू आहे. माऊलीच्या सहवासात वयाच्या ७-८ व्या वर्षा पासून आहे. ३६ वर्षे रेल्वेत कार्यरत होतो. शेवटी कोंकण रेल्वेत डेप्युटी चीफ इंजिनीअर म्हणून सेवानिवृत्त झालो.

दिनांक ३ जानेवारी २०१५ रोजी नाशिक येथे पूज्य दलाई लामा यांचा सत्संग झाला. त्यांना गीतेची इंग्रजी अनुवादाची प्रत दिल्यावर त्यांनी आनंदाने म्हंटले, " Don't leave this path. God Bless You, ॐ मणिपद्मे हूं "

सोबतच्या अनुभव अमृत अंतरंग या काव्यमय भाष्याचे कार्य मागील गुढी पाडव्याला माऊलीच्या आदेशाने सुरु झाले साधारण सहा महिने पूर्ण होण्यास लागले. अनुभव अमृत या ग्रंथाचे लेखन ज्ञानदेवांनी १२९० ते १२९२ या काळात केले. त्याची अपूर्व गोडी आहे. परंतु ज्ञानेश्वरीवर जसे विपुल आशय दर्शक ग्रंथ आहेत तसे यावर मला आढळले नाहीत. या काव्यमय भाष्याने व सारग्रहण वाचनाने जिज्ञासूंना नक्कीच फायदा होईल. माऊलीच्या सहवासाचा व मार्गदर्शनाचा लाभ घडेल हे खात्री आहे. शेवटी आपल्या कल्याणासाठीच हे महान तत्वज्ञान आपल्यापर्यंत देऊन माऊली संजीवन समाधीत आहे. आपण जाणकार आहांत मी थोडे लिहिले आपण जास्त समजून घ्या.

सस्नेह

अण्णा

{मधुकर वि, सोनवणे }

नाशिक-पंचवटी



अर्पणपत्रिका

जिच्या प्रेरणेने मी हे कार्य करू शकलो त्या माझ्या दिवंगत प्रिय पत्नीस हे लेखन अर्पण करीत आहे.

सौ. सरोजिनी म. सोनवणे

एकदा अनुभव अमृत सहज पाहतांना म्हणालीस, 'हे आहे छान पण चटकन समजत नाही, ते समजेल असे लिहिले तर सुलभ होईल.'

मला माऊलीनेही गुढी पाडव्याला तसाच आदेश दिला. आवश्यक ग्रंथांची उपलब्धी झाली हे काव्यानुवादि भाष्य पूर्ण झाले पण त्याचा रसास्वाद घ्यायला तू नव्हतीस. पणतूच्या आगमनाने गेल्या चैत्र शुद्ध पुनवेला सहजी आनंदाश्रू झरले आणि म्हणालीस, आता मी जायला मोकळी झाले. आषाढाच्या वद्य त्रयोदशीला १८ जुलाई रोजी 'झाकलीये घटीचा दिवा, नेणिजे काय जाहला केंव्हा?' या ओवीनुसार ज्ञातीगुरू संत नामदेवांच्या सामाधीदिनी शांतपणे देह सोडलास. पंचावन्न वर्षे समर्थपणे साथ दिली, त्या माझ्या दिवंगत अर्धांगिनी सौ. सरोजिनी हिला हे लेखन सद्भावे समर्पण.

अस्तित्वाच्या शाश्वतपणाने तू याने सुखावशील व जेथे असशील जशी असशील तेथे समाधानी होशील.

अण्णा

माघ शु. चतुर्थी –श्री गणेश जयंती २०२१

अनुभव अमृत सारग्रहण

अमृत गंगा-कलश पहिला



मनोगत

ज्यांना संपूर्ण 'अनुभव अमृत' ग्रंथात नेमके काय आहे, याचे रसपान करायचे आहे, त्यांनी श्री ज्ञानेश्वर अमृत गंगा –कुंड १ ते १० वाचावेत. परंतु ज्यांना त्यातील जीवनक्रम आचरण्यास उपयुक्त असा व साधनेला दिशा लाभावी असाच भाग हवा आहे, त्यांनी हा कलश रूपी संक्षिप्त रसास्वाद घ्यावा. {मूळ अंतरंग मधील ओवी क्रमांक उधृत केलेलं आहेत.}

धन्यवाद.

अण्णा { मधुकर वि. सोनवणे} पंचवटी –नाशिक

msonavane@hotmail.com

अनुभव अमृत - ग्रंथ प्रवेश शिव शक्ति समावेशन

ऐसी इयें निरुपाधिकें *[नाम व रूप नसलेले]* ***। जगाचीं जियें जनकें । तियें वंदिलीं मियां मूळिकें****[मूळची-पहिली]* ***। देवोदेवी*** **॥ १-१ ॥**

असे उपाधी रहित असती जे, मायबाप ते विश्वाचे | देव देवी ती पुरुष प्रकृती, चरण वंदिले मी त्यांचे || ४०.

कोणतेही नाम रूप अशी उपाधी नसलेले पुरुष आणि प्रकृती हेच या जगाचे मायबाप आहेत. त्यांना नमस्कार. सत्ता म्हणजे अस्तित्व हेच पुरुषाचे रूप असून त्याची जाणीव –ज्ञान- हीच प्रकृतीची शोभा आहे. ते एकरूपाने हा सृष्टीचा खेळ खेळत आहेत.

जो प्रियुचि*[नवरा]* ***प्राणेश्वरी*** *[प्रिय पत्नी]* ***। उलथे*** *[उलटे]* ***आवडीचे सरोभरीं*** *[भराने]* ***। चारुस्थळीं येकाहारी*** *[एका ओळीने]* ***। एकांगाची*** **॥१-२॥**

एकचि शिव तो स्फूर्ति होता, स्वयेचि प्रकृति रुप धरी | स्फुरण असे हे प्रणव [ॐ]रुपाचे, क्रियाशक्ति ती सृजन करी || ५३.

श्री शिवाला आपणच -पाण्यावर लहरीचे वेगळेपण उंमटावे तसे- द्वैत धारण करावे, अशी स्फूर्ति होताच शक्ति-प्रकृती-रूप धारण केले. आणि जगताचा खेळ सुरू झाला. पुरुष आणि प्रकृती दोन नसून एकच आहेत, हे जाणून साक्षीभावाने अलिप्त राहून देहाला प्रकृती कशी नाचविते हे पहावे. असे करणारा मुक्त होतो.

आवडीचेनि वेगें । येकयेकातें गिळिती अंगें । कीं द्वैताचेनि पांगें *[उणिवेने]* ***। उगळिते*** *[ओकतात-प्रगट करतात]* ***आहाती*** **॥ १-३ ॥**

स्फुरण रूपाने [स्व-संवेद्य] उठे आवडी, एक दुज्याचा लय करिती | नित्य खेळ चाले विश्वाचा, क्षणात नवरूप प्रगटविती || ६३.

चैतन्य आणि प्रकृती जशी आवश्यकता असेल तसे एक दुसऱ्याचा लय करीत विश्वाचा खेळ खेळत असतात. जर वृक्ष वाढत असेल तर त्याचे आकारमान वाढवीत आणि जर वृक्षाचा विनाश जवळ आला असेल तर चैतन्याचा अभाव करीत आकार आणि रूप तसेच गुणधर्म बदलवीत नवेपण कसे आणतात याचे हे वर्णन आहे.

कैसी स्वसुखाचि आळुकी [आवड] । जे दोनीपण मिळोनि येकीं । नेदितीचि कवतिकीं । एकपण फुटों ॥ १-५ ॥

शिवशक्तीची स्वसुख भोगण्या, जरि आवडी अन्य नसे | परि कदापि ऐक्य न भंगे, एक दुज्यातचि विरत असे || ८७.

चैतन्य आणि प्रकृती एक असूनही यांचे संमिश्र कृतीविना बदल संभवत नाही. जन्म-मरण, उत्पत्ति स्थिति आणि लय याद्वारे सृष्टीचे सातत्य कसे कायम राहते हे समजते. हे समजल्यावर जन्म मृत्यू कसे अनिवार्य आहेत हे उमगून जे वाट्याला येईल, त्याला आचरीत जाणे कसे निसर्गाला अनुकूल होते हे समजते. आवश्यक तेंव्हा परिस्थिति बदलविणे आणि परिस्थितीनुसार कृती बदलणे हे अचूक कळते.

जयां येक सत्तेचें बैसणें । दोघां येका प्रकाशाचें लेणें । जें अनादि येकपणें । नांदती दोघें ॥ १-८ ॥

अधिष्ठान उभयास एकची, लेणे श्रीहरी कांतीचे | अनादिपणे उभय नांदती, अभिन्न अंगचि ते हरीचे || १०२.

प्रकृती आणि पुरुष यांच्या प्रत्येक खेळीमागे 'पुरुषोत्तम'-हरी- असतो. म्हणून सारे नियमबद्ध घडत सृष्टी नवे रूप घेत राहते.

जेणें देवें संपूर्ण देवी । जियेविण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना येकोपजीवी । येकयेकांची ॥ १-१० ॥

शक्तीला सामर्थ्य शिवाचे, शिवा शिवत्वहि शक्तिमुळे | एक-दुज्याविण उभय शून्यचि, निश्चल निर्बल नि दुबळे || ११३.

शिव आणि शक्ति एकमेकावाचून एकट्याने कांहीच करू शकत नाहीत. म्हणून चैतन्याच्या आदेशानुसार [आतल्या आवाजाच्या आदेशानुसार] कार्यं करीत जीवन यशस्वी व सार्थ करावे.कारण तेंव्हा आपण करीत नाही तर घडू देतो.

जिया दोघांमाजीं येकादें।विपायें उमजलें[*जागे झाले****] होय निदे [****झोपेतून****]। तरी गरवात[****चराचरविश्व****]गिळूनि नुसुधें [****नुस्ता****] ।कांहीं ना कीं॥१-१४॥***

पुरुषासंगे निजे प्रकृति, स्वप्नी फिरवी चराचरा | पुरुषा जागृती आत्मभान ते, जात झणी निर्विकारा || १४०.

‘दंपती’ मधले चुकुनि कुणीहि, झोपेतुनी ते जरि उठले | असे दंपती स्वप्नामधली, म्हणुनि कोणिहि नच उरले || १४२.

शिवाची जागृती म्हणजे आपले स्वरूपाविषयीचे विस्मरण जाऊन आत्मभान येणे. अशी जागृती येताच विश्व लयाला जाते. व परब्रहमाची अनुभूति होते. प्रकृतीची जागृती म्हणजे तिचे शिवाशी एकरूप होणे.

याचा गूढ अर्थ असा की, आपण जर या जगाकडे एक आभास मानून विरक्त भावनेने विवेकाने अलिप्त भावनेने कार्य करीत राहिलो, तर कैवल्याचा मार्ग दिसू लागतो.

दोहों अंगाचिये आटणी । गिंवसीत [*सापडवित****] आहाती येकपणीं । जाली भेदाचिया वाहाणी [****प्रवाह****] । आधाधीं जियें ॥ १-१५ ॥***

उभय आपुले अंश आवरुनी, मूल स्वरूपी ते येती | विश्व रुपे ते भेद दाविती, उभयची आकारा आणीती || १५१.

विश्वाचा लय झाल्यावर दोघेही आपापले अंश आवरून पुन्हा एक रूप होतात. परंतु पुन्हा विश्वाला साकार करण्याची उर्मी येताच हे आभासमय विश्व परब्रह्माच्या अंगावरच दृश्यमान होते.

जे मायेत गुरफटलेले आहेत त्यांना भेद जाणवत राहतो, पण या बदलत्या अवस्थेत सुदधा ते एकमेकाला सावरून घेत असतात, उपाधीतील गुप्त चैतन्य जे जाणतात, त्यांना केवळ सर्वत्र श्रीहरीच प्रतीत होतो.

स्त्रीपुरुष नामभेदें । शिवपण येकलें नांदे । जग सकळ आधाधें [*अर्धे-अर्धे****] पणें जिहीं ॥ १-१७ ॥***

स्त्री पुरुषांची रूप नि नामे, भेद असे हा वरवरला | एकचि शिवपण उभयी नांदे, जरी भेद तो दृष्टीला || १५८.

जरी सृष्टीत भेद दिसत असले तरी, त्यातील आत्मतत्व शिव एकच असते. बाह्यरुप हा बदलता आभास आहे. समुद्र-मेघ-जलधारा-ओहळ-गंगा आणि समुद्र नेहमी एकाच जळाची बदलती रुपे आहेत.

दो ओठीं येकी गोठी । दो डोळां येकी दिठी । तेवीं दोघीं जिहीं सृष्टी । येकीच जेवीं ॥ १-१९ ॥

दोन ओठ परि शब्द एकचि, नयन दोन परि एक दिठी | तेवी वेगळे शिव शक्ति परि, उभविती एकचि ही सृष्टी || १६४.

चैतन्य प्रकृतीच्या सहाय्याने विश्वाचे कार्य करविते. ही पुरुष व प्रकृती यांची खेळी आहे हे जाणून आपण आत्मभान विसरू नये.

सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया बाइला केला पुरुषु । जेणें दादुलेन सत्ताविशेषु । शक्ति जाली ॥ १-२७ ||

सर्वची शून्य असे विश्व हे, पत्नीस्तव शिव साकारी | नसे त्यास अस्तित्व देऊनी, शक्ती विश्वाभास करी || २०९.

या सर्व आभासाच्या चैतन्यरूप शिव आहे. तो स्वत: शून्यात राहून या खेळात आपली पत्नी जी शक्ति-प्रकृती- तिच्या प्रेमाखातर या खेळात सहभागी होतो. तिने त्याला पुरते 'बाईल' बनविलेले असते. या जगताचा लय झाल्यावर आपल्या निज रूपात शिव दंग होतो. परंतु आपल्या

पत्नीच्या आवडीचा विचार बळावताच पुन्हा विश्व निर्मितीच्या कार्यात तिच्याबरोबर सहभागी होतो. हे विश्व शून्यातून साकार होते आणि परत शून्यात जाते. आपण जर अंतर्यामी दृष्टी स्थिर केली तर आपल्याला या कांही नसण्याशी तदाकार होता येते.

आंगाचिया आटणिया [संकोचाने] । कांतु उवाया [विकासाला] आणिला जिया । स्वसंकोचें प्रिया । रूढविली जेणें ॥ १-३२ ॥

एरवी विस्मृती निजरूपाची, आणुनिया शिव संकोचे | देई अवसर मुक्तपणाने, रूप नांदण्या शक्तीचे || २५२.

आत्मानुभूती होण्यासाठी देहभाव विसरून आपापल्या शिवत्वाशी समरस व्हावे. ज्याला अशी मनोमन प्रबळ कामना असेल त्याला कसे सहाय्य मिळते हे वरील रचनेतून सांगितलेलं आहे.

जंव कांतु लपो बैसे । तंव नेणिजे जियोद्देशे । जियें दोघें आरिसे । जियां दोघां ॥ १-३८ ॥

लपे आत्मरूप तेंव्हाचि ते, विश्वचि दृश्यरुपे भासे | शिव नि शक्ति ते जाणवती, एक दुज्यांचे जणु आरसे || २७१.

शिव लपून कार्य करतो. तर प्रकृतीचे कार्य दिसून येते. पण त्याचे गुप्त रूप तजेला, प्रसन्नता, उत्साह या आरशाद्वारा दिसून येतच असते. आणि जेंव्हा अहंभाव विरतो, तेंव्हा आत्मभानाचा मार्ग खुला होतो. ईश्वर दिसत नाही, तो अनुभवावा लागतो.

किंबहुना तियें । प्रणवाक्षरीं विरुढातियें । दशेचीही वैरियें । शिवुशक्ति ॥ १-४४ ॥

ॐ कारचि कारण विश्वाचे, तीन अंकुरे विस्तरले | तोचि वाचक असे हरीचा, हे हरीशी ठाऊक नसे || २९६

अनुसरुनिया प्रणवाला ते, प्रपंच मुक्ति ती होई | हे जाणुनि त्या वैरी मानती, शिव नि शक्ति दोघेही || २९७

ॐ काराच्या सहाय्याने शिव शक्ति निर्मित विश्वाची उभारणी होते आणि त्याच्याच सहाय्याने आपल्याला पुन्हा आत्मभान येऊ शकते. त्यामुळे ते ॐ काराला वैरी मानतात. ॐकाराद्वारे आपण श्री हरीशी एकरूप होण्याची साधना संक्षेपाने खाली दिली आहे.

ॐकाराचा ध्वनि निघतसे, नीरव शांतीच्या मधुनी | शब्द उमटता नादच आधी, ईश्वर वाचक ये श्रवणी || २९८.

नाद कंपने जशि घंटेची, उमटुनिया विरुनी जाती | कंपनाशी त्या समरस व्हावे, अनुभवी शुन्यी ती शांती || २९९.

ब्रहमबीजाच्या प्रणव अंकुरे, घोष ध्वनी नादाकारे | त्याची हरीच्या भुवनी विसावे, अहं स्वरूपी तेथं विरे || ३००.

शांत डोळे मिटून बसावे. ॐ काराच्या ध्वनीला बाहेरून कुणी म्हणत आहे असे कल्पून शांत चित्ताने समरस होऊन ऐकावे. नाद संपल्यावर कंपनाशी समरस व्हावे. नाद शून्यात विरतो तेच भगवंताचे निवास स्थान [ज्ञा. अध्याय ९/२७५]

हें असो नामरूपाचा भेदसिरा[भेदाचा शिरा]।गिळित येकार्थाचा उजिरा [प्रगटपणा]। नमो त्या शिव-वोहरा[दांपत्याला]। ज्ञानदेवु म्हणे **॥१-४५॥**

नामरूपाचा भेद पसारा, गिळुनी नाविन्या आणिती | शिवशक्ति या दांपत्याला, ज्ञानदेव बंदन करीती || ३०८.

ज्ञानदेव नाम-रूप यांच्या पलीकडले जे आत्मरूप त्याशी समरस होतात. हेच नसणे-पणाची शून्य अवस्था-पूर्ण समर्पणरूप वंदन ते करीत आहेत. नमस्कार करणारा हाच नमस्कार घेणारा असल्याने, द्वैत विरून जाणे ही समरसता खरी वंदना आहे. .

अहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे । तरि स्वतरंगाचीं मुकुळें । तुरंबु का पाणी **॥ १-५९॥**

उदकपणा तो मुळी न मोडता, क्रिडे आपुल्या कल्लोळी | नर्तन जळीचे जळी चालता, सुंदर दिसते ती खेळी || ३४३.

जर पाण्यावरील लहरींचे नर्तन पाणी हे मूळरूप न विसरता पहात त्यांतील आनंद घ्यायचा असेल, तर पाण्याने खुशाल घ्यावा. असे उदाहरण ज्ञानदेवांनी येथे दिले आहे. आपल्या मूळ स्वरूपाचे भान नित्य ठेवीत कोठेही न गुंतता पूर्ण विरक्त राहून देहाकरवी कार्यात खंड पडू देऊ नये. आणि बाहयत: सामान्य व्यक्तीसारखे कार्यरत राहून प्रारब्धाचे भोग संपेपर्यंत समर्पण भावाने कार्ये सोडू नये हीच जीवनमुक्ती. संसारात असणे पण त्यांत अंतर्यामी नसणे

सांडूनि मीठपणाचा लोभु । मीठें सिंधुत्वाचा घेतला लाभु । तेविं अहं देऊनि शंभु । शांभवी झालों **॥ १-६३ ॥**

मीठपणाचा लोभ सोडूनि, आश्रय घेई सिंधुचा | अहं अर्पुनी शंभु जाहलो, अनुभव येई शांभवीचा || ३४८.

मिठाने आपले वेगळेपण विसरून जळाशी एकरूप व्हावे अशा तऱ्हेने मी अहं त्यागून शंभू आणि शांभवी यांचा अनुभव घेत आहे.

शिवशक्तिसमावेशें । नमन केलें म्यां ऐसें । रंभागर्भ आकाशें । रिगाला जैसा । **१-६४ ॥**

शिवशक्तीत मी समावेशुनी, ऐसे स्वरूपे वंदियले | केळी-गर्भिचे आकाशचि कि, महदाकाशी समरसले || ३४९.

नमन व्यक्तवि समरसताचि, कृतज्ञ भावे ऐक्याला | जन्मजन्मीचे विरे दुजेपण,पूर येत स्वानंदाला || ३५४.

माझा नमस्कार हा असा आहे. ज्यात पूर्ण समर्पण भावाने जे वाट्याला आले ते निष्ठेने करीत विरक्ती व विवेक यांच्या आधारे ऐक्य कायम ठेवले आहे.

अमृत गंगा प्रथम कलश समाप्त

कलश दुसरा [श्रीगुरुस्तवन]

आतां उपाय [उपासनारूपी साधन] वनवसंतु । जो आज्ञेचा [ब्रह्मविद्येचा] आहेवतंतु [मंगळसूत्र] । अमूर्तचि परि मूर्तु ।कारुण्याचा॥ २-१॥

साधन वनी जो वसंत होऊनि, स्वरुपफलांशी बहरवितो | सौभाग्यचि जो कैवल्याचे, त्या सद्गुरूला मी नमितो || १

साधनारूपी वनात जणु वसंत ऋतु होऊन आत्मबोधाच्या फळाला जो बहार आणतो, अशा कैवल्याचे सौभाग्य असलेल्या माझ्या सदगुरुला माझा नमस्कार असो.

अविद्येचे आडवे [वनात]। भुंजीत[भोगीत] जीवपणाचे भवे[फेरे] । तया चैतन्याचे धांवे । कारुण्यें जो कीं ॥ २-२ ॥

निजरुप विस्मरणाच्या रानी, वाट शोधिता सुटकेची | जन्ममृत्यू चक्रात अडकले, धावशी मदतीस्तव तूची || ३

कैवल्यकनकाचिया दाना । जो न कडसी[निवड करी] थोर साना । द्रष्ट्याचिया दर्शना । पाढाऊ[मार्ग दर्शक] जो ॥ २-५ ॥

कैवल्याचे कनकदान तो, कुणी मागे त्यासि देई | सान थोर हा भेद न पाही, द्रष्ट्या दर्शन ते होई || १४.

आपल्या मूळ स्वरूपाचे विस्मरण झाल्याने, अज्ञानाच्या रानात भटकत असतांना आम्ही अज्ञ जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकलो असता, हे सद्गुरू ! तूच मदतीसाठी धाऊन येतोस. जो तुझ्याकडे शिष्य भावाने येतो, त्यावर उदार होऊन तू कैवल्याचे सुवर्णदान देताना कोणताही भेद भाव करीत नाहीस.

सामर्थ्याचेनि बिकें [वैभव] । जो शिवाचेंही गुरुत्व जिंके । आत्मा आत्मसुख देखे । आरिसा जिये ॥ २-६ ॥

शिव समर्थ ना स्वरुप प्रतीतिला, गुरुदृष्टी ते सहज करी | तुलना सामर्थ्याचि करिता, गुरुत्व श्रेष्ठत्वास वरी || १७.

तुझे सामर्थ्य शिवाहून जास्त आहे. शिव आत्मप्रचिती देऊ शकत नाही पण तू ते सहज करतोस.

राखों जातां शिष्यातें । गुरुपणहि धाडिलें थितें [कमी] । तऱ्ही गुरुगौरव जयातें । सांडीचिना ॥ २-१२ ॥

लघुत्व घालवुनि शिष्याचे, गुरुत्व त्यासि गुरु देई | तेणे महिमा श्रीसद्गुरूचा, कीर्तिरूपे वर्धन होई || ३५.

आपले गुरूचे मोठेपण तू शिष्याला बहाल करतोस ही तुझी कीर्ति महान आहे.

***जयाचेनि सावायें** [सहाय्याने] । जीवु ब्रह्म उपर [वर] लाहे । ब्रह्म तृणातळीं जाये । उदासे जेणें ॥ २-१६ ॥*

साह्य लाभता श्री सद्गुरूचे, प्रतीति जीवा परब्रहमाची | परी उदासीन जरी सद्गुरू, ना सुटका संसाराची || ४२.

सद्गुरूच्या सहाय्याने जीव मी शिव आहे,-परब्रह्म आहे- अशा उन्नत स्तरावर जातो, परंतु जर गुरु उदास झाला; तर तो ब्रहमज्ञानाला मुकून त्याची अधोगती होते. शिष्याची पात्रता असेल तर त्याला सहजी गुरूचा लाभ होतो. मात्र जो विषयातच आनंद मानून भौतिक सुखात रमतो, त्यावर गुरु उदास होऊन त्याची सुटका होत नाही.

उपस्ति/उपासना/वरि राबतिया [शिष्य]। उपाय [उपासनारूपी साधन] फळीं येती मोडोनियां [बहारदार]। वरिवंडले [परिपक्व] जयाचिया। अनुज्ञा [आज्ञा] कां॥२-१७॥

जीवन आचरी गुरु आज्ञेने, निष्ठा ठेऊनिया पुरती | पूर्ण समर्पण भावे शिष्या, फळे लाभती प्रतीतिची || ४७.

बुद्धिनिश्चये आत्मज्ञान ते, त्यासि परायण अहर्निशी | पूर्ण ब्रह्मनिष्ठाही भावे, ब्रह्मरूप निजरूपाशी || ४८

ज्याने निष्ठेने गुरुने सांगितलेला मार्ग अनुसरला, त्याला कैवल्याची बहारदार परिपक्व फळे मिळतात. बुद्धीच्या निश्चयाने मीच ब्रह्म आहे अशी पक्की भावना धरून, त्याप्रमाणे जो विवेक व विरक्तीने हे जीवन व्यतीत्त करतो, त्याला ब्रह्मभावाची प्रतीति येते.

नाहीं जे जळीं बुडिले । तै घनवटें[भरीव] जेणें तरिजे । जेणें तरलियाहि नुरिजे । कवणिये ठाईं ॥ २-२१ ॥

असे कोरडा भवसागर हा, समर्थ गुरुने तारियले | सारा खेळ असे स्वप्नीचा, दृष्टिस ज्ञानमयी केले || ५७.

येथे आपण फक्त पाहुणे, जो तो रिक्तचि जात असे | सारे दिसता हांव सागरी, बुडती जन ते कां कैसे || ५९.

याला भवसागर असे म्हणतात, पण खरे तर, हा पुरता कोरडा आहे. म्हणजेच यांत बुडावे, असे कांहीच नाही. पण विषयात आनंद घेत जे या मायावी चक्रात स्वत:च अडकले आहेत, त्यांनी जर या जगातील फोलपणा ओळखला तर सहजी त्यांचा उद्धार होईल. येथे आपण येतो, ते चार दिवसांचे पाहुणे म्हणून॰ तेही विशिष्ट कार्य करण्यासाठी. येथले कांहीच आपले नाही आणि येथून कांहीच न्यायचेही नाही, मग उगाच हांवेच्या मागे लागून; जे नेहमी निघून जाते त्याचा हव्यास कां धरावा?

चंद्रादि सुसीतळें [अगदी शीतल] । घडलीं जयाचेनि मेळें । सूर्य जयाचेनि उजाळें । कडवसोनि [कवडशाने] ॥ २-२३ ॥

शीतल चंद्र नि ग्रहगोलादि, सारे घडवियले त्याने | सुर्यादिंना एक कवडसे, प्रकाश दिधला श्री गुरुने || ६८.

सद्गुरू व्यक्ति नसून ब्रह्माशी तदाकार झालेले आहेत, हे शीतल चंद्रादी ग्रह आणि असंख्य तारे त्यांनीच घडविले आहेत. त्यांच्या प्रकाशाच्या एका कवडशाने सुर्यादिक प्रकाशित होतात.

जीवपणाचेनि त्रासें । यावया आपुलिये दशे । शिवही मुहूर्त पुसे । जया जोशियातें ॥ २-२४ ॥

जीवपणाला त्रासुनियाची, यावयास आपुल्या दशे | श्री सद्गुरु हा असा ज्योतिषी, जया शिवहि मुहूर्त पुसे || ६९.

सुख-दुःखाचे येणे जाणे, कर्मफलांची नोंद तशी | सारे जन्मोजन्मी करुनी, थकला शिव तो अहर्निशी || ७१

शिव या जगात जीव म्हणून आला, आणि जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकला, तो सुद्धा आमच्या गुरूंना उत्तम ज्योतिषी मानून त्या त्रासातून सुटकेचा मूहूर्त विचारतो.

***जो उघड किं न दिसे । प्रकाश कीं न प्रकाशे । असतेपणेंचि नसे । कव्हणीकडे* ॥ २-२६ ॥**

सर्वठायी सद्गुरु परमात्मा, असे परि ना कुठे दिसे | इंद्रिये नि मन बुद्धि कुंठित, केवळ स्वसंवेद्यचि असे || ७५.

सर्वांचे हृदयी बसलेला सद्गुरू परमात्मा अगदी जवळ असूनही, उघड दिसत नाही. तो केवळ स्फुरणाने जाणवतो.

***तेथें नमनें का बोलें । केउतीं सुयें [टाकावी] पाउलें । आंगीं लाउनि नाडिलें[फसविले] । नांवचि येणें* ॥ २-३१ ॥**

ऐसे ज्या पाहणे शक्य ना, नमन स्तवन करणे कैसे | ज्यासी सकलाची निवृत्ती, प्रवृत्ती त्या रुचत नसे || ८४.

गुरुदेव देहधारी नाहीत. त्यांना नमन करावे ते कसे? ती खऱ्या अर्थाने निवृत्ती आहेत. त्यांना प्रवृत्ती शिऊच शकत नाही. ते सर्वातून निवृत्त आहेत.

***नामें रूपें बहूवसें । उभारूनि पाडिलीं ओसें[आभासमय] । सत्तेचेनि आवेशें । तोषलासि ना ?* ॥ २-३८ ॥**

बहू निर्मिले नाम रूपांना, उभवुनी त्यासी ओस करी | घडिशी मोडीशी, पुन्हा घडविशी, झाला ना संतोष उरी? || १०१

सद्गुरू, आपण या जगात असंख्य नामरूपांच्या आभासमय उतरंडी रचल्यात आणि मोडून टाकल्यात, आता आपल्या अस्तित्वाच्या पसाऱ्याने संतोष वाटतो ना?

विशेषाचेनी नांवें । आत्मत्वही न साहावे । किंबहुना न व्हावें । कोण्हीच या ॥ २-४० ॥

तुला नावडे वेगळेपणा, आत्मत्वाचा सन्मान | संबोधन ते मुळी नावडे, केवळ स्वत्वाचे भान || १०५.

आपल्याला तर आत्मत्वाचा सन्मान आणि वेगळेपणा आवडत नाही. आपण नित्य निजस्वरूपी स्थित आहांत

कापुराचे थळीव । नुरेचि आगीची बरव[शोभा] । नुरेचि रूप नांव । तैसें यया ॥ २-४२ ॥

कापुर अग्निसंगे येता, रूप नांव ते कांही नुरे | गुरू संगती शिष्याचाहि वेगळेपणा पूर्ण सरे || १११

कापराच्या संगतीला अग्नि गेला की दोघेही विरून जातात. तसे आपल्या संपर्कात शिष्य आला, की दोघांचे वेगळेपण विरून जाते.

परी नव्हे तरी न हो । हें वेखासी [विरुद्ध] कां घेवो । परी वंदीतयाहि ठावो । उरों नेदी ॥ २-४७ ॥

वंदन घ्यावे तुवा कुणाचे, ही तर मर्जी तुझी असे | ज्याने केले वंदन तुजला, देहभाव त्या उरत नसे || १२२.

किंबहुना इया भाखा [भाषा]। द्वैताचा जेथें उपखा [श्रम]। फेडोनियां स्वसखा । श्रीगुरु वंदिला ॥ २-५४ ॥

होता जेंव्हा पूर्ण समर्पण, तीच वंदना असे खरी | त्या सद्भावे नमन असे हे, आता सकलची एक हरी || १३९.

कुणाचे वंदन स्वीकारायचे की, नाही ही गुरूंची मर्जी. पूर्ण समर्पण हेच गुरूला वंदन. मात्र ज्याने त्यांना वंदन केले तो वेगळा उरत नाही. पूर्ण समर्पण हेच गुरूला खरे वंदन आहे.

निवृत्ति जया नांव । निवृत्ति जया बरव । जया निवृत्तीची राणीव । निवृत्तिचि ॥ २-७० ॥

केवळ नामची ना निवृत्ती, नाम शोभते छान तया | निवृत्तीचे राज्य तयाचे, निवृत्ती अंगी लिलया || १७७.

सदा विरक्ति, ना प्रवृत्ती, सहजभाव निवृत्ती असे | पूर्णकाम निवृत्ती राणीव, निवृत्तीने विलसतसे || १७९.

ऐसें करणियावीण । स्वयंभचि जें निवृत्तिपण । तयाचे श्रीचरण । वंदिले ऐसे ॥ २-७९ ॥

सामरस्यचि सद्गुरू हरीशी, वंदन हे त्या चरणाला | नसे विधी उपचार यांत ते, कृतज्ञता ये शब्दाला || २००

निवृत्ती हे ज्यांचे नांव आहे, निवृत्ती हीच ज्यांची शोभा आहे. आणि नित्य विरक्ती अशी निवृत्ती हीच ज्यांची राजधानी आहे, त्या माझ्या सद्गुरूला मी पूर्ण समर्पण; हेच वंदन सादर करतो.

आतां ज्ञानदेवो म्हणे । श्रीगुरु प्रणामें येणें । फेडिली वाचाऋणें । चौही वाचांचीं ॥ २-८० ॥ ॥

ऋणे चारही वाचांची ती, प्रतीतिस्तव साह्या आली | ऐसा प्रणाम सद्गुरू चरणी, करुनि ऋणे ती फेडियली || २४

या गुरु वंदनेने मी वाचा ऋणातून मुक्त झालो.

अमृत गंगा- द्वितीय कलश समाप्त

अमृत गंगा कलश तिसरा - {वाचाऋण परिहार]

जगात आपले सारे व्यवहार शब्दांच्या आधारे चालतात. पण परब्रह्म प्राप्तीसाठी शब्द उपयोगी पडत नाहीत. तो निखळ अनुभूतीचा विषय आहे. अनेक प्रवचने दिलीत वा ऐकलीत, शास्त्रांचे वाचन वा लेखन केले, चर्चा केली त्यांनी फक्त रस्त्यावरल्या पाट्यांच्या सारखी दिशा कळते. पण प्रत्यक्ष अनुभूति शिवाय कैवल्य दूरच राहते.

पण शब्दांनी केलेल्या मार्गदर्शनाच्या मदतीचे ऋण फेडल्याशिवाय परब्रह्म अनुभूति होऊ शकत नाही. हे ऋण नेमके कशा प्रकारचे असते आणि त्याचा परिहार कसा करावा याचे विवेचन या अध्यायात ज्ञानदेवांनी केलेले आहे.

ययांचेनि बोभाटे [आक्रोशाने]। आत्मयाची झोप लोटे । पूर्ण तऱ्ही ऋण न फिटे । जें चेणोंचि[जागृती येऊनही] नीद कीं ॥ ३-१ ॥

घोष महावाक्यांचा ऐकुनी, स्वभान निद्रा चाळवली | म्हणे 'शिवोहं' अहंभावचि पुरती, निद्रा ना सरली || ३.

ही अजुनिही असेच निद्रा, पूर्ण जागृती ना आली | अहंभाव तो सुप्त अजोनी, फेड ऋणांची ना झाली || ४.

तेवीं अविद्येसवें । चौघीं वेंचती जीवें । तत्त्वज्ञानाचेनि नांवे । उठतीचि या ॥ ३-७ ॥

वाणी नुरती तत्वज्ञाने, बंधन ज्ञानाचे उरते | दिशा कळे, परि दूरच आत्मा, शिरी ऋण तेही ना फिटते || १४.

.

चारी वाणींचा तत्वज्ञानाचा घोष ऐकून अज्ञानाची झोप जरा चाळवली जाते. चारही वाणी 'अहं ब्रह्मास्मि', 'तत्वमसि' आदि चार महावाक्ये व इतर शब्दांनी देहबुद्धीची झोप कांही अंशी उडवितात हे खरे परंतु, अहंभाव पुरता न सरल्याने अद्यापही पूर्ण जागृती येत नाही आणि आत्मदेवाशी समरसता घडत नाही. ही तर दुसरी तंद्रारूपी झोपच झाली. आणि वाणींच्या बोधाचे ऋण फिटले जात नाही.

मोक्षुचि बंधु होये । तरी मोक्ष शब्द कां साहे ? । अज्ञान घरी त्राये । वाउगीची ॥ ३-१२ ॥

आभासचि तो वृथा मुक्तिचा, मोक्षचि बंधन होई तसे | भ्रामक समजुत ती ब्रहमाची, व्यर्थ बंधनी पाडितसे || २४.

जर ज्ञानाचे श्रवण होऊनही, मुक्तीचा नुसता आभास निर्माण झाला, ब्रह्मज्ञानाची फोल समजूत झाली, तर बंधन कायम राहते. ती कसली मुक्ती ?

आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसें । म्हणितलें असे । सदाशिवें ॥ ३-१६ ॥

शिव सुत्रातील एक सूत्र ते, 'ज्ञान बंध' ते शिव म्हणती | सदाशिवांचे वचन असे ते, सत्यचि शंका नसेच ती || ३३.

आणि वैकुंठींचेहि सुजाणें । ज्ञानपाशीं सत्त्वगुणें । बांधिजे हें बोलणें । बहू केलें ॥ ३-१७ ॥

गीतेमाजी हरी सांगती, सत्वचि बंधन सुख संगे | ज्ञान करी ते बद्ध साधका, अहं मूळचा ना भंगे || ३४.

परि शिवें कां श्रीवल्लभें । बोलिलें येणेंचि लोभें । मानु तेहि लाभे । न बोलतांही ॥ ३-१८ ॥

शिव विष्णुचे तसे सांगणे, मान्यचि आम्हा पूर्णपणे | ज्ञान करितसे बंधन ऐसे, ज्ञानवंत पुरते जाणे || ३५.

'मीच ब्रह्म' जे वदती साधक, असे ज्ञान ते बद्ध करी | कारण त्यांतील अहं भावना, अलगचि राखे सदा हरी || ३६.

शिवसूत्रांतील एक सूत्र आणि गीतेतील अध्याय १४ श्लोक ६ अनुसार ज्ञान हे बंधनकारक ठरते असे म्हटले आहे. श्री शिव आणि श्री हरीचे हे वचन निरर्थक कसे असणार? आम्हालाही ते शिरोधार्य आहे. कोणत्याही ज्ञानाने जर अहं–मी-पणा वाढत असेल तर त्याचे बंधन होणारच. 'मला ज्ञान झाले'. हा अहंकार परमार्थाला काय उपयोगी?

तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपली प्रमा [निश्चय] । करितसे सोहं मा [मीच ते ब्रह्म आहे] । ऐसा बंधु ॥ ३-२३ ॥

मी परमात्मा, मीच श्रीहरी 'सोहं' वदणे बंध असे | जो आहे मी, सदाची आहे, त्यासि घोकणे कां तैसे ?|| ४६.

श्वासोश्वासाद्वारे 'सोहं' हा ईश तत्वाचा संकेत आपल्याला विरक्ती येऊन आपण आत्मज्ञानाचा वेध घ्यावा यासाठी आहे.

नुसते 'सोहं' घोकून उपयोग नाही, तर प्रत्यक्ष अनुभूति शिवाय सारे व्यर्थ आहे.

ओवी क्रमांक २३ वर श्री राजाराम बुवा ब्रह्मचारी [अनुभव अमृत रहस्य] यांचे 'सोहं' वर भाष्य

पूर्ण श्वास अंतरी घेउनी, उदर जरा ना हालविता | हळू सोडणे त्या बाहेरी, कुंभक बाहयचि तो करिता || ५३..

दीर्घ कुंभकी निश्चल उदरी, विना श्वास तद्रूप व्हावे | देहबुद्धी ती सहजी जाई, सकल पाही साक्षीभावे || ५४.

दृष्टी तेंव्हा आंतचि वळवी, चित्ती चंचलता ती नसे | पूर्ण भान ते आत्मरूपाशी, अन्य भाव कांही न असे || ५५.

हीची हरीशी समरसता नि, द्वैत पुरे विरूनी जाणे | 'सोहं' चे ना ज्ञान न केवळ सोहं हेचि अनुभवणे || ५६

म्हणुनि माऊली स्पष्टचि सांगे, सोहं भावहि सोडावा | त्याद्वारे जे ज्ञान होतसे, भासचि तोहि मानावा || ६४ .

श्री राजाराम बुवा ब्रह्मचारी महाराज यांनी सांगितलेली सुलभ साधना वर दिली आहे.

जें ज्ञान स्वयें बुडे । म्हणोनि भारी [वजनदार] नावडे । ज्ञानें मोक्षु घडे । तें निमालेनि [लयाला गेल्यावर]॥ ३-२४ ॥

निजबोधाचि येता प्रतीति, ज्ञान सहजी ते त्यांत बुडे | कार्य अविद्येचेचि ज्ञान ते, मोक्षा उपयोगी न पडे || ६५.

अहंभावाचे लोढणे घेऊन जड झालेले ज्ञान स्वतः तर बुडतेच, शिवाय धारण कर्त्यालाही बुडविते. ज्ञान हे साधन आहे, कैवल्य प्राप्तीनंतर ते लयाला जाते.

म्हणोनि परादिका वाचा । तो शृंगारु चौ अंगांचा [चार देहांचा] । एवं अविद्या जीवाचा । जीवत्व त्यागी ॥ ३-२५ ॥

चारी देहांच्या त्या शोभा, चारहि वाणी विलसतसे | अहंभाव नासता अविद्या, चारी वाणीसह नासे || ६८

तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें । आपुलेपणें उरे । बोधु जो कां ॥ ३-३१ ॥

मावळता तो द्वैतभाव नि, देहबुद्धि ती जरी नुरली | 'ब्रह्म असे मी' या बोधाची, स्मृति अहं भावे उरली || ८०.

बोध जाहला आत्मरुपाचा, ज्ञानघना त्या ओळखिले | अनुभूतीस ना समरसता परि, बोधे दूरचि राखियले || ८१.

या चारी वाणी महाकारण देहासहित चारी देहांच्या शोभा आहेत. अहंभाव विरला की त्याही देहभाव व अज्ञानासकट लयाला जातात. त्यांनी दिलेल्या बोधाने स्वरूपाचे ज्ञान होते, परंतु बोध होऊनही बोधातील मी-पणाच्या छुप्या अहंभावाने आत्मदेवाशी सामरस्य होत नाही. या बोधाचे ऋण फिटणे आत्मज्ञानासाठी म्हणूनच आवश्यक असते.

तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां । तें पायां पडोनि मियां । सोडविलें ॥ ३-३२ ॥

ऐसे जे ऋण शेष राहिले, फिटण्या मार्गचि ना उरले | गुरुचरणाशी आश्रय घेऊनि, वंदन करुनी, फेडियले || ८३.

असे जे शेष राहिलेले ऋण राहिले होते, ते फिटण्याचा कोणताही मार्ग न उरल्याने मी गुरुचरणाशी पूर्ण समर्पणभाव धरून केलेल्या वंदनाने फेडून टाकले.

म्हणोनि परा पश्यंती । मध्यमा हन [आणि] भारती [वैखरी]। या निस्तरलिया लागती । ज्ञानीं अज्ञानींचि ॥ ३-३३ ॥

चारही वाणी मार्ग दाविती, ज्ञान होतसे मुक्तिचे | परि त्या बोधे अहं मिटेना, ऋण ही फिटेना बोधाचे || ८८.

म्हणुनि शरण ते सद्गुरुचरणी, ऋण वाचांचे फेडुनि ते | निरसावे मग ज्ञानासंगे, अज्ञानाही ते पुरते || ९४.

आता श्रीगुरु चरणी पूर्ण समर्पण करून या चारही वाणीच्या ऋणातून मुक्त झालो. मग ज्ञान आणि अज्ञान या दोहींचाही लय झाला. ज्ञान सूर्याच्या दिव्य प्रकाशाने पुरते आत्मभान प्रत्ययाला येवो. श्री गुरूला जीवन समर्पण करून चिरंतन अमृतावस्था लाभो.

अमृत गंगा-तृतीय कलश समाप्त

तैसें पिऊनि अज्ञान । तंववरी वाढे ज्ञान । जंव आपुलें निधन [मृत्यू] । निःशेष साधे ॥ ४-१० ॥

ज्ञान वाढते निवृत्तीने, निरसित प्रपंच अज्ञाना | पूर्ण निरसने, ज्ञानहि विरते, अज्ञानासह त्याच क्षणा || २७ .

पूर्ण ज्ञानघन आत्म्या नलगे, जाण ती दुजिया ज्ञानाची | स्वयंसिद्ध अस्तित्वा जाणे, गरज त्यांस ना बोधाची || २८.

जैसें कल्पांतीचें भरितें । स्थळाजळा दोहींतें । बुडविलिया अरौतें [अलीकडे] । राहोंचि नेणें ॥ ४-११ ॥

कल्पांती होता ते जलमय, जळी स्थळी पाणीच पाणी | सर्वव्यापी ते जलची असता, भेद पूर्ण गेले मिटुनी || २९

तैसे प्रतीतिसागरी विरता, अलगपणाचा लय होई | ज्ञानाज्ञानहि भेदचि नुरले, सारे ज्ञानमयचि होई || ३०

तैसे अज्ञान आटोनियां । ज्ञान येतें उवाया [विकासाला]। ज्ञानाज्ञान गिळूनियां । ज्ञानचि होय ॥ ४-१४ ॥

आटवुनि अज्ञाना तैसे, विकास ज्ञानाचा होई | नुरे ज्ञान वा अज्ञानही ते, शुद्ध ज्ञान एकचि राही || ३५.

विवेक व विरक्तीयुक्त आचरणाने, अज्ञानाचा पूर्ण लय करून वाढणारे ज्ञान आपले काम संपले, हे जाणून स्वत: बाजूला सरते. आणि निखळ ज्ञानमय अवस्था प्राप्त होते. त्यासाठी स्वयंज्ञानघन आत्म्याला कुणाचेही सहाय्य नको असते. आत्मबोधाची प्रतीति होताच प्रलय काळी सर्व जलमय होण्यासारख्या वेगळेपणांचा लय होऊन एकमेव श्री हरीचे अस्तित्व जाणवते.

म्हणोनि ज्ञानें उजळे । कां अज्ञानें रुळे [झांकले जाते] । तैसें नव्हे निर्वाळें [शुद्ध] । ज्ञानमात्र जें ॥ ४-१७ ॥

झांके ना उजळे कवणेही, शुद्ध ज्ञान आत्माची असे | दुज्या न ज्ञाने, जाणीव त्याची, स्वये ज्ञानमय पूर्ण वसे || ४३.

कुणा अन्य ज्ञानाने उजळावे अगर अज्ञानाने झांकोळून जावे किंवा अन्य कुणा करवी जाणले जावे, असे आत्म्याचे स्वरूप नसून ते स्वयंभू ज्ञानमात्र आहे.

***परी ज्ञानमात्रें निखळें । तेंचि कीं तया कळें । काई देखिजे बुबुळें । बुबुळा जेवीं ?* ॥ ४-१८ ॥**

जरी ज्ञानमय पूर्णचि आत्मा, आपुल्या ज्ञाना ना जाणे | बुबुळे जैशी सारे पाही, शक्य न आपणाशी बघणे || ४५.

आत्म्या अस्तित्वाची जाणीव, स्वसंवेद्य ऐसी नित्य असे | त्यासी केवळ ते अनुभवणे, जाणणे नि पाहणे नसे || ४८.

***तैसें आपणयां आपण । जाणतें नव्हे जाण । म्हणौनि ज्ञानपणेंवीण । ज्ञानमात्र जें* ॥ ४-२२ ॥**

आत्मा आपुल्या स्व-रुपाचा ना, बोध कदापि घेत असे | ज्ञानपणाविण ज्ञानमात्र तो, जाणीव नेणीव त्यास नसे || ५६.

कांही जाणून घेण्यासाठी जाणून घेणारा-ज्ञाता-आणि ज्ञेय, असे द्वैत हवे. आत्मदेव एकमेव सारेच कांही असता ज्ञेय आणि ज्ञाता हे द्वैत त्यांचे ठायी संभवत नाही. त्यामुळे आत्मा स्वत:कडे बघणे शक्य नाही. आत्मा दिसत नाही तो अनुभवावा लागतो.

***तैसें असणें आणि नसणें । हें नाहीं जया होणें । आतां मिथ्या ऐसें येणें । बोलें गमे* ॥ ४-२५ ॥**

ब्रह्मावर आभास जगत हे, क्षणिकचि अस्तित्वहि जया | लौकिक असणे, वास्तव नसणे, कारण ती केवळ माया || ६८.

परि होई हे सारे कांही, चैतन्याच्या शक्तीने | 'नसे ब्रह्म' हे फोल बोलणे, खेळ कुणाच्या मर्जीने ?|| ७१.

आत्म्याच्या ठिकाणी कांही असणे अगर नसणे, ज्ञान वा अज्ञान असे नसते. तो अनंत आहे. सारे कांही आहे, पण आपणच सारे कांही आहोत हा भाव नाही. म्हणून 'तो नाही' असे बोलणे निरर्थक आहे. सारे चराचर त्यावरच पाण्यावरील लहरीसारखे ऐक्याने विलसत आहे.

म्हणोनि कांहीं नाहींपण । देखता नाहीं आपण । नोहूनि असणेनवीण । असणें जें ॥ ४-३१ ॥

त्यास न कांही होणे लागे, असणे अथवा ना असणे | त्याच्या अस्तित्वाची न शंका, विश्व शून्यची तयाविणे || ९१.

आत्म्याठायी कोणतीही क्रिया नसते. त्यामुळे आपले असणे अगर नसणे यासाठी त्याला कांहीच करावे लागत नाही.ते सहजी घडत राहते. म्हणून तो नाही असे अनुमान चुकीचे आहे. तो आहे म्हणून तर हा विश्वाचा एवढा कारभार सुरळीत चालला आहे.

निदेचें नाहींपण । निमालियाहि जागेंपण । असिजे कां नेण । कोणी न होऊनि जैसें ॥ ४-४१ ॥

जागृति निद्रा संधिकाली, उभय स्पर्शी जी स्थिति असे | सांडुनी दोही, शुन्यी रंगणे, निजस्वरूपचि ते तेथं वसे || १२०.

निद्रारंभी वा ओसरता, रात्री वा ब्राह्मी काली | सहजी स्फुरते आत्मप्रभा ती, स्थिर बसुनी या समकाली || १२१.

देहभाव पुरता विसरोनी, आज्ञाचक्री दंगावे | ये शून्याची सहज अनुभुती, शांत न कांही चिंतावे || १२३.

अनुभव घ्यावा स्व-स्वरूपाचा, निराकार व्याप्ती त्याची | नुरे ज्ञान नि ज्ञाता दर्शन. निखळ अनुभूति श्री हरीची || १२४.

सारी असे ती, एकचि सत्ता, अद्वैती रंगुनी जावे | स्वानंदाचे अमृत असता, कडु विषया कां प्राशावे ?|| १२५.

ज्ञानदेवांनी संकेत दिलेली ही एक उत्तम सुलभ साधना आहे. अनुभूति प्रसन्न व उत्तेजक असते. एकदा त्याची रुचि जाणवली की, ती अनुभूति मनात पक्की नोंदवून ठेवावी. सरावाने केंव्हाही ही अनुभूति येऊ शकते. अर्थात मनाची शुद्धी व निष्काम विरक्त आचरण ही पूर्व तयारी हवी.

हेच खाली श्री राजाराम बुवा यांनी अधिकारी वाणीत सांगितलेले आहे. [अशा वेळी सुषुम्ना नाडी चालणे उपयुक्त असते. त्या वेळी दोन्ही नासिकेतून श्वास येऊ जाऊ लागतो. सहजी प्राण व अपान दोन्ही सम असतात. श्वासावर लक्ष ठेऊन प्रबळ इच्छेने हे सहजी जमू लागते]

- श्री राजाराम बुवा ब्रह्मचारी यांनी अध्यायाचा केलेला उपसंहार -

व्यष्टि[वेगळी विशिष्ट व्यक्ति**]]मानुनी असे जीव तो, ईश्वर सकलाठायी असे | आकारांच्या पैल अनंते, आत्मा सकला व्यापितसे ||१३५.**

ईश तत्व ते सकला जाणे, त्याविण ती सारी माया | निद्रा-जागृती संध्याकाली, निजरुप येई भेटाया || १३६.

मायातीतचि होऊनि सहजे, स्वानंदी रमुनी जावे | 'एक्केचाळीस' म्हणुनि लिहिली, निजरुपातची दंगावे || १३७[४१व्या ओवीचे महत्व]

निद्रादौ जागरस्यांते यो भाव उपजायते | तं भावं भावितं साक्षात् जीवन्मुक्तो भवेत्सदा |४४|| {राजाराम बुवा रचित }

निद्रारंभी वा तिज अंती, सहज भाव अंतरि स्फुरतो | तेचि असे निजरूप आपुले, समरसता हरि अनुभवतो || १३८.

बोध येई जो त्या समयाला, स्मृतीत त्यासि ठेवावे | शांत मनाने आठवूनी त्या, अद्वैती रमुनि जावे || १३९ . [अनुभव अमृत रहस्य]

श्री ची स्थापना झालेली आहे. आज सायंकाळी गौरींचे आगमन होत आहे, आपण वाचले, त्याचा अनुभव घ्या. माऊलीने म्हणूनच आज आपल्याला हे अमूल्य रहस्य उकलून दाखविले. आत्मदेव श्री गणेशाची अनुभूति घ्या, आंतल्या आवाजाने माऊली आहेच मार्ग दर्शनाला, अनुभव घ्या आणि जीवन प्रसन्न आणि कृतार्थ करा.

अमृतगंगा कलश चवथा समाप्त

अमृतगंगा कलश पांचवा { सच्चिदानंद निरूपण }

श्रुतींच्या निर्देशानुसार सद्‌चिदानंद या तीन शब्दांनी आपण श्री हरीला आळवितो. मात्र आपण सद्‌चिदानंद आहोत हे श्रीहरीला माहीत नाही. या शब्दांची उकल आणि त्याचा नेमका हरीशी संबंध ज्ञानदेवांनी खुलासेवार सांगितलेला आहे.

सत्ता [अस्तित्व] प्रकाश [ज्ञान] सुख । या तिहीं तिहीं तीं उणे [नसणे] लेख । जैसें विखपणेंचि विख [वीष] । विखा नाहीं ॥ ५-१ ॥

अस्तित्व ज्ञान आणि आनंदे, श्रुति निर्देशिती श्रीहरीशी | हे तीनही जरि हरिठायी, ज्ञात नसे हे परि त्याशी || १.

जरि वीष ते मारक घेता, प्राशितसे तोची जाणे | विषास परि हे ज्ञात कदाना, जाणे जेणे अनुभविणे || ८.

जो हरीशी समरस होतो, त्याला या तिहीचा अनुभव येतो. जसे वीष हे मारक असते, हे विषाला माहीत नसते पण केवळ अनुभवणाराचा ते जाणतो. तसेच या त्रिपदांचे आहे.

येऱ्हवीं सच्चिदानंदभेदें । चालिलीं तिन्ही पदें । परि तिन्हीं उणीं आनंदें । केलीं येणें ॥ ५-६ ॥

अस्तित्व नि सुख ज्ञानची जगती, क्षणिक अनुभूति येत असे | शाश्वत तीनही श्रीहरी माजी, परि तो त्यांच्या पैल वसे || २३.

या तीनही पदांचा अनुभव आपल्याला विषयोपभोग घेताना येत असतो मात्र तो क्षणिक असतो. म्हणून या शब्दांचा श्रुतींनी आश्रय आत्मबोधासाठी घेतला

सत्ताचि कीं सुख प्रकाशु । प्रकाशुचि सत्ता उल्हासु । हें न निवडे मिठांशु [गोडी] । अमृतीं जेवीं ॥ ५-७ ॥

प्रकाशरूपे सत्ता विलसे, प्रकाशात उल्हास वसे | गोडी दे आनंद अमृती, गोडी नि अमृत भिन्न नसे || ३०.

अमृत आणि त्याची गोडी. अमृताचा द्रवपणा, त्याचे अस्तित्व आणि गोडी हे जसे एकच असते. तसेच सत्ता ज्ञान आणि सुख ही तीन पदे जरि वेगळी वाटतात तरी ती एक दुज्याशी संलग्न आहेत. सारे अस्तित्व प्रकाशरूपाने विलसत असते, त्यातच उल्हासाची अनुभूति येते.

एवं वस्तूसि जाणों जातां । जाणणेंचि वस्तु तत्वता । मग जाणणें आणि जाणता । कैचें उरे ? ॥ ५-१८ ॥

ब्रह्म वस्तुशी जाणो जाता, स्वये ब्रह्मचि होत असे | कुणी कुणाला काय जाणणे, ज्ञेय नि ज्ञाता अलग नसे || ७०.

ते वेळीं वरिसोनि मेघु । समुद्र होउनि वोघु [प्रवाह]। सरे दाऊनि मागु [खूणा]। राहे जैसा ॥ ५-२१ ॥

सिंधूजलची मेघ होऊनी, वर्षे, वाहुनी सिंधू बने | सारी कार्ये करी वाहता, तैसे जीवन हे जाणे || ७७.

हरी रुपातून आपण आलो, जीवन प्रवाहे मिळे हरी | जीवनात या अलिप्त राहुनी, हरिकार्यासि सदा करी || ८७.

आपण विशिष्ट कार्यासाठी शून्यातून येतो, विश्वकार्य करण्याचे साधन असलेल्या देहाद्वारे व्यक्त होतो आणि आपले कार्य झाले की, परत अव्यक्तावस्थेत जातो. आपले कार्य करण्यासाठी साधन व मार्ग तो देतो. रिकामे येतो आणि रिक्तच जात असतो,. मग कार्य करतांना त्यांत आसक्ती कशाला ? आसक्ती, स्वामित्व आणि कामना आपल्याला येथेच गुंतवून बंधनात अडकवितात आणि जन्म- मृत्यूचे चक्र सुरू होते. म्हणून वाट्याला आले ते निष्ठेने पण अलिप्तपणे करीत जावे. कार्यालयात आपण असेच तर करतो. हेच जल चक्राच्या उदाहरणाने येथे दिलेले आहे.

तैसा सच्चिदानंदा चोखटा [शुद्ध]। दाऊनि द्रष्ट्या द्रष्टा । तिन्हीं पदें लागतीं वाटा । मौनाचिया ॥ ५-२५ ॥

सच्चिदानंद तिन्ही पदे, दावित श्री हरी, कार्य सरे | तिन्ही पदे ही मौनची धरुनी, आपुल्या वाटे जात त्वरे || ९८.

म्हणोनि सदसदत्वें गेलें । चिदचिदत्वें मावळलें । सुखासुख जालें । कांहीं ना कीं ॥ ५-३२ ॥

सत्ता ज्ञान नि सुख ते नित्यचि, जेथे जेथे हरी असे | | सारे हरिमय विश्वी असता, त्रिपदांची या गरज नसे || १२१.

विषयानंदी कदा न गुंते, हरिठायी मांगल्य भले | वर्षावी ती सतत मंगळी, माऊलीने ते प्रार्थियले | १२६.

तिन्ही पदे मार्गदर्शक आहेत. त्यांचा प्रत्येक पदाचा खुलासा वर दिला आहे. आपण विषयानंदाची अनुभूति टाळून श्री हरीशी समरस होऊन त्यांचा खरा शाश्वत अनुभव घ्यावा असे ही त्रिपदे सुचवितात

तैसें सुखा आतोनि निघणे [वेगळे होणे] । तें सुखीयें सुखी तेणें । हें सुखमात्रचि मा [मग] कोणें । अनुभवावें ?॥ ५-३५ ॥

सुखांत ओतप्रोत होऊनि, सुखातचि रंगुनी जावे. | स्वये अनुभवी आपणाशीची, कुणी कुणाला भोगावे || १३१.

तैसें आपुलेनि सुखपणें । नाहीं जया सुखावणें । आणि नाहीं हेंही जेणें । नेणिजे सुखें ॥ ५-३७ ॥

ब्रह्मभावी समरसता सुख, आणि अनुभूती अन्य नसे | हरी ठायी तर द्वंद्व नसेचि, सुखी सुखमयता नित्य असे || १३७..

विशेष म्हणजे विषयाच्या सुखासारखा या सुखाचा क्षणिक अनुभव येत नाही तर, आपणच सुखमय अवस्थेशी समरस होऊन जातो.

सर्व सिद्धांताचिया उजरिया [उदय] । सांडोनिया निदसुरिया [स्वप्नासारखे निरर्थक]। आपुलिया हात चोरिया । आपणचि जो ॥ ५-३९ ॥

सकल शास्त्र सिद्धांताहाती, आत्मतत्व लागले कधी? | स्वयेचि लपवी जे निजरूपा, येईल कैसे ते वेदी? || १४३.

श्रवणे नि वाचने येत ना, ब्रह्मसुखाची ती प्रतीति | विवेक वैराग्ये अनुभवणे, ज्यासि हवी त्याची प्राप्ती || १४४.

जो आपलेच स्व-रूप लपवित असतो, शास्त्रे त्याचे काय वर्णन करणार? तो शब्दातीत आहे. मुक्याला साखर खाऊ घातल्यावर तो आपला अनुभव कसा व्यक्त करणार ? अनुभूतीनेच तो जाणला जातो.

आतां यावरी जे बोलणें । तें येणेंचि बोलें शहाणें । जें मौनाचेंही निपटणें । पिऊनि गेलें ॥ ५-५३ ॥

शब्द संपुनि मौनी जावे, मौनातेही विसरावे | शब्द हि नाही, मौनहि नाही, विचारांत ना दंगावे || १७४

स्व-संवेद्य ऐसे स्फुरण अंतरी, त्यांतही ना ते गुंतावे | अनंत अस्तित्वाची प्रतीति, निराकार निर्गुण व्हावे || १८१.

माझे विरता पुरते मीपण, विचार शब्द नि मौन नुरे | निश्चल अनंत समरस होता, हरीविण अन्य न कांही उरे || १८२.

भावे अंतरी ॐ श्रवणाने, नादामध्ये रंगावे | नाद संपता, कंपनी समरस, त्यासंगे शून्यी जावे || १८३.

कां गजबजला उबा [उकडू लागल्याने]। पांघुरणें केळीचा गाभा । सांडी[सोडून देतो-काढतो] तेव्हेळीं उभा । कैंचा कीजे ? ॥ ५-६० ॥

गाभा केळीचा वेष्ठियला, सोपटाचिये आवरणे | सोलिताची वेष्टणे तयाची, गाभ्याचे विरुनी जाणे || १९२.

देहभावना तर्क कल्पना, याच सोपटे वेष्टियला | निराकार निर्गुण परमात्मा, आतुर आपुल्या भेटीला || १९३.

सुखासनी बैसुनि एकाग्र, अंत:करणे स्थिर व्हावे | अनंत अनुभविता स्वानंदे, समरस हरिमाजी व्हावे || १९४.

शब्द, विचार आणि कृती तिहींचेही मौन पाळावे आणि वर दिलेल्या मार्गाने श्री हरीशी समरस व्हावे.

तैसें अनुभाव्य अनुभाविक । इहीं दोही अनुभूतिक । तें गेलिया कैचें एक । एकासिचि ॥ ५-६१॥

हरिची अनुभूति ज्यास होतसे, स्वयेच होई तोचि हरी | हरिने अनुभूति घेता हरिची, अनुभव जाई पैलतिरी || १९८.

***अनुभवो हा ठाववरी । आपुलीचि अवसरी । तेथें अक्षरांची हारी [ओळ] । वाईल[प्रवेश] काई ?* ॥ ५-६२ ॥**

जेथे अनुभव त्रिपुटी विरते, अनुभव होई पूर्ण मुका | तेथे पंक्ति त्या शब्दांच्या, ठरती उपयोगास फुका || २०३

अनुभूति झाल्यावर आपण परबरहमाशी पूर्ण समरस होतो. मग त्या तीन पदांची गरज उरत नाही. आपण त्याचाच स्वानंद घेतो.

***म्हणोनि बंधमोक्षाचें व्याज [निमित्त]। नाहीं; निमालें काज [काम] । आतां निरूपणाचें भोज [कौतुक] । वोळगे [शरण जाई] जरी* ॥ ५-६६ ॥**

बंध मोक्ष जंववरि कल्पना, तंवचि सत् चित् आनंद पदे | शब्द अन्यथा ना उपयोगी, मुक्त होतं जंव स्वानंदे || २०८.

परि कधी जंव निरूपण करणे, कोड पुरविण्या चर्चेचे | पदे तीनही ये उपयोगी, हे उपयोगचि शब्दांचे || २०९.

आपण बद्ध नाही तेंव्हा मुक्त होण्याचा प्रश्नच उरत नाही. कशासाठी देहाला पीडा देऊन वा अन्य साधने करून त्याशी समरसता लांबवायची? मिळालेल्या आयुष्यात त्याची अनुभूति घेऊ या. आणि स्वानंदात रममाण होऊ या.

अमृत गंगेचा पंचम कलश समाप्त

अमृत गंगेचा सहावा कलश {शब्द खंडन}

या अध्यायात ज्ञानदेवांनी शब्द भौतिक जीवनात उपयोगी असला, तरी आत्मबोध होण्यास-कैवल्याचा मार्ग दाखविण्यास त्याचा उपयोग नाही आणि अविद्या किंवा अज्ञान हे अभावात्मक असतात, त्यांना वेगळे अस्तित्व नाही असे ठामपणे प्रतिपादिलेले आहे.

***पहातें** [डोळस] **आरिसा पाहे । तेथें कांहींचि नवल नव्हे । परि दर्पणें येणें होये । न पाहतें** [न दिसणाऱ्या गोष्टीही] **पाहतें* ॥ ६-२ ॥

दिसते त्यासी दावी आरसा, नवल यांत परि कांही नसे | अदृश्यासहि दावी शब्द तो हा महिमा शब्दात असे || ३.

मायेने जो अंध जाहला, जीवा लाभता गुरुकृपा | शब्दाकरवी ज्ञानदृष्टीने, पाहू शके तो निजरूपा ||४.

आरशाने डोळसाला हवे ते पाहता येते, परंतु शब्दांचे वैशिष्ट्य म्हणजे जो अंध आहे त्यालाही जे दिसत नाही किंवा जे आपण पाहिलेले नाही, त्याचे शब्दचित्र सुद्धा मन:चक्षु समोर उभे करू शकतो. जो मायेने अंध झाला आहे, त्याला गुरुकृपेने ज्ञान दृष्टीचा लाभ शब्दद्वारे होऊ शकतो.

***विधिनिषेधांचिया वाटा । दाविता हाचि दिवटा** [मशालजी]**। बंधमोक्ष कळिकटा** [कलह- भांडण] **। शिष्टु हाचि* ॥ ६-५ ॥

विधिनिषेध वाटांना दावी, मशालजी बनुनिया स्वये | मुळात नाही तेहि निर्मिले, बंध मोक्षहि जगती तये || १५.

नित्यमुक्तचि जीव जरीहि, बद्ध भासवित तो त्याला | कर्मकांड नि साधन विधीच्या, स्तोमाने त्या गांजविला || १६.

शब्द काय करावे आणि काय करू नये या विधी निषेधाच्या वाटा दाखवीत असतो. यानेच बंधनातून मुक्त कसे व्हावे याचे स्तोम माजविले. खरे तर जीव कधीच बंधनात नसताही, त्याचे मागे हा आभास करून कर्मकांडाच्या जाळयात अडकवून टाकतो. कुणीही बंधनात नसते. बंधन आपण

आसक्ती व स्वामित्व तसेच ममत्व यांनी तयार करतो. घटना तीच असते पण तिशी आपला संबध समजताच आपण सुख-दुःखाचा अनुभव घेतो. या जगातले कांहीच आपले नसताही, कांही काल त्याशी आपली जवळीक होताच आपण सुख-दुःख ओढावून घेतो. हेच बंधन आहे.

हा अविद्येचा आंगीं पडे । तैं नाथिलें [जे नाही ते]ऐसें विरूढे [रूढ करतो]। न लाहिजे तीन कवडे । साचा वस्तु ॥ ६-६ ॥

सख्य अविद्येसि तो करिता, मिथ्याहि सत्यचि वाटे | आणि सत्य जे असेचि शाश्वत, ते परि वाटतसे खोटे || १८.

शब्द अविद्येची–अज्ञानाची संगत धरून जे नाही ते भासवत असतो. देहबुद्धीत अडकवून ठेवतो. आणि जे सत्य आहे-शाश्वत आहे- त्यापासून दूर ठेवतो. त्याची आत्मज्ञानाच्या क्षेत्रात तीन कवड्याही किम्मत नाही. देह आपले केवळ साधन असताही आपण त्याच्यातच अडकून जातो. देहाला होणारे मान-अपमान स्तुती-निंदा द्वेष- प्रेम यांनी आपले मूळ आनंदी स्वरूप अनाठायी काळवंडून टाकतो.

शुद्ध शिवाच्या शरीरीं । कुमारु हा जिउ [जीव पणाची भावना] भरी । जेवीं आंगें पंचाक्षरी [भगत]। तेवींचि बोलु ॥ ६-७ ॥

निर्दोष नि तो शुद्ध असे शिव, कर्मफलांचे भय दावी | सोडविण्यास्तव वृथा तयाला, जन्म-मृत्यु चक्री फिरवी || २४.

योग याग विधि यांत गुंतवी, कधि सन्मार्गा परि लावी | निजांगीच ज्योतिर्लिंगाते, अहं सोडिता ते दावी || २६.

शिव मुळात शुद्ध असताही तू जीव आहेस असे त्याचे मनावर बिंबवून त्याला तो कर्म फळांच्या भयाचे निमित्त करून उगाच जन्म-मृत्यू च्या चक्रात अडकवून ठेवतो. या जगात आपण साक्षी भावाने कार्य न करता त्यांत अडकून जाऊन कार्य करतो. आपण कार्यालयात जसे त्या त्या भूमिकेनुसार पण अलिप्तपणे आचरण करतो, पण घरी जातांना आपण ती भूमिका विसरून आपल्या वेगळाल्या भूमिकेत जातो आणि त्या त्या

भूमिकेनुसार आचरण करतो- वाट्याला आलेल्या कामानुसार बदलत्या भूमिकेला न्याय देत अलिप्तपणे आचरण केले तर कर्मफळाच्या भोगाचा प्रश्नच येणार नाही. त्यासाठी शब्द नव्हे तर आपला आंतला आवाज सांगेल तसे आचरण असावे.

जे प्रवृत्ति आणि निवृत्ति । विरुद्धा ह्या हातु धरिती । मग शब्दें़चि चालती । एकलेनि ॥ ६-१० ॥

शब्द चालवी प्रवृत्तीला, देहबुद्धीतचि गुंतवुनी | एकलाची वैराग्य विवेके, निवृत्ती बोधा आणी || ३४.

प्रवृत्ती आणि निवृत्ती या उभय विरोधी असूनही त्यांना हाताशी धरून शब्द चालवतो. उपवास, व्रते अशा प्रवृत्तीमय कर्मकांडांत अडकवितो आणि दुसरीकडे हा संसार एक आभास आहे यांत गुंतू नको म्हणून निवृत्तीही शिकवीत असतो. याने कैवल्याच्या मार्गाची ओळख पटते परंतु प्रत्यक्ष अनुभूतिचा लाभ न झाल्याने आत्मदर्शन दूरच राहते,

किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु । परी ययाही *[आत्म्याबाबत]* ***संबंधु । नाहीं येथें*** ॥ ६-१२ ॥

शब्द पटाईत स्मरण कराया, जरी विसरले मनी कांही | परी आत्मा तर नित्यची जागृत, स्मरणाची गरजची नाही || ९.

विसरलेल्या गोष्टींचे स्मरण करून देण्यात शब्द पटाईत आहे. मात्र आत्म्या नेहमीच जागृत असल्याने व स्व-संवेद्य असल्याने स्मरण-विस्मरण असे कांहीच नसल्याने तेथे शब्दाचा उपयोग नाही.

जागतेया नीद नाही । मा जागणें घडे काई ? । स्मरणास्मरण दोन्हीही । स्वरूपीं तैसीं ॥ ६-१६ ॥

पूर्ण जागृती सावधानता, निद्रा जागृती भाव नसे | विसर नि आठव ना स्वरूपीही, स्व-स्थ भाव हा एक वसे || ४९

परंतु येथे शब्द ख्यात जो, स्मरणदानी सर्वत्र असे | त्याचा ना संबंध प्रतितीशी, स्वसंवेद्यता आत्म्यात वसे || ५१.

म्हणोनि नाशापुरती । अविद्या नाही निरुती । नाहीं आत्मा आत्मस्थिति । रिगे ऐसा **॥ ६-२३ ॥**

अविद्या न होतसे कदापि, अडथळा ती बोधासाठी | अविद्येस संबंध असेना, नित्य हरीची आत्मस्थिती || ६७.

सदा प्रकाशित आपुले ठायी, निजस्वरूप ऐसेची असे | साधनांची ती गरज कशाला ? मी ब्रहमाविण अन्य नसे || ६९.

अज्ञान- अविद्या हिचा नाश झाल्याशिवाय आत्मबोध होत नाही हे म्हणणे चुकीचे आहे. आत्मा नेहमीच सर्वत्र अस्तीत्वात असतो, त्यानेच सारे चराचर व्यापले आहे. त्याचा अविद्येच्या नाशाशी संबंध नाही. आपण प्रत्यक्ष परब्रह्म आहोत हेच सत्य आहे, त्यासाठी कुणाच्या सांगण्याची वा शब्दांची आवश्यकता अजिबात नाही. आपण संसारातील सारी कर्तव्ये निष्ठेने पण अलिप्तपणे पार पाडावित, पण अंतरी आपल्या मूळ स्वरूपाची आठवण मात्र सोडू नये.

अविद्या येणें नांवें । मी विद्यमानचि नव्हे । हे अविद्याची स्वभावें । सांगतसे **॥ ६-३८ ॥**

नांव तियेचे असे अविद्या, स्वयेचि सुचवी, मी न असे | विद्यमान जी मुळीच नाही, तिचिये असणे ते कैसे ? || ९१.

अविद्या हे नांवच सांगते की ती अस्तीत्वात नाही. ती केवळ सावलीसारखी अभाव रूप असल्याने तिला अस्तित्वच नाही. आपल्याला एखाद्या गोष्टीचे ज्ञान नसले म्हणजे आपण अन्य कुणाकडून ती माहिती घेऊन अगर वाचून त्याची माहिती करून घेतो. याचा अर्थ आपल्यात सुप्त असलेल्या त्या ज्ञानाची जागृती होते. ज्ञानाचा अभाव असेपर्यंत ते अज्ञान असते. अज्ञान ही फक्त अभावात्मक शब्द योजना आहे. तिचे वेगळे अस्तित्व नाही.

***तैसा आत्मराजु तंव । ज्ञानमात्रचि भरींव । आतां ज्ञानें ज्ञानासि खेंव [आलिंगन]। कैसें दीजे ?* ॥ ६-८७ ॥**

ज्ञानमये त्या निजज्ञानस्तव, दुजे ज्ञान कां शोधावे ?| ज्ञान तयाचे होण्या कां ते, ज्ञान दुजे आलिंगावे ?|| १५९.

आत्मदेव पूर्ण ज्ञानमय आणि सर्वज्ञ आहे. त्याला इतर कुणी येऊन तो काय आहे, याची ओळख करून द्यावी लागत नाही.

***या शब्दाचा निमाला । महाप्रळयो हो सरला । अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा* ॥ ६-१०३ ॥**

आभाळीची जाता अभ्रे, कुंद दिवसही तो सरला | शब्दही विरता, मौनानेचि आत्मबोध तो अनुभवला || १७८.

शब्दांनी जगती विहरावे, आत्मप्रतीति त्या क्षेत्र नसे | शब्द इंद्रिये त्या न जाणती, आत्मदेव तो पैल असे || १८०.

आत्मबोध झाला म्हणजे एकमेव त्याचीच सत्ता आपण अनुभवतो. शब्द आणि इतर सारेच विरून जाते. केवळ उरते ते आत्मभान. मग आभाळात अभ्रांच्या मुळे अंधारलेल्या दिवसाची उदासी जशी अभ्रे निघून गेल्यावर निघून जाऊन जसा मोकळेपणा येतो. तसे मुक्त प्रसन्न वाटू लागते. आपण शांत मौनात बसले म्हणजे मग विचार, कल्पना, संकल्प विरून गेल्यावर सहजी आत्मभान होते.

अमृत गंगा- कलश सहावा समाप्त

अमृत गंगा –कलश सातवा {अज्ञान खंडन}

हा अत्यंत महत्वपूर्ण अध्याय आहे. यांत साधनेंचे गुह्य बऱ्याच जागी ज्ञानदेवांनी संकेताने दाखविलेले निर्देशित केलेले आहे. या अध्यायाचा संक्षेप करतांना मूळ विषयाचा तसेच साधनेचा उपयुक्त भाग सहजी उपलब्ध होईल याचा विचार केलेला आहे. आत्म्याच्या ठिकाणी अज्ञान असते काय? या कांही शास्त्रकारांच्या विधानाचे खंडन हा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे.

तैसें आत्मा अज्ञान असकें[असते] । असतां तो न मुके । तैं अज्ञान शब्दा लटिके । आलेंच कीं ॥ ७-२३ ॥

आत्मा होताची अज्ञानी, विश्वप्रेरणा मावळली | परि ऐसे तर कांही दिसेना, मिथ्या वार्ता कुणी दिधली? || ४१

तैसें अज्ञान हें अज्ञान नोहे । तरी आत्मा असकें असों लाहे । येऱ्हवी अज्ञान होये । लागलाचि ॥ ७-३४ ॥

आत्मस्वरूपी प्रविष्ट होता, नुरेच मग अज्ञानपणा | तेहि ज्ञानमय होईल तत्क्षणी, समग्र येईल ज्ञानपणा || ५६.

अज्ञान कार्यपणें । घेइजे तें अज्ञान म्हणे । तरी घेतांहि करणें [इंद्रिये]। तयाचेंची ॥७-४८॥

प्रत्यक्षादि जीहि प्रमाणे, जरि कार्ये अज्ञानाची | इंद्रियेही होतिल अज्ञानी, कार्य करित जी बोधाची || ८५.

आत्म्याच्या ठिकाणी जर अज्ञान आहे, असे मानले, तर अज्ञानाच्या गुणधर्मानुसार आत्म्यालाही ते अज्ञानी बनविल आणि आत्माच जर अज्ञानी झाला, तर साऱ्या विश्वाचे ते प्रेरणा स्थान असल्याने विश्व कार्य स्तब्ध होईल. प्रेरणेचा अभाव असल्याने इंद्रियेही अज्ञानी होतील. विश्वाचे व्यवहार ज्ञानाविणा थंडावतील. पण तसे तर कोठेच दिसत नाही. त्यामुळे अज्ञानाने आत्म्याठायी ठाण मांडले आहे, हे विधान अगदी चुकीचे आहे.

आत्मया स्वप्न दाऊं । न शके कीर [खरोखर] बहू । परि ठायें ठाउ । निदे जो नेणें ॥ ७-५७ ॥

आत्मदेव तो सदैव जागा, झोप न ये अज्ञानाची | अभाव वस्त्रहि घालू शकेना, गोष्ट दूर ती स्वप्नांची || ९६.

आत्मा नित्य जागरूक असतो. त्यामुळे त्याला अज्ञानाची झोप लागणे शक्यच नाही. व ज्ञानाचा अभाव त्याठायी आणता येणे शक्य नाही.

तैसें आत्मा ऐसें नांव । न साहे आत्मयाची बरव [शोभा]। तैं कांहीं अज्ञान हांव । बांधतें कां ? ॥ ७-६० ॥

आत्मा हे नांवहि न साहे, ना शोभा मिरवी त्याची | ऐशा आत्म्याठायी होईल, वस्ती काय अज्ञानाची ?|| ९९.

एवं कोण्हेही परी । अज्ञानभावाची उजरी[उदय-प्रगटपणा] । न पडेचि नगरीं । विचाराचिये ॥ ७-७७ ॥

पूर्ण विचारे उमगे नाहीच, अस्तित्वही अज्ञानाचे | आत्मस्वरुपी विवेक नगरीत, अधिष्ठान ते ना त्याचे || ११८.

आत्मा हा निर्विकार असल्याने आपण अमुक आहोत असा भाव त्याठायी नसतो. मग विचार करणारांचे नगरीत अज्ञानाला कसा वाव असणार? अशा तऱ्हेने सारासार विचार केल्यावर हे समजते की, खुद्द अज्ञान हेच अस्तीत्वात नसल्याने त्याच्या आत्म्याच्या ठिकाणी असण्याचा विचार अगदी अनाठायी आहे.

तैसा जाणणेयाचा वेव्हारू । जेथें माखला[जोरात पुढे आला] समोरु । तेथें आणिजे पुरू । अज्ञानाचा ॥ ७-१०० ॥

जाणीवरुपे खळाळतो जो, प्रवाह आहे ज्ञानाचा | त्यासी विसंगत कसे म्हणावे, पूर असे अज्ञानाचा ? || १५१.

या आत्म्याच्या अस्तित्वाने सुरळीत चाललेल्या या विश्वात जाणिवेचे व्यवहार अगदी जोरात चाललेले दिसून येत आहेत, मग तेथे अज्ञानाचा पूर येणार कसा?

जो आपणासी नव्हे विखो [विषय] । तो कोणा लाहे देखो । जे वाणी न सके चाखों । आपणापें ॥ ७-११३ ॥

आत्मा नेणे निजस्वरूपाशी, कुणी दुजे जाणीत नसे | ऐशा निर्विकार परब्रहमाला, कोण आणि जाणील कसे ?|| १७३.

जीभ जशी आपलीच चव घेऊ शकत नाही, तद्वत आत्मा हा कुणाचाच विषय होत नसतो. त्यामुळे त्याने स्वत:ला जाणून घेणे संभवत नाही.

नाडिले** [फसविले] **जें वादीकोडें** [जुगाऱ्याचा एक खेळ]। **आंतुचि बाहेर सवडे** [पडे]। **तैसा निर्णो** [निर्णय] **सुनाथा**[व्यर्थ]**पडे ।केला जेथें

॥७-११६॥

खेळ गारुड्याचा पाहुनिया, व्यर्थ दवडिती द्रव्य खुळे | आत्मदर्शना तैसे सिद्धांती, भुलविती व्यर्थची ते सगळे || १७६.

आत्मदर्शनाचे विविध प्रकार वा साधना साधकांच्या गळी उतरवण्याच्या उद्देशाने कांही शास्त्रकारांनी आत्मविषयक ज्ञानाबाबत अज्ञान आहे, आणि त्याच्या प्राप्तीसाठी कांही साधना आम्ही सांगतो, त्याकरून आत्मानुभूती घ्यावी, असा अपप्रचार केला. हा प्रकार गारुड्याच्या खेळासारखा भुलविणारा आहे. आपले मूळ स्वरूप हे आपल्याला नित्यप्राप्तच असते त्याविषयी अज्ञान असणे संभवत नाही हेच सत्य आहे.

***मागिलिये क्षणीचीं अंगें**[दृश्ये] । **पारुसी म्हणोनियां वेगें । सांडूनि दृष्टि रिगे । नवेया रूपा* ॥ ७-१२७ ॥**

मागिल क्षणीची दृश्ये जीहि, मानुनि सारी पारोशी | झडकरि तीही टाकुनी देई, नवीन सृजि तो साजेशी || १९०.

***तैसीच प्रतिक्षणीं । जाणिवेचीं लेणीं । लेऊनि आणी । जाणतेपण* ॥ ७-१२८ ॥**

आत्मबोध तो व्हावा म्हणुनी, उत्कंठा जाहली जरी | अंतरीच्या आवाजे त्यासि, सुयोग्य जाणीव देत हरी || १९४.

***सर्वज्ञतेची परी । चिन्मात्राचे तोंडवरी** [स्वरूपी]। **परी तें आन घरीं | जाणिजेना* ॥ ७-१३० ॥**

सृष्टीमधल्या चैतन्यातचि, ज्ञानशक्ती जी दडली असे | हरीची सर्वज्ञता असे ती, त्या ठायीचि विलसतसे || १९६.

आपल्या ज्ञानशक्तीने आत्मा नित्य सृष्टीच्या स्वरूपी बदल घडवून तिचे नित्यनूतन स्वरूप कायम ठेवत असतो. येवढेच नव्हे तर ज्यांना आत्मज्ञानाचा विसर पडला आहे, त्यांच्या जाणिवेचा स्तर तो योग्य प्रकारे उंचावत असतो. हे कार्य तो आंतल्या आवाजाद्वारे करून मुक्तिच्या पांथस्थांना मदत करीत असतो.

पाणी कल्लोळाचेनि मिसें । आपणपें वेल्हावे जैसें । वस्तु वस्तुत्वें खेळों ये तैसें । सुखें लाहे ॥ ७-१३५ ॥

जलासंगती जलचि खेळे, आपुल्या लाटा कल्लोळे | आपणासंगे आनंदाने, तैसे ब्रह्महि ते खेळे || २०२.

हा विश्वाचा पसारा आत्मदेवाने आपल्याच निजांगावर धारण केला आहे. जसे पाण्यावर तरंग, लाटा यांनी खेळावे तसे हे आहे.

सहजें आघवेंचि आहे । तरी कोणा कोण पाहे ? । तें न देखणेंचि आहे । स्वरूप निद्रा ॥ ७-१५५ ॥

चित्स्वरूपचि विलसे जगती, आत्मानंदी पूर्ण रमे | स्वरूपनिद्रा हीच असे ती, जेथं सृष्टीरुप ते विरमे || २२८.

नाना न देखणें नको । म्हणे मीचि मातें देखो । तरी आपेंआप विखो । आपैसें असे ॥ ७-१५६ ॥

कुणी न द्रष्टा, दृश्य तसेही, भान विसरुनी भंवतीचे | आपण विरता आपणातचि, जाळे फिटते द्वैताचे || २३१.

यासाठी ना कांही साधन, स्वये न कांही चिंतियणे | एकाग्रचि त्या अंतःकरणे, सद्गुरु स्मरुनी अनुभवणे || २३३.

आत्म्याचे चित्स्वरूप सर्वत्र विलसत आहे. आत्मा आपल्या स्वानंदात नेहमी रंगलेला असतो. तोच सारे असल्याने त्याने आपल्याकडे किंवा दुसऱ्याकडे पाहण्याचा विषय येतच नाही. आत्म्याला न पाहता अनुभवणे हीच स्वरूप निद्रा. त्यांत आपणच आपले ठायी सहजी बिरुन जातो.

वेगळेपणाची जाणीव रहात नाही. यासाठी कांही साधन नको की उपासना नको. एकाग्र अंतःकरण करून स्वरूपाचा पाहण्याचा प्रयत्न न करता त्याचा अनुभव घेत रहावा.

विश्वाचें असे नाहीं । विपायें बुडालियाही[लय झाल्यावर] । तऱ्ही दशा ऐसिही । देखतचि असे ॥ ७-१६० ॥

विश्वाचे अस्तित्व हि बघतो, अभावहि तैसा बघतो | असणे नसणे हेही नसता, अभाव नसणे अनुभवतो || २३९.

आत्मदेव विश्वाचे अस्तित्व व सगळी उलाढाल तर बघतोच शिवाय त्याचा लय झाल्यावर सुद्धा त्याचा अनुभव घेत असतो.

कां दाटला डोळा डोळ्यां । डोळा चितारा [चित्रकार] होऊनियां । स्फुरे चोख म्हणौनियां । विस्मो नाहीं ॥ ७-१६४ ॥

बंद करुनिया उभय पापण्या, वरुनी दाबता बोटांनी | तेजोमय ते दर्शन दिसते, प्रगटे दडले जे नयनी || २५०.

स्वयेचि होऊनी चित्रकार तो, नेत्र चित्रितो रेषांना | तोचि सृजि नि तोचि पाहतो, रम्य कलाकृती नाना || २५१.

लष्कर-ग्वाल्हेर येथील योगीवर श्री महिपतीनाथ यांनी उकललेले रहस्य [अमृतवाहिनी]

उभय लोचना बंद करोनी, सोडुनि भौतिक अनुभूति | पूर्ण स्व-स्थ राहुनि पहावे, मौज दिसे दृष्टीसच ती || २५२.

हळू दाबणे नयना बोटे, दृष्टीला जेही दिसते | शांत पहावे लक्ष देऊनि, मौजचि अनुभूत ती होते || २५३.

सुंदर तेजोमय ती किरणे, आणि प्रकाशमय ज्योती | जणु रूप्याच्या तारा किंवा, चांदण्याचि येती जाती || २५५.

हा सारा जो दिव्यत्वाचा, सहजी खेळचि तेजाचा | अंतरात ही स्मृति साठवा, अनुभव हा दिव्यत्वाचा || २५६.

आपण आपले डोळे बंद करून त्यावर बोटांनी थोडा दाब द्यावा. तेंव्हा डोळाच चित्रकार बनून जी विविध दर्शने घडवितो, त्याचे अगदी छान वर्णन वर दिले आहे. अनुभव घेतल्यावरच त्यातला आनंद कळेल.

यालागीं एकें चिद्रूपें । देखिजे कां आरोपे । आपणयां आपणपें । काय काज ? ॥ ७-१६५ ॥

ब्रह्माठायी ना प्रवृत्ती, आणी निवृत्तीहि नसे | जे घडते ते विना क्रियाचि, बघणे वा ना बघणेही तसे || २५७.

ऐसें आपणया आपण । आपुलें निरीक्षण । करावें येणेंवीण । करितुचि असे ॥ ७-१७१ ॥

नित्यचि साक्षी आत्मदेव तो, स्वयेचि बघणे स्वरूपाशी | क्रियेविण हे बघणे होई, नलगे प्रवृत्ती ती त्याशी || २६४.

जग हा एक चिद्विलास आहे. एक चैतन्यच आपले आपल्याला पहात असते. आपल्या ठायी होणारे त्याचे स्फुरण [स्वसंवेद्य] होताच आपण त्याची अनुभूति घ्यावी. ही एक सहज क्रिया आहे. त्याठायी प्रवृत्ती आणि निवृती दोहींचा अभाव आहे. जे घडते त्यासाठी त्याला कोणतीही क्रिया करावी लागत नाही.

जोवरी आपण आहो जगती, अलिप्त राहुनी करि कर्मे | लक्ष जयाचे निजरूपातचि, स्वानंदी तो नित्य रमे || २६५.

स्थिती सुखाची वा दुःखाची, आत्मदेव त्या लिप्त नसे | सदा रमावे स्वानंदीची, तीच स्व-स्थिती सहज असे || २६६.

अहंकार स्वामित्व नि जगही, केवळ जागृतीत असती | निद्रेमाजी सुखद अवस्था, सारे विरुनिया जाती || २६७.

दृष्टी जाता ती बाहेरी, ममत्व भोगा निर्मितसे | तिज वळवावे अंतर्यामी, निजरूप आनंदीच असे || २६८.

आपणाशीचि आपण बघणे, देह विसरुनी अनुभवणे | साक्षीभावे होती कर्मे, परि असणे ते हरिपणे || २६९

आपण या जगात कांही विशिष्ट कार्य करण्यासाठी येतो. आपण येथले नसून प्रत्यक्ष परब्रह्माचे अंश आहोत. आपण येथल्या माया बाजारात गुंतलो की, निष्कारण जन्म-मृत्यूचे चक्र केल्या कर्मांची फळे भोगण्यासाठी चालू होते. म्हणून येथील सारी वाट्याला आलेली कर्मे निष्ठेने करून अलिप्त राहावे. आपले मूळ स्वरूपाशी असलेले अनुसंधान सोडू नये. आपले आत्मस्वरूप सुख दुःख यांशी निगडीत नसते. आपल्या स्व-रूपाशी आपण तदाकार होऊन येथल्या वस्तु व व्यक्ति यांत लिप्त होऊ नये, झोपेत आपण नेहमीच भौतिक गोष्टी व स्वामित्व यांना विसरून अनुभव घेतो. परंतु जागृती मध्ये ते भाव पुन्हा जागे होऊन आपली धावाधाव सुरू होते. म्हणून साक्षीभावाने सारी कामे अलिप्त राहून करावीत .

म्हणोनि हें न व्हावे । ऐसेंही करूं पावे । तरी तैसाचि स्वभावें । आयिता असे ॥ ७-१७३ ॥

नित्य बदलत्या विश्वरुपाला, हरी कल्पने साकारी | काय कुठे कैसे बदलावे, त्या मनी ये ते आकारी || २७५.

जेंव्हा वाटे दुःखरूप हा, भोग सृष्टीचा नको मला | गुंतू नकाची कदा तयाशी, सहजी अभाव द्या त्याला || २७७.

श्रीहरीच्या मनात असेल तसे घडत राहते. कोणते होऊ द्यावे व कोणते होऊ देऊ नये ही त्याची मर्जी. आपला सहज भाव आनंदाचा आहे. जेंव्हा आपल्याला नकोशी परिस्थिति अनुभवावी लागते, त्यावेळी आपण तिच्याकडे अलिप्त भावाने पहावे व आपल्या मूळ आनंदात रमावे.

मग भलतेथ भलतेव्हां । माझारीले दृश्य-द्रष्टाभावा । आटणी करीत खेंवा । येती दोन्ही ॥ ७-१७६ ॥

दृश्य नि द्रष्टा समरस व्हावे, अलग पाहणे वा व्हावे | कुठे कधीही पुनश्च किंवा, आत्मानंदी रंगावे || २९३.

एकदा निजस्वरूपी आपण समरस होण्याचे तंत्र ध्यानी घेतले की, केंव्हाही कधीही भौतिक जगाचा तर कधी ब्राह्मी स्थितीचा अनुभव घेऊ शकतो. आणि तरीही अलिप्त राहतो.

तैसें रुसता दृष्टी । द्रष्टा दृश्य भेटी । येती तेथें मिठी । दोहींची पडे ॥ ७-१८० ॥

अनुभूतीत ते विरे पाहणे, केवळ उरते अनुभवणे | दृश्य नि द्रष्टा भाव न उरती, एकत्वे सारे होणे || २९९.

बहुये हें त्रिपुटी । सहजें होतया राहटी । प्रतिक्षणीं काय ठी[स्मरण] । करीतसे ? ॥ ७-१८२ ॥

द्रष्टा दृश्य नि दर्शन त्रिपुटि, ज्ञानप्रवाहीचि विरती | गुंतावे ना त्यामाजी कदापि, भेद कल्पनेचे असती || ३०१.

आपली दृष्टी पाहणे बंद करून अंतर्यामी वळाली की, द्रष्टा-पाहणारा- आणि दृश्य असे द्वैत विरून जाते. सहजी आत्मभान येऊन आपण श्री हरीशी समरस होतो. द्रष्टा-दृश्य आणि दर्शन हे त्रिपुटि आत्मज्ञानाचे ठिकाणी विरून जाते व केवळ एकमेव ब्रह्मदशा अनुभूत होते. आपण या त्रिपुटीत गुंतू नये ती कल्पनेने भेद निर्माण करून पुन्हा गुंतवू पहाते.

पातया पातें मिळे । कीं दृष्टत्वे सैंघ पघळे । तिये उन्मळितां मावळे । नवलावो हा ॥ ७-१८४ ॥

पापणी मिटता जेंव्हा हरीने, मायामय ते विश्व दिसे | आणि जेंव्हा पुरता जागृत, हरिविण अन्य न कुणी असे || ३०४.

श्रीहरी जेंव्हा पाहणे बंद करून डोळे मिटून घेतो, तेंव्हा जगाचा खेळ सुरू होतो आणि त्याने दृष्टी उघडून स्वरूपी स्थित झाले की, ब्रहमभाव जागृत होऊन द्वैत सरते.

नाना येका ठाऊनि उठी । अन्यत्र नव्हे पैठी [स्थापन झाली]। हे गमे तैशिया दृष्टी । दिठी सुतां ॥ ७-१८८ ॥

एक पाहुनी दृश्य दृष्टीने, अजुनी दुजे ना पाहियले | ऐसी मधली जी निश्चलता, योगभूमिका जाणियले || ३०९.

घेतला स्वासु बुडाला । घापता नाहीं उठिला । तैसा दोहींसि सिवतला । नव्हे जो अर्थु ॥ ७-१९० ॥

किंवा रेचकी, श्वास सोडिला, दुज्यास ते घेण्याआधी | बाहय कुंभकी ज्ञानमात्रचि, तैसा ब्रह्मकाल अवधी || ३११

'अनुभवामृत रहस्य' मधील सुलभ साधना

सायंकाळी वा की पहाटे, व्यवहाराशी विसरावे | मस्तक मान नि मेरूदंडही, पुरते सरळची ठेवावे || ३१२.

शांत होऊनी अंतर्बाह्यहि, केवळ स्मरणी एक हरी | चित्त स्थिर नि श्वसन मंद ते, सुषुम्नेस मग ये उजरी [उदय-प्रगटपणा] **|| ३१३.**

मंद दीर्घ तो पूरक करुनी, सहजी कुंभक तो होता | हळू रेचके बाह्य कुंभकी, हरिमय होई अनुभविता || ३१६

आज्ञाचक्री जाणीव न्यावी, समरस हरीशी ते व्हावे | नित्य प्राप्त जो तोचि अनुभवी, स्वानंदी ते रंगावे || ३१७ .

बाह्य कुंभकी प्राण नि मनही, सहजी निश्चल ते होती | विकल्प नि संकल्प सोडुनी, सहजी अनुभवा शांती || ३१८.

वर अत्यंत महत्वाची साधना सांगितलेली आहे. नीट वाचून अनुभव घेत राहिल्याने चैतन्याचा अनुभव येतो.

कीं अवघांचि करणीं[इंद्रिये] । विषयांची घेणी । करितांचि येके क्षणीं । जें कीं आहे **॥ ७-१९१ ॥**

अवघी इंद्रिये स्वाद न घेता, सहजी तृप्तचि ती होती | भूक मोडली त्या सर्वांची, सारे ब्रह्मरसी रमती || ३२०.

तैसें दृश्य करूनियां । द्रष्ट्यातें द्रष्ट्या । दाऊनि धाडिलें वाया । दाविलेपणही **॥ ७-२१२ ॥**

चैतन्याने साक्षीभावे, दृश्य दाविले जगताचे | निर्मिला स्वये आभास केवळ, व्यर्थही दिसणे दृश्याचे || ३४८.

तैसें आत्मयातें आत्मया । न दाविजे पैं माया । तरी आत्मा वावो[व्यर्थ] कीं वायां । तेचि कीं ना ? **॥ ७-२१५ ॥**

आत्मरूप ते स्वये देखणे, ज्ञानमात्रही नित्य असे | मायेने दाविणे तयासि, गरज तयाची मुळी नसे || ३५२.

आत्मरूपाची अनुभूति साधणे ही एक फार मोठी दैवी देणगी आहे. माऊलीने त्याचे रहस्य संकेताने उकलून सांगितले आहे. त्याच्या सरावाने साऱ्या इंद्रियांना सहजी तृप्ति मिळते. एकदा ही अनुभूति आली आणि सहजी श्री हरीशी समरसता साधता आली, की, ध्यान तेथे ठेऊन आपली देहाकरवीची कामे साक्षीभावाने होऊ लागतात जगताच्या आभासात मन न गुंतता प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधतात. त्यासाठी मायेच्या कोणत्याही साधनांची गरज नाही.

तरी कां निमित्य पिसें । हा यया दाऊं बैसें । देखतें नाहीं तैं आरिसे । देखावे कोणें ? **॥ ७-२३० ॥**

जेही सदा स्वानंदी सिद्ध ते, नित्य तयासी दिसे हरी | नलगे माध्यम उपासना वा, हरी कदा त्या नसे दुरी || २६८.

म्हणोन ययातें येणें । ये परीचें पाहणें । पाहतां कांहीं कोणे । पाहिलें नाहीं **॥ ७-२५३ ॥**

श्रीहरीचे पाहणे तयाशी, पाहण्याविना पाहियले | कुणी कुणाला काय पाहिले, कृतीशून्य ऐसे घडले || ३९४.

किंबहुना ऐसें । आत्मेनि आत्मा प्रकाशे । न चेतुचि चेऊं बैसे । जयासि तो **॥ ७-२५४ ॥**

प्रकाशिला आत्म्याने आत्मा, ऐसे ते असते बघणे | सावधानचि सदैव असता, स्वये आपणा जागविणे || ३९५.

श्री शिव कल्याण [नित्यानंदैक्यादीपिका] यांचे भाष्य

‘न बंधोस्ति न मोक्षोस्ति, ब्रह्मैवास्ति निरंतर’ | वशिष्ट सांगती श्रीरामाला, ब्रह्मचि सारे चराचर || ३९७.

नित्य ज्ञानमय असता आत्मा, अज्ञानासि ठाव नसे | बंध मोक्ष ते उभयचि नसती, वशिष्ट रामा सांगतसे || ३९८.

नलगे साधन हरी अनुभवण्या, माया सरता तोचि असे | भाव समर्पण, चित्त शुद्ध नि, वासुदेवमय जगत दिसे || ४००.

येथे श्री शिव-कल्याणी यांनी छान भाष्य केलेले आहे. आपण बद्धही नाहीत आणि मुक्तही. आपण सहज स्थितीत आहोत. आपल्याला आत्मज्ञान होणे हा सहज भाव आहे. आपली दृढ इच्छा आणि तळमळ मात्र हवी. मग सर्वत्र वासुदेव अनुभूत होऊ लागतो.

स्वयें दर्शनाचिया सवा[बरोबर] । अवघियाची जात फावां[प्राप्ती] । परी निजात्मभावा । न मोडिताही ॥ ७-२५५ ॥

पूर्णासि ते नित्य पूर्णपण, म्हणुनी मौनची शब्दाशी | पूर्णे पूर्णपणा अनुभवणे, हेचि पाहणे स्वरूपाशी ॥ ४०५.

तैतरेय ती श्रुति सांगते, पूर्णब्रहम आनंद असे | आनंदातुनि तू आलासि, आनंदाहुनी अन्य नसे ॥ ४०६.

नित्य राही तू आनंदीची, आनंदचि हा धर्म असे | पुन्हा जायचे आनंदातचि, त्याविण कांही अन्य नसे ॥ ४०७.

आपण पूर्ण असे आत्मरूप आहोत. मौनाने याचा अनुभव येतो. आपण आनंद स्वरूप पूर्णब्रहम आहोत. आनंद हा आपला सहज भाव आहे.

भलतैसा फांके । परी येकपणा न मुके । नाना संकोचे तरी असकें । हाचि आथी ॥ ७-२५७ ॥

जे जे भासे आत्मरूप ते, त्याविण नाही कांही दुजे | ऐशी अनुभूति नित्य असे तो, हरी होऊनी हरी भजे ॥ ४१२.

हे सर्वत्र पसरलेले आत्मदेवाचेच स्वरूप आहे. हे जे भेदरूपाने दिसत आहे, ते पाण्यावर तरंग उठावेत असे त्याचे स्वरूप आहे. आपण हरी होऊन हरीला भजावे.

म्हणौनि इये आत्मलीळे । नाहीं आन कांटाळें । आतां ययाचिये तुळे[तुलनेने] । हाचि यया ॥ ७-२६६ ॥

स्व-स्थ राहुनी तो लीलाधार, खेळे नि खेळवितसे | अन्य कुणाशीही ना तुलना, तयासारिखा तोचि असे ॥ ४२२.

येऱ्हवीं शिवोनि पृथ्वीवरि । तत्त्वांच्या वाणेपरी । जयाचा रश्मिकरीं । उजाळा येती ॥ ७-२७२ ॥

शिवापासुनी जडासहितही, अनेक जी तत्वे असती | चैतन्याच्या जये प्रकाशे, सारी प्रकाशली जाती || ४३४.

श्रीहरी हा विश्वाचा खेळ सहजी घडवित आहे यासाठी त्याला अन्य कुणाचे सहाय्य लागत नाही. या हरीचे तुलनेत ब्रह्मांडात अन्य काहीच नाही. अगदी शिवापासून गवताच्या काडीपर्यंत तोच एकमात्र आहे. आण सारे त्याचेच अंश आहोत. एका चैतन्याने हे सारे प्रकाशमान होते.

जेणें ज्ञान सज्ञान होये । दृङ्मात्र दृष्टीतें विये । प्रकाशाचा दिवो पाहे । प्रकाशासी ॥ ७-२७३ ॥

ज्ञान होई सज्ञान त्यामुळे, दृष्टी पाहू शके तेणे | प्रकाशवी जो सर्व प्रकाशा, त्याचे प्रकाश योगाने || ४३५.

यांच्याच कृपेने अज्ञानाचा नाश होतो-मागमूसही राहत नाही. दृष्टी त्यामुळे पाहू शकते. तोच सर्व प्रकाशाचा स्रोत आहे.

असो हें आत्मराजें । आपणापें जेणें तेजें । आपणचि देखिजे । बहुये परी ॥ ७-२८० ॥

आत्मराज विलसे ज्ञानाने, घेत अनुभूती स्वरूपाची | आपण देखे आपणासिचि, पाही लीला बहुरुपाची, || ४४४.

आत्मदेव आपली लीला पहात स्वानंदी रमलेला आहे. तो आपल्याला आणि जगरूपी लीला पहात आहे.

तंव अज्ञान त्रिशुद्धि नाहीं । हें जगेंचि ठेविलें ठाई । जे धर्मधर्मित्वें कंहीं । ज्ञानाज्ञान असे ? ॥ ७-२८३ ॥

अज्ञाना अस्तित्व मुळी ना, विलसत जग हे ज्ञानाने | अधर्मास कां धर्म म्हणावे, तैसे ज्ञाना अज्ञाने || ४४७.

अज्ञान हे सर्वथा नाही. हे सारे जग ज्ञानाने विलसत आहे. उगाच अधर्मास धर्म आणि ज्ञानाला अज्ञान कां म्हणावे.?

यालागीं वस्तु [परब्रह्म] प्रभा । वस्तुचि पावे शोभा । जात असे लाभा । वस्तुचिया ॥ ७-२९१ ॥

प्रकाशले हे विश्वचि अवघे, हरि ऐश्वर्ये विलसतसे | स्व-स्वरुपिच्या स्वानंदाने नित्य प्रसन्नची हरि असे || ४५७.

परब्रह्म हेच या विश्वात विनटलेले आहे. सर्वत्र त्याचीच शोभा विलसत आहे. श्री हरी नेहमीच प्रसन्न भावाने आपल्या आनंदात निमग्न आहे.

कां नीद खोळे भरिता । जागणें ही न ये हाता । येकलिया टळटळिता । ठाकिजे जेवीं ॥ ७-२९५ ॥

प्रभाव निद्रेचा ना अजुनी, जागृतीही ती ना सरता | मध्यस्थिति हीचि ज्ञानाची, अनुभवी श्रीहरी तो पुरता || ४६१.

अजुनि न निद्रा, सरे जागृती, उभयांच्या संधीस्थानी | सावधान नि ज्ञानमात्र ते, व्हावे समरस हरिचरणी || ४६२.

मनी नसावे अमुक पहावे, निर्विकार नि शांतपणे | अनुभवी वासुदेवमयस्थिति, रंगुनिया स्वानंदाने || ४६३.

जेही पाहिले अनुभविले वा, दर्शन ते अद्वैताचे | हेच आत्मरुप, प्रतीति येता, सार्थक या नर देहाचे || ४६४.

येथे पुन्हा एका सहज साधनेचा खुलासा आहे. रात्री किंवा पहाटे; अद्याप झोप आणि जागृती दोन्हींचा परिणाम जाणवत नाही अशी जी मधली अवस्था आहे, त्यावेळी हे साधना करायची आहे. शांतपणे पूर्व अगर उत्तर दिशेकडे मुख करून बसावे. झोपेला बाजूला सारावे. पूर्ण सावधान व्हावे. मनात अमुक दिसावे असे नसावे. सद्गुरूचे स्मरण करून आपल्या भ्रूमध्याच्या जरा मागे आज्ञाचक्राशी ध्यान न्यावे. तेथे चैतन्याचा अनुभव होताच त्याशी पुर्णपणे समरस व्हावे. आता आपण आणि श्रीहरी यांत कोणताही भेद उरलेला नाही. अशा पूर्ण अद्वैताची अनुभूति हेच आपले जीविताचे ध्येय आणि सर्वोच्च उपलब्धी आहे.

अमृत गंगा- कलश सातवा समाप्त

अमृत गंगा- कलश आठवा (ज्ञानखण्डन)

आत्मबोध झाला की तेथे, ना ज्ञान न अज्ञान, केवळ शुद्ध ज्ञानमय अशी ती ज्ञानघन अवस्था असते त्या अवस्थेला आता ज्ञानदेव आलेले आहेत. ती अवस्था शब्दातीत आणि ज्ञानाज्ञानातीत असते.

ज्ञानदेवांनी या अध्यायात गुरु कृपेने प्राप्त झालेल्या दिव्य स्थितिचे कृतज्ञ भावाने वर्णन केलेले आहे.

तैसें आमुचेनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे । आम्हांलागीं गुरुदेवें । आम्हीच केलों ॥ ८-१ ॥

ॐ नमिले सद्गुरूराया, सार्थचि केले नामाला | पूर्णत्वे ज्ञानेश्वर आम्ही, स्वरुपि मिळविले आम्हाला || १.

ज्ञानाज्ञानाच्याहि पैल ते, आणिले तू निजस्वरुपाशी | पूर्ण ज्ञानमय हरी जाहलो, काय दिव्य तंव कृपा अशी || २

परी आम्हा आम्ही आहों । तें ऐसे पाहो जावों । तंव काय कीजे ठावो । लजिजे ऐसा ॥ ८-२ ॥

आम्ही निजस्वरूपाशी पाहता, बघणे आत्मत्वा लाजे | येथे स्वानंदा अनुभवणे, एकचि आत्मरूप साजे || ३.

हे सद्गुरू, आमचे ज्ञानदेव हे नांव आपण सार्थ केलेत आम्हाला शुद्ध ज्ञान देऊन ज्ञान आणि अज्ञान यांच्याही पलीकडे निजस्वरूपी नेलेत. आपल्या कृपेने आम्ही आता ज्ञानमय हरीच झालो आहोत. या स्वरुपात सर्वज्ञतेमुळे बघणे हे लाजून अनुभवणे झाले. केवळ स्वानंदात रंगून जाणे हा नित्य भाव झाला आहे.

हा ठावोवरी गुरुरायें । नांदविलों उवायें [आनंदाने]। जे आम्ही न समाये । आम्हांमाजीं ॥ ८-३ ॥

आम्हास गुरुने अनंत केले, आम्हात आम्ही मावेना | नसेच आम्हा आम्हीपणाही, अस्तित्वा या सीमा ना || ४.

अहो आत्मेपणीं न संटो[मर्यादित असणे]**। स्वसंविति** [आत्माकार वृत्ती] **न घसवटो**[घासून जात नाही]**।आंगीं लागलिया न फुटों। कैवल्यही॥८-४॥**

सीमित नाही आत्मपणाने, स्व संवेद्यचि अनुभूति | पूर्णत्वे स्वानंदी दंगे, केवळ कैवल्य प्रतीति || ५.

आता पिंड व ब्रहमांड यांत साक्षीरूपाने स्फुरणारा जो व्यष्टि व समष्टीचा आत्मपणा –मीपणाची वेगळी भावना- आमच्यांत साठवली जाऊ शकत नाही. तसेच आत्माकार वृत्तीचे स्फुरण आम्हाला घर्षण करू शकत नाही. आमच्यात कैवल्य समाविष्ट झाले असून आमची अमर्याद अवस्था याच देही अनंत रुपे आम्ही अनुभवत आहोत. आम्हाला सामावले जावू न शकणारे असे अनंत झालो आहोत.

***आमुची करवे गोठी । ते जालीचि नाहीं वाक्सृष्टी । आमुतें देखे दिठी । ते दिठीचि नव्हे* ॥ ८-५ ॥**

आम्हास वर्णील जी वाक्सृष्टी, अजुनि न जन्माला आली | पाहिल आम्हा ऐसी दृष्टी, कोठे हि ती नच सृजिली || ६.

***आमुतें करूनि विखो । भोगूं शके पारखो । तैं आमुतें न देखों । आम्हीपण* ॥ ८-६ ॥**

सर्वव्यापी नि अनंत आम्ही, एकलेच असता ऐसे | विषय आमुचा करुनी भोगणे, वेगळेपणे शक्य नसे || ७.

आम्ही देखणेमात्रचि असता, देखणे न देखणेविणा | दृश्य नव्हे ना द्रष्टेपणहि, ना कर्मी ना उगेपणा || ८.

भोग्य न भोक्तेपणहि नाही, स्वरुपमात्रचि जे आम्ही | प्रत्यय मात्रचि केवळ असता, नसे पाहण्याची उर्मी || ९.

आमच्या स्थितीचे वर्णन करणारी वाणी सृष्टीत नाही. आम्हाला पाहू शकेल अशी दृष्टीच नाही कारण आम्ही बघणे या कल्पनेच्या पलीकडे आहोत. आमचे अस्तित्व विषय होऊ न शकल्याने आम्हाला लौकिकरित्या अनुभवणे आता शक्य नाही.

प्रगटो लपो न लाहो । येथें नाहीं नवलावो । परी कैसेनिही विपावो । असणयाचा ॥ ८-७ ॥

प्रगटणे नि लपणे वा प्राप्ती, दृष्टी विषयचि होत नसे | अद्वैती या नसणे किंवा, नसुनीही असण्याचा || ११.

उदय अस्त असुनीही भास्कर, प्रकाशरुपे नांदतसे | तैसे प्रगटलियाविण अस्तित्वे, नित्यचि स्वानंदात असे || १२.

आमचे प्रगट असणे अगर लपणे यांत कांहीच फरक उरलेला नाही. कारण आमचे असणे आणि नसणे दोन्ही एकच झाले आहे. सदा सर्वकाळ सर्वत्र असून सुद्धा आमहो कोठेच नसतो. उदय आणि अस्त असतांनाही जो नित्य प्रकाशमान अवस्थेत असतो अशा सूर्य नारायणासारखी ही अवस्था आहे.

किंबहुना श्रीनिवृत्तीं । ठेविलों असों जया स्थितीं । ते काय देऊं हाती । वाचेचिया ? ॥ ८-८ ॥

सद्गुरू श्री निवृत्तींनी, ठेवीलियेही जया स्थिति | वाचेच्याहि पैल असे ही, अनुभवेची येई प्रतीति || १३.

आमच्या गुरुरायांनी आम्हाला जेथे नेऊन ठेवले आहे. ती स्थिति वाचेच्या हाती देता येणे शक्यच नाही.

तेथ समोर होआवया । अज्ञानाचा पाडू [योग्यता] कासया । केउते मेलिया माया । होऊं पाहिजे ॥ ८-९ ॥

सन्मुख आमुच्या होण्यासाठी, ना प्राज्ञा अज्ञानाची | मृत मायेच्या पोटी येणे, कैसी शक्यता हो त्याची || १५ .

अज्ञानाचा पूर्वीच नाश झाल्याने आता त्याची आमच्या समोर येण्याची काय प्राज्ञा ?

म्हणोन अज्ञान नाहीं । तेथेंचि गेलें ज्ञानही । आतां निमिषोन्मेषा[ज्ञानाज्ञान] दोहीं । ठेली वाट ॥ ८-१२ ॥

अज्ञानाचे संगे ज्ञानही आत्मस्वरुपातुनि गेले | स्व स्वरूपभूत ज्ञानमात्रचि, आता केवळ ते उरले || १८

येऱ्हवीं तरी ज्ञान अज्ञानानें । दोहींचि अभिधानें [नामाने]। अर्थाचेनि आनानें । विप्लावलीं [प्रगट केली] ॥ ८-१३ ॥

आत्मवस्तू ती सदा ज्ञानमय, ज्ञान नी अज्ञानही नसे | भौतिक दृष्टी असता उभयची, एक पालटुनी दुजे असे || १९.

आता अज्ञान नाही आणि ज्ञानही लोपलेले आहे. त्यामुळे ज्ञान आणि अज्ञान विरहित अशी शुद्ध ज्ञानामय अवस्था आत्मदेवाच्या ठिकाणी उरलेली आहे. व्यवहारात सुद्धा ज्या ठिकाणी अज्ञान असते, तेथे दुसऱ्याच क्षणी ज्ञान प्रगटते. ही उभय नामे नित्य बदलणारी आहेत. आम्ही याच्या पलीकडे गेलेलो आहोत.

तैसें निपटून जें नेणिजे । तें अज्ञान शब्दें बोलिजे । आतां सर्वही जेणें सुजे [समजते] । तें अज्ञान कैसें ? ॥ ८-१६ ॥

कांहीचि ना जाणणे तयासी, म्हणती जगती अज्ञान | पूर्ण ज्ञानमय असता आत्मा, अज्ञाना नाही स्थान || २२

अजिबात उमज नसणे याला अज्ञान असे म्हणतात. आता सर्वज्ञता असता ते राहुच शकत नाही.

ऐसें ज्ञान अज्ञानीं आलें । अज्ञान ज्ञानें गेलें । ये दोहीं वांझौलें । दोन्ही जाली ॥ ८-१७ ॥

मिळता अज्ञानाशी ज्ञान वा, ज्ञान मिळे अज्ञानाशी | शुद्ध ज्ञानचि उरते केवळ, नाशुनिया अज्ञानाशी || २३.

ज्ञानाज्ञानातीतचि उरते, उभयहि म्हणुनी फोल असे | उभय नाशिती एक दुज्याला, अर्थ तत्क्षणि पालटसे || २४

ज्ञान आणि अज्ञान यांचा एक-दुसऱ्याशी संबंध येताच अज्ञान उरत नाही. आणि नंतर ज्ञान हा सहजभाव झाल्याने ज्ञानही उरत नाही.

***आणि जाणे तोचि नेणें । नेणे तोचि जाणे । आतां कें असे जिणें । ज्ञानाज्ञाना ?* ॥ ८-१८ ॥**

जाणियले जे ऐसे वदती, शुद्ध ज्ञान त्या ना झाले | आणि जोही असे नेणता, तया जाणतेपण आले || २५ .

ज्ञान नि अज्ञानाचे ऐसे, स्थान कदापि सत्य नसे | आमुचे ठायी म्हणुनि उभया, स्थान नाहीचि ते तैसे || २६

ज्याला मला ज्ञान झाले आहे, असा अहंभाव असेल तोच पूर्ण अज्ञानी असतो. परंतु नेणतेपणाची भावना असणारा जाणकार होत असतो. कारण तो जाणणे आणि नेणणे याच्या पलीकडे गेलेला असतो.

***एवं ज्ञानाज्ञानें दोन्ही । पोटीं सूनि अहनी । उदैला चिद्गगनीं चिदादित्यु हा* ॥ ८-१९ ॥**

आत्मबोध हा चित्सूर्य उगवला, शुद्ध जाणिवेच्या गगनी | तये प्राशिली ज्ञान दिवस नि, रात्रही जी कि अज्ञानी ॥२७.

याप्रमाणे ‘मी ब्रह्म आहे’ असा ज्ञानरूपी दिवस आणि ‘ मी देह आहे ‘ अशी अज्ञानरूप रात्र यांना नाहिसे करून हा शुद्ध ज्ञानमय चितसूर्य चिदाकाशात कधी न मावळण्यासाठी प्रगट झाला आहे.

अमृत गंगा कलश आठवा समाप्त

अमृत गंगा कलश नववा -[सिद्धाचार लक्षण]

सिद्धावस्थेला गेलेल्या भाग्यवंतांचे आचरण कसे असते, याचे मुख्यत: वर्णन या अध्यायात ज्ञानदेवांनी केले आहे.

***आतां आमोद** [सुगंध] **सुनास[चांगले नाक] जालें। श्रुतीसि [शब्दाना] श्रवण [कान] रिघाले । आरिसे उठले । लोचनेसी* ॥ ९-१ ॥**

सुगंध हेचि नाक जाहले, शब्दहि ते श्रवणचि झाले | आरसाच ते नेत्र होऊनि, भोग स्वये भोक्ता झाले |१.

जो भाग्यवंत सिद्ध अवस्थेला पोचतो, तो अद्वैत अवस्थेत असल्याने भोग भोगण्यात ब्रहमाशी तादात्म्यता अनुभवतो. त्याचे त्याशी ऐक्य होते.

***तैसें नव नवा अनुभवीं । वाजतां वाधावी** [चाहूल लागताच]। **अक्रियेच्या गांवीं । नेणिजे तें* ॥ ९-९ ॥**

विविध अनुभूति जरि प्रारब्धे, सिद्ध मानी या ब्रह्मलिला | ब्रह्मचि खेळे ब्रहमावरती, नित्य अनुभवी श्रीहरीला || ९.

त्याचे नित्याचे जीवन चालूच राहते. नवनवीन अनुभूति येतात, पण हे ब्रह्मच ब्रहमावर खेळत आहे, असे उमजून तो आत्मस्थिती पासून विचलित होत नाही. हीच जीवन्मुक्त अवस्था असते.

***म्हणोन तोंडाआड** [तोंडापुढे] **पडे । तेंहि वाचा वावडे** [बोलते] **। परी समाधी न मोडे । मौनमुद्रेची* ॥ ९-२० ॥**

लौकिक विषयी बोले जरिही, सिद्धा नित्यचि आत्मस्थिती | भौतिक व्यवहारे ना बिघडे, त्याची नीरव ती शांती || २१.

लौकिक दृष्ट्या तो लोकांशी बोलत असतो. त्या बोलण्यात अलिप्तता असते. त्यामुळे अंतरीचे मौन अविचलीत राहते.

***व्यापाराचे गाडे । मोडतांहि अपाडे** [असंख्य] **। अक्रियेचें न मोडे । पाऊल केंही* [कोठे] ॥ ९-२१ ॥**

सिद्धदेह जरि करिता कर्मे, लौकिक वाट्या जी आली | अक्रियता परि ती भंगेना, अनुभूती श्री हरीची झाली || २२.

प्रारब्ध जे वाट्याला आणील, त्या त्या कर्मांचे गाडे तो ओढीत राहतो, पण सदैव अलिप्त असल्याने त्याची कर्मे त्याला बाधित नाहीत.

तैसा उदैलया निर्विषयें । ज्ञानी विषयी हो लाहे ?। तंव दोन्ही न होनी [होत नाही] होये । काय नेणों ॥ ९-२५ ॥

आत्मबोध तो उदया येता, सारे ब्रह्मचि दिसत असे | विषय नि विषयी लोप पावती, तदा भोग घेणार कसे ?|| २७.

आत्मबोध झाल्यावर सारे ब्रह्मच आहे, अशी निश्चिती येते. मग विषय आणि त्यांचा भोक्ता ब्रहमाविण वेगळे उरत नाहीत.

कैवल्याही चढावा [वरताण]। करीत विषयसेवा । झाला भृत्यु [भक्त] भज्य [देव] कालोवा [मिलाफ]। भक्तीच्या घरीं ॥ ९-३० ॥

करि विषयांचे सेवन ज्ञानी, ये कैवल्या रंगत ती | देव भक्त ते एक जाहले, विषय वेगळे नाकळती || ३०.

बाहयत: तो विषयांचे सेवन करीत आहे, असे वाटते, परंतु त्याची कैवल्याचा आस्वाद घेण्याची रंगत अधिकच वाढत जाते. तो नित्य अलिप्त असल्याने कशातच गुंतत नाही. भक्त आणि देव यांचे ऐक्य झाल्याने त्याचे ब्रह्माशी तादात्म्य नेहमीच कायम राहते.

जाला स्वेच्छाचि विधि । स्वैर झाला समाधि । दशे ये मोक्षऋद्धि । बैसों घापे ॥ ९-३४ ॥

नाही बंधन त्यासि विधीचे, स्थितप्रज्ञ तो नित्य असे | मोक्षऋद्धिची नित्य अवस्था, ब्रह्म होऊनि ब्रह्मी वसे || ४२.

त्याच्या अंतर्मनाला रुचेल असे त्याचे वर्तन असल्याने त्याला विधी निषेधांचे बंधन नसते. तो सतत स्थितप्रज्ञ अवस्थेत असतो.

देव देऊळ परिवारु । कीजे कोरुनि डोंगरु । तैसा भक्तीचा व्यवहारु । कां न व्हावा ? ॥ ९-४३ ॥

डोंगर कोरुनि भव्य उभविले, देव देऊळ नि भक्तजना | तैशा भक्तीच्या व्यवहारे, अर्चन कां नच हो नाना ?|| ५५.

डोंगर कोरून भव्य देऊळ, देव, भक्तगण, पूजा उपचार सारे एकच व्हावे, तसे त्याच्या नित्य व्यवहारात शिव होऊन शिवाला भजणे चालू असते.

ना तरी निंदास्तुति । दोन्हीं मौनासाठीं जाती । मौनीं मौन आथी । न बोलतां बोली ॥ ९-५२ ॥

स्तुति आणि निंदा दोहींचा, समावेश होई मौनी | लौकिकी बोले तरी अंतरी, धरी मौन पुरते ज्ञानी || ६५.

कुणी स्तुति करा, की निंदा, याचे अंतरीचे मौन अविचलीत राहते. त्याचे कुणाशी बोलणे हेही त्या मौनातच असते.

घालिता अव्हासव्हा [कोठेही] पाय । शिवयात्राचि होतु जाय । शिवा गेलियाही नोहे । केंही [कोठे] जाणें ॥ ९-५३ ॥

कोठेही चालणे तयाचे, शिवयात्राची होत असे | आणि जाता यात्रेलाही, स्वये शिवाहुनी अन्य नसे || ६६.

तो जाईल ती शिवयात्राच घडते, आणि कधी बाहयत: शिव यात्रेला गेला, तरी ते कोठेही न गेल्यासारखे असते.जशी पाण्याची लाट कुणीकडेही पळाली तरी ती पाण्याशिवाय कोठेच जात नसते. सिद्ध शिव अवस्थे वाचून कदापि विचलीत होत नसतो.

कोण्ही एक अकृत्रीम । भक्तीचें हें वर्म । योगज्ञानादिविश्राम । भूमिके हे ॥ ९-६१ ॥

देव नि भक्तहि अभेद पुरता, भक्ति अकृत्रिम वर्म असे | योग ज्ञान आदि विश्रामे, स्वानंदी तो सिद्ध वसे || ७४.

देव आणि भक्त यांत कांहीच भेद न उरल्याने सहज भक्ति घडत राहते. त्याला मग योग, याग, ज्ञानार्जन याची गरज उरत नाही.

शिवशिवा ! समर्था स्वामी । येवढीये आनंदभूमि । घेपे दीजे एकें आम्हीं । ऐसें केलें ॥ ९-६५ ॥

शिव रूपा श्री सद्गुरू स्वामी, अमूल्य ती आनंदभूमि | देणे घेणे स्वये एकटे, झालो स्वतंत्रचि आम्ही || ८१.

हे शिवरूपा श्री सद्गुरू, आपण आम्हाला अमूल्य अशी आनंदभूमी बहाल केलीत. आता या भूमीवर आम्ही एकट्यानेच देणे घेणे करण्यास स्वतंत्र झालो.

चेतचि [माझ्यातील नित्य जागृत आत्मभाव] मा चेवविलें[तू जागृत केलेस]। निदैलेंचि मा निदविलें। आम्हीचि आम्हा आणिलें । नवल जी तुझें॥९-६६॥

माझ्यातील नित जागृत ऐसा, आत्मभाव जागृत केला | विषयाची निद्रा घालवली, आणिलेस निजरूपाला || ८२.

विषयानंदाच्या निद्रेतून तू पुरते जागे केले | ब्रह्मभाव तो नित्य जाहला, पूर्णचि स्वातंत्र्या दिधले || ८३.

विषयांच्या भोग निद्रेतून आपण जागे केलेत. आणि ब्रह्मभावाची खरी जागृती आणण्याचे सामर्थ्य दिलेत. ही नवलाची गोष्ट आहे.

आम्ही निखळ मा तुझे । वरी लोभें म्हणसी माझें । हें पुनरुक्त साजे । तूंचि म्हणोनी ॥ ९-६७ ॥

आम्हास दिधले त्वां आपुलेपण, आम्ही सर्वथा असू तुझे | वरती म्हणशी मम ज्ञानोबा, पुनरुक्ति ही तुज साजे || ८८.

आपण नेहमीच आपुलकी दाखवून ‘माझा ज्ञानोबा, ‘माझा ज्ञानोबा’, असे म्हणता, पण आता आपण आपले कैवल्याचे आपलेपण-ब्रह्म स्थिति- मला देऊन शुद्ध ज्ञानमय अवस्थेला आणून पुन्हा प्रेमाने आपलेपण -ब्रह्म स्थिति- कायम ठेवलीत, ही द्विरुक्ती आपणासच शोभून दिसते.

गुरुत्वें जेवढा चांगु । तेवढाचि तारूनि लघु । गुरु लघु जाणे जो पांगु । तुझा करी ॥ ९-६९ ॥

गुरुत्व आपुले महानचि हे, तारिशी तू लघु शिष्याला | गुरू शिष्यपण टाकिशी विरवून, जंव वाटे तंव चित्ताला || ९०.

आपले श्रेष्ठत्व लघुपणा असलेल्या शिष्याला देऊन आपण श्रेष्ठ बनविता, जो आपले श्रेष्ठत्व जाणत नाही, तोच खरा दरिद्री !

किंबहुना ये दातारा । तूं याचा संसारा । वेंचोनि होसी सोयरा । तेणेंचि तोषें ॥ ९-७१ ॥

परम दयाळा दातारा तू, जगदुद्धारा अवतरशी | ज्यासी कळकळ या मार्गाची, हात धरोनि उद्धरशी || ९२.

निजल्याशी तू जागे करुनी, आत्मजागृती लाभविशी | यांतचि तुज संतोष दयाळा, सहजी कैवल्या नेशी || ९३.

हे दानशूर गुरुराया, तू जगाचा उद्धार करण्यास अवतरला आहेस. विषयांच्या झोपेत असणाऱ्यांना पूर्ण जागृत करून खऱ्या अर्थाने तू त्यांचा सोयरा बनतोस. तसे करण्यातच तुला संतोष वाटतो

अमृत गंगा नवम कलश समाप्त

अमृत गंगा दहावा कलश

अमृतगंगा कलश दहावा [ग्रंथ महिमा]

अनुभव अमृत ग्रंथ लिहून पूर्ण झाला. सर्वोच्च अशा परब्रह्म अवस्थेला पोचण्याचे सदभाग्य ज्ञानदेवांना लाभले. आपल्याला आलेल्या शब्दातीत अनुभवांना त्यांनी शब्दरूप दिले. हा अमृत कलश गुरुकृपेने लाभला. ज्ञानदेव कृतकृत्य झाले. या अवीट अमृताचा लाभ केवळ त्यांचे साठी नसून कोणत्याही इच्छुकासाठी आहे, हे ते जाणून आहेत.

परी गा श्रीनिवृत्तिराया । हातातळीं सुखविलें तूं या । तरी निवांतचि मियां । भोगावें कीं तें ॥ १०-१ ॥

वंदन तुजला श्री निवृत्ती, पूज्य सद्गुरू दातारा | अमूल्य अमृतकुंभ दिलासि, पूर्ण कृपे माझिया करा || १

अक्षय ऐसा कुंभ असे हा, केवळ हे ना मजसाठी | या मार्गीचे जे जे इच्छुक, हा त्या सकलांच्या साठी || २

चंद्रासि अमृत घातलें । तें तयाचि काई येतुलें । कीं सिंधु मेघा दिधले । मेघाचि भागु ॥ १०-३॥

चंद्रा लाभे अमृत तेणे, औषधी झाल्या वनस्पती | जल सिंधुने देता मेघा, जगा तृप्त करि मेघ तसे || ४

चंद्राला अमृताचा लाभ झाला, तो काय केवळ त्याचे साठीच होता? त्याने त्या द्वारा वनस्पतींना औषधी गुणांचा वर्षाव केला. वनस्पतींचे पोषण केले. सागराने मेघाला पाण्याची देणगी दिली, त्याने ती सर्व जगाला तृप्त करण्यासाठी मेघाकरवी उदार हस्ते वापरली.

म्हणोनि हें असंवर्य [असीमपण] । दैविकीचें औदार्य । वांचोनि स्वातंतर्य [स्वतंत्रपण} । माझें नाहीं ॥ १०-६ ॥.

म्हणोनी हे औदार्य असीम जे, जी श्री सद्गुरु कृपा तुझी | मज स्वतंत्र ना समर्थता ही, तूच असे ऊर्जा माझी || ७

हे गुरुदेव, या असीम दैवी औदार्याचा फायदा घ्यायला मी स्वतंत्र नाही. आपला हेतू मी जाणून आहे. या ग्रंथाने या मार्गावरील सर्व इच्छुकांना याचा फायदा लाभेल.

आम्ही बोलिलों जें कांहीं । तें प्रगटची असे ठायीं । मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावें बोलें ?॥१०-८॥

या ग्रंथी जे आम्ही बोललो, नवे त्यांत कांही नव्हते | स्वयंप्रकाशित आत्मतत्व ते, ज्ञानी पूर्ण जाणी त्यांते || ९.

आम्ही या ग्रंथात जे बोललो, ते तर सर्वच सिद्धांना अंतरी प्रगट आहे. जे स्वयंप्रकाशी आहे त्याला प्रकाशावे लागत नाही.

नाना विपायें आम्हीं हन [जर]। कीजे तें पां मौन । तरी काय जनीं जन । दिसते ना ? ॥ १०-९ ॥

या ग्रंथी ते नसते लिहिले, मौन पाळिले असते वा | चक्र जगाचे चालुचि असते, उदय अस्तीहि ना उणिवा || १०.

आम्ही न लिहिता मौन पाळले असते, तरी चित्प्रकाश दिसला नसता काय? जिज्ञासूंना समजले नसते, असे थोडेच आहे.?

ययापरौतें कांहीं । संविद्रहस्य नाहीं । आणि हें तया आधींही । असतचि असे ॥ १०-११ ॥

या परते ते नसे रहस्यही, ज्ञानाचे ते कदा असे | या जगताच्या आदि मध्ये, अंतीहि अन्य न कांही वसे || १२

हे निश्चित की, यांतील सत्यापलीकडे ज्ञानाचे रहस्य कांही नाही. हे त्रिकलाबाधित सत्य आहे.

पढियंतें[आवडते] सदा तेंचि । परी भोगीं नवी नवी रुची । म्हणोनि हा उचितुचि । अनुवाद सिद्ध ॥१०-१३॥

विषय आवडीचे जरि तेची, भोग रुचीचा नवा नवा | लाभवी आनंदचि नवाही, म्हणुनि हा अनुवाद हवा || १४.

आपल्याला आवडते ते लाभले की आनंद होतो. नवीन वाचनाने, त्यांत पुन्हा नवनवीन रुचि लाभते. म्हणून यांत गोडी असणाऱ्यांना या ग्रंथांने अधिकच रुचि वाढेल. जे सिद्ध पुरुष आहेत, त्यांना या ग्रंथाने आपल्या मौनाला शब्दरूप मिळाल्याचा अनुभव येईल. आणि ते आपल्या मौनाने पुन्हा अंतरीच्या अनुभूति मौनात रंगून जातील.

आणि पूर्ण अहंता वेठलों । सैंघ आम्हीच दाटलों । मा लोपलों ना प्रगटलों । कोणा होऊनी ।१०-१५॥

पूर्ण ब्रह्म जाणिवे वेढिलो, सर्वत्रचि दाटलो आम्ही | कधी न लपलो वा की प्रगटलो, पूर्ण लोपले तू नि मी || १६.

आता आम्ही पूर्ण ब्रहमभावाने वेढले गेलेलो आहोत. सर्वत्र दाटलो गेलेलो आहोत. लपणे किंवा प्रगटणे आता आमचे ठायी नाही.

आपणया आपणपें । निरूपण काय वोपे [देणार] ? । मा उगेपणे हरपे । ऐसे आहे ? ॥ १०-१६ ॥

आपणाशी जाणियले आम्हीची, निरुपण हे पूर्णत्वाचे | पूर्णचि आधिहि होतो तर, काय प्रयोजन लिहिण्याचे ?|| १७.

मौनहि धरिता, नित्यप्राप्त ते, एकलेचि ते नित्य असे | निरुपण लिहुनी दुजे कुणी ना, सांगणेही ते कुणा नसे || १८.

या ग्रंथांतले निरूपण आम्हाला काय देणार? कारण आम्ही जे जाणत होतो आणि आमच्या निजस्वरूपाची जाणीव आमचे ठायी आहे, तेच तर लिहिले आहे. मग काय तसेच काष्ठमौन बाळगून शांत बसायचे?

म्हणोनि माझी वैखरी । मौनाचेंहि मौन करी । हे पाणियावरी मकरी । रेखिली पां ॥ १०-१७ ॥

निजस्वरुपाचे भान उमलता, शब्द पुरेही ते विरती | जैसे मकरी जात जलातुनि, जलरेषा विरुनी जाती || २०

मौनाचेही मौन असे हे, निरुपण ज्ञाते शब्द विरे | स्वानंदी मग मौनहि विरते, हरिविण तेथे कांही नुरे || २१.

म्हणून माझे लिहिणे मौनाचेही मौन आहे. माझे शब्दत्व सिद्धांच्या मौनाचे मौनत्व टाकून देऊन स्वानुभूतीच्या पूर्ण मौनात रंगवून टाकणारे जलपृष्ठावर मगरीचे रेखाटल्या चित्रासारखेच तर आहे.

एवं दशोपनिषदें । पुढारी न ढळती पदें । देखोनि बुडी बोधें । येथेंचि दिधली ॥ १०-१८ ॥

सारभूत दश उपनिषदे तीही, नच यापुढती जाती | अनुभव अमृत पूर्णचि पाहुनी, स्वये यांतची ती लपती || २२.

आता प्रसिद्ध दश उपनिषदे यातील आशयाचे आकलन उमगल्यावर आपल्या निवेदनाचे सारे सार यांत आलेले पाहतील आणि यातील ज्ञानामृतात बुडी मारून अनुभवामृतरूप होऊन राहतील.

ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत । हें अनुभवामृत । सेंवोनि जीवन्मुक्त । हेंचि होतु ॥ १०-१९ ॥

परमाश्चैर्ये श्रीमंतचि हे, अनुभव अमृत गुरुकृपा | सेऊनी जीवन्मुक्तचि करिते, अनुभवी सहजी हरिरूपा || २३

ज्ञानदेव म्हणतात, हा अनुभव अमृत नामक ग्रंथराज षडगुण ऐश्वर्यात सर्वश्रेष्ठ असे जे दिव्यज्ञान, त्याने युक्त, ज्ञान-धन-संपन्न व सर्वात श्रीमंत आहे. याचे सेवनाने जीवनमुक्तीचा लाभ होईल.

मुक्ति कीर वेल्हाळ [विस्तारलेली] । अनुभवामृत निखळ । परी अमृताही उठी लाळ । अमृतें येणें ॥ १०-२०॥

चारी मुक्ति श्रेष्ठचि परि हे, अनुभव अमृत हरिच करी | या अमृत लाभास्तव उठते, लाळ अमृता जिभेवरी ||१६.

या ग्रंथीची जीहि अनुभूति, पूर्णत्वाने घेयावी | पूर्ण मुक्तिस्तव निरूपणीची, वाट निखालस चालावी || १७.

मुक्तींचा लाभ तसा मोठाच ! पण हे अनुभव अमृत निखळ ब्रहमाची अनुभूति देते. म्हणून अमृतालाही याचे स्वादासाठी जिभेला लाळ सुटते. या लेखनाला पूर्णत्वाने घ्यावे. आणि सहजी कैवल्याचा लाभ घ्यावा.

ययालागीं हें बोलणें । अनुभव अमृतपणें । स्वानुभूति परगुणें । वोगरिलें ॥ १०-२४ ॥

यालागी ही स्वानुभवाची पक्वाने, मी वोगरिली | सेवितील जे चकोर अमृत, इतरा स्वाद रुचि कळली || २९.

आणि मुक्त मुमुक्षु बद्ध । हें तंववरी योग्यता भेद । अनुभव अमृतस्वाद । विरुद्ध जंव ॥१०-२५॥

बद्ध मुमुक्षु मुक्त भेद जोवरी, हे अमृत ना चाखियले | अनुभव अमृत करिता सेवन, स्वयेचि श्री हरी ते झाले || ३१.

म्हणूनच यातील निरूपण माझ्या अनुभवाचे अमृत आहे. ही स्वानुभूतीची पक्वान्ने मी अगदी स्वादिष्ट बनवून वाढलेली आहेत. बद्ध, मुमुक्षू आणि मुक्त हे भेद तोवरच, जोवर या अमृताचा लाभ घेतलेला नाही.

तैसें जे या अखरा । भेटती गाभारां । ते वोघ जैसे सागरा । आंतु आले ॥ १०-२८ ॥

तैसे जाणती गहन आशया, स्वयेचि होती श्रीहरी ते | एकरूपची जलौघ सारे, केवळ मिळता सिंधूते || ३४.

यातील **अक्षरांच्या गाभाऱ्यात जाऊन जे याचा आस्वाद घेतील** ते, जलप्रवाहांनी सागरात प्रवेश केल्यावर स्वयेच सागर होतात, तसे तेच श्रीहरी होतील.[माऊलीने हाच आशीर्वाद सर्व रस घेणारांना द्यावा]

तैसी तिये ईश्वरीं । अंगुळी नव्हेचि दुसरी । किंबहुना सरोभरीं | शिवेसीचि ॥ १०-३० ॥

एकलाची श्रीहरी दुजी ना, अंगुली लागे मोजाया | सारे हरीमय एकतत्वची, जीव शिव नि ना माया || ३६

या परब्रह्म हरी साठी तो एकमेव असल्याने मोजतांना दुसरी अंगुली उचलावी लागत नाही. तोच सर्वत्र सर्वव्यापी आहे. जीव, शिव वा माया हे आभास आहे. एकच एक ईश तत्वाने सारे व्याप्त आहे.

म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें । सणु भोगिजे सणें विश्वाचेनि ॥ १०-३१ ॥ ॥

म्हणुनि म्हणती ज्ञानदेव या, अनुभव अमृत वर्षेने | विश्वामाजी करा साजरी, दीपावली आनंदाने || २२.

म्हणून श्री ज्ञानदेव म्हणतात या अनुभव अमृताचे प्राशन करून उज्वल व्हा. या ज्ञानाच्या दिव्य प्रकाशाने चिरंजीव व्हा आणि साऱ्या विश्वात समरस होऊन दीपावली साजरी करा. आता सारा दिव्य प्रकाशच प्रकाश ! !

अमृत गंगा – कलश दहावा, समाप्त

मूळ ग्रंथ नि अंतरंग ही यांत नेमके काय असे | सहजी उमगे कलश वाचिता, संक्षेपाने जाणतसे ||

हा आदेशही माऊलीचाचि, आशय ध्यानी येण्याला | अंतरी बैसुनी मजशी सांगता, कठीण काय मज लिहिण्याला ||तीर्थ

गोड मानुनी घ्यावी सेवा, हृदय आपुले आळंदी | अनुभव जीवनी स्वयेचि घ्यावा, रंगावे मग स्वानंदी ||

|| हरी ॐ ||

अण्णा

-अमृत कलश सार प्राशन समाप्त-

तीर्थ पहिले

एकचि शिव तो स्फूर्ति होता, स्वयेचि प्रकृति रूप धरी | एकदुज्यांच्या विविध मिश्रणे, या सृष्टीला साकारी ||

परब्रहमाच्या अंगावरती, नित्य खेळ हा आभासे | जसे जलावर तरंग, लाटा क्षणिक खेळ हा चालतसे ||

विस्मृती आपणा निजरूपाची, भास जगाचा करवितसे | विश्वाभासा पैल पाहती, त्यासी हरीमय जगत दिसे ||

पूर्ण समर्पण श्री चरणाशी, सहजी देत कैवल्याशी | विरता देहबुद्धी ती पुरती, समरसता येई हरीशी ||

तीर्थं दुसरे

नित्य वसे सद्गुरू अंतरी, द्यावे जीवन त्या हाती | प्रवृत्ती विरवुनिया पुरती, सहजी येतसे निवृत्ती ||

प्रवृत्ती त्या कधी ना शिवे, सहज भाव निवृत्ति असे | निवृत्ती गुरु नामे शिकवी, वर्तावे कैसे जगती ||

संपर्की, ये वस्तू व्यक्ति, सोडुनि आपणा जात असे | ममत्व नि आसक्ती फसवी, प्रपंच चक्री घुमवितसे ||

विहित कर्म निष्ठेने आचरी, परी कशातची गुंतू नये | जे आले ते सहज स्वीकारी, ब्रह्म भाव परि विसरू नये ||

तीर्थ तिसरे

चारही वाणी जरि उपयोगी, देती कल्पना ब्रह्माची | बोध येई परि अहं न जाई, दिशा कळे परमार्थाची ||

'मला जाहले ज्ञान' असा जो अहंभावचि मनी आला | तोचि कारण होइ बंधना, दूर ठेवी ते ब्रहमाला ||

लाभ न झाला कैवल्याचा, ऋण वाचेचे येई शिरी | परब्रह्म शब्दा पलिकडले, दूरचि तो राहिला हरी ||

वाचा ऋण फिटते ते केवळ, पूर्ण समर्पण गुरुचरणी | समरसता होई ब्रहमाशी, केवळ आचरी गुरुवाणी ||

तीर्थ चवथे

अज्ञाना नासुनिया पुरते, आत्मबोध होता पुरता | ज्ञान बाजुला सरते, मिटती, भेद अलग ज्ञेय नि ज्ञाता ||

नसे ज्ञान वा अज्ञानही ते, शुद्ध ज्ञानमय हे सारे | स्वयंसिद्ध त्या ब्रह्मालागी, ज्ञात अन्य ना कुणी करे ||

सूर्यासम निज-रूपा नेणे, प्रगट जीवा संध्या-काली | अनुभवी विश्वाचा लीलाधार, निद्रा-जागृती समकाली ||

ना निद्रा परि येत जागृती, सहजी स्फुरते वस्तुप्रभा | विसरुनी सारे त्यास अनुभवी, स्वयेची होई आत्मप्रभा ||

तीर्थ पांचवे

श्रुती सच्चिदानंद म्हणोनी, नित्य हरी गौरवीतसे | सत्ता, प्रकाश आणि ज्ञान ते, एकरूपे हरिठायी वसे ||

त्रिपदे ही ना हरीची वाचक, अनुभुतिचा निर्देश असे | प्रकाशरूपे सत्ता विलसे, प्रकाशात उल्हास वसे ||

नेणे हरि सच्चिदानंद मी, अनुभवि जोहि हरी होई | स्वयेचि सुखमय, सुखा अनुभवी, मौने रंगुनिया जाई ||

आतुर हरि भेटण्या अंतरी, अहं वेष्टणे वेढियला | नित्य मुक्त तू, अहं त्यागिता, पावन श्री हरीची झाला ||

तीर्थ सहावे

शब्द असती ते अति उपयोगी, या भौतिक व्यवहाराला | स्मरण देती नि, दिसे न तेही, दावितीही ते अंधाला ||

विधी निषेध शिकविती, परि ते प्रपंचातची अडकविती | अज्ञानाची संगत करिता, शुद्ध शिवाही फसविती |

मुक्त असुनी शिव, बद्ध भासवी, वृथा साधनी गुंतविती | आत्म दर्शना ना उपयोगी, शब्द न वर्णिती आत्मस्थिती ||

अविद्येस अस्तित्वचि नाही, अभाव रुपे ती राही | आत्मदेव तो पूर्ण ज्ञानमय, अज्ञाना वावची नाही ||

तीर्थ सातवे

पूर्ण ज्ञानमय प्रकाश आत्मा, दाट तमची ते अज्ञान | ज्ञान विरोधी अज्ञानाला, आत्म्याठायी नच स्थान ||

हरी निर्मितो नित्यचि नूतन, सृष्टी संगे नव जाण | अंतरिच्या आवाजे देई, नित्य साधका उत्थान ||

निद्रा-जागृती संधिकाली, आत्मभान सहजी होई | ॐ समरसता नाद कंपनी, स्वयेचि हरिमयता येई ||

बंधन- मुक्ति उभय नसेची, मुक्तचि आपण नित्य असे | सारे हरीमय विश्व असे हे, अहंकारचि अडवितसे ||

तीर्थ आठवे

पूर्ण ज्ञानमय, अनंत ऐशा, निज-स्वरूपी आपण आणिले | ज्ञानाज्ञानाच्याहि पैल मी, असणे नसणेही नुरले ||

सीमित नाही आत्मपणाने, स्व संवेद्यचि अनुभूति | पूर्णत्वे स्वानंदी दंगे, केवळ सुखमय आत्मस्थिती ||

शब्द न वर्णिती, विषय न होई, ऐसी ही निज-आत्मस्थिती | भोग्य न भोक्तेपणहि नाही, लपणे वा ना, एक स्थिती ||

'जाणियले' जे ऐसे वदती, शुद्ध ज्ञान त्या ना झाले | आणि जोही असे नेणता, तया जाणतेपण आले ||

तीर्थ नववे

सिद्ध होऊनी ब्रह्मरूपचि, नित्यची अद्वैती रमती | भोग नि भोक्ता, भक्त देवही, स्वयेचि होती अद्वैती ||

तो करितो ते सदैव पूजन, चालणेहि यात्राचि असे | कृती, बोलणे सारे करि जरि, आत्मभान ना विसरतसे ||

विविध अनुभूति, विषयस्पर्शही, ब्रहमाविण त्या अन्य नसे | अंतरीच्या आवाजे वर्ते, बंधन विधीचे त्या न असे ||

गुरु अवतरती उद्धारास्तव, सहज भक्तीने शिव करिती | सद्गुरूस त्या पूर्ण समर्पण, वंदन करि मी अल्पमती ||

तीर्थ दहावे

‘अनुभव अमृत’ पूर्ण जाहले, नसेचि केवळ मजसाठी | इच्छुक कैवल्याचे जेही, मुक्तचि अमृत त्यासाठी ||

लिहिले ते तर प्रगटचि ज्ञात्या, स्वयंप्रकाशित तत्वचि ते | ब्रह्मा अनुभविले ते लिहिले, अनुभवती मौने ज्ञाते ||

पूर्ण ब्रह्म जाणिवे वेढिलो, वोगरिली ती पक्वान्ने | गहन आशया समजुनि सेवन, सहजी कैवल्या येणे ||

या परते ते नसेचि कांही, नवी रुची ये ज्ञात्याला | दिव्य प्रकाशे करा साजरी, विश्वी त्या दीपावलीला ||

अनंताच्या वाटेवरल्या सर्व पथिकांना विनम्र नमस्कार. अनुभव अमृत’ या ग्रंथाच्या आशयाच्या सुलभ काव्यमय शब्दिकरण करण्याची प्रेरणा माऊलीने दिली. स्वत: माऊलीने गहन आशय सुलभ केला, त्यासाठी जाणकारांच्या ग्रंथांचे बहुमोल सहाय्य झाले. आपल्या सदिच्छांनी बळ दिले. श्री आत्मरूप गणेश आसनी विराजमान असल्याने लेखन सुलभ झाले. जे आपण नित्यच आहोत, त्याची अनुभूति सहजी यावी, म्हणून अनेक साधना या ग्रंथात संकेत रूपाने दिल्या आहेत. त्या मूळ अमृत गंगा- कुंड १ ते १० मध्ये खुलासेवार सापडतील. कलश लेखनात त्याचा संक्षेपाने जागजागी उल्लेख आहे. ज्ञानदेवांनी आत्मदेव हाच आद्य पूज्य श्री गणेश असे म्हटले आज माघ शुद्ध चतुर्थीला श्री चे जयंतीलाच **‘ई साहित्य प्रतीष्ठान’** करवी हे प्रकाशन होत आहे. ही माऊलीची इच्छा. आपणा सर्वांस कैवल्याचा लाभ व्हावा हीच श्री चरणी प्रार्थना

अण्णा – नाशिक पंचवटी

– माघ शुद्ध चतुर्थी –श्री गणेश जयंती १५/०२/२०२१{ msonavane@hotmail.com

श्री अनुभव अमृत अंतरंग

श्री अनुभव अमृत अंतरंग – अमृत गंगा –कुंड पहिले

रचना- मधुकर वि. सोनवणे

नाशिक –पंचवटी –

मनोगत

नववर्षाच्या प्रथम मंगल दिवशी अचानक ‘अनुभव अमृत रहस्य ‘ ग्रंथ हाती आला. आणि माऊलीचा आदेश आला की, याचे सुलभ काव्यमय रूपांतर करावे. यापूर्वी संपूर्ण ‘अनुभव अमृत’ समजून घेण्याचा प्रयास केवळ दुर्बोध भाषेमुळे आशयाचे आकलन नीट होत नसल्याने केला गेला नाही. सुदैवाने माऊलीने पुढे दिलेले सुयोग्य ग्रंथ उपलब्ध करून दिल्याने व वेळोवेळी मार्गदर्शनाने शब्द अंतरी उमटत गेले. आणि काव्यरूप घेत गेले.

१), अभंग अमृतानुभव –स्वामी स्वरुपानंद -१९६२. २). अमृतानुभवातील अद्वैत दर्शन -स्वामी विद्यानंद – २०१७. ३). अनुभवामृत रहस्य- श्री राजाराम केशव कुलकर्णी [पंडित राजाराम बुवा ब्रह्मचारी]लेखन १९१७ ४). अमृतानुभव- श्री वि. न. जोग – १९०५. -५). शिव कल्याण कृत

नित्यानंदैक्यादीपिका – अण्णा मोरेश्वर कुंटे -१८८८ -६). अमृतवाहिनी – रामचंद्र ब. डोंगरे – १९२७ ७). डॉक्टर रहाळकर[लंडन] यांचे, श्री रामचंद्र भागवत तसेच स्वामी अभयानंद यांचे इंग्रजी भाषांतर आणि बहिरट यांचे इंग्रजी भाषांतर या सर्व ग्रंथांनी आशय आकलन उत्तम झाले. समजल्याशिवाय लेखन करायचे नाही हे ठरवून लेखन चालू राहिले. कधी एखादीच ओवी दिवस भरात व्हायची, पण आकलन झाल्यावर होणारा आनंद अनेक जन्म पुरेल असा असे.

कित्तेकदा भान हरपून जाई आणि अमृत रसपान सुरेख होई. आता पटले की, हा विद्वत्ता वर्धनाचा विषय नसून माऊलीची कृपा होताच येणाऱ्या अनुभूतीचा आहे. आपल्या वाट्याला आलेली कर्मे निष्काम भावाने करून कोणत्याही साधना न करता साधता येते. सुदैवाने मला मुक्तिची इच्छा नाही आणि मृत्युचे भय नाही. मी प्रत्येक जन्म माऊलीचे कार्य पुढे नेईन.

हे पूर्ण लेखन 'स्वांत सुखाय' केले आहे. काव्यात छंद मात्रा यांची अचूकता नसेलही, पण आशय मात्र नेमका असेल. मूळ ओव्या इटालिक व ठळक आहेत. ओवीचे आशयात्मक आकलन व भाष्य काळ्या रंगात आहे.

माझ्या काव्याच्या पंक्तींचे क्रमांक अगदी सद्गुरू स्तवनाच्या संस्कृत रचनेपासून सुरू झालेले आहेत. प्रत्येक कुंडाचे वेगळे आहेत. ज्ञानदेवांच्या मूळ ओव्यांचे क्रमांक तेच ठेवले आहेत. ही अमृत गंगा असून प्रत्येक अध्यायातून वाहत जाणारी मूळ अध्यायानुसार वेगळाल्या कुंडातून जाता आहे अशी कल्पना आहे. विद्वान रचनाकारांचे भाष्य काव्यमय करतांनाचे ओवी क्रमांक पुढे चालू ठेवले आहेत. कुंडांची नांवे अमृत वाहिनी ग्रंथाप्रमाणे दिली आहेत.

मला लाभलेला आनंद वाचकासही व्हावा हीच सदिच्छा. हरी ॐ ||अण्णा {मधुकर वि. सोनवणे}१४/०७/२०२० [प्रथम कुंड लेखन|

कृतज्ञ वंदन



गुरुदेव श्री ज्ञानेश्वर माऊली

अमृतमय ॐ – कुलदेवता

श्री रेणुका माहुर गड वासिनी

आशीर्वाद स्तवन

ॐ कारे अनुभूत गणेशा, स्व-संवेद्य श्री आत्मरूपा | नित्य अनुभूति तुझी होऊ दे, सदा राहु दे तुझी कृपा || १.

सद्गुरू माऊली हृदयी माझ्या, प्रतीत हो अंतरातुनी | तुला समर्पण हेचि वंदन, तूचि घेशी सारे लिहुनी || २.

कुलदेवी श्री माहुर वासिनी, आई रेणुका जगदंबा | तुझ्या कृपेने जीवन चाले, वाढविशी जीवन शोभा || ३.

आम्हा हितकर माते देशी, सदैव वंदन तंव चरणी | आशीर्वाद दे काव्यलेखनी, विनम्र भावे मी चरणी || ४.

या विश्वातील दिव्य शक्ति ज्या, आत्मिक उन्नती सहजी करी | कृतज्ञ भावे वंदन आपणा, कर दिधला आपुले करी || ५.

अनुभव अमृत गंगा वाहे, पूर्ण स्नात मज होऊ दे | यथेच्च रसपानहि ते व्हावे, नित्य रमुनिया स्वानंदे || ६.

मूळ ग्रंथ -**श्री अनुभव अमृत मंगलाचरण-**

यदक्षरमनाख्येयमानंदमजमव्ययम् । श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥ १ ॥

अविनाशी अनुपम स्वानंदी, स्वयंभु अज श्रीमंत असे | ईश तत्व जे श्री निवृत्ती, नामे सकला ख्यात तसे || १

इष्ट दैवता, आश्रय घेई, तंव चरणांचा, कृपा करी | विनम्र भावे, शरण तुला मी, मम कर दिधला तुझ्या करी || २.

अहंरूप उठता प्रवृत्ती, साक्षी भावे तिज पाही | सावधान होऊनी लय करी, स्वरुपात तिज लवलाही || ३.

निवृत्तीचि सद्गुरूरूपे, ईशतत्व हृदयात वसे | आश्रय त्याचा नित्य घेतला, सद्गुरू मम हृदयी असे || ४

गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्याहि शांकरी । जयत्याज्ञानमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम् ॥ २ ॥

गुरूतत्व साक्षात शांकरी, नित्यचि जयजयकार असो | दयार्द्र त्या श्री सद्विद्येस्तव, वंद्य भाव मम हृदयी वसो || ५

शांकरी विद्या कांती शिवाची, सद्गुरूरुपे उद्धरिते | हिच्या कृपेने निर्मळ होऊनि, अनुभविते कैवल्याते || ६

आदिगुरू श्री शंकर कृपा, जीवनदीपाते उजळी | दयार्द्र शक्ति अमृतगंगा, जन्मजन्मीचा मळ क्षाळी || ७ .

अहंकार पुरता मिटवोनी, नाशितसे अज्ञानाला | आत्मरुपाचा प्रत्यय देई, ऐक्यरुपे वंदन तिजला || ८.

सार्द्धं केन च कस्यार्द्धं शिवयोः समरूपिणोः । ज्ञातुं न शक्यते लग्नमितिद्वैतच्छलान्मुहुः ॥ ३ ॥

ही शक्ति श्री शिव अंगीची, शिवाठायी अर्धांगी वसे | समरूपी मिसळले कवण किती ते, ज्ञात कुणालाही नसे || ९ .

शिव शक्ति मिसळती किती ते, जाणुनि घेणे शक्य नसे | ऐक्यपणा प्रख्यात तयांचा, बुद्धी कुंठित होत असे || १०

ज्ञानशक्तिरुप तत्त्व शिवाचे, क्रियाशक्तिरुप शक्तीचे | नित्य बदलत्या उचित प्रमाणे, मिसळुनि कार्यहि सृष्टीचे || ११ .

शिव चैतन्यचि गुप्त राहते, दृश्यमान शक्ति विलसे | व्यक्ति वा अव्यक्ती असे जे, शिवशक्तिविण अन्य नसे ||१२ .

अखिल चराचर त्रिगुणे विनटे, वेगवेगळी गति त्यांची | किती चैतन्ये फिरे उपाधी, धांव खुंटली बुद्धीची || १३ .

कोण किती संलग्न जाहले, कधी कुणा हे उमगेना | पुरुष प्रकृति ऐक्य अबाधित, खेळ तयांचा समजेना || १४ .

मी न वेगळा शिवशक्तीविण, नियोजनचि त्यांचे हाती | विवेक वैराग्या अनुसरुनी, सबल करावी शिवशक्ती || १५.

आदितत्व शिव स्वयंप्रकाशी, हृदयदेशी ते नित विलसे | शक्ति ज्ञानरूपा त्या जाणे, नित्य 'शिवोहं' गर्जतसे || १६ .

अर्धांगी ती असे शिवाची, शिवात शक्तीरुपे राही | शिव नि शक्ती या उभयाविण, ब्रह्मांडात नसे कांही || १७ .

निर्गुणाची ॐ, बहुगुणी छाया, उदय अस्त तिज होत असे | शिवरूपावरी तीचि उमटे, ॐ ध्वनिरुपे विलसतसे || १८ .

नाना रुपे नाना नामे, शिवा संगती प्रगटतसे | विरोधी धर्मा नित्य प्रसवुनि, रूप नित्यचि नव भासे || १९ .

तृणापासुनि ब्रह्म्याचेही, जेहि जगी अस्तित्व असे | शिव नि शक्ति या संयोगे, या जगती ते विलसतसे || २०.

प्रणव शक्तिचि शिवास जाणे, विश्वा नामरुपा आणिले | शिव शक्तीचे प्रमाण किती ते, कधि कुणाला ना कळले || २१ .

निर्विकार परि दिसे विकारी, असुनि स्थिर अस्थिर दिसे | जेहि भासे दिसे कळतसे, वा कल्पियले तीच असे || २२ .

अनंत आकाशात शिवाच्या, स्पंदन इच्छेचे उठवी | वायु तेज जल आणि धरती, विविध मिश्रणे ती उभवी || २३ .

अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयंतौ मिथस्तराम् । तौ वंदे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥ ४ ॥

आत्मस्वरूप अद्वैती दाविती, त्या श्री शिवशक्तीला | जगत्कारणा आद्य स्वरूपा, विनम्र वंदन चरणाला || २४..

तत्वप्राप्तीस्तव नमन तुला हे, यथार्थ देई ज्ञान मला | उभया वंदन पूर्ण समर्पण, ज्ञात करी तंव रूपाला || २५.

अद्वैती जनकांचे पोटी, द्वैतरूपे हे जगत दिसे | द्वैती लपे अद्वैत गुप्त ते, राखिती त्या नकळेचि कसे ?|| २६.

निर्मिती पोशिती लयही करिती, एकदुज्यांच्या सहयोगे | आद्यतत्व ते सादर नमिले, विश्वाभास जया योगे || २७.

शिवचि जाणे निज शक्तीला, शक्ति जाणते श्रीशिवा | निज एकत्वा कधि न विस्मरे, जाता जरि मिथ्या भावा || २८.

भिन्न भासती नामरूपाने, तत्वस्वरुप परि एक असे | आदी कारण तेचि जगाचे, विनम्र भावे वंदितसे || २९

मूलायाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये । क्षिणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥ ५ ॥

सृष्टीच्या आरंभी बिजरूप, स्फुरद्रुपे तूचि असशी | अग्रभागी जंव वाढ खुंटता, अंतीहि तूचि वसशी || ३०

या सृष्टीचा मूल मध्य लय, जया कारणे आभासे | परि या आभासात नसे त्या, सर्वरूपा मी वंदितसे || ३१.

स्थितीकाल जो मध्य सृष्टीचा, त्या रूपातहि तूंच वसे | तिही स्थितीची क्षीणावस्था, लय तुजमाजी होत असे || ३२

असा नित्य तू पूर्णरुपाने, श्री शिव शंभो नित्य असे | विनम्र भावे वंदन तुजला, अन्य तुजविणा कांही नसे || ३३..

पूर्ण असोनि विश्वी दाविती, उत्पत्ति स्थिति आणि लया | आदिकारण ते विश्वाचे, सर्वरुपा वंदन पाया || ३४. .

सृष्टीच्या आरंभी स्फुरद्रुप, बिजस्वरूपे जे विलसे | स्थितीच्या मध्यकाली नि अंती, लयास कारण जेचि असे ||३५ .

आरंभी, मध्ये नि अभावी, स्वसंवेद्य ऐसे स्फुर्तिरूपे | नित्य पूर्ण त्या शिव शंभूला, नमस्कार परमात्मरुपे || ३६ .

उत्पत्ति पूर्वी नव्हते जग, आणि अंती ते लय पावे | मध्ये भासे अभावरूपे, जणू स्वप्नीचे देखावे || ३७ .

जेही दिसे प्रत्यक्ष लोचना, त्याचे अस्तित्वचि नसे | अभाव रुपे मूर्तरुपाशी, वास्तव सारे शून्य असे || ३८ .

अभावेचि विनटे शिवशक्ति, नसताही जे परि भासे | नमस्कार त्या शिवशक्तीला, या जगती जे, तेचि असे || ३९.

अनुभव अमृत –

ग्रंथ प्रवेश

शिव शक्ति समावेशन

{ प्रथम अध्याय }

ऐसी इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें । तियें वंदिलीं मियां मूळिकें । देवोदेवी ॥ १-१ ॥

असे उपाधी रहित असती जे, मायबाप ते विश्वाचे | देव देवी ती पुरुष प्रकृती, चरण वंदिले मी त्यांचे || ४०

जरि जगता दाविती स्वरूपे, निरुपाधिकचि ते असती | नसते भासविती या जगती, सर्वाठायी शिवशक्ती ||४१.

थोर एवढे जरि ब्रह्मांडही, शिवशक्तीचि भासविती | कांही नसता, नियमानेचि, विश्वा आकारा आणिती ||४२.

सत्ता रुपे असे पुरुष नि जाणीव शोभा प्रकृती ती | साऱ्या जगती खेळ खेळती, एकरूपाने शिवशक्ति || ४३.

प्रत्येकाची गती वेगळी, आकर्षण वेगळे तसे | सारे फिरती निजकक्षेतचि, चराचरहि सारे जगती || ४४.

देहा धारण उभया योगे, स्वप्न जागृती कारण वा | सारी शिवशक्तीची लीला, खेळ खेळती नवा नवा || ४५.

अहंकार करि वेगळेपणा, मी तू पणाला पोषविती | सारे येती जाती रिकामे, व्यर्थचि बंधनात पडती. || ४६.

स्वये उपाधी रहित राहती, खेळ जरी सारा करिती | एवं निरुपाधिके म्हणोनी वंदियली मी शिवशक्ती || ४७.

देहबुद्धी मुकवी स्वानंदा, निर्भयता विलया जाई | धाववी फसव्या मायेमागे, विकृति विकारास देई || ४८ .

निजस्वरूपा जाणुनियाचि, पुरुष प्रकृति वंदावे | देहभाव सारुनी बाजूला, स्वानंदी तल्लीन व्हावे || ४९ .

जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरीं । चारुस्थळीं येकाहारी । एकांगाची ॥ १-२ ॥

उपभोगाची उठता उर्मि, शिवचि प्रकृति होत असे | प्रिया नि प्राणेश्वरी होऊनि, आप आपणा भोगितसे || ५०.

वायु तेज जल आणि धरती, चार मिश्रणी वस्ती करी | विन्मुख होऊनिया स्वरुपाच्या, विषयांचा तो संग धरी || ५१ .

द्रष्टयाला द्रश्याची आवडी, होता तोचि दृश्य बने | रम्य अशा जगताच्या खेळी, मुरडुनि पाही तृप्त मने || ५२ .

एकचि शिव तो स्फूर्ति होता, स्वयेचि प्रकृति रुप धरी | स्फुरण असे हे प्रणवरुपाचे, क्रियाशक्ति ती सृजन करी || ५३ .

तहान लागे तृष्णा स्फूर्ति नि, शिवशक्ती शोधिती जला | ज्ञान अचुक ते असे शिवाचे, शक्ती फिरवी देहाला || ५४ .

ज्ञानरूपा ही क्रियाशक्तिचि, शब्दगुणाने भासतसे | स्वरूप स्फुरता, पुरुष जागृती, जाणे मीचि ब्रह्म असे || ५५ .

स्वरुपाच्या परि विस्मरणाने, प्रकृति सत्ता आभासे | देहबुद्धितुनि अहंकार ये, मायाजाली फसत असे || ५६ .

स्मरणे वा विस्मरणे ऐशा, पुरुष प्रकृती भाव उठे | अहंभाव वा कधि 'शिवोहं', अंतरात स्फूर्ति दाटे || ५७

कधी पुरुष नि कधी प्रकृति, स्वयेचि होती स्वभाव हा | साक्षीभावे अलिप्त होऊनि, मायेचा हा खेळ पहा || ५८.

कोण असे मी, हे शोधावे, स्फुरण नेमके काय असे | पुरुष प्रकृति दोन न असती, एका अंगी दुजी वसे || ५९ .

अज्ञानाने एक लपुनिया, दुजे भासते 'अहं' मुळे | ज्ञानदीपाने सत्य जाणता, अंतरी ब्रह्मभाव उजळे || ६० .

इदं रुपाचे स्फुरण निजरुपा, ठेवी विस्मृत ते करुनि | स्फुरण लयाला जाता राहे, ब्रम्हभावचि तो भरुनी || ६१

ऐक्यभाव हा पुरुष एकला, दुजेपणा प्रकृति आणी | हे जाणे जो साक्षीभावे, भवसागर जाई तरुनी || ६२ .

आवडीचेनि वेगें । येकयेकातें गिळिती अंगें । कीं द्वैताचेनि पांगें । उगळिते आहाती ॥ १-३ ॥

स्फुरण रूपाने उठे आवडी, एक दुज्याचा लय करिती | नित्य खेळ चाले विश्वाचा, क्षणात नवरूप प्रगटविती || ६३ .

शिव शक्तीचे एकदुज्यावर, असे प्रेम द्वैतासाठी | लटकेचि उत्पत्ति स्थिति लय, भाव अभावे जागविती || ६४ .

विनिमय चैतन्याचा करुनी, उपाधी रूपा साकारी | चैतन्यही बदलवी आकारा, एकदुज्याचा लयचि करी || ६५ .

चैतन्याने उपाधी गिळिता, नव रूपाने ती प्रगटे | नव्या रूपाचे नवे कार्य ते, विश्वी चित्र नवे उमटे || ६६

उत्पत्ती होताचि बदलते, स्थिति अस्थिर ती प्रतिक्षणी | अद्वैतातुनी बहुरूपाचे, स्फुरणे घडते लय करुनी || ६७

गळती पाने जीर्ण पालवी, नवी वसंती ती येई | गिळुनि जीर्ण ते नवे उगळती, खेळ असा चालू राही || ६८

एकचि शिव तो द्वैत चिंतिता, स्वयेचि स्फुरणे बहु होई | स्वरूप ज्ञानाच्या उर्मीने, दुजेपणा गिळुनि घेई || ६९ .

प्रतिक्षणाला द्वैत विलसते, नवरूपाला प्रगटवुनी | परि मुळातुनि ब्रह्म एकचि, विलसत नवरुपा धरुनी || ७० .

जेही आहे कृष्ण द्रव्य नि, ऊर्जा कृष्ण ती ब्रह्मांडी | तेचि भांडवल शिव शक्तीचे, विश्वी रचण्या उतरंडी || ७१.

प्रकृती भावे पुरुष लोपतो, स्वरूप भाना तो विसरे | ज्ञानतेज अंतरी उजळता, बोधे प्रकृति सहजी विरे || ७२ .

सूर्य झाकला जणू अभ्राने, तसा झांकला स्फुरण रुपे | स्व-भान विसरे, द्वैती रमला, जशी जागृती स्वप्नी लपे || ७३

जरि अक्षर तो, क्षरा अनुभवी, प्रकृतीसंगे तो खेळे | पुरुषाहुन प्रकृती भिन्न ना, एकलेपणा कंटाळे || ७४ .

विसरुनिया आपुले थोरपण, तो सुख-दुःखा अनुभवतो | निर्गुण तरि तो त्रिगुणी रमुनि, सानपणाला अनुसरतो || ७५ .

उपनिषदातिल दुजा पक्षी तो, शेंड्यावरती स्वस्थ असे | फलस्वादि रमला जीव पक्षी, वाट तयाची पाहतसे || ७६ .

जे एकचि नव्हे एकसरें । दोघां दोनीपण नाहीं पुरें । काइ नेणों साकारें । स्वरूपें जियें ॥ १-४ ॥

स्फुरण एकची होऊनि द्रष्टा. आणि दृश्यहि एकसरे | दोन म्हणावे परि एकचि, सृजन परि विविधाकरे || ७७

निराकार जरि निजस्वरूपे, विविधाकारा प्रगटविती | ऐक्यालागी भंगु न देता, खेळ खेळती ते जगती || ७८.

एक म्हणावे परी विविधता, साऱ्या ब्रह्मांडात दिसे | दोन म्हणावे तरी उपाधी, चैतन्याविण कदा नसे || ७९.

आकाराने बद्ध म्हणावे, क्षणोक्षणी परि रूप नवे | निराकार कि, साकारचि हे, प्रश्नी बुद्धी ना धावे || ८०.

एकावाचूनी दुजे न राही, उभय मिळुनि सिद्धता वसे | दोन पणाने एक भासते, सरिता प्रवाह दोन जसे || ८१.

जे उपजे ते लयास जाई, आदिअंति परि तेच असे | जसा बुडबुडा आदी अंती, जळावाचुनी अन्य नसे || ८२.

जेही दिसते त्यासि बदलती, शिव तांडव हे नित चाले | उत्पत्ति स्थिति शब्दचि नुसते, विश्वी लय सारे बदले || ८३.

एक म्हणावे, दोन बहु वा, शब्दांचा हा खेळ असे | एकलेपणा नित्य राखिती, वरवर बहूपणा भासे || ८४.

पूर्ण विकारी विश्व असे हे, ओळखुनि जागृत व्हावे | असत्त्यांत या मुळी न रमता, स्वानंदी तल्लीन व्हावे || ८५.

पुरुष प्रकृति खेळ पहावा, साक्षीभावा जागवुनी | लटक्या खेळी सामील व्हावे, निजरुप परि ना विस्मरणी || ८६.

कैसी स्वसुखाचि आळुकी । जे दोनीपण मिळोनि येकीं । नेदितीचि कवतिकीं । एकपण फुटों ॥ १-५ ॥

शिवशक्तीची स्वसुख भोगण्या, जरि आवडी अन्य नसे | परि कदापि ऐक्य न भंगे, एक दुज्यातचि विरत असे || ८७.

ऐक्याविण ना पूर्ण सुख मिळे, जाणुनि खेळती, सावध ते | नि:संगेचि भोग भोगिता, ऐक्य आवडी ना सुटते || ८८.

द्वैतामधल्या सुखा भोगिता, त्यांत न रमती शिवशक्ती | ऐक्याची ती ओढ अनावर, त्यातची पूर्णसुखे तृप्ती || ८९.

द्वैतामधले सुख अनुभवण्या, जरि आलासी इहलोकी | भोगावे, परि ना गुंतावे, कारण स्व-रुपी पूर्णसुखी || ९०.

तृप्ती येथल्या सुखात नाही, लाभे ती तर ऐक्याने | शिवशक्तीचे रूप आपुले, क्षणिकचि सुख ते खेळाने || ९१.

यावे, खेळावे, भोगावे, स्व-भान परि ना विसरावे | खेळ आपुला आपुल्याशी हा, सारे ब्रहमार्पण व्हावे || ९२.

सुखात इथल्या नसे पूर्णता, पूर्ण सौख्य ते स्वानंदी | खेळ असाची तो खेळावा, दुज्या पहावे आनंदी || ९३

कृति कर्माची अशी असावी, ज्यातुन दुज्यास सुख व्हावे | शक्तिसंगे येथ वर्तता, शिवत्व भान न सोडावे || ९४.

हा ठाववरी वियोगभेडें । जें बाळ जगायेव्हढें । वियालीं परी न मोडे । दोघुलेपण ॥ १-६ ॥

मूळ स्वरूपी समरसले तर, वियोग होईल द्वैताचा | म्हणुनी साकारिले जगाला, आठव जेणे उभयांचा || ९५.

विशिष्ट कार्या जगती राहणे, कार्य संपता ते जाणे | जाणुनि ऐसे कार्य करावे, शिवत्व ना विस्मृत जेणे || ९६.

आपुलिये आंगीं संसारा । देखिलिया चराचरा । परी नेदितीचि तिसरा । झोंक लागों ॥ १-७ ॥

शिवशक्तीच्या संयोगाने, पूर्ण चराचर उद्भवले | जे जगती ते पुरुष प्रकृती, कुणी न तिजे येथे आले || ९७

साऱ्या ब्रह्मांडाची कर्मे, शिवशक्तीच्या संयोगे | जेही होते-जसेही होते, केवळ दोघांच्या योगे || ९८

चैतन्याचा दाता शिव तो, शक्ति खेळवी तयामुळे | देहा वाटे मी चि कर्ता, बंधन होई जयामुळे || ९९

द्रष्टा अंग असे पुरुषाचे, आणि प्रकृति दृश्य जगत | सारा दोघांचाचि मामला, स्वप्नसृष्टी की जणु तद्वत् || १००

स्फुरण प्रकृतीपुरुषा होता, कोश मनोमय चित्र उठे | तोचि स्वप्नमयी संसारहि, सत्यचि मनुजाशी वाटे || १०१

जयां येक सत्तेचें बैसणें । दोघां येका प्रकाशाचें लेणें । जें अनादि येकपणें । नांदती दोघें ॥ १-८ ॥

अधिष्ठान उभयास एकचि, लेणे श्रीहरी कांतीचे | अनादिपणे उभय नांदती, अभिन्न अंगचि ते हरीचे || १०२

घटास सत्ता एक मृत्तिका, उष्म्या सत्ता अग्नीची | पुरुष प्रकृति तैशी सत्ता, एकचि त्या परब्रहमाची || १०३

साऱ्या ब्रह्मांडास शक्ति ती, पुरुष प्रकृतीचीच असे | सारी कार्ये त्या शक्तीने, निर्गुणात ती गुप्त वसे || १०४

आज्ञाचक्री करिता ध्याना, दर्शन तेजोमय होई | तीच शिवाची सगूण मूर्ती, ज्ञाता बनुनी सुख देई || १०५

द्रष्टा बनुनी बघे श्री हरी, दर्शन हरीचे हरी घेई | निर्गुण निरखी सगुण कांतीला, सारे हरिमयचि होई || १०६

प्रकाश बिंदू आणि नादहि, विविध रुपे ती शक्तीची | निर्गुणातुनी सगुणी सत्ता, माया हीच असे हरीची || १०७

भेदु लाजौनि आवडी । येकरसीं देत बुडी । जो भोगणया ठाव काढी । द्वैताचा जेथें ॥ १-९ ॥

भोक्ता पुरुष नि भोग्य प्रकृति, भेद शोधिता मति लाजे | जणू भेदची अभेद होऊनि, स्वयेचि अद्वैती साजे || १०८

सागरावरी खेळत लाटा, सागर ना तो जल भोगी | किंवा जल ना भोगी सागरा, उभयहि आपुल्याचि जागी || १०९

स्वप्न पाहता, स्वये विनटता, विविधरुपे तरी भेद नसे | तैसी स्फुरणे शिव नि शक्ति, दोन वाटती आभासे || ११०

जेणें देवें संपूर्ण देवी । जियेविण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना येकोपजीवी । येकयेकांची ॥ १-१० ॥

शक्ति देवि ती सबल शिवाने, शून्यचि शिवही शक्तिविणा | पूरक असती एक दुज्यांचे, एक एकटे कांहीच ना || १११

दीप्तीचे अस्तित्व दिव्याने, दिवाहि दीप्तीविना नसे | शिव नि शक्ति एक दुज्याविण, समर्थ होती ना तैसे || ११२

शक्तीला सामर्थ्य शिवाचे, शिवा शिवत्वहि शक्तिमुळे | एकदुज्याविण उभय शून्यचि, निश्चल निर्बल नि दुबळे || ११३.

जेही 'शिवोहं' असे जाणणे, शिवात स्फुरते ती शक्ति | शिवा जाणते जाणीवरुपे, अंग शिवाचे ती स्फूर्ति || ११४.

मस्तकीचे आकाश शिवाचे, कैलासाचे स्थान असे | मस्तकी सहस्त्रार मध्याशी, तेजरूपे श्री शिवहि दिसे || ११५.

सर्वव्यापुनि देही या शिव, नील बिंदू आज्ञी विलसे | निराकार शिव नेत्राद्वारे, शक्तिरूप जग पाहतसे || ११६.

भ्रूमध्याहुनी दहा अंगुळे, सहस्त्रारी तो शिव उरला | कैलासी अंगुष्ठमात्र तो, ज्योतिर्लिंगे दिसे भला || ११७.

ॐ कारे हे विश्व व्यापिले, ध्वनि नाद त्या शिव देई | स्वयेचि साकारुनि ॐ कारा, नील बिंदुरुपे राही || ११८.

कैसा मेळु आला गोडिये । दोघें न माती जगीं इये । कीं परमाणुही माजीं उवायें । मांडलीं आहाती ॥ १-११ ॥

मोठ्या आवडीने शिवशक्ती, संयोगिती ते प्रेमाने | जगही पुरेना त्या वस्तीला, अणुरेणूतही जरि ठाणे || ११९ .

परमाणुहि रिता न त्याविण, त्रैलोक्यहि तेणे व्यापे | जीवभूत नि अष्टधाही त्या, उभय प्रकृती त्यांची रुपे || १२०.

सारेची अवकाशामधले, चंद्र सूर्य नि ग्रह तारे | स्थावर जंगम सजीव निर्जीव, पुरुष नि प्रकृतीच सारे || १२१.

आपआपली गती जाणुनि, नियमे कक्षेतची फिरती | स्वधर्मास ते कधि न सोडिती, लीला दाविती शिवशक्ति || १२२.

जिहीं येकयेकावीण । न कीजे तृणाचेंही निर्माण । जियें दोघें जिऊ प्राण । जियां दोघां ॥ १-१२ ॥

त्या उभयांच्या संयोगाविण, तृणाचेही ना निर्माण | अतुट प्रेमहि उभयी ऐसे, जणू दोघे जीव प्राण || १२३

ज्ञानी शिव, शक्ती अज्ञानी, स्मरण रुपे ती रुचि त्याची | निज सामर्थ्या ना जाणे शिव, ही किमया तर शक्तीची || १२४ .

नुसते चैतन्यचि एकले, कैसे होई उपयोगी ?| सुगंध पुष्पाधारे राही, तशी प्रकृती पुरुषांगी || १२५

शिवात शक्ति, शक्तीत शिव तो, प्राण प्रकृति पुरुषाचा | उभय राहती उभयाधारे, खेळ असे हा उभयांचा || १२६.

प्राण अपानाची ये जा ते, साक्षीरुपे जाणुनि घेतो | बाह्य कुंभकी पुरूष तो चि, निजरूपाला अनुभवितो || १२७.

आदि मध्य नि अंती व्याप्त जो, आत्मदेव त्या चिंतावे | साक्षीभावे मुक्त राहुनि, शांतिसुखी तल्लीन व्हावे || १२८.

हे उपदेशी वसिष्ठ मुनीला योगी भुशुंडी पुर्णपणे | पुरुष प्रियु नि शक्ति प्राणमय, जीव प्राण समजे तेणे || १२९.

घरवातें मोटकीं दोघें । जैं गोसावी सेजे रिघे । तैं दंपत्यपणें जागे । स्वामिणी जे ॥ १-१३ ॥

विश्वामाजी हेचि दोघे, त्यांत स्वामिणी शक्ति असे | तो ईश्वर गोसावी जेंव्हा, माया शय्यी पहुडतसे || १३०

तेंव्हा घरपण शक्ति चालवी, निभवी ती दंपत्यपणे | सर्व चराचर सृष्टीरुपाचा, प्रपंच चालतसे तेणे || १३१.

हा गोसावी गृहस्थ झाला, केवळ ते या शक्तिमुळे | अनासक्त नि शांत मानसी, आत्मदेव स्वसंवेद्य कळे || १३२

जोवरी गोसावी हा झोपे, तोवरि जग हे भासतसे | वरी मूळ नि खाली शाखा, अशाश्वतचि अश्वत्थ असे || १३३ .

मायेने ही लागे निद्रा, विवेक वैराग्ये मोडे | निद्रा सरता स्वभान येई, स्व-संवेद्य उषा उजडे || १३४.

आत्मभाव संकोच हि निद्रा, येता विकास प्रकृतीचा | नाम रुपे हे द्वैत भासते, विलास त्या शिवशक्तीचा || १३५

प्रणवी समरस नादरुपाने, सुषुम्नेत सुस्थिर व्हावे | प्रणवाच्या कंपनासवेचि, निजभानाला मिसळावे || १३६.

शक्तीचा हा सर्व पसारा, सहजी मिटे निद्रा सरता | केवळ निजरुप ये अनुभूति, सकल प्रतीति प्रभूसत्ता | १३७ .

प्रणवरूप हा देठ उमलला, श्रीहरीच्या नाभीकमली | मायारूपी महासागरी, निवांत जेंव्हा वनमाली || १३८.

त्यातुनचि उद्भवली सृष्टी, दंपत्ये स्वामिनीमुळे | गोसावी निद्रिस्त ज्यापरी, रहा विरक्त विवेक बळे ||१३९.

जिया दोघांमाजीं येकादें । विपायें उमजलें होय निदे । तरी गरवात गिळूनि नुसुधें । कांहीं ना कीं ॥ १-१४ ॥

पुरुषासंगे निजे प्रकृति, स्वप्नी फिरवी चराचरा | पुरुषा जागृती आत्मभान ते, जात झणी निर्विकारा || १४० .

प्रकृति ऊठता, स्वप्नहि भंगे, पडदा मायेचा विरतो | स्वप्नामधुनी पूर्ण जागृती, संसारही मग ना उरतो || १४१.

'दंपती' मधले चुकुनि कुणीहि, झोपेतुनी ते जरि उठले | असे दंपती स्वप्नामधली, म्हणुनि कोणिहि नच उरले || १४२.

भानही आले, स्वप्नहि विरले, आत्मबोध मग होई पुरा | वासुदेव सर्वत्र अनुभवे, मायेचा पुरता निचरा || १४३ .

नामरूपे विरता ये प्रतीति, सकल सच्चिदानंद हरी | द्वैताचा तो मिटे पसारा, हरीमय अनुभूति ती सारी || १४४

शरीर हे दोघांच्या अंशे, म्हणुनि दंपत्यचि नामे | निद्रा सरता एकरूप हो, शिवशक्ती ती निजधामे || १४५

द्वैत विरे नि उरे ब्रह्मचि, त्याहुनि अन्य न कांही वसे | माझे मीपण कांही नुरता, श्रीहरी सर्वत्रचि दिसे || १४६

ज्ञानदेव सांगती, स्वप्न हे, ऐसे उमगुनी जगी रहा | कुणी ना कर्ता येथे उरतो, निष्कामे सारेचि पहा || १४७

निद्रा हे अव्यक्त तत्व नि, स्वप्नचि व्यक्तरुपे भासे | सत्य मानुनि जोही गुंतला, तोचि येथे नित्य फसे || १४८.

खरी जागृती जेंव्हा येते, 'तुझे' नि 'माझे' नच उरते | सहजी विरक्ति विवेक योगे, कारण आहे स्वप्नचि ते || १४९.

दोहों अंगाचिये आटणी । गिंवसीत आहाती येकपणीं । जाली भेदाचिया वाहाणी । आधाधीं जियें ॥ १-१५ ॥

जागृती येता पुरुष प्रकृति, अंशा आपुल्या आवरती | अस्ति भाति प्रिय नि नामरुप, हेचि अंश ते या जगती || १५०

उभय आपुले अंश आवरुनी, मूल स्वरूपी ते येती | विश्व रुपे ते भेद दाविती, उभयची आकारा आणीती || १५१

{अस्ति [आहे] भाति [जाणले जाते] प्रिय-[आवडते] हे पुरुषाचे अंश आणि नाम रूप हे मायिक प्रकृतीचे अंश एकरूप होतात.}

पुरुष प्रकृति जागे होता, तत्क्षणीच आटणि होते | असणे जाणवणे आवडणे, नाम रूपही ते विरते || १५२.

जेही होते जगी विखुरले, पुरुष प्रकृति अंशाने | पूर्ण जागृती येता विरते, जाणीव नेणीव एक क्षणे ||१५३.

विषो येकमेकांचीं जियें । जियें एकमेकांचीं विषइयें । जियें हीं दोघें सुखियें । जियें दोघें ॥ १-१६ ॥

विषय नि विषयी एक दुज्यांचे, पुरुष प्रकृति ते असती | सुख देती नि घेती तैसे, परस्परांना पूरक ती ||१५४ .

द्रष्टा आतुर दृश्य पहाया, दृश्यहि आतुर द्रष्टयाशी | भोक्ता भोग्यहि असती उभयता, जेणे पावती सौख्याशी ||१५५.

या जगताचे सारे असती, भोग्य नि भोक्ता एकदुज्या | देती घेती पुरुष प्रकृति, कधि रंक नि कधि राजा || १५६ .

एका बोचे कांटा तेंव्हा, दुःख दुज्याशीही होई | कुणी पाहता सौख्यामाजी, दुजा सुखावे त्या समयी || १५७.

स्त्रीपुरुष नामभेदें । शिवपण येकलें नांदे । जग सकळ आधाधें । पणें जिहीं ॥ १-१७ ॥

स्त्री पुरुषांची रूप नि नामे, भेद असे हा वरवरला | एकचि शिवपण उभयी नांदे, जरी भेद तो दृष्टीला || १५८

शिव नि शक्ति अर्धे अर्धे, मिळुनि विश्वचि हे नांदे | एकलेची शिवतत्व विलसते, दिसत वेगळे जरि भेदे || १५९.

वेगवेगळे आपण सारे, परि स्पंदने एकची ती | पुरुष प्रकृति एकदुज्यास्तव, एक शिवत्वचि या जगती || १६०.

स्फुरण 'शिवोहं' एकचि नांदे, नाम रूप वेगळे जरि | भेद असती हे सौख्यासाठी, अंतरी परंतु एक हरी ||१६१.

स्वसंवेद्यतेने येत प्रतीति, आपण पाहि आपणासी | एकचि वासुदेव कोंदटे, नाही थारा भेदासी || १६२.

दो दांडीं एकि श्रुति । दोहों फुलीं एकी दृति । दोहों दिवीं दीप्ति । येकीचि जेवीं ॥ १-१८ ॥

दो ओठीं येकी गोठी । दो डोळां येकी दिठी । तेवीं दोघीं जिहीं सृष्टी । येकीच जेवीं ॥ १-१९ ॥

दो टिपऱ्यातुनि नाद एकचि, सुवास एकचि दोन फुले | दोन दिवे परि दीप्ति एकचि, उभये प्रकाशचि उजळे || १६३

दोन ओठ परि शब्द एकचि, नयन दोन परि एक दिठी | तेवी वेगळे शिव शक्ति परि, उभविती एकचि ही सृष्टी || १६४.

सृष्टी विविध जरि, एक चेतना, खेळविते सर्वाठायी | भिन्न भिन्न ऐकतो पाहतो, ज्ञान परि एकचि होई || १६५

दाऊनि दोनीपण । येक रसाचें आरोगण । करीत आहे मेहूण । अनादि जे ॥ १-२० ॥

दोनपणाचा हा देखावा, रससेवन एकात्मरूपी | उजेड नि काळोख वेगळे, भेद फक्त अभावरूपी || १६६

एक शिवत्वचि उभयी नांदे, प्रकृति आणि चैतन्यी | उभय मिळुनिची नित्य कार्यरत, रुचि तयांची नाविन्यी || १६७

स्वये होऊनि ज्ञानदेवचि, सेवावे ऐक्यानंदा | रससेवन ते एकरसाचे, वर्धिष्णु हो स्वानंदा || १६८

श्वासोच्छश्वासी पेशी पेशीला, जिर्णा काढुनि नविन करी | हेचि भोग ते उभय भोगुनि, परब्रहमावरी साकारी || १६९

जे स्वामिचिया सत्ता । वीण असो नेणें पतिव्रता । जियेवीण सर्व कर्ता । कांहीं ना जो ॥ १-२१ ॥

पतिव्रता ही शक्ति शिवाची, त्याविण तिज अस्तित्व नसे | शक्तिमुळे तो कर्ता भोक्ता, म्हणुनि सकला ज्ञात असे || १७०

शिवचि अधिष्ठान शक्तीचे, शिव न तिजविना कार्य करी | एक दृश्य नि दुजे गुप्त परि, उभयचि विश्वा साकारी || १७१

जें कीं भातारायें दिसणें । भातारुचि जियेचें ससणें । नेणिजती दोघेंजणें । निवडूं जिये ॥ १-२२ ॥

जे की पतीचे दिसणे तेचि, असे जियेचे ते असणे | दिसे उपाधी चैतन्यास्तव, नांदती उभयहि एकपणे || १७२

शिव नि शक्ति मिळुनि विश्व हे, नसे निवड वेगळेपणे | तीच शिवाचे करवी दर्शन, त्यासि अलग आकार नसे || १७३. .

शिव हा भ्रतार देवी शक्तीचा, त्याच्या राहुनिया अंगी | अणुरेणूला गती देउनिया, होई तयाची अर्धांगी || १७४

निराकार नि निर्गुण तो शिव, शक्ति आणी त्या आकारी | शिव नि शक्ति उचित मिसळुनी, सकल विश्वही साकारी || १७५

तिजवाचुनि तो असेच दुबळा, सर्व शक्तीचा भांडारी | क्षमता आणि औचित्याची, शक्ति नियोजन स्वये करी || १७६

कुठल्या आकारास कसे ते, खेळवायचे ती जाणे | पुरुष प्रकृति किती मिसळले, नेमके कुणी हे नेणे || १७७

तिचा बने भ्रातार स्वये ती, वा पत्नी की कधि त्याची | कधि केव्हा ती पति की पत्नी, मती न चाले कोणाची || १७८

द्रष्टा कधि वा कधी दृश्य ती, चैतन्यासी वापरुनी | लिला तिच्या त्या तीच जाणते, ब्रह्मांडाशी खेळवुनी || १७९.

त्यावाचुनि ती कधि न वेगळी, पूर्ण त्यांतची समरसली | म्हणुनि उभयता निद्राधिन वा, जागृती ती उभया आली || १८०

उभय झोपता तिचीया स्वप्नी, दंपत्याचे रूप धरि | निद्रेच्या सत्तेत ती जागी, दृश्य नि द्रष्टा खेळ करी || १८१.

गोडी आणि गुळु । कापुरु आणि परिमळु । निवडूं जातां पांगुळु । निवाडु होये ॥ १-२३ ॥

गुळामधुनि ना गोडी वेगळी, सुवास कापुर एक तसा | यत्न वेगळे काढायाचा, होईल वेडेपणा जसा || १८२

नित्य अभिन्नचि हे जैसे की, शिवशक्ती ते एक तसे | गोसावी नि त्याची निद्रा, मिळुनि शिवशक्तीच असे || १८३.

द्रवपण आणि उदक वेगळे जसे कदापि शक्य नसे | तेवी सत्ता आणि ज्ञानही स्वरुपमात्रची नित्य असे || १८४.

समग्र दीप्ति घेतां । जेविं दीपुचि ये हातां । तेविं जियेचिया तत्त्वतां । शिवुचि लाभे ॥ १-२४ ॥

समग्र दीप्ति घेऊ जाता, दीपचि जैसा ये हाती | तशी शक्ति ती तेज शिवाचे, वेगळे न ते शिवशक्ति || १८५

जैसी सूर्यीं मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा । तैसी भेद गिळीत शोभा । येकचि जे ॥ १-२५ ॥

सूर्य मिरवितो प्रभेसंगती, प्रभेत सूर्यत्वची गाभा | एकचि तैसे शिवशक्तीही, एकचि विलसतसे शोभा || १८६

सूर्याविण ना प्रभा संभवे, पुरुष प्रकृति एक तसे | आत्मतत्व सच्चिदानंद ते, एकचि उभयातुनि विलसे ||१८७

कां बिंब प्रतिबिंबा द्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमापक । तैसें द्वैतमिसें एक । बरवतसे ॥ १-२६ ॥

बिंब प्रकाशक प्रतिबिंबासि, प्रतिबिंबे बिंबचि उमजे | प्रतिबिंबी ते बिंबचि नांदे, द्वैत होऊनिया साजे || १८८

उपाधि हा आरसा शक्तिचा, पुरुष त्यांत प्रतिबिंब असे | बिंब सच्चिदानंद श्रीहरी, प्रतिबिंबाने तो विलसे ||१८९

बिंबाने प्रतिबिंब होऊनि, निजरूपाला निरखियले | त्याचि प्रतिबिंबाने विश्वा, स्वरूपाचे अनुमान दिले || १९०

पुरुष असे गाभा शक्तीचा, ज्ञात श्रीहरी करवितसे | अतर्क्य महिमा भगवंताचा, प्रतिबिंबे सत्ता विलसे || १९१.

ब्रह्म नि आत्मा त्याची नामे, अशुभा विरवी त्याची कृपा | स्थिरावते प्रज्ञा भक्तीने, दूर राखिते ती पापा || १९२.

भक्त सदा संतुष्टचि राही, दृष्टीस त्याच्या हरिच दिसे | पूर्णकाम तो नित्य मानसी, अनाहतासि ऐकतसे || १९३.

प्रणव नाद त्या नित्य श्रवणी ये, नाद स्पंदनी समरसतसे | मार्ग सुषुम्नेचा अनुसरुनि, निजस्वरूपि तो विलसतसे || १९४ .

प्रकाशरुपाहुनी वेगळा, परमात्मा तेजा देई | प्रकाशवी तो रवी ग्रह तारे, परी यांत कोठे नाही || १९५

चंचलतेतहि सदैव स्थिर जो, ज्ञानाचेही ज्ञान असे | तिन्ही अवस्था मधे असोनि, कशातही परि लिप्त नसे || १९६

स्वयंप्रकाशित आणि स्वयंभू, स्वरुपि परि स्वसंवेद्य असे | अलक्ष सहजी ना उमगेना, अज अनादि सर्वात वसे || १९७.

आत्मदेव ज्यानेही जाणिला, अगम्य त्यासी कांही नसे | एक हरीविण नसेच सत्ता, गुणी नि निर्गुणी तोच असे ||१९८

अंधाराला सूर्य ना दिसे, शिव शक्तिस ना ब्रह्म दिसे | चर्मचक्षुला हरी दिसेना, अंतरी अनुभूत होत असे ||१९९ .

निर्गुण निराकार परब्रह्म, सदैव निश्चल शांत असे | हात कटेवरि ठेऊनि नित्यचि, शक्ति कौतुका पाहतसे || २००.

शक्ती ना क्षणमात्र रिकामी, स्थिति उत्पत्ति लय साधितसे | कर्मफलाच्या चक्रि गुंतवुन, मनुजा अस्थिर ठेवितसे || २०१.

तिला हव्या त्या विश्वाकारा, पुरुष बळे ती साकारी | घडवी मोडवी, पुनश्च घडवी, प्रतिबिंबे ती परोपरी || २०२

पुरुषाला ना जाणीव नेणीव, चैतन्याने काय घडे ?| गुणातीत परि त्रिगुण चेतवुनि, वश पुरता प्रकृतीपुढे || २०३.

परमात्म्यातील आत्मा अंशे, जीवा वेगळी शक्ति करी | कर्मफलांच्या चक्री गुंतवुनि, ती विश्वाते साकारी || २०४ .

परमात्म्याची छाया बनुनी, स्वामिनी ब्रह्मांडाची बने | कुठे उभारी महाल मोठे, कुठे ठेवी ती सर्व सुने ||२०५

प्रणवभाव ध्वनि परमात्म्याचा, ब्रह्मरूप जाणिवे स्फुरे | ज्ञानभावचि प्रतिबिंबोनी, शक्ति तयाला विस्तारे || २०६

तोचि पुरुष हा पति शक्तीचा, भांडारचि चैतन्याचे | त्यासि करुनि उद्युक्त प्रकृति, खेळ करवी ब्रह्मांडाचे || २०७

सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया बाइला केला पुरुषु । जेणें दादुलेन सत्तविशेषु । शक्ति जाली ॥ १-२७ ॥

सकल शून्यही जेथे विरती, परब्रह्म ते निखळ असे | महाशून्य तो करुनी दादुला, त्यास बाईला केलासे || २०८

सर्वची शून्य असे विश्व हे, पत्नीस्तव शिव साकारी | नसे त्यास अस्तित्व देऊनी शक्ती विश्वाभास करी || || २०९

ॐ काराचा ध्वनि निघतसे, नीरव शांतीच्या मधुनी | शब्द उमटता नादच आधी, ईश्वर वाचक ये श्रवणी || २१०

नाद विरतसे शुन्यामाजी, विहंग कोटरी जणु गेला | नाद सरे परि पाठी कंपने, अनुभूत होती ज्ञात्याला ||२११

नाद कंपने जशि घंटेची, उमटुनिया विरुनी जाती | प्रणव कंपने तशी मंदावुनी, शुन्यी विश्रामा येती || २१२

वेध घेत जो निजबोधाचा, ईश्वर वाचक ॐ कारे | विवेक वैराग्ये वृत्तींना, शून्य करी जो आचारे || २१३.

तया विश्व हे शून्यचि वाटे, ओढ मनाची पैलतिरी | विचार नि वासना कामना, शून्य जाती त्या दिगंतरी || २१४.

चंचल मानस शून्य होऊनि, समरस होई ॐ कारी | आधी अनुसरणे नादाला, नंतर कंपनि विलय करी ||२१५

नाद कंपने ॐ काराची, विरती शांतावुनि जिथे | त्याचि सर्व शुन्यांच्या अंती, महाशून्यचि जे उरते || २१६

ब्रहमबीजाच्या प्रणव अंकुरे, घोष ध्वनी नादाकारे | त्यांचे भुवनी हरी राहतो, शक्तीत प्रतिबिंबाद्वारे || २१७

कुठे दरीच्या जवळी जाता, ध्वनि बनतसे प्रतिध्वनि | यंत्राद्वारा ध्वनि श्रवणी ये, प्रतिबिंबचि जणु बने ध्वनी || २१८

निराकार ऐसे प्रतिबिंबे, ध्वनि प्रतिध्वनि ऐक्य असे | ध्वनी पुरुष प्रतिध्वनी प्रकृति, माया हरीची ही विलसे || २१९ .

प्रतिबिंबच ते पुरुष बनोनी, भ्रतार होई शक्तीचा | स्रोत होत तो चैतन्याचा, हा महिमा प्रतिबिंबाचा || २२० .

बाईल होताचि पुरुषाची, सारी सूत्रे तिच्याकडे | मायेचा पसरवी पसारा, उपाधीत तो पुरुष दडे || २२१.

स्फुरणामधला ज्ञान भाव जो, हरीचे ते प्रतिबिंब असे | प्रणवरूप जे स्फुरणामाजी, प्रकृतिभावे विलसतसे || २२२.

शिवशक्त्यात्मक भाव प्रकाशित, सहजी हरिद्वारा होई | बिंब नि प्रतिबिंबाच्या रुपे, प्रतीति हरिची ती येई || २२३.

जिये प्राणेश्वरीवीण । शिवीहीं शिवपण । थारों न शके ते आपण । शिवें घडली ॥ १-२८ ॥

विश्व निर्मिता प्राणेश्वरी ती, शिव गौरवचि होत असे | शिव महान सर्वज्ञ तरीही, एकलाच त्या कोण पुसे? || २२४

अनंतात तो निर्गुण निश्चल, समर्थ त्याविण नसे कुणी | परि सामर्थ्या कोण विचारी, निरुपयोग एकलेपणी || २२५

स्फुरणे त्याच्या शक्ति घडली, अनायास शिवपणा मिळे | अबाधित त्याची निश्चलता, ठेवित ती सहजी खेळे || २२६.

निर्विकारता अभंग त्याची, ठेऊनि विकार जागविले | निर्गुणास ना येऊनि बाधा, त्रिगुणी परि त्या खेळविले || २२७.

त्याच्या निश्चलतेतील ऊर्जा, घेऊनि विश्वा गती दिधली | ब्रह्मांडी आणुनि विविधता, त्याची थोरवी गाजविली || २२८.

ऐश्वर्येंसी ईश्वरा । जियेचें आंग संसारा । आपण होऊन उभारा । आपणचि जे ॥ १-२९ ॥

त्याच्या सामर्थ्या साकारुनी, ऐश्वर्यासि उभवियले | त्याच्या अद्वैतात राहुनि, जगती द्वैता खेळविले || २२९.

पंचभुते नि अहं बुद्धि मन, अष्टधाहि प्रकृति असे | त्यांत खेळवुनि चैतन्याला, विश्वाचा आभास दिसे || २३०.

स्फुरणे त्याच्या उभे राहता, चैतन्यासी वापरुनिया | निराकार रूपा साकारी, शून्यातुनि रचिली माया || २३१.

जगदाकारे स्वये होऊनी, शिव चैतन्या खेळविले | निराकार आकारी रमविला, नाम रुपासि जग आणिले ||२३२ .

मूलरूपाने शिव तो निश्चल, जगी खेळविले शक्तीने | अपूर्णता दे गतीमानता, ओळखिले हे वर्म तिने ||२३३.

कर्मफलांची बांधुनि वेसण, हांवेची गळकी थाळी | जो तो धावे फोलामागे, नित्य मानवी पळापळी || २३४.

अधर्म दुर्गुण जोपासुनिया, तोल राखी ती धर्माचा | अहंकार गुंतवी ज्ञात्यासि, पथ अडवी कैवल्याचा || २३५.

पूर्णत्वावरी विश्व उभविले, पूर्णत्वा परि ना बाधा | निराकार धरिते साकारा, प्रतिरुपि थोडी तरि विपदा || २३६.

साऱ्या ब्रह्मांडात तियेने, अपूर्णता ती खेळविली | उणिवेचे सामर्थ्य जाणुनि, सजीवासि ती गती दिधली || २३७.

पूर्णत्वासी परि न बाधा, लौकिक त्याचा वाढविला | अनंत खेळवुनिया सांती, बहरविले नाविन्याला || २३८.

अपूर्णतेने जो तो भजतो, शिव महिमा नित गौरविला | पतीगौरवे, शक्ति तुष्टचि, आनंदे दाखवी लिला ||२३९.

भ्रतार पुरुषा वैभव दिधले, ख्याती ब्रह्मांडी केली | कांही जवळी नसता त्याच्या, स्वामित्वाची पदवी दिली || २४०

पतीचेनि अरूपपणें । लाजोनि आंगाचें मिरवणें । केलें जगायेव्हढें लेणें । नामरूपाचें ॥ १-३० ॥

पतिच्या अरुपा लाजुनि लेणे, जगाएवढे त्या दिधले | नामरुपाला आणुनि त्याला, जगतामाजी गौरविले || २४१.

अनंग तो पेंधा निकवडा, अचक्षु आणि अश्रवण | ज्ञानेश्वरीतील हरी वर्णन हे, अहस्त आणि अचरण || २४२.

आपणची आघवे होतसे, अमूर्तास मूर्ता आणी | घनश्याम तो मुरली मनोहर, सकला भावे जनी मनी || २४३.

निराकार साकारी खेळवुनि, वेद पुराणी त्या महिमा | विस्मरणाने निजरूपाला, उजळविली त्याची प्रतिमा || २४४.

परि सदा ते श्रेय पतीला, पतिव्रता धर्मास वरी | जरि एकली विश्व राखिते, नाम शिवाचे चराचरी || २४५.

शिव स्फुरणे ॐ कार स्वये ती, वाचक होई ती त्याची | ॐ कारे ती शिवा भेटवी, पाही परिक्षा भक्तांची || २४६.

कच्चे मडके परत पाठवी, सुपात्र बघता हात धरी | चालवी योगक्षेम तयाचा, दर्शन हरीचे सुलभ करी || २४७.

ऐक्याचाही दुष्काळा । बहुपणाचा सोहळा । जियें सदैवेचिया लिळा । दाखविला ॥ १-३१ ॥

ऐक्याचा दुष्काळ पडोनी, बहुपण मिरवित ती जगती | अद्वैतातुनी द्वैत पसरले, बहुपण सोहळाचि जगती || २४८

अनंत प्राणी, वृक्ष लताही, लाख विखुरले चौऱ्यांशी | रंग रूप आकार वेगळे, नाविन्याची ती हौशी || २४९ ०

एक तत्वचि खेळवी सकला, ज्ञाते जाणती वर्माते | एकची शिव नि शक्ति त्याची, अखिल विश्व हे खेळविते || २५०.

आंगाचिया आटणिया । कांतु उवाया आणिला जिया । स्वसंकोचें प्रिया । रूढविली जेणें ॥ १-३२ ॥

सुपात्र विरळा हरी मीलना, निघता प्रकृति संकोचे | आटवी वृत्ती मनोकामना, सुलभ दर्शनासि हरीचे || २५१

एरवी विस्मृती निजरूपाची, आणुनिया शिव संकोचे | देई अवसर मुक्तपणाने, रूप नांदण्या शक्तीचे || २५२

विवेक वैराग्ये कुणि पांथिक, वाट धरि कैवल्याची | निजसंकोचा करी प्रकृती, काळजी वाही भक्ताची ||२५३.

मायेचा अंधार विरवि ती, प्रकाश दावी ज्ञानाचा | निजपतीच्या भक्तास आदरे, मार्ग दावी कैवल्याचा || २५४.

जे मायेतचि परि रंगले, त्या शिव निजरुप संकोची | भव्य पसारा विश्व मोहिनी, लावी गोडी विषयांची || २५५.

जियेतें पाहावयाचिया लोभा । चढे दृष्ट्रत्वाचिया क्षोभा । जियेतें न देखतु उभा ॥ आंगचि सांडी ॥ १-३३ ॥

जीव म्हणोनी जगती येता, प्रकृतीचे हे स्वरूप दिसे | आत्मबोध होताचि मावळे, तेंव्हा तो निजस्वरूपि वसे || २५६

कांतेचिया भिडा । अवला होय जगायेव्हढा । आंगविला उघडा । जियेविण ॥ १-३४ ॥

प्रिय पत्नीची भीड राखण्या, ब्रह्मांडाएवढा दिसे | अनंत सर्वव्यापी असुनीहि, निजरूपाला विसरतसे || २५७ .

मूळ स्वरूपी निराकार तो वस्त्र प्रावरण कांही नसे | वेष जगाचा तये घालता, नामरुपे विश्वी भासे || २५८.

जो हा ठावो मंदरूपें । उवायिलेपणेंचि हारपे । तो झाला जियेचेनि पडिपे । विश्वरूप ॥ १-३५ ॥

सूक्ष्माहुनिही सूक्ष्म असे शिव, सापेक्षे मंदचि भासे | निजस्वरूपि तो असे तेधवा, विषय दृष्टीचा होत नसे || २५९

भीड प्रियेची तिच्या आवडी, धारियेले या विश्वरूपा | कुणीही यावे दर्शन घ्यावे, केला मार्गचि हा सोपा || २६०

त्याचे असणे आकाराविण, स्वसंवेद्य प्रतीति ये त्याची | प्रकृति आच्छादने विश्वरुप, विरता अनुभूति स्वरुपाची || २६१.

जिया चेवविला शिवु । वेद्याचे बोणें बहु । वाढि तेणेंसि जेऊं । धाला जो ॥ १-३६ ॥

जया स्फूर्ति ये निजबोधाची, जागृत करि शिव अंतरीचा | स्व-संवेद्यतेने, तया अनुभवी, प्रत्यय ये स्व-स्वरूपाचा || २६२

पूर्ण समर्पण करुनी शिवाला, पिंडे पिडाच्या ग्रासे | वाढी दृश्याची पक्वान्ने, तृप्तचि शिवहि होत असे ||२६३.

शिव होऊनिया शिवास भजता, समर्पणे प्रतीति त्याची | अस्तित्वासि स्वरूपि विरविता, तृप्ति येत अनुभूतिची || २६४

देहबंध ऐसे विरताचि, विमुक्त प्रतीति ब्रह्माची | विश्वचि विरते, प्रकृति संगे, प्रतीति येत अनंताची || २६५

निदैलेनि भातारें । जे विये चराचरें । जियेचा विसांवला नुरे । आंबुलेपणही ॥ १-३७ ॥

पति जोवरी असे निदेला, शक्ति प्रसविते चराचरा | तया जागृती येता तत्क्षणी, ना तिज वा जगता थारा || २६६

विसर होई जो आत्मरुपाचा, शिव निद्रा ती तीच असे | वास्तव भासे तोवरी हे जग, प्रकृति तेंव्हा जागतसे || २६७

आत्मदेव शिव जागा होता, आत्मभान पुरते येई | दृश्य नि द्रष्टा विरे भावना, विश्वाभास लया जाई || २६८.

ॐ काराचे स्फुरणहि सरते, नाद घोष नि ध्वनिसंगे | निखळ उरे ते आत्मतत्वचि, तेचि स्वानंदी रंगे || २६९.

नसे जगत नि वेगळेपणा, शिवशक्ति वा अमुकचि मी | मी माझेपण पुरे मावळे, अनासक्ति रुप नि नामी || २७०.

जंव कांतु लपो बैसे । तंव नेणिजे जिच्या दोषें । जियें दोघें आरिसे । जियां दोघां ॥ १-३८ ॥

लपे आत्मरूप तेंव्हाचि ते, विश्वचि दृश्यरुपे भासे | शिव नि शक्ति ते जाणवती, एक दुज्यांचे जणु आरसे || २७१.

जेंव्हा लपतो कांतुरूप शिव, निजरुप जाणीव ती विसरे | प्रभाव शक्तिचाचि असे हा, शिवा जागृति शक्ति नुरे || २७२.

शिव नि शक्ति निजरूपाची, जाणीव नेणीव तिजद्वारे | शिव दिसता ती शक्ति दिसेना, दिसता शक्ति शिवचि नुरे || २७३.

पुरुष प्रकृतीकडे पाहता, प्रकृतीत निजरूप दिसे | प्रकृति पुरुषाकडे पाहता, निजरुप पाही ती तैसे || २७४.

पुरुष प्रकृति उभय एकचि, अधिष्ठान त्या ब्रह्माचे | ऐशी दृष्टी ज्यास लाभली, सदैव दर्शन त्या हरीचे || २७५

मी माझेपण सारे विरते, प्रतीति केवळ स्वरुपाची | नीरव शांति ब्राहमीस्थितीची, अनुभूति स्वानंदाची || २७६

जियेचेनि आंगलगें । आनंद आपणा आरोगूं लागे । सर्व भोक्तृत्वही नेघे । जियेविण कांहीं ॥ १-३९ ॥

भोक्तृत्वे जो भोगामधला, अनुभव ये विषयानंदी | प्रकृतिसंगे रुचिही वाढे, गुंतवी ती त्या आनंदी || २७७.

ॐ काराचा आविष्कार जो, प्रकृतिसंगे प्रतीत असे | नाद ध्वनि घोषाच्या संगे, कैवल्याचा मार्ग दिसे || २७८.

विवेक वैराग्याच्या योगे, ॐ कारचि ने हरि भुवनी | द्वैतचि दावी अद्वैताची, वाट अशी ये उमगोनी || २७९

जीवनमुक्ती निजबोधाने, पुरुष प्रकृती एक दिसे | विश्व जरि हे भवती विलसे, दुजे हरिविना कांही नसे || २८०

जया प्रियाचें जें आंग । जो प्रियुचि जियेचें चांग । कालउनी दोन्ही भाग । जेवितें आहाति ॥ १-४० ॥

शक्ति हे सौदर्य शिवाचे, शक्ती-शोभा शिवचि असे | उभय मिळुनिया नाम रूपाला, कालवुनिया भक्षितसे || २८१

चैतन्याच्या सत्तेनेचि, शक्ति विश्वा प्रसवितसे | जरि हे कल्पित, तरि ब्रहमाविण, आश्रय त्यासि अन्य नसे || २८२

उपाधी नि चैतन्य मिळोनि, गाडा विश्वाचा चाले | एक दुज्याच्या सहकार्याने, विश्व नाम रुपा आले || २८३.

जेही उपजे भक्षुनिया ते, त्यास देत आकार नवे | नाम जरि ते एकचि असता, नवरुप ते कार्यास हवे || २८४.

प्रतिक्षणाला नव आकारे, विश्व विविधता साकारे | नव क्षमतेने समष्टि विकसे, नूतनता ब्रह्माधारे || २८५

जैसि कां समिरेंसकट गति । कां सोनियासकट कांति । तैसे शिवेसिं शक्ति । अवघिचि जे ॥ १-४१ ॥

वायुची गति वायू संगे, सुवर्ण विलसे कांतीने | तैसी शक्ति स्वांग शिवाचे, नसे कदापि दुजेपणे || २८६.

कां कस्तुरीसकट परिमळु । कां उष्मेसकट अनळु । तैसा शक्तींसिं केवळु । शिवुचि जो ॥ १-४२ ॥

कस्तुरी परिमळ नसे विलगता, उष्मा अग्नि निजरुपी | शिवशक्तिही नसे वेगळे, सदाची ते तर एकरूपी || २८७

घटाहुनि ना अलग मृत्तिका, शिवशक्तीविण विश्व नसे | अर्धनारीनटेश्वर विनटे ब्रह्मांडी या एकरसे || २८८

राति आणि दिवो । पातलीं सूर्याचा ठावो । तैसीं आपुला साचि वावो । दोघेंही जियें ॥ १-४३ ॥

रात्र दिनाचे अधिष्ठान रवी, नित्य प्रकाशित भानु असे | त्याचे ठायी सापेक्षचि ते, दोघा अस्तित्वचि नसे || २८९.

पुरुष प्रकृति या उभयांचे, अधिष्ठान परब्रह्म असे | त्याविनाचि अस्तित्व असेना, भाव अभावहि कांही नसे || २९०

एकचि आत्मा सकल प्रकाशक, विस्मरणे विलसे माया | कोहं शोधित सोहं कळता, 'मी' 'तू' पण जातसे लया || २९१.

आत्मरूप मी सदाशिव असे, ही जाणीवहि नच उरली | सारे विलसे आत्मरुपाने, भेदाची प्रतीति नुरली || २९२.

उगा 'शिवोहं' कशास गर्जे, जेथं अस्मिता नच उरली | अनंतात ते पूर्ण मिसळता, जाणीव नेणीवही नुरली || २९३.

किंबहुना तियें । प्रणवाक्षरीं विरुढातियें । दशेचीही वैरियें । शिवुशक्ति ॥ १-४४ ॥

शिवशक्तीच्या स्वस्वरूपाची, उठे कामना प्रणवरूपे | त्रैमात्रेने प्रकृति विनटे, अर्धमात्री तो शिवचि लपे || २९४

ॐ कारे शिवशक्ति येती, अद्वैतातुनि द्वैत दशे | मूळ रूप ते होई पारखे, म्हणुनी ते वैरीच असे || २९५

ॐ कारचि कारण विश्वाचे, तीन अंकुरे विस्तरले | तोचि वाचक असे हरीचा, हे हरीला ठाऊक नसे || २९६

अनुसरुनिया प्रणवाला ते, प्रपंच मुक्ति ती होई | हे जाणुनि त्या वैरी मानती, शिव नि शक्ति दोघेही || २९७.

ॐकाराचा ध्वनि निघतसे, नीरव शांतीच्या मधुनी | शब्द उमटता नादच आधी, ईश्वर वाचक ये श्रवणी || २९८

नाद कंपने जशि घंटेची, उमटुनिया विरुनी जाती | कंपनाशी त्या समरस व्हावे, अनुभवी शुन्यी ती शांती || २९९.

ब्रहमबीजाच्या प्रणव अंकुरे, घोष ध्वनी नादाकारे | त्याची हरीच्या भुवनी विसावे, अहं स्वरूपी तेथं विरे || **३००.**

प्रणवरूपाने जागृती येता, सृष्टीसह शिवशक्ती विरे | ॐ कारहि तो विरुनि जातसे, जेथे नाद नि ध्वनि सरे || ३०१.

ॐ कारचि हा असे उंबरा, द्वैताद्वैताच्या मधला | नाद घोष ध्वनि कंपनासवे, समरसला तो हरी झाला || ३०२

द्वैती विषयांचे ते जाळे, विरक्त त्यातुनी जंव होता | आत्मअनुभूति उष:काल हो, वाटचाल कैवल्यपथा || ३०३

सहजी साधे समर्पणाने, विवेक नि वैराग्याने | अहंबुद्धी ती पुरती विरता, अनंत अनुभूति ये भाने || ३०४

विविधरुपे त्रिगुणात पसरता, प्रकृति अंतर्मुख होई | सहजी प्रवृत्ती ती विरोनी, निवृत्तीचि रुचि येई || ३०५

निवृत्तीने चित्ती शांती, प्रणव नाद तो ये श्रवणी | सहजी येई खरी जागृती, विश्वनाश तिज येत मनी || ३०६

ज्ञानदेव म्हणती ही जागृती, आल्याविण ना ऊर्ध्व गती | प्रणवाधारे जाता पुढती, निवृत्ती दे अनुभूती || ३०७

हें असो नामरूपाचा भेदसिरा । गिळित येकार्थाचा उजिरा । नमो त्या शिववोहरा । ज्ञानदेवु म्हणे ॥ १-४५ ॥

नामरूपाचा भेद पसारा, गिळुनी नाविन्या आणिती | शिवशक्ति या दांपत्याला, ज्ञानदेव बंदन करिती || ३०८

गिळुनि नाशिती एक दुज्याला, उजेड ये ईशवृत्तीचा | त्यांचे चालु द्यावे भोजन, मागोवा घेऊ हरीचा || ३०९

नामरूपाची ही मिष्टान्ने, पुरुष प्रकृति बाजू करा | शिवशक्ती खाता मिष्टान्ने, स्वप्नभाव तो जात पुरा || ३१०

प्रणवाचा ये श्रवणी नाद तो, त्याचे संगे समरसता | शिवशक्ती पाही निजरुपी, वंदन करुनी शरणगता || ३११

पुरुष प्रकृति विरता सहजी, मी 'ज्ञानेश्वर' हेही विरे | निजबोधाचा प्रकाश पसरे, प्रणवरुपे आत्माच उरे || ३१२

भेदरहित त्या दांपत्याला, वंदन करि मी निजभावे | द्वैताचा हा सरुनि पसारा, हरि वंदन करितो भावे || ३१३

जागृती येता शिवशक्तीला, पुरते मीपण ते विरले | आत्मभाव तो प्रतीत झाला, शरणागती वंदन झाले || ३१४.

जया दोघांच्या आलिंगनीं । विरोनि गेली दोन्ही । आघवियाचि रजनी । दिठिचि जे ॥ १-४६ ॥

शिवशक्ति आलिंगन देता, दोनपणा पुरता गेला | आली त्यासि पूर्ण जागृती, बोध जणू उदया आला || ३१५

रात्रीचे दिवसा आलिंगन, दोघेही विरुनी जाती | एक प्रकाशचि दाही दिशेला, सर्वत्रचि अवती भवती || ३१६.

बोधाच्या त्या तेजप्रकाशे, अज्ञानाचे तमही विरे | ज्ञानदृष्टीचा लोचन उघडे, हरीविण जगती कांही नुरे || ३१७. .

ज्ञानदृष्टी येताची लोचनी, रजनी गेली हरपोनी | सत्स्वरूपाविण कांही नुरले, शब्दचि झाले ते मौनी || ३१८

जयांच्या रूप निर्धारीं । गेली परेसीं वैखरी । सिंधूसीं प्रळय निरीं । गंगा जैशी ॥ १-४७ ॥

कोहंच्या मी शोधी बुडता, वैखरी संगे गेली परा | प्रलय काली त्या गंगा सिंधु, एकचि मिळती प्रलय निरा || ३१९

पूर्ण जागृती निजबोधाची, येता द्वैतहि ते विरले | शिवशक्ति नि चारहि वाणी, विलया सृष्टीसवे गेले || ३२०

प्रलयकाळी ते सारे जलमय, गंगा सिंधू भेद नसे | अनुभवास केवळ परमात्मा, वर्णू शब्दी त्या कैसे || ३२१

वायु चळबळेंशीं जिराला व्योमाचिये कुशीं । आटला प्रळयप्रकाशीं । सप्रभ भानु ॥ १-४८ ॥

वायू आपुल्या गती संगती, आकाशाचे उदरी जिरे | प्रलयकाली सारे तेजोमय, प्रकाशासवे सूर्य विरे || ३२२

तेवीं निहाळितां ययांते । गेले पाहणेंनसीं पाहतें । पुढती घरौतें वरौतें । वंदिलीं तियें ॥ १-४९ ॥

तेवी न्याहाळिता शिवशक्ति, पहाणेहि ते नच उरले | सबाह्य कोंदटल्या परब्रह्मा, समर्पणे म्या वंदियले. || ३२३

जयांच्या वाहाणी । वेदकु वेद्याचें पाणी । न पिये पण सांडणी । आंगाचि करी ॥ १-५० ॥

शिवशक्ति निजस्वरुपी विरता, ज्ञातृत्वहि ते नच उरले | ज्ञाता ज्ञेय नि ज्ञानहि विरले, सकलचि नारायण झाले || ३२४

कशास काय नि कुणी जाणणे, हे तर आता नच उरले | मीच मला ते काय जाणणे, जाणीव नि नेणीव गेले || ३२५.

गंगा अखंड जी ज्ञानाची, त्याच प्रवाही समरसलो | वेगळेपणा नसे कुठेही, श्रीहरीशी तल्लीन झालो. || ३२६.

शिव नि शक्ति एक शिवत्वे, सारी एकचि तद्रूपता | जोवरी विस्मृती अज्ञानाने, तोवरी वल्लभ नि कांता ||३२७

तेथ मी नमस्करा । लागीं उरों दुसरा । तऱ्ही लिंगभेद पऱ्हा । जोडूं जावों ॥ १-५१ ॥

पिंडचि विरता आता ब्रह्मांडी, नमन कराया मी नुरलो | नमन करितसे ऐसे म्हणता, भेदा प्रवृत्तचि झालो || ३२८

नमन करावे कुणी कुणाला, जेंव्हा सर्वत्रची हरी | दुजेपणाला कुणी ना उरले, कोण कुणाला नमन करी || ३२९

प्रवेशिता सागरात गंगा, दाटे कृतज्ञताचि मनी | भावे कैसे त्या वंदावे ?, तीही सागर त्याच क्षणी || ३३०

परि सोनेंनसिं दुजें । नव्हतु लेणें सोना भजे । हें नमन करणें माझें । तैसें आहे ॥ १-५२ ॥

जाणुनिया निज कनकपणाला, लेणी गरिमा वाढविती | तसे निजरूपा कृतज्ञ नमिले, कार्य देह करी जगती || ३३१

भाग्ये जाणे आत्मरुपाला, वंदन ऐक्य न सोडोनी | विभक्तपण ही नसे भावना, भाव समर्पण हा नमनी || ३३२

सांगतां वाचेतें वाचा । ठाउ वाच्य वाचकाचा । पडतां काय भेदाचा । विटाळु होये ? ॥ १-५३ ॥

वाणी करिता तिचेच वर्णन, वाचक वाच्य न भेद टळे | त्या भेदाचा विटाळ कैसा?, शिवा मीहि शिव तुझ्यामुळे || ३३३

सिंधु आणि गंगेचि मिळणी । स्त्रीपुरुष नामाची मिरवणी । दिसतसे तरी काय पाणी । द्वैत होईल ? ॥ १-५४ ॥

गंगा सिंधुमाजी मिळता, स्त्री पुरुषाचे मिलन नसे | गंगा स्त्री नि पुरूष सागर, जळात जळचि मिळत असे || ३३४.

जीवन गंगेचे यासाठी, समरस सिंधुसी व्हावे | करी वाहता सारी कार्ये, सागर होता विसरावे || ३३५.

पाहे पां भास्य भासकता । आपुला ठाईं दावितां । एकपण काय सविता । मोडितसे ? ॥ १-५५ ॥

सूर्य प्रकाशी सूर्य दिसतसे, भास्य नि भासक एक असे | त्याला कैसे द्वैत म्हणावे ?, वंदन माझे हे तैसे || ३३६.

चांदाचिया दोंदावरी । होत चांदणियाची विखुरी । काई उणें दीप्तीवरी । गिवसों पां दीपु ॥ १-५६ ॥

चंद्रावरती चंद्र चांदणे, निज कौमुदि ही त्या लेणे | निजप्रकाशे दिसे दीपहि, शोध न अन्यचि दीपाने || ३३७

मोतियाची कीळ । होय मोतियावरी पांगुळ । आगळें हन निर्मळ । रूपा ये कीं ? ॥ १-५७ ॥

मोती चमके निज तेजाने, तेज नि मोती द्वैत नसे | तेज मोतियाचेचि अंग की, एकचि त्या अस्तित्व असे || ३३८.

मात्राचिया त्रिपुटिया । प्रणवु काइ केला चिरटिया ? । कीं 'णकार' तिरेघटिया । भेदवला काई ? ॥ १-५८ ॥

अउम ऐसे ध्वनि वर्णत्रय, ॐ एकचि ये श्रवणी | विभजित ना ॐ कार तयाने, त्रै मात्रा परि एक ध्वनी || ३३९

'ण' हे अक्षर काढायला, रेषा लागती तीन जरि | तीन भेद ना त्याचे झाले, अक्षर एकचि असे परी || ३४०.

अहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे । तरि स्वतरंगाचीं मुकुळें । तुरंबु का पाणी ॥ १-५९॥

मूळ ऐक्य ना जरा सोडिता, कार्या देह करी द्वैते | स्वकार्य आणि स्वामी कार्यही, विश्व तयानेची खुलते || ३४१.

तरंग नक्षी बहु वलयांची, वस्त्र जळाने पांघरले | लटक्या द्वैते ऐक्य अबाधित, जळे जळाला शोभविले || ३४२.

उदकपणा तो मुळी न मोडता, क्रिडे आपुल्या कल्लोळी | नर्तन जळीचे जळी चालता, सुंदर दिसते ती खेळी || ३४३.

म्हणौनि भूतेशु अणि भवानी । वंदिली न करूनि सिनानि । मी रिघालों नमनीं । तें हें ऐसें ॥ १-६० ॥

मजपासुनि ना करुनि वेगळी, शिव नि भवानी मी नमिली | त्यासि समरस पूर्ण राहुनि, कृतज्ञता मी व्यक्तविली || ३४४.

दर्पणाचेनि त्यागें । प्रतिबिंब बिंबीं रिगे । कां बुडी दिजे तरंगें । वायूचा ठेला ॥ १-६१॥

जसा आरसा बाजू सारता, प्रतिबिंबाला बिंब मिळे | लहर वायुची ती विश्रमता, तरंगपण विरतेचि जळे || ३४५.

नातरी नीदजातखेवों । पावे आपुला ठावो । तैशी बुद्धित्यागें देवीदेवो । वंदिली मिया ॥ १-६२ ॥

निद्रा सरता, विरे स्वप्नजग, भान येतसे देहाचे | देहबुद्धि ती पूर्ण त्यागिता, भान येतसे स्वरूपाचे || ३४६.

मायेचे साम्राज्य मावळे, अहं विरतसे आत्मरुपी | समरसता ही मिया वंदिली, देवदेवी परमात्मरूपी || ३४७.

सांडूनि मीठपणाचा लोभु । मीठें सिंधुत्वाचा घेतला लाभु । तेविं अहं देऊनि शंभु । शांभवी झालों ॥ १-६३ ॥

मीठपणाचा लोभ सोडूनि, आश्रय घेई सिंधूचा | अहं अर्पुनी शंभु जाहलो, अनुभव येई शांभवीचा || ३४८

शिवशक्तिसमावेशें । नमन केलें म्यां ऐसें । रंभागर्भ आकाशें । रिगाला जैसा । १-६४ ॥

शिवशक्तीत मी समावेशुनी, ऐसे स्वरूपे वंदियले | केळी-गर्भिचे आकाशचि कि, महदाकाशी समरसले || ३४९.

जन्मजन्मीचे व्यष्टि सोपटे, अहं रूपाने वेढियले | अलगपणा होता आभासे, मिटता निजरुप ओळखिले || ३५०.

शिवचि असता जन्मोजन्मी, वृथा शिवाला शोधियले | अनंत असता सांत होऊनि, वृथा शिवरुपा गांजविले || ३५१.

आता नुरला अहंभाव नि, मी पण निपटुनिया गेले | होता निजरुप पूर्ण उदेले, नमने त्यासि गौरविले || ३५२..

पुनवेचा हा पूर्ण चंद्रमा, अभ्र सारुनि, चमचमला | कौमुदि रुपे एकत्वाने, स्वानंदे नमिले त्याला || ३५३.

नमन व्यक्तवि समरसताचि, कृतज्ञ भावे ऐक्याला | जन्मजन्मीचे विरे दुजेपण, पूर येत स्वानंदाला || ३५४

|| हरी ॐ || प्रथम कुंड प्रवेश समाप्ति

श्री ज्ञानेश्वर अमृत गंगा –

कुंड दुसरें

[श्रीगुरुस्तवन]

आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा आहेवतंतु । अमूर्तचि परि मूर्तु । कारुण्याचा ॥ २-१ ॥

साधन वनी जो वसंत होऊनि, स्वरुपफलांशी बहरवितो | सौभाग्यचि जो कैवल्याचे, त्या सद्गुरूला मी नमितो || १

अमूर्त परि तो मूर्त जाहला, साधकास पथ दावाया | कारुण्याचा विशाल सागर, आश्रय धरिला तंव पाया || २

अविद्येचे आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे । तया चैतन्याचे धांवे । कारुण्यें जो कीं ॥ २-२ ॥

निजरुप विस्मरणाच्या रानी, वाट शोधिता सुटकेची | जन्ममृत्यू चक्रात अडकले, धावशी मदतीस्तव तूची || ३.

मोडोनि मायाकुंजरु । मुक्तमोतियाचा वोगरु । जेवविता सद्गुरु । निवृत्ति वंदूं ॥ २-३ ॥

बहु माजता माया हत्तीण, सद्गुरू तिजला संहारी | गंडस्थळ ते विश्वभ्रमाचे, फोडुनि मौक्तिक ते चारी || ४.

निजमुक्तीचा लाभ असा हा, देत असे श्रीनिवृत्ती | वंदन सद्गुरू तुझ्या कृपेने, लाभे सहजचि ती मुक्ति || ५.

“माझी माया अतीव दुस्तर,” स्वये सांगती भगवंत | बहु माजता माया हत्तीण, सद्गुरुचि करिती अंत || ६.

हत्तिण महाकाय बलशाली, आणि माजता जोर चढे | म्हणुनि मायेसि रूपक हे, सद्गुरू बघता तीच दडे || ७

दुर्जय माया कठीण मारण्या, मारिताचि सहजे मुक्ति | जे शिष्याला अती कठीण ते, स्वयेचि करिती निवृत्ती || ८.

जयाचेनि अपांगपातें । बंध मोक्षपणीं आते । भेटे जाणतया जाणतें । जयापाशीं ॥ २-४

कृपा दृष्टीने सहजी पाहता, बद्ध जीव तो मुक्त क्षणी | ज्ञाता ज्ञेय नि ज्ञान मिटुनिया, लाभे कैवल्यचि झणी || ९.

मी ज्ञाता ज्ञेयाच्या ज्ञाना, आतुर परि ते उमजेना | सद्गुरू चरणी आश्रय घेता, पैलतिरी ये त्याच क्षणा || १०.

गर्भिणीस अज्ञेय गर्भ तो, ज्ञाता ज्ञेयहि तीच जरी | त्या तिघासही पूर्ण जाणतो, हृदयीचा परि एक हरी ||११ .

गुरु जाणता ज्ञेय श्रीहरी, ज्ञान होई ते प्रतीतीने | तत्क्षणीच ते समरस होता, नुरेचि त्रिपुटि ऐक्याने || १२.

मीच शोधितो मला कधीचा, ज्ञाने अज्ञानही विरले | कापुर विलये अग्निसंगे, तसे ज्ञानहि ते नुरले || १३.

कैवल्यकनकाचिया दाना । जो न कडसी थोर साना । द्रष्ट्याचिया दर्शना । पाढाऊ जो ॥ २-५ ॥

कैवल्याचे कनकदान तो, कुणी मागे त्यासि देई | सान थोर हा भेद न पाही, द्रष्ट्या दर्शन ते होई || १४.

सज्जन दुर्जन उभया लाभे, एकचि प्रकाश सूर्याचा | तसे सद्गुरू दानशूर ते, मार्ग दाविती मुक्तीचा || १५.

आपणाशी भेटताचि आपण, दर्शन जाई हरपोनी | गुरु कृपेचा ऐसा महिमा, कैवल्याच्या त्या ज्ञानी || १६.

सामर्थ्याचेनि बिकें । जो शिवाचेंही गुरुत्व जिंके । आत्मा आत्मसुख देखे । आरिसा जिये ॥ २-६ ॥

शिव समर्थ ना स्वरुप प्रतीतिला, गुरुदृष्टी ते सहज करी | तुलना सामर्थ्याचि करिता, गुरुत्व श्रेष्ठत्वास वरी || १७

जीव जरी शिव, तरि 'शिवोहं,' नच ती प्रतीति गुरूविना | सद्गुरुमध्ये निजमुख पाही, गुरु आरसा त्या ज्ञाना || १८.

जोवरी मायेचा तो पगडा, जीव नि शिव ही ओळख ती | अनंत स्वरुपाचि जंव प्रतीति, जीव शिव नामे विरती || १९.

निजरुप विस्मरणेचि जीव हा, द्वैतालागी भोगितसे | कैवल्याच्या लाभे सद्गुरू, जीवपणाला विरवितसे || २०.

जीवत्व विरता नुरे शिवत्वहि, गुरुत्व ते आपुल्या जागी | हा साराचि सद्गुरू महिमा, श्रेष्ठपणा त्या, त्यालागी || २१.

बोधचंद्रचिया कळा । विखुरलिया येकवळा । कृपा पुनीव लीळा । करी जयाची ॥ २-७ ॥

आत्मवस्तुच्या विविध कला त्या, असे विखुरल्या नामरुपे | दृष्टी ज्ञानमयी ती होता, पूर्ण बोध तो पुनवरुपे || २२.

पूर्ण रूप जरि असे चंद्रमा, प्रतिदिनी भासती नविन कळा | पौर्णिमेस त्या एकवटुनि जणु, दिसे चंद्रमा तो सगळा || २३.

तसे आत्मरुप एक सदाचि, कळा विखुरल्या जगद्रूपे | ज्ञानमयी ती होता प्रतीति, एकत्वची ते गुरुकृपे || २४

जो भेटलियाचि सवे । पुरति उपायांचे धांवे । प्रवृत्ति-गंगा स्थिरावे । सागरीं जिये ॥ २-८ ॥

मुमुक्षु करिति विविध साधना, निजरूपा जाणायाते | स्थिरावी गुरुकृपा तयाशी, सागरी गंगा शांतवते || २५.

सिद्ध पुरुष जे पूर्णकामचि, अनेक व्यवहारा करिती | इंद्रियेचि जरि गुंतती कार्यी, स्थितप्रज्ञ अंतरी शांती || २६.

बाहेरी प्रवृत्ति दिसे जरि, अंतरी निवृत्तीच असे | जन हितास्तव त्यांची कार्ये, हेतु फलाशा मुळी नसे || २७.

जयाचेनि अनवसरें । दृष्टाले दृश्याचें मोहिरें । जो भेटतखेंव सरे । बहुरुपचि हें ॥ २-९ ॥

सुयोग सद्गुरु भेटीचा तो, जीवनी जोवरी नच आला | तंववरीच हा द्रष्टा दृष्ये, भास जीवाने अनुभवला || २८.

भाग्ये भेटताचि सद्गुरु, भास प्रपंचाचा विरला | जैसी येता पूर्ण जागृती, स्वप्नाभासचि मावळला || २९

अविद्येचें काळवखें । कीं स्वबोध सुदिनें फांके । सीतलें प्रसादार्कें । जयाचेंनि ॥ २-१० ॥

उगवताचि श्रीगुरुकृपेचा, भास्कर त्याच्या किरणांनी | अज्ञानाच्या रजनीचे ते, तिमिर पुरे जाई मिटुनी || ३०.

सुदिन उदेला निजबोधाचा, उजळ जाहल्या दाहि दिशा | प्रवृत्ती नि निवृत्तीच्या, उरतील उर्मि मग कैश्या ? || ३१

जयाचेनि कृपासलिलें । जीउ हा ठाववरी पाखाळे । जें शिवपणहि वोंविळें । अंगी न लवी ॥ २-११ ॥

गुरुकृपा पावन गंगाजल, स्नान त्यांत जंव जीव करी | जन्म जन्मीचा मळ निपटोनी. पूर्ण शुद्धता त्यासि वरी || ३२

पुर्णपणे तो होता निर्मळ, शिवत्वहि ओवळे गमे | त्यांस न अंगा लागू देई, पूर्ण व्यापिता तो ब्रहमे || ३३.

करिता निष्कामचि ती कर्मे, संग सोडुनि निष्ठेने | अभ्यंतर ते पुर्णचि उजळे, विवेक नि वैराग्याने || ३४ .

राखों जातां शिष्यातें । गुरुपणहि धाडिलें थितें । तऱ्ही गुरुगौरव जयातें । सांडीचिना || २-१२ ॥

लघुत्व घालवुनि शिष्याचे, गुरुत्व त्यासि गुरु देई | तेणे महिमा श्रीसद्गुरूचा, कीर्तिरूपे वर्धन होई || ३५.

एकपण नव्हे सुसास । म्हणोन गुरु-शिष्यांचें करोनि मिस । पाहणेंचि आपली वास । पाहतसे ॥ २-१३ ॥

एकाकीपण जंव करमेना, ब्रह्म होत मग शिष्य-गुरु | तो उन्नत करि शिष्या जैसा, वेलीला आधार तरु || ३६.

निमित्त करुनी ते शिष्याचे, आपुल्याचि स्वरुपा पाही | आत्मबोध करिता शिष्याला, उजळणी ज्ञानाची होई || ३७.

जयाचेनि कृपातुषारें । परतलें अविद्येचें मोहिरें । परिणमे अपारें । बोधामृतें ॥ २-१४ ॥

गुरुकृपा पावन गंगाजल, लाभे एक तुषार जरी | मोहरूप अज्ञान वीष ही, उलटुनि अमृत बोध करी || ३८.

विषय विकारी लाभे जे सुख, तेचि दुःख हो परिणामी | बोधे येई विरक्ति आणि, शिष्य जात हरिचे धामी || ३९

वेद्या देतां मिठी । वेदकुहि सुये पोटीं । तऱ्ही नव्हेचि उशिटी । दिठी जयाची ॥ २-१५ ॥

निजस्वरूपाचा विषय करुनिया, स्वयेचि द्रष्टा बने हरी | दर्शन घेई निजरुपाचे, त्याचि कारणे द्वैत धरी || ४० .

स्व-बोध होता ज्ञान दृष्टीने, दृष्टी न उष्टी श्री गुरुची | कर्तेपण ते बुद्धित नसता, नच बाधा व्यवहाराची || ४१ .

जयाचेनि सावायें । जीवु ब्रह्म उपर लाहे । ब्रह्म तृणातळीं जाये । उदासे जेणें ॥ २-१६ ॥

साह्य लाभता श्री सद्गुरूचे, प्रतिति जीवा परब्रहमाची | परी उदासीन जरी सद्गुरू, ना सुटका संसाराची || ४२

जरि शिष्यासि असे पात्रता, तरि लाभे सद्गुरू तया | अपात्र सहजी विषयानंदी, रमवित त्यासी ती माया || ४३.

जरि दैवे लाभला सद्गुरु, कृतार्थ जीवन हो त्याचे | उदासिन होण्या गुरु कारण, अशुद्ध चित्तचि शिष्याचे || ४४.

लाभता गुरु, उदार हस्ते, दान देत कैवल्याचे | पूर्वजन्मीच्या व्यवहाराने, चित्त उदासिन ना गुरूचे || ४५.

म्हणुनी आचरणे सद्ग्रंथा, केवळ वाचन काय करी | नामदेव म्हणती अनुभवणे, ओवी जीवनी एक तरी || ४६ .

उपस्तिवरि राबतिया । उपाय फळीं येती मोडोनियां । वरिवंडले जयाचिया । अनुज्ञा कां ॥ २-१७ ॥

जीवन आचरी गुरु आज्ञेने, निष्ठा ठेऊनिया पुरती | पूर्ण समर्पण भावे शिष्या, फळे लाभती प्रतीतिची || ४७ .

बुद्धिनिश्चये आत्मज्ञान ते, त्यासि परायण अहर्निशी | पूर्ण ब्रह्मनिष्ठाही भावे, ब्रह्मरूप निजरूपाशी || ४८ .

चवथे अध्यायी कथिले हे, ज्ञानेश्वरीत माऊलीने | तेचि कथियले पुनश्च येथे, सद्भावे त्या आचरणे || ४९ .

जयाचा दिठिवावसंतु । जंव न रिघे निगमवनाआंतु । तंव आपुलिये फळीं हातु । न घेपतिही ॥ २-१८ ॥

जोवरी ना ये कृपा वसंतचि, सद्गुरुचा तो शास्त्र वनी | तोवरी ना ती फळे बहरती, म्हणुनि असावे शुद्ध मनी || ५०

शुद्ध असावे नित्य अंतरी, तशिच विरक्ति बाहेरी | गुरुकृपा सहजीचि लाभे, दिसे सकलचि विश्व हरी || ५१.

गुरु कृपेने 'प्राकाम्य'हि ते, ऐश्वर्याचा लाभ घडे | भाग्यवान त्या शिष्याचीहि, ज्ञानदृष्टी सहजी उघडे || ५२ .

पुढें दृष्टीचेनि आलगें । खोंचि कीं निवटी मागें । येव्हडिया जैता नेघे । आपणपें जो ॥ २-१९ ॥

ज्ञानदृष्टीच्या अपूर्व लाभे, विरे दृश्य द्रष्टाची दिसे | आत्मरूप ते सकलचि दिसते, त्याविण अन्य न कांही असे || ५३.

गुरुकृपेचे ज्ञानांजन ते, दृष्टी दृश्याला विरवी | आत्मरूप ते दिसे चहुकडे, आत्मरूपे ब्रह्मा भावी || ५४.

लघुत्वाचेनि मुद्दलें । बैसला गुरुत्वाचे शेले । नासूनि नाथिलें । सदैव जो ॥ २-२० ॥

विनम्र सानपणा शिष्याचा, गुरुत्व देई श्रीगुरूला | मिथ्या लघु नि गुरूपणा हा, कृपा देत अनुभूतीला || ५५.

नाहीं जे जळीं बुडिले । तै घनवटें जेणें तरिजे । जेणें तरलियाहि नुरिजे । कवणिये ठाईं॥ २-२१ ॥

नसता जल ते जरा तरीही, बुडले त्यांसी गुरु तारे | तरले त्यांसी येई प्रतीति, भासमानचि हे सारे || ५६.

असे कोरडा भवसागर हा, समर्थ गुरुने तारियले | सारा खेळ असे स्वप्नीचा, दृष्टिस ज्ञानमयी केले || ५७

आज दिसे ते नसे उद्या हे, सकलासिही ज्ञात असे | ऊन साउली नित्य जीवनी, स्थिति कदापि स्थिर नसे || ५८.

येथे आपण फक्त पाहुणे, जो तो रिक्तचि जात असे | सारे दिसता हांव सागरी, बुडती जन ते कां कैसे || ५९

असे नित्य तो जवळी श्रीहरी, जो माझे निजरूप असे | मीचि मजला असे जाणणे, गुरु घडवी हे आपैसे || ६०.

सगुण असे केवळ देखावा, कार्य कराया विश्वाचे | निष्कामे नि विरक्त होऊनि, स्मरण राखणे स्वरुपाचे || ६१.

आकाश हे सावेव । न बंधे आकाशाची हांव । ऐसें कोण्ही येक भरीव । आकाश जो ॥ २-२२ ॥

आकाशाला अवयव नाही, अवयव सहिते शब्दगुणे | चिदाकाशी परब्रह्म कोंदटे, नुरे व्योम अवकाशपणे || ६२.

'आत्मन: आकाश संभूत', श्रुति सांगे ते स्पष्टपणे | उदित व्योम ते होण्याआधी, निश्चल सद्गुरु ज्ञानपणे || ६३.

विविध तरंगे तुडुंब भरती, लघु-गुरू बहुउद्देशी | ब्रहमांडातून प्राणशक्ति ये, तीहि भरली आकाशी || ६४

पोकळ कैसे व्योम म्हणावे, व्यक्ताव्यक्तहि ॐ जिथे | परब्रह्म आधारचि सकला, निराकार नि अनंत ते || ६५ .

चिदाकाश ते यथार्थ स्वरूपचि, परब्रह्मरुप श्रीगुरुचे | अनंत निर्गुण निराकार ते, कालातीतचि नित्याचे || ६६ .

चंद्रादि सुसीतळें । घडलीं जयाचेनि मेळें । सूर्य जयाचेनि उजाळें । कडवसोनि ॥ २-२३ ॥

शीतल किरणे ती चंद्राची, आणि तेज मार्तंडाचे | तेजे तळपती नित्यचि गगनी, अल्प दान जरी श्रीगुरूचे || ६७.

शीतल चंद्र नि ग्रहगोलादि, सारे घडवियले त्याने | सुर्यादिंना एक कवडसे, प्रकाश दिधला श्री गुरुने || ६८ .

जीवपणाचेनि त्रासें । यावया आपुलिये दशे । शिवही मुहूर्त पुसे । जया जोशियातें ॥ २-२४ ॥

जीवपणाला त्रासुनियाची, यावयास आपुल्या दशे | श्री सद्गुरु हा असा ज्योतिषी, जया शिवहि मुहूर्त पुसे || ६९

सुख-दु:खाचे येणे जाणे, कर्मफलांची नोंद तशी | सारे जन्मोजन्मी करुनी, थकला शिव तो अहर्निशी || ७०

आसक्ती नि लोभ मोह ही, हे सारे जरी देहाचे | वृथा देहबुद्धीत गुंतुनी, जीवा फेरे चक्राचे || ७१.

जोवरी जीव दशा ना संपे, तोवरि गुंते कार्याशी | योग मुक्तीचा केंव्हा ऐसे, पुसे शिव श्री सद्गुरूशी || ७२. .

चांदिणें स्वप्रकाशाचें । लेइला द्वैतदुणीचें । तऱ्ही उघडेपण नवचे । चांदाचें जया ॥ २-२५ ॥

चंद्र पसरवी गगनी चांदणे, पांघरुनि ना लपे कदा | प्रकाशुनिया सकल जगाला, राही सद्गुरु प्रगट सदा || ७३.

जो उघड किं न दिसे । प्रकाश कीं न प्रकाशे । असतेपणेंचि नसे । कव्हणीकडे ॥ २-२६ ॥

जरि दिगंबर सर्वव्यापिही, कुणा परंतु तो न दिसे | प्रकाशवी तो जरि सकलाशी, दर्शन नयने होत नसे || ७४.

सर्वठायी सद्गुरु परमात्मा, असे परि ना कुठे दिसे | इंद्रिये नि मन बुद्धि कुंठित, केवळ स्वसंवेद्यचि असे || ७५

उपाधीत तो निराकारचि, मुके न कधि एकत्वाशी | तो न इंद्रिया विषय असे परि, चैतन्या दे सकलाशी || ७६.

आतां जो तो इहीं शब्दीं । कें मेळऊं अनुमानाची मांदी । हा प्रमाणाहि वो नेदी । कोण्हाहि मा ॥ २-२७ ॥

नाम रूप ना आणि अगोचर, म्हणुनि वर्णना वाव नसे | अनुमानाशी प्रमाण नसता, शब्दचि कुंठित होत असे || ७७.

जेथें शब्दाची लिही पुसे । तेणेंसिं चावळों बैसे । दुजयाचा रागीं रुसे । येकपणा जो ॥ २-२८ ॥

शब्दपणा विरतो शब्दांचा, मौने करी संवादाशी | हरि होऊनिया हरीशी बोलणे, राग येत त्या द्वैताशी || ७८ .

प्रमाणापरि सरे । तैं प्रमेयचि आविष्करे । नवल मेचुं ये धुरे । नाहींपणाची ॥ २-२९ ॥

तर्क विचार नि प्रमाण यांचा, विषय कदापि होत नसे | स्वसंवेद्यताचि त्यासि जाणणे, अन्य कदा न रुचत असे || ७९ .

आपुले नसणे तया आवडे, जगा वाटू दे देव नसे | हीच आवडी त्याचे मनीची, नसणेपण त्या रुचत असे || ८०

'अमूक' असणे ज्याचे नसणे, नसणेपणी अनुभवित जया | त्यासी त्याची ये अनुभूति, श्रम इतरांचे ते वाया || ८१.

द्वैत अभावे एकपणा ये, शब्दी म्हणुनि तो ज्ञात नसे | स्वसंवेद्यि प्रतीति त्याचि, आपण आपणी स्पष्ट दिसे || ८२.

कांहींबाहीं अळुमाळु । देखिजे येखादे वेळु । तरी देखे तेहि विटाळु । जया गांवीं ॥ २-३० ॥

कधि क्वचितचि जाय चमकुनि, तडितेसम दिसणे त्याचे | म्हणुनि त्याचि रुपा शोधिता, विटाळ त्याशी स्पर्शाचे || ८३

तेथें नमनें का बोलें। केउतीं सुयें पाउलें । आंगीं लाउनि नाडिलें । नांवचि येणें ॥ २-३१ ॥

ऐसे ज्या पाहणे शक्य ना, नमन स्तवन करणे कैसे | ज्यासी सकलाची निवृत्ती, प्रवृत्ती त्या रुचत नसे || ८४.

नव्हे आत्मया आत्मप्रवृत्ति । वाढवितां कें निवृत्ति ? । तरी या नामाचि वायबुंथी । सांडीचिना ॥ २-३२ ॥

चिन्मात्र नि पूर्णचि आत्मा, प्रवृती त्या ठायी नसे | पूर्णकाम सहजी निवृत्ती, नांव वागवी फुका कसे ?|| ८५

निजरुप निर्विकार नि निश्चल, अभाव प्रवृत्तिचा असे | निवृत्ती मग तिथे कोठली?, उगा नाम ते व्यर्थ तसे || ८६.

निवृत्ती ती असे कोठुनि, जेथं मुळी नच प्रवृत्ती ?| तरी धारिले नाम असे ते, अंतर्बाह्यचि निवृत्ती || ८७.

निवर्त्य तंव नाहीं । मा निवर्तवी हा काई ? । तरि कैसा बैसे ठाईं । निवृत्ति-नामाच्या ? ॥ २-३३ ॥

सकलची हे परमात्मा असता, कशापासुनी निवृत्ती ? | उगा नाम निवृत्ती धारणे, त्या नामाची कां प्रीति || ८८.

प्रवृत्तीचा अभाव असता, नच संभवते निवृत्ती | ऐसे असता संज्ञा कैसी, निवृत्ती धारिलीच ती || ८९.

सूर्यासि अंधकारु । कैं झाला होता गोचरु ? । तऱ्ही तमारि हा डगरु । आलाचि कीं ॥ २-३४ ॥

कधी न तम पाहिले रवीने, तरी तमारी त्या म्हणती | फुकाचि तो गौरव नामाचा, आणि फोलची ती ख्याती || ९०

तमास नाशी ऐसा लौकिक, सूर्यालागी ख्यात असे | त्याने परि ना तमा पाहिले, नाम तमारी मिरवितसे || ९१

लटिकें येणें रूढे । जड येणें उजिवडे । न घडे तेंहि घडे । याचिया मावा ॥ २-३५ ॥

कैसी सत्ता परमात्म्याची, नसे तेही प्रभावी असे | जे न घडावे तेही घडते, अजब आश्रयी हे कैसे || ९२ .

जे नसते ते याच्या योगे, अस्तित्वाला मिरवितसे | युगे युगे हे विश्व भासते, अभाव सारा जरी असे || ९३

हां गा मायावशें दाविसी । तें मायिक म्हणोन वाळिसी । अमायिक तंव नव्हसी । कवणाहि विषो ॥ २-३६ ॥

मायेने तू मूर्त होऊनि, जगताच्या येशी पुढती | त्या स्वरूपाला भजता तूचि, त्यातुनि घेशी निवृत्ती || ९४

देहधारी जी काया धारिशी, जन सामन्यास्तव मूर्त रुपी | परि पूजना निषेध करिशी, माया म्हणुनी आरोपी || ९५

परि भिन्न ना तुजशी माया, निषेध कां तो मग करिशी ?| अमूर्त रूपा तू न दाविशी, कांही कळेना आम्हासी || ९६

शिवशिवा सद्गुरु । तुजला गूढा काय करूं ? । येकाहि निर्धारा धरूं । देतासि कां ? ॥ २-३७ ॥

हर हर हे सद्गुरू आपुल्या, गूढपणाला काय करू? | यथार्थ रूपा तूचि लपविशी, कवण रूपा मी ध्यानी धरू? || ९७.

जगदाधिष्ठानस्वरुपा, मंगलधामा निवृत्ती | अनंतरूपा कसे भजावे, अम्हा कळेना अल्पमती || ९८

देहधारी म्हणुनिया भजावे, मायिक म्हणुनि ना भावे | अंतर्यामी म्हणुनि भजण्या, कसे वेगळे काढावे || ९९

सेव्यस्वरूपा यथार्थ कैसे, सांगा सद्गुरू जाणावे ?| कृतज्ञ भावा सांगा आमुच्या, कैसे आम्ही व्यक्तावे ?|| १००

नामें रूपें बहूवसें । उभारूनि पाडिलीं ओसें । सत्तेचेनि आवेशें । तोषलासि ना ? ॥ २-३८ ॥

बहू निर्मिले नाम रूपांना, उभवुनी त्यासी ओस करी | घडिशी मोडीशी, पुन्हा घडविशी, झाला ना संतोष उरी**?** || १०१

अनंत कालापासुनि ऐसा, खेळ स्वयेचि चालविला | चिद्विलासचि करुनि ऐसा, परि ना संतोषी झाला || १०२

जिउ घेतलिया उणे । चालों नेदिसी साजणें । भृत्यु उरे स्वामीपणें । तेंहि नव्हे ॥ २-३९ ॥

जीवभाव जोवरी आमुचा, तोवरी विफलचि यत्न असे | आणि विरता गुरु शिष्य हे, नातेचि ते उरत नसे || १०३

द्वैत विरे नि समरसतेने, स्वरुप होत कैवल्याचे | आणि ऐसे होता तेंव्हा, दर्शन ना उमगायाचे || १०४

विशेषाचेनी नांवें । आत्मत्वही न साहावे । किंबहुना न व्हावें । कोण्हीच या ॥ २-४० ॥

तुला नावडे वेगळेपणा, आत्मत्वाचा सन्मान | संबोधन ते मुळी नावडे, केवळ स्वत्वाचे भान || १०५

अंश भाव वा विशेष भावे, आत्मभावी ये दोनपणा | ते न साहवे कधी आपणा, नित्य आवडे एकपणा || १०६ .

स्वयंसिद्धता कधि न सोडी, हरी दर्शना, हरि व्हावे | ऐक्य साधुनि समरसतेने, आपण आपणासी भावे || १०७

राति नुरेचि सूर्या । नातरी लवण पाणिया । नुरेचि जेवी चेइलिया । नीद जैसी ॥ २-४१ ॥

भास्कर असता रात्र नुरेनि, जल संपर्के लवण नुरे | जेंव्हा येई पूर्ण जागृती, झोप सर्वथा मुळी न उरे ||१०८

सूर्य दर्शना जाता रजनी, रजनीपण ते मुळी न उरे | किंवा मीठचि जला भेटता, वेगळेपणा पूर्ण विरे || १०९

निद्रा संपुनि जागृती येता, निद्रापण ते कांही नुरे | तसे व्यष्टिपण पूर्णचि विरता, केवळ हरिरुप एक उरे || ११०

कापुराचे थळीव । नुरेचि आगीची बरव । नुरेचि रूप नांव । तैसें यया ॥ २-४२ ॥

कापुर अग्निसंगे येता, रूप नांव ते कांही नुरे | गुरू संगती शिष्याचाहि वेगळेपणा पूर्ण सरे ||१११

सद्गुरू परमात्माचि निर्गुण, शुद्ध यथार्थचि एकपणा | मी हरि हे पुरते विसरावे, समर्पणे ये शून्यपणा || ११२

याच्या हातांपायां पडे । तरी वंद्यत्वें पुढें न मंडे । न पडेचि हा भिडे । भेदाचिये ॥ २-४३ ॥

चरण स्पर्श करण्या कुणी विनवी, वंदनास ना येई पुढे | अद्वैताच्या निजस्वरूपाचा यांस कधी ना विसर पडे || ११३

आत्मरूपाने हृदयी सद्गुरू, चरण वेगळे ना दिसती | कैसे मस्तक पायावरती, ठेवावे चाले न मती || ११४

वंद्य वंदिता वंदन कैसे, अभेद जंव पुरताचि असे | स्वसंवेद्या उर्मि येता, जयजयकारा आपैसे || ११५

आपणाप्रति रवी । उदो न करी जेवीं । हावंद्य नव्हें तेवीं । वंदनासी ॥ २-४४ ॥

नित्य उदित तो भास्कर जैसा, वंदिताही हा वंद्य नसे | स्वये आद्य जो वंदक वंद्यहि, भेद उदित होईल कसे ?|| ११६

उदय आपुला सूर्य ना करी, नित्य उदित तो स्वये असे | नित्यवंद्य तैसाची सद्गुरू, वंदनासी तो विषय नसे || ११७.

कां समोरपण आपलें । न लाहिजे कांहीं केलें । तैसें वंद्यत्व घातलें । हारौनि येणें ॥ २-४५ ॥

सद्गुरू देता अनुभूति हरीची, शिष्य गुरूही एक हरी | सारे एकवटे एकत्वे, कोण नमन कोणास करी ?|| ११८.

आपुल्या सन्मुख आपण येणे, कदापिही हे शक्य नसे | तैसा सद्गुरू वंद्य असुनीही, हरवुनि वंद्यत्वा बैसे || ११९

सद्गुरूचे सामोरे येणे, संभव नच ते आत्मगुणे | म्हणुनि त्याच्या वंद्यपणाला पुरते हरवियले तेणे || १२०.

आकाशाचा आरिसा । नुठे प्रतिबिंबाचा ठसा । हा वंद्य नव्हे तैसा । नमस्कारासी ॥ २-४६ ॥

नच आकाशा रूप म्हणोनि, प्रतीबिंब दर्पणी नसे | तैसा सर्वव्यापी परमात्मा, सद्गुरू वंदावे कैसे || १२१.

परी नव्हे तरी न हो । हें वेखासी कां घेवो । परी वंदीतयाहि ठावो । उरों नेदी ॥ २-४७ ॥

वंदन घ्यावे तुवा कुणाचे, ही तर मर्जी तुझी असे | ज्याने केले वंदन तुजला, देहभाव त्या उरत नसे || १२२

वंदनासि ते वंद्य न होणे, विस्मय यांत न कांही असे | वंदन करण्या जोही जातसे, त्याचा ठावहि उरत नसे || १२३

आंगौनि येकुणा झोळु । फेडितांचि तो तरी बाहिरिळू । कडु फिटे आंतुलु । न फेडितांचि ॥ २-४८ ॥

एकेरी ते वस्त्र नेसिता, बाहेरुनि फेडू जाता | त्याच क्षणी ते आतुनि सुटुनी, फेडुनिया येई हाता || १२४. .

नसे जीव वा शिव हि भावना, व्यष्टीपण ते सकल सरे | पूर्ण समर्पण देह मनाचे, करिता मीपण कांही नुरे || १२५

नाना बिंबपणासरिसें । घेऊनि प्रतिबिंब नासे । नेलें वंद्यत्व येणें तैसें । वंदितेंनसीं ॥ २-४९ ॥

किंवा सारिताची आरसा, सहजी प्रतिबिंबहि जाते | बिंब अशा या संज्ञेला मग, कांही प्रयोजन नच उरते || १२६.

देहभाव सरता शिष्याचा, द्वैत सकलही नच उरते | वंदन करण्या दोनपणाचे, नाते ते विरुनी जाते || १२७

शिष्य गुरुची द्वैत भावना, गुरुकृपेने जंव विरते | कुणी कुणाला मग वंदावे?, तेही प्रयोजन नच उरते || १२८

देह भावना निरास होता, शिष्य गुरु हे द्वैत नुरे | आत्मरूप ते एकचि असता, वंदन भावहि पूर्ण विरे || १२९

नाहीं रूपाचि जेथें सोये । तेथें दृष्टीचें कांहींचि नव्हे । आम्हां फळले हे पाये । ऐसिया दशा ॥ २-५० ॥

नाम रुपाची जेथं सोय ना, काय पहावे दृष्टीने | गुरुकृपेचे फळ लाधे हे, दशा लाभली भाग्याने || १३०

श्री सद्गुरूची कृपा फलद्रुप, लाभे मज एकात्मदशा | रूपहि नुरले, बघणे सरले, प्रगटे अद्वैताची उषा || १३१

गुणा तेलाचिया सोयरिका । निर्वाहिली दीपकळिका । ते का होईल पुळिका । कापुराचिया ॥ २-५१ ॥

तेल वात दीपात योजुनी, पेटविता ती ज्योत दिसे | कर्पुर अग्निसंगे येता, अग्निज्योतिविण कांही नसे || १३२

तया दोहों परस्परें । होय ना जंव मेळहैरें । तंव दोहीचेंही सरे । सरिसेंचि ॥ २-५२ ॥

तेल वातीच्या दीपामाजी, ज्योत प्रकाशा देत असे | कापुरास परि अग्नि लाविता, भस्म क्षणी, ती ज्योत नसे || १३३

तेविं देखेना कायी ययातें । तंव गेलें वंद्य वंदितें । चेइलिया कांतें । स्वप्नींचें जेवीं ॥ २-५३ ॥

यथार्थ दर्शन मम सद्गुरूचे, जोवरी मजला नच घडले | तोवरीच या वंद्य वंदिते, व्यवहाराला आचरिले || १३४.

अज्ञानाच्या निद्रेमाजी, होतो तोवरि व्यष्टिरुपे,श्री गुरूचे मी चरण धरी | येता आता पूर्ण जागृती, सारे झाले एक हरी || १३५.

तैसे देखिताचि सद्गुरूला, वंद्य वंदिते उभय विरे | जागृत होता प्रिया स्वप्नीची, सहजचि ती तत्क्षणी नुरे || १३६.

स्वप्नी पाही निज कांतेला, जागृत होता तोचि उरे | तैसी अविद्या सारी सरता, शिष्य गुरूपण द्वैत सरे || १३७.

किंबहुना इया भाखा । द्वैताचा जेथें उपखा । फेडोनियां स्वसखा । श्रीगुरु वंदिला ॥ २-५४ ॥

या माझिया काव्यपदांनी, द्वैतासी मी संपविले | समरस होऊनि प्रिय गुरूशी, विनम्र वंदन ते केले || १३८

होता जेंव्हा पूर्ण समर्पण, तीच वंदना असे खरी | त्या सद्भावे नमन असे हे, आता सकलची एक हरी || १३९.

ऐसे जाणुनि, गुरुकृपेने, मायेचा पडदा विरता | अभेद भावे सख्य लाभता, कृतज्ञतेने गुरु नमिता || १४०

अधिक सांगणे नलगे आता, आत्मत्वे स्वसखा गुरु | आहेपण माझे विसरोनी, अद्वैतेचि नमन करू || १४१

द्वैत नि अद्वैतहि ते सरुनी, स्वरूप मात्रे स्वतंत्रचि | आपणायासि सखाहि आपण, स्वप्रत्यये हो वंदनचि || १४२.

याच्या सख्याची नवाई । आंगीं एकपण रूप नाहीं । आणि गुरु-शिष्य दुबाळीही । पवाडु केला ॥ २-५५ ॥

नवलाई, ती सख्यत्वाची, एकपणाही रूप नसे | स्वयेचि होऊनि शिष्य गुरूही, अद्वैताहि राखितसे || १४३ ||

स्वये निराकार नि निर्गुण, अनंत सर्वचि तोचि असे | एकपणाही कसे म्हणावा, जेंव्हा अन्यचि कुणी नसे || १४४.

ऐसे असता, गुरु शिष्याच्या द्वंद्वालागी खेळविले | अबाधित अद्वैता ठेऊनी, नवल कसे ऐसे केले || १४५

कैसा आपणया आपण । दोंविण सोइरेपण । हा याहूनि विलक्षण । नाहीं ना नोहे ॥ २-५६ ॥

आपणासी आपणचि सोईरे, दुज्याविणा सख्यत्व कसे | स्वरूप सोडुनी अन्य न होणे, सारे विलक्षणचि असे || १४६

सर्वव्यापि नि सर्वचि तो तर, तो नाही हे म्हणू कसे ?| आहे म्हणता कुठे दिसेना, नसणे असणे हे ऐसे || १४७.

दुजेपणाविन सोयरेपणा, विलक्षणचि हे शिष्य गुरु | बोध आपणा आपणासिची, द्वैताला ना देत ऊरु || १४८

जग आघवें पोटीं माये । गगनायेव्हढे होऊनि ठाये । तेचि निशी साहे । नाहींपणाची ॥ २-५७ ॥

जगा घालुनि उदरामाजी, सद्गुरु झाले गगनरुपी | निजबोधे ते विश्व लयाशी, ही जणु रजनी अभावरुपी ||१४९

कां पूर्णते तरि आधारु । सिंधु जैसा दुर्भरु । तैसा विरुद्धेयां पाहुणेरु । याच्या घरीं ॥ २-५८ ॥

धरतीला करण्याला जलमय, सागर त्याचे जल देई | साऱ्या सरिता त्या मिळताही, तृष्णापूर्ती नच होई || १५० .

जलपूर्ती आधार सिंधुचि, रिता परी तो नच होई | अखंड सरिता जल साठविता, ना पुरता भरुनि जाई || १५१

अखंड दाता जलपूर्तीस्तव, जल सरितांचा भांडारी | देणे घेणे उभय चालता, प्रसन्नतेला नित्य वरी || १५२

तसे गुरु एकता न सोडिता, अनेकतेलाही दावी | विरुद्ध धर्मा धारण करुनी, विचलित परि ते नच होई || १५३

तेजा तमातें कांहीं । परस्परें निकें नाहीं । परि सूर्याच्या ठायीं । सूर्यचि असे ॥ २-५९ ॥

तेज तमाचे हाडवैरची, परस्परांना नच बघती | त्यासी असे आधार सूर्यचि, त्यामुळेची ते वसती || १५४

सूर्या ठायी प्रकाश केवळ, दिन रात्रही त्या ठाव नसे | भाव अभावे दोघी असती, सूर्यापरी अद्वैत असे || १५५

येक म्हणतां भेदें । तें कीं नानात्वें नांदे ? । विरुद्धें आपणया विरुद्धें । होती काइ ? ॥ २-६० ॥

दुजा कुणी तो नसता त्याविण, भेद 'एक' म्हणताची असे | परी नानात्वे तोचि नांदता, त्याचे एकत्व न नासे || १५६.

एकपणाही गुरु न साहतो, दुज्या मुळी अस्तित्व नसे | तोचि श्रीसद्गुरु परमात्मा, नानात्वेहि नांदतसे || १५७

एकपणा नि अनेकविधता, उभयचि परि तो एक हरी | निराकारिता परि न सोडिता, विलास जगती तोचि करी || १५८

म्हणौनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोहों शब्दांचा अर्थु । श्रीगुरुचि परी होतु । दोहों ठायीं ॥ २-६१ ॥

म्हणुनी शिष्य आणि सद्गुरू, एक अर्थ परि दो नामे | दोन्ही रुपे ती एक गुरुची, जैसे सुगंध नि कुसुमे || १५९

गुरु शिष्य नामे ही वेगळी, एक गुरुचि उभय असे | एक सच्चिदानंद श्रीहरी, केवळ उभयामाजी वसे || १६०

कां सुवर्ण आणि लेणें । वसतें येकें सुवर्णें । वसतें चंद्र चांदणें । चंद्रींचि जेवीं ॥ २-६२ ॥

अलंकार नि सुवर्ण दोन्ही, एक सुवर्णी वास करी | चंद्र चांदणे दिसती वेगळे, उभय असती ते एक परी || १६१

नाना कापुरु आणि परिमळु । कापुरचि केवळु । गोडी आणि गुळु । गुळुचि जेवीं ॥ २-६३ ॥

कापुर नि परिमळ दुजे ना, एक परीचि कापुर तो | गोडी नि गुळ भिन्न नसेची, गूळ एकचि तो असतो ||१६२

तैसा गुरुशिष्यमिसें । हाचि येकु उल्हासे । जहीं कांहीं दिसे । दोन्ही-पणें ॥ २-६४ ॥

तैसेची गुरु-शिष्य निमित्ते, जरी भासतो दोनपणा | परमात्मा सद्गुरुचि एकला, उभयी न सोडी एकपणा ||१६३

आरिसा आणि मुखीं । मी दिसे हे उखी । आपुलिये ओळखी । जाणे मुख ॥ २-६५ ॥

जरी आरसा मुखासी दावी, द्रष्टा जाणे दोन नसे | स्वमुख असे ते त्याचे ठायी. आरशात आभास असे || १६४

दिसे दर्पणी स्पष्ट रुपाने, ते नि मम मुख दोन नसे | द्रष्टा जाणे दोन्ही मुखे ती, एकत्वे त्याचीच असे || १६५.

पहापा निरंजनीं निदेला । तो हा निर्विवाद येकला । परि चेता चेवविता जाहला । दोन्ही तोचि ॥ २-६६ ॥

कुणी वनी नीरव एकांती, एकलाची झोपी गेला | निद्रा होता स्वयेची उठला, दुजा न उठवितसे त्याला || १६६

झोपी जाणारा नि उठणारा, तोचि एकला स्वये असे | भिन्न क्रिया परि कर्ता त्याचा, त्याविण कोणी अन्य नसे || १६७

जे तोचि चेता तोचि चेववी । तेवीं हाचि बुझे हाचि बुझावी । गुरुशिष्यत्व नांदवी । ऐसेन हा ॥ २-६७ ॥

तोचि ऊठविणारा नि जागृत, तयावाचुनी अन्य नसे | तैसा सद्गुरू श्रीहरि बोधा, शिष्यत्वाने घेत असे || १६८

अद्वैती असता निजरूपी, निश्चल आणि निवांत तो | निद्रा अज्ञानाची हरण्या, तोचि गुरु शिष्य हि होतो || १६९

नाम रुपाने या इहलोकी, विषयानंदी झोपतसे | निजरूपाची जागृती येता, श्रीहरी प्रतीति होत असे || १७० .

विषयस्मृति ती आत्मविस्मृती, निद्रा ती निजरूपाची | स्व-संवेद्य ऐशी जागृती येता, अनुभूति होई श्रीहरीची || १७१.

दर्पणेवीण डोळा । आपुले भेटीचा सोहळा । भोगितो तरि लीळा । सांगतों हें ॥ २-६८ ॥

विना दर्पणे नेत्रे नेत्रा, पाहियलेचि ज्या कोणी | शिष्य आपुला आपण होऊनि, जाई स्वानंदी रमुनी || १७२.

तया भाग्यवंताशीच उमगे, हे सारे जे सांगितले | नित्य विवेके पूर्ण विरागे, आत्मरुपासी अनुभविले || १७३.

व्यवहारी ते नित्य असुनिही, अनासक्तचि या जगती | स्थितप्रज्ञ ते नित्य आत्मस्थित, स्वानंदीचि नित रमती || १७४

एवं द्वैतासी उमसो । नेदि ऐक्यासी विसकुसों । सोईरिकीचा अतिसो । पोखितसे ॥ २-६९ ॥

उठाव झाला जरि द्वैताचा, विस्कटे न तरि एकपणा | तोचि सद्गुरू स्वये तयाचा, आत्मस्थितीच्या नित भाना || १७५

गुरु शिष्याचे नाते द्वैती, घेता देता दोन दिसे | मिटवुनि अज्ञाना दे ज्ञाना, उभय एकला निभवितसे || १७६

निवृत्ति जया नांव । निवृत्ति जया बरव । जया निवृत्तीची राणीव । निवृत्तिचि ॥ २-७० ॥

केवळ नामची ना निवृत्ती, नाम शोभते छान तया | निवृत्तीचे राज्य तयाचे, निवृत्ती अंगी लिलया || १७७

जया नांव असे निवृत्ती, निवृती त्याची शोभा | राजधानीही त्यांची निवृत्ति, निवृत्तीची राजप्रभा || १७८ .

सदा विरक्ति, ना प्रवृत्ती, सहजभाव निवृत्ती असे | पूर्णकाम निवृत्ती राणीव, निवृत्तीने विलसतसे || १७९ .

निवृतीच्या राज महाली, प्रवेश प्रवृत्तीस नसे | पूर्ण विरक्ति अहं पासुनी, द्वार तयाला खुलत असे || १८० . .

वांचोनि प्रवृत्तिविरोधें । कां निवृत्तीचेंनि बोधें । आणिजे तैसा वादें । निवृत्ति नव्हे ॥ २-७१ ॥

प्रवृत्तीने मम सद्गुरुला, स्पर्श कदापि ना केला | निरोध करणे प्रवृत्तीचा, प्रश्न तया ना उद्भवला || १८१

कुणी बोध तो त्यासि करोनी, नच प्रवृत्ती सोडियली | स्वयंभूच निवृत्ति स्वये ते, निवृतीला गौरविली || १८२ .

आपणा देऊनि राती । दिवसा आणी उन्नति । प्रवृत्ति वारी निवृत्ति । नव्हे तैसा ॥ २-७२ ॥

निजदाना देउनि रात्रीने, दिवसाशी उन्नत केले | प्रवृत्ति निवृत्त होऊनी, निवृत्ती ना सृजियेले || १८३ .

इंद्रिय दमना करुनी अथवा, आवडी सारुनि बाजूला | निवृत्ती आणण्या बळे ती, प्रयास त्यासी ना पडला || १८४ .

सहजी निवृत्ती ती सदाची, सुगंध पुष्पी जसा असे | आसक्ती ती नाही कशाची, तो स्वानंदी नित्य वसे || १८५ .

वोपसरयाचें बळ । घेउनि मिरवे कीळ । तैसें रत्न नव्हे निखळ । चक्रवर्ती हा ॥ २-७३ ॥

सहाणेवरि घास घासुनि, तेज आणिती रत्नाला | तैसे नच हे स्वयंप्रकाशी, शोभवित निज नामाला || १८६

बहु प्रयासे दमने अथवा ना निवृत्ती बाणीयली | निवृत्ती नामास शोभवी, नामा शोभा जणु आणिली || १८७ .

गगनही सूनि पोटीं । जैं चंद्राची पघळे पुष्टी । तैं चांदिणें तेणेंसि उठी । आंग जयाचें ॥ २-७४ ॥

शीतल आणि सौम्य चांदणे, पूर्ण प्रकाशे पसरवितो | चांदण्यासवे पूर्ण चंद्रमा, पूर्ण गगन ते खुलवीतो || १८८ .

अशी रम्यता आणि सुखदता, केवळ लाभे चंद्राने | अमृत वर्षा कौमुदीतुनी, हे तर त्याचेची देणे || १८९.

तैसें निवृत्तिपणासी कारण । हाचि आपणया आपण । घेयावया फुलचि झालें घ्राण । आपुली दृती ॥ २-७५ ॥

निवृत्तीपण स्वयेचि कारण, आपणासि जो स्वये असे | सुगंध घेण्यालागी सुमने, स्वयेचि व्हावे घ्राण जसे || १९०.

दिठी मुखाचिये बरवे । पाथीकडोनि जैं पावे । तैं आरिसे धांडोलावे । लागती काई ? ॥ २-७६ ॥

दृष्टि जये केली उफराटी, अंतर्मुख ते होऊनिया | त्या दर्पण लागेना केंव्हा, निजरूपाला निरखाया || १९१

अंत:स्थचि तो वास तयांचा, नित्यप्राप्त श्री निवृत्ती | निवृत्तीपण विसरतीच ना, तीच तयांची सहज स्थिती ||१९२ .

कीं राती हन गेलिया । दिवस हन पातलिया । काय सूर्यपण सूर्या । होआवें लागें ? ॥ २-७७ ॥

रात्र संपुनि दिन उदयाचा, समय प्राप्त जंव होत असे | मुहूर्त ऐसा साधायाला, सूर्य वाट कां पाहतसे || १९३ .

नित्य उदित तो प्रकाश रूपे, उदय अस्त नसती त्याला | प्रकाश त्याचा अखंड पसरे, शिवे न तो प्रवृत्तीला || १९४ .

होणे प्रकाशमान सूर्याने, येता घडी ती उदयाची | अस्तसमयी तेजा सावरणे, प्रवृत्ती नच ती त्याची ||१९५ .

तैसे सद्गुरू निवृत्तींनी, प्रवृत्तिस ना स्पर्शियले | मूळरूप जे निवृत्तीचे, कधी न त्यांनी सोडियले ||१९६

म्हणोनि बोध्य बोधोनि । घेपे प्रमाणें साधोनि । ऐसा नव्हे भरंवसेनि । गोसावी हा ॥ २-७८ ॥

प्रवृत्ती नि निवृत्तीचा, बोध घेऊनी अनुसरणे | तरीच निवृत्ती आचरणे, ऐसे ना गुरूचे करणे || १९७ .

निवृत्ती हा सहजभावचि, त्यांचे ठायी विलसतसे | आत्मानात्म स्वयंभू जाणे, स्वयंसिद्ध ते तोचि असे || १९८

ऐसें करणियावीण । स्वयंभचि जें निवृत्तिपण । तयाचे श्रीचरण । वंदिले ऐसे ॥ २-७९ ॥

ऐशी स्वयंसिद्ध निवृत्ती, ज्या सद्गुरूच्या ठायी असे | तया ज्ञानघन गुरुरायाशी, विनम्र वंदन करित असे || १९९.

सामरस्यचि सद्गुरू हरीशी, वंदन हे त्या चरणाला | नसे विधी उपचार यांत ते, कृतज्ञता ये शब्दाला ||२००

आतां ज्ञानदेवो म्हणे । श्रीगुरु प्रणामें येणें । फेडिली वाचाऋणें । चौही वाचांचीं ॥ २-८० ॥ ॥

ऋणे चारही वाचांची ती, प्रतीतिस्तव साह्या आली | ऐसा प्रणाम सद्गुरू चरणी, करुनि ऋणे ती फेडियली ||२०१.

श्री. ज्ञानेश्वर अमृत गंगेच्या प्रवाहाची कुंड दुसरे समाप्ती

(३} श्री ज्ञानेश्वरी अमृत-गंगा-कुंड तिसरे

{वाचाऋण परिहार]

ययांचेनि बोभाटे । आत्मयाची झोंप लोटे । पूर्ण तऱ्ही ऋण न फिटे । जें चेणोंचि नीद कीं ॥ ३-१ ॥

वाचुनि शास्त्रे, समजुनिया जरी, महावाक्य आशया पुरा | बुद्धिस पटते देह नसे मी, परि चैतन्यचि, नच दुसरा || १

ज्ञानाची ती दिशा समजते, परंतु अनुभूति नाही तिथे | आत्मदेव ना पुरता जागृत, वाचा ऋण ते शिरी येते || २.

घोष महावाक्यांचा ऐकुनी, स्वभान निद्रा चाळवली | म्हणे 'शिवोहं' अहंभावचि, पुरती निद्रा ना सरली || ३

ही अजुनिही असेच निद्रा, पूर्ण जागृती ना आली | अहंभाव तो सुप्त अजोनी, फेड ऋणांची ना झाली || ४

अहंभाव तो पूर्ण जावया, शब्द न उपयोगी येती | जावे शब्दांच्याही पैल ते, केवळ यावी अनुभूती || ५.

येऱ्हवीं परादिका चौघी । जीवमोक्षाच्या उपेगीं । अविद्येसवें आंगीं । वेंचती कीर ॥ ३-२ ॥

चारी वाणी शब्द वेचुनी, वर्णिती मार्गही मोक्षाचे | जीवा शिकविती, देहबुद्धी हे, मिथ्या बंधन भासाचे || ६

परी शब्द ना देती अनुभूति, केवळ वर्णन मोक्षाचे | समजे आशय परि फिटेना, जाळे ते अज्ञानाचे || ७.

केवळ वर्णन ना उपयोगी, आत्म अनुभूती येण्याला | पुरता अहंभाव जाण्यासि, नको अविद्या उरण्याला || ८

अविद्येसवे जाती लयाला, चारही वाणी पुर्णपणे | परि परा वाणी ती उरते, मी ब्रह्म या शब्द गुणे || ९

देहासवे हातपाये । जाती, मनासवें इंद्रियें । कां सूर्यासवें जाये । किरणजाळ ॥ ३-३ ॥

मृत होता पंचत्वी अवयव, देहाचे तर भागची ते | मनासवे ती जाती इंद्रिये, जसा रवी ने किरणाते || १०

ना तरी निद्रेचिये अवधी । स्वप्नें मरती आधीं । तेवीं अविद्येचे संबंधी । आटती इया ॥ ३-४ ॥

झोप संपता स्वप्ने जाती, तशी अविद्या ती जाता | चारी वाणी संगे जाती, प्रतीति स्वरुपाची होता || ११.

मृतें लोहें होती । ते रसरूपें जिती । जळोनि इंधनें येती । वन्हीदशे ॥ ३-५ ॥

लोहादि जाळुनी भस्म ते, औषधास ये उपयोगी | जळता काष्ठे बने कोळसा, पेटे तो शेगडीलागी || १२.

लवण अंगें विरे । परी स्वादें जळीं उरे । नीद मरोनि जागरें । जिइजे निदें ॥ ३-६ ॥

लवण विरेचि जळात जरि ते, अंश स्वादिचा तो न विरे | निद्रा विरता जागृतीतही, स्वप्न स्मृतिरुपे परी उरे || १३

तेवीं अविद्येसवें । चौघीं वेंचती जीवें । तत्त्वज्ञानाचेनि नांवे । उठतीचि या ॥ ३-७ ॥

वाणी नुरती तत्वज्ञाने, बंधन ज्ञानाचे उरते | दिशा कळे, परि दूरच आत्मा, शिरी ऋण तेही ना फिटते || || १४

हा तत्त्वज्ञान दिवा । मरोनि इहीं लावावा । तरी हाही शिणलेवा । बोधरूपेंची ॥ ३-८ ॥

आत्मा नित्यचि स्वयंसिद्ध तो, ज्ञानमात्र सर्वत्र असे | ओळख त्याची करुनी देण्या, कवणाचीही गरज नसे || १५.

सत्य हेच की, तत्वज्ञाने, प्रकाश अंतरी विलसतसे | बुद्धिस पटते कोण असे मी, आत्मस्वरूप परि पैल असे || १६.

कोरडेची ते केवळ वदणे, 'मी न देह परि ब्रह्म असे' | अनुभूतीविण ना ये प्रत्यय, शब्द त्यास उपयोगी नसे || १७.

शब्द खर्चुनी फोलची ठरती, ना अनुभूति ब्रहमाची | केवळ तत्वज्ञान ऐकता, प्रतीति ती येईल कैची ?|| १८.

येऊनि स्वप्न मेळवी । गेलिया आपणपां दावी । दोन्ही दिठी नांदवी । नीद जैशी ॥ ३-९ ॥

निद्रा येता स्वप्ने दावी, जागृती येई ती सरता | उभय अनुभवा निद्रा कारण, उभय सृष्टीची ती दाता || १९.

जागृती निद्रा उभयी दिसती, वस्तु व्यक्ति नि ती सृष्टी | व्यवहारी जे दिसे दाखवी, भासरुपे स्वप्नी दृष्टी || २० .

जिती अविद्या ऐसी । अन्यथा बोधातें गिंवसी । तेचि यथा बोधेंसी । निमाली उठी ॥ ३-१० ॥

बोध अविदयेने जो होई, व्यष्टि भाव तो मुळि न विरे | ब्रह्म आणि मी अलगपणा तो, तरीही तेथे फोल उरे || २१.

परि जीती ना मेली । अविद्या हे जाकळी । बन्धमोक्षीं घाली । बांधोनियां ॥ ३-११ ॥

जरि वाटे की, सरली अविद्या, अहंभाव तो राही तसा | मीपण हे तर पुरते बंधन, ब्रहमभाव येईल कसा ?|| २२.

देहबुद्धी जागवी अविद्या, बद्ध करी अभिमानाने | मिटुनि होत ती जेंव्हा विद्या, जीवा बांधिते बोधाने || २३.

मोक्षुचि बंधु होये । तरी मोक्ष शब्द कां साहे ? । अज्ञान घरी त्राये । वाउगीची ॥ ३-१२ ॥

आभासचि तो वृथा मुक्तिचा, मोक्षचि बंधन होई तसे | भ्रामक समजुत ती ब्रहमाची, व्यर्थ बंधनी पाडितसे || २४.

मोक्षचि जरि तो करी बंधना, मोक्ष म्हणावे त्या कैसे | आत्मदेव तर नित्यमुक्तचि, अहंकारचि बांधितसे || २५.

बागुलाचेनि मरणें । तोषावें कीं बाळपणें । येरा तो नाहीं मा कोणें । मृत्यु मानावा ? ॥ ३-१३ ॥

बाळपणी तो भिववी बागुल, मरणे त्याच्या संतोषे | जो नाही त्याचाचि मृत्यू, बद्धपणाचेहि तैसे || २६.

अविद्येस अस्तित्व असेना, फोल कल्पना मुक्तिची | आत्मदेव तो नित्य मुक्तचि, फोल पेरणी शब्दांची || २७.

घटाचें नाहींपण । फुटलियाची नागवण । मानीत असे ते जाण । म्हणो ये की ॥ ३-१४ ॥

ना घडविता घट मातीचा, रडे की नसता घट फुटला | जे नाहीच ते कैसे नाशे, म्हणू काय अज्ञानाला ?|| २८.

नसे ज्यास अस्तित्व तयाचा, होईल नाशहि तो कैसा } नित्य मुक्त त्या आत्म्यालागी, बद्ध शब्दही फोल तसा || २९.

म्हणोनि बंधुचि तंव वावो । मा मोक्षा कें प्रसवो ? । मरोनि केला ठावो । अविद्या तया ॥ ३-१५ ॥

नित्य मुक्त तो आत्मदेवची, बंधन त्याला कदा नसे | वृथा यत्न ते मुक्तीचे, नच बंधन सोडणे कसे || ३०

जी नाही तिज म्हणती अविद्या, बंधन तिजने ते केले | स्वये कल्पिले बंधनात मी, अज्ञाने कांही बोले || ३१.

मरे अविद्या, उपजे विद्या, मोक्ष कल्पना भरविते | असे बोलणे निखळ कल्पना, यत्न त्यास्तवे फोलचि ते || ३२.

आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसें । म्हणितलें असे । सदाशिवें ॥ ३-१६ ॥

शिव सुत्रातील एक सूत्र ते, 'ज्ञान बंध' ते शिव म्हणती | सदाशिवांचे वचन असे ते, सत्यचि शंका नसेच ती || ३३

आणि वैकुंठींचेहि सुजाणें । ज्ञानपाशीं सत्त्वगुणें । बांधिजे हें बोलणें । बहू केलें ॥ ३-१७ ॥

गीतेमाजी हरी सांगती, सत्वचि बंधन सुख संगे | ज्ञान करी ते बद्ध साधका, अहं मूळचा ना भंगे || ३४.

परि शिवें कां श्रीवल्लभें । बोलिलें येणेंचि लोभें । मानु तेहि लाभे । न बोलतांही ॥ ३-१८ ॥

शिव विष्णुचे तसे सांगणे, मान्यचि आम्हा पूर्णपणे | ज्ञान करितसे बंधन ऐसे, ज्ञानवंत पुरते जाणे || ३५.

'मीच ब्रह्म' जे वदती साधक, असे ज्ञान ते बद्ध करी | कारण त्यांतील अहं भावना, अलगचि राखे सदा हरी || ३६.

जें आत्मज्ञान निखळ । तेंहि घे ज्ञानाचें बळ । तैं सूर्य चिंती सबळ । तैसे नोव्हे ? ॥ ३-१९ ॥

निखळ आत्मज्ञान सदा ते, स्वयं ज्ञानघन नित्य असे | प्रपंच वृत्तीज्ञान सहाय्या, घेणे त्यासि गरज नसे || ३७

सूर्यदेव तो नित्य प्रकाशी, त्याने कां उदयासाठी | अन्य कुणाचे सहाय्य घेणे, गरजच ना ती त्यासाठी || ३८.

ज्ञानें श्लाघ्यतु आले । तैं ज्ञानपण धाडिलें वांये । दीपवांचून दिवा न लाहे । तैं आंग भुललाचि कीं ॥ ३-२० ॥

पूर्ण ज्ञानमय स्वरूप असता, सहाय्य कवणाचे न लगे | दीप लाविता, जये लाविला, तोहि प्रकाशित हो अंगे ||३९.

‘मी जाणियले स्व रूपालागी,’ प्रौढी मिरवियली ज्याने | ज्ञानपणाला व्यर्थ दवडिले, जाणले न स्वरूपा त्याने || ४०.

स्व-स्वरूप ते नित्य ज्ञातचि, त्यासि न लागे शोधावे | माझे मी-पण वृथा शोधणे, कुणी न लागे सांगावे || ४१.

आपणचि आपणापाशीं । नेणतां देशोदेशीं । आपणपें गिंवशी । हें कीरु होय ? ॥ ३-२१ ॥

आपण नेणुनि आपणासची, शोधी यत्ने आपणाशी | गवसण्यास ते आपुले निजरुप, हिंडे कां देशोदेशी || ४२.

जरि कार्यास्तव चैतन्याने, उपाधीस ते बळ दिधले | मी न उपाधी परि चैतन्यचि, स्वरूपा विस्मृत परि झाले || ४३.

परि बहुतां कां दिया । आपणपें आठवलिया । म्हणे मी यया । कैसा रिझों ? ॥ ३-२२ ॥

बहुत दिसांनी आठव आला, निजरुप माझे सांपडले | नाचे आनंदे भ्रम सारा, नव्हते कांहीची घडले || ४४.

पूर्ण ज्ञानघन मीच श्रीहरी, स्वरुपज्ञान ते नित्य असे | विस्मृती मजला निजरूपाची, वृथा प्रयासी घालतसे || ४५.

तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपली प्रमा । करितसे सोहं मा । ऐसा बंधु ॥ ३-२३ ॥

मी परमात्मा, मीच श्रीहरी, ‘सोहं’ वदणे बंध असे | जो आहे मी सदाची आहे, त्यासि घोकणे कां तैसे ?|| ४६.

स्व-स्वरूपाशी मीच जाणतो, वृथा प्रौढी हे बंधनचि | जो आहे मी, तोचि असे मी, वृथा वाच्यता कां त्याची ?|| ४७.

तैसे ज्ञानरूप आत्म्याने, ज्ञाने निजरुप आठवणे | उसन्या ज्ञानाच्या प्रौढीने, नसत्या बंधनी जणु पडणे || ४८

निर्विकार नि निर्गुण आत्मा, विसर नि आठव त्या कैसे | स्व-संवेद्य निजस्वरूपी असता, मिथ्या बंधन हे तैसे || ४९.

ओवी क्रमांक २३ वर श्री राजाराम बुवा ब्रह्मचारी [अनुभव अमृत रहस्य] यांचे भाष्य[५०-६६]

आत्मा नित्यचि सदैव जागृत, जीवा विस्मृती ती होई | सोहं म्हणता, हेचि जाणवे, देह प्राण मन मी नाही || ५०

या सकलाहुनि असे वेगळा, मीचि जाणतो या सकला | हा मी, 'मीपणा' हून वेगळा, साक्षी यांचे कृत्याला || ५१

मी आहे 'मीपणा' पूर्वीचा, जाणुनि या सकला पाही | प्राणवायू आकर्षुनि त्यासी, ठेविताही ते निज हृदयी || ५२

पूर्ण श्वास अंतरी घेउनी, उदर जरा ना हालविता | हळू सोडणे त्या बाहेरी, बाहयचि कुंभक तो करिता || ५३

दीर्घ कुंभकी निश्चल उदरी, विना श्वास तद्रूप व्हावे | देहबुद्धी ती सहजी जाई, सकल पाही साक्षीभावे || ५४

दृष्टी तेंव्हा आंतचि वळवी, चित्ती चंचलता ती नसे | पूर्ण भान ते आत्मरूपाशी, अन्य भाव कांही न असे || ५५ .

हीची हरीशी समरसता नि, द्वैत पुरे विरूनी जाणे | 'सोहं' चे ना ज्ञान न केवळ, सोहं हेचि अनुभवणे || **५६.**

उमजे तेंव्हा तरंग उठण्या, आधी शांत जल तो मी असे | 'मीपण' येण्याआधी शांत नि, निश्चल माझे स्वरूप तसे || ५७

जेंव्हाही ती ये चंचलता, 'मीपण' शब्दरुपा धारी | होई प्रसरण नि आकर्षण, प्राणापाना सृजन करी || ५८

गुण परिणामची ये आकारा, इंद्रियादि सारे होती | कूर्मासम मी आवरू शके, जैसी माझी मनोगती || ५९

अंतर्दृष्टीस येई दिव्यता, तेज शलाका त्या दिसती | चंद्र सूर्य नि ग्रह तारेही, तेज सकल मी पाहू किती ?|| ६०

हे ध्वनीहि माझेच रूप ते, दूर श्रवण ऐकू येई | ॐ कारही तो येई श्रवणी, प्राण हकारे वरी जाई || ६१

अधोगतीला सकार श्रवणी, अपान तोही घेई गती | हंस: सोहं, सोहं हंस:, स्पष्ट असे ते ध्वनी येती || ६२

मला सांगती परब्रह्म मी, तेचि ईश्वरी तत्वचि मी | देह कदा ना परि मीचि तो, सकलही विश्वाचा स्वामी || ६३

म्हणुनि माऊली स्पष्टचि सांगे, 'सोहं' भावहि सोडावा | त्याद्वारे जे ज्ञान होतसे, भासचि तोहि मानावा || ६४

जें ज्ञान स्वयें बुडे । म्हणोनि भारी नावडे । ज्ञानें मोक्षु घडे । तें निमालेनि ॥ ३-२४ ॥

निजबोधाचि येता प्रतीति, ज्ञान सहजी ते त्यांत बुडे | कार्य अविद्येचेचि ज्ञान ते, मोक्षा उपयोगी न पडे || ६५

एक फायदा परि ज्ञानाचा, आत्मबोध हो, ते विरता | विरे 'अहं ब्रह्मास्मि' 'सोहं', सहजी मोक्षचि ये हाता || ६६ .

म्हणोनि परादिका वाचा । तो शृंगारु चौ अंगांचा । एवं अविद्या जीवाचा । जीवत्व त्यागी ॥ ३-२५ ॥

परादिका या चारही वाचा, चार देहीचीचि शोभा | जरि बोध तो जिवास होई, दिसे परि ना आत्मप्रभा || ६७ .

चारी देहांच्या त्या शोभा, चारहि वाणी विलसतसे | अहंभाव नासता अविद्या, चारी वाणीसह नाशे || ६८ .

चार वाणी नि देह चारही, अभिन्न त्यांचे कार्य भले | अविद्याची सृजितसे तयांना, वाणीचि ज्ञाना उजळे || ६९.

आंगाचेनि इंधनें उदासु । उठोनि ज्ञानाग्नि प्रवेशु । करी तेथें भस्मलेशु । बोधाचा उरे ॥ ३-२६ ॥

काष्ठ प्रवेशे अग्निमाजी, जळे परि ती राख उरे | तैसी ज्ञानाग्नीत अविद्या, जळताहि ना बोध सरे || ७०

चारी देही विद्यमानचि, ज्ञानाग्नि तो नित्य वसे | उपासनादी द्वारा संज्ञित, ज्ञानहि ते तेथेचि असे || ७१.

प्रवेश करी ते देह इंधनी, कार्य कारणादि संगे | जाळूनि त्यासी पुरते टाकी, बोध तरी उरतो अंगे ||. ७२.

सोहं जैसा बोध उरे तो, आत्मतत्व परि पैल असे | आत्मज्ञाना बोध फोलचि, अनुभूतिविण अर्थ नसे || ७३

अनुभूतिविण उरे बोध तो, आत्मप्रभा परि ना प्रगटे | जाणीव नेणीव शून्य होऊनी, न लगे स्वरूपाशी कोठे || ७४.

अंगीं लाविलिया विभूती । तैं परमाणुही झडती । परि पांडुरत्वें कांती । राहे जैसी ॥ ३-२७ ॥

भस्म लाविता निज अंगाला, भस्म कणहि सारे झडती | परि पांडुरपण देही राही, तेणे स्मृति दावी कांती || ७५ .

जळी जळा वेगळु | कापूर न दिसे अवडळू || परी होऊनि परिमळु | उरे जेवी || २८.

जैसा कापुर जळि विरघळता, अवघे सारे जलचि दिसे | कापुर ना तो नष्टचि झाला, परिचय जळात तो वासे || ७६.

ना वोहळला आंगीं जैसे । पाणीपणें नसे । तहीं वोल्हासाचेनि मिसें । आथीच तें ॥ ३-२९ ॥

पर्जन्ये वाहताती ओहळ, नदी-नाल्यांना जळ मिळते | ओहळ वाहुनी जळ सरते परि, ओलावा ठेऊनि जाते || ७७.

पाणी मातीवरुनी वाहता, ना पाणी परि ओल उरे | ओल दर्शवी वाहियले जळ, जरि थोडेही तेथ नुरे || ७८.

ना तरी माध्यान्हकाळीं । छाया न दिसे वेगळी । असे पायातळीं । रिगोनियां ॥ ३-३० ॥

माध्यान्ही माथ्यावर भास्कर, वेगळी न छाया दिसते | परी असे ती पायाखाली, निजरूपे तेथेचि दडते || ७९

तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें । आपुलेपणें उरे । बोधु जो कां ॥ ३-३१ ॥

मावळता तो द्वैतभाव नि, देहबुद्धि ती जरी नुरली | 'ब्रह्म असे मी' या बोधाची, स्मृति अहं भावे उरली || ८० .

बोध जाहला आत्मरुपाचा, ज्ञानघना त्या ओळखिले | अनुभूतीस ना समरसता परि, बोधे दूरचि राखियले || ८१ .

आत्मज्ञान न फळ क्रियेचे, कवण कारणे कार्य नसे | म्हणुनि जीवाचे माथी उरले, वाच्यांचे ते ऋण असे || ८२

तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां । तें पायां पडोनि मियां । सोडविलें ॥ ३-३२ ॥

ऐसे जे ऋण शेष राहिले, फिटण्या मार्गचि ना उरले | गुरुचरणाशी आश्रय घेऊनि, वंदन करुनी फेडियले || ८३ .

ऐहिक विषयी भोग वासना, वैखरीचे ते ऋण असे | विवेक वैराग्ये नि संयमे, शुद्ध मने ते फेडितसे || ८४

विषयांचे जे दुःख नि सुखहि, मध्यमा हिचे ऋण तसे | अंतरी शुचिता करुनि 'शिवोहं', प्रत्यय याचा फेडितसे || ८५

परी 'शिवोहं' ज्ञानप्रत्यये, ऋण शिरि देई पश्यंती | 'सोहं' प्रतीति त्यास फिटविते, लाभे ऐसी फलप्राप्ती || ८६ .

चार महावाक्ये नि सोहं, उन्नत करि परि ऋण ठेवी | तेच परेचे फेडायासि, हरिचरणे ना सोडावी || ८७ .

म्हणोनि परा पश्यंती । मध्यमा हन भारती । या निस्तरलिया लागती । ज्ञानीं अज्ञानींचि ॥ ३-३३ ॥

चारही वाणी मार्ग दाविती, ज्ञान होतसे मुक्तिचे | परि त्या बोधे अहं मिटेना, ऋण ही फिटेना बोधाचे || ८८.

आत्मबोध ना ठेवी अहंता, 'मी आहे' हा भाव नसे | परी अनुभूति सर्वव्यापी ती, अभेदरूपचि नित्य असे || ८९.

शब्द विरुनिया भावचि उरतो, वाचाऋण मग ते जाई | देहभाव विरुनियाचि पुरता, समरस आत्म्याशी होई || ९०.

तेणे जळती पूर्व पातके, प्रपंच वाटे निजस्वरूपी | वासनाहि नि:शेष जाऊनी, आनंदचि ये आत्मरूपी || ९१.

देहाचे ते भान न राही, व्यापारही सहजी घडती | बालकापरी अलिप्तता ये, नित्यची लाभे आत्मस्थिती || ९२.

ध्यानी नुरतो ध्यानपणा नि, ज्ञानीहि तो ज्ञानपणा | ऐसी राहे नित्यसमाधी हाची जीवन मुक्तपणा || ९३.

म्हणुनि शरण ते सद्गुरुचरणी, ऋण वाचांचे फेडुनि ते | निरसावे मग ज्ञानासंगे, अज्ञानाही ते पुरते || ९४.

श्री. अमृतानुभव अमृत गंगा - तृतीय कुंड समाप्ती

(४) श्री. अमृतानुभव अमृत गंगा –

कुंड चवथे-

[ज्ञानाज्ञानभेदकथन]

आतां अज्ञानाचेनि मारें । ज्ञान अभेदें वावरें । नीद साधोनि जागरें । नांदिजे जेवीं ॥ ४-१ ॥

अज्ञानाचा विनाश होता, ज्ञान स्वरूपी समरसते | जैशी निद्रा पूर्ण संपता, जागृतीच अनुभूत होते ||१.

निद्रेमाजी स्वप्नसृष्टीला. सत्य मानुनी मन रमते | जाता निद्रा स्वयेचि उमगे, ते सारे भासचि होते || २.

'इंद्रियांत मी मनचि अर्जुना', सांगती गीतेमाजी हरी | जागृती येता अंतर्दृष्टी, त्याच मनाते हरी करी || ३.

हीच असे ती खरी जागृती, अन्य जागणे झोप असे | ज्ञान नि अज्ञानही अभेदे स्व-स्वरूपी ते नांदतसे || ४.

कां दर्पणाचा निघाला । ऐक्यबोधु पहिला । मुख भोगी आपुला । आपणचि ॥ ४-२ ॥

दर्पणात प्रतिबिंब पाहता, बोध मुखाचा तंव उमजे | दर्पण 'तत्वमसि' शिकविते, मी ऐसा हेहि समजे || ५.

दर्पण दाखवी ज्याही मुखाला, बिंबाचे प्रतिबिंब असे | हे माझे मुख असे ज्ञान ज्या, ते अज्ञानचि, ज्ञान नसे || ६

झाले मजला स्वमुख दर्शन, ऐसे ज्यालाहि उमजे | प्रतिबिंबी तो असा गुंतला, अज्ञाना ज्ञानचि समजे || ७.

गुरु समजावी भास दर्पणी, स्व-मुख असे ते निज स्थानी | तंव ज्ञान-अज्ञान अभेदे, नांदे होता निज-ज्ञानी || ८.

दर्पणे न मुखलाभ जाहला, निजमुख ते त्याचे ठायी | दर्पणी बघता वा ना बघता, एकत्वा बाधा नाही || ९.

ज्ञान जिया तिया परी । जगीं आत्मैक्य करी । तैं सुरिया खोचे सुरी । तैसें जालें ॥ ४-३ ॥

जगत पाहता द्रष्टा म्हणुनि, आत्मरूप सर्वत्र दिसे | आत्मैक्याचे ज्ञानहि समजे, द्वैत ठेऊनी होत असे || १०

आत्मा आणि जगत वेगळे, कारण ज्ञाने ते समजे | वृथा ज्ञान केवळ वरवरले, अनुभूतीविण ना उमजे || ११.

दुजिया ज्ञाने ज्ञान जाणणे, जैसे दर्पणी मुख बघणे | द्वैतभाव दूरचि ठेवितो, आत्मा गोचर न द्वैतपणे || १२.

अज्ञानाची दशा पूर्विची, बदलुनि मिरवे ज्ञानपणे | अभिन्न आत्म्याशी तरि तेथे, कैसे बदलावे त्याने ? || १३.

एवं म्हणणे ज्ञान घडविते, ऐक्यचि व्यापक ज्ञानाशी | सुरी खुपसते टोंक आपुले, जणु आपुल्याचि उदराशी ||१४

लावी आंत ठावूनि कोपट । तो साधी आपणया सकट । का बांधलया चोरट । मोटेमाजी ॥ ४-४ ॥

कोशकिटक बनवुनिया घर, आतच द्वारा बंद करी | लिंपि मृत्तिका स्वये त्यावरी, निजनाशाला जणु वरी || १५.

चोरी करण्या चोर जाऊनि, पोत्यामाजी लपुनि बसे | बंद आतुनी पोते करिता, करी आपणा बद्ध तसे || १६.

आगी पोतासाचेनि मिसें । आपणपें जाळिलें जैसें । ज्ञाना अज्ञाननाशें । तैसें जालें ॥ ४-५ ॥

कापुरास जाळिताचि अग्नि, उभय जाळिती आपणासी | नाशिताची तैसे अज्ञाना, ज्ञानहि आपणास नाशी || १७.

अज्ञानाचा टेंका । नसतांही ज्ञानाधिका । फांके तंव उफखा । आपुला पडे ॥ ४-६ ॥

वन्ही सारखे ज्ञान गुप्तचि, प्रगटुनि विरवी अज्ञाना | बोध करुनि अज्ञाना संगे, नाशी ज्ञानहि ते आपणा || १८.

नाश परि ऐसा ज्ञानाचा, होण्याआधी ते विकसे | बहु प्रकाशमय होऊनि ते मग, पुरतेचि अंती नाशे ||१९.

दशाही ते निमालिया । येणें जें उवाया । तें केवळ नाशावया । दीपाचे परी ॥ ४-७ ॥

तेल संपता, ज्योति विझते, जाण्याआधी एक क्षणी | मोठी होऊनि अधिक प्रकाशे, दीप जात ऐसा विझुनी || २०.

अज्ञानाचा विनाश होता, ज्ञान विशेषे झळकतसे | तेचि निराश्रित ज्ञान ज्योतिसम, मोठे होऊनिया नाशे || २१

उठणें कीं पडणें । कुचभाराचे कोण जाणे । फांकणें कीं सुकणें । जाउळाचें ॥ ४-८ ॥

स्तन नारीचे उन्नत होता, झुकती खाली, सहजपणे | की जाईची कळी उमलता, सुकेचि ती नाजूकपणे || २२

गहन होत कुचभार जेधवा, जेहि होतसे व्युत्थान | तंव झुकणे सहजीचि घडते, व्युत्थानची होते पतन || २३

तरंगाचें रूपा येणें । तयाचि नांव निमणें । कां विजूचें उदैजणें । तोचि अस्तु ॥ ४-९ ॥

तरंग रूपा येता जळचि, हळूच पृष्ठावरती चढे | जल पृष्ठाहुनी वरती चढणे, तेची तयाचे पतन घडे || २४.

गगनी चमके तडिता क्षणभर, आसमंत उजळुनि जाई | क्षणिक परी ती तेज शलाका, पुन्हा तिचे दिसणे नाही || २५.

ऐसे व्युत्थानचि ते क्षणिचे, पुढिल क्षणी ते पतन तसे | उदय नि मध्यान्हहि ते क्षणीचे, पुढले क्षणीचि अस्त असे || २६.

तैसें पिऊनि अज्ञान । तंववरी वाढे ज्ञान । जंव आपुलें निधन । नि:शेष साधे ॥ ४-१० ॥

ज्ञान वाढते निवृत्तीने, निरसित प्रपंच अज्ञाना | पूर्ण निरसने, ज्ञानहि विरते, अज्ञानासह त्याच क्षणा || || २७.

पूर्ण ज्ञानघन आत्म्या नलगे, जाण ती दुजिया ज्ञानाची | स्वयंसिद्ध अस्तित्वा जाणे, गरज त्यांस ना बोधाची || २८

जैसें कल्पांतीचें भरितें । स्थळाजळा दोहींतें । बुडविलिया आरौतें । राहोंचि नेणें ॥ ४-११ ॥

कल्पांती होता ते जलमय, जळी स्थळी पाणीच पाणी | सर्वव्यापी ते जलची असता, भेद पूर्ण गेले मिटुनी || २९

तैसे प्रतीतिसागरात विरता, अलगपणाचा लय होई | ज्ञानाज्ञानहि भेदचि नुरले, सारे ज्ञानमयचि होई || ३०

कीं विश्वाहि वेगळ । वाढे जैं सूर्यमंडळ । तैं तेज तम निखळ । तेंचि होय ॥ ४-१२ ॥

जरी सूर्यमंडळचि वाढुनि, पुरत्या विश्वा व्यापियले | उजेड नि अंधार भेद ना, सारे प्रकाशमय झाले || ३१.

भास्कर किरणे नसती तेथे, अंधाराची ये प्रतीति | भास्कर पूर्ण ब्रह्मांड व्यापिता, सारिच तेजाची व्याप्ती || ३२.

उजेड आणि अंधारही तो, भेद वेगळा कांही नुरे | सारे ब्रह्मांडचि तेजोमय, तेज नि तम हा भेद सरे || ३३.

नाना नीद मारोनि । आपणपें हिरौनि । जागणें ठाके होवोनि । जागणेंचि ॥ ४-१३ ॥

किंवा निद्रा पूर्ण जाऊनि, जागृतीच ये पूर्णपणे | निद्रा जागृती नुरे वेगळी, ठाके जागृती एकपणे || ३४

तैसे अज्ञान आटोनियां । ज्ञान येतें उवाया । ज्ञानाज्ञान गिळूनियां । ज्ञानचि होय ॥ ४-१४ ॥

आटवुनि अज्ञाना तैसे, विकास ज्ञानाचा होई | नुरे ज्ञान वा अज्ञानही ते, शुद्ध ज्ञान एकचि राही || ३५.

विनाश अज्ञानाचा आणि, विकास व्हावा ज्ञानाचा | ऐसे कांही नच उरलेले, अनुभव एकची स्वरूपाचा || ३६.

सारे अज्ञानहि ते विरले, जाणुनि घेणे कांही नसे | पूर्ण ज्ञानमय ज्ञप्तिमात्रता, स्व-स्वरूपी ती एक असे || ३७.

ते वेळीं पुनिवां भरे । ना अवसां सरे । ते चंद्रींचि उरे । सतरावी जैशी ॥ ४-१५ ॥

कलेकलेने चंद्र वाढुनी, पौर्णिमेस तो पूर्ण दिसे | सर्व कला अवसेला विरुनि, दृष्टी आड तो होत असे || ३८

मूळ चंद्रमा नित्य पूर्णची, हीच कला ती सतरावी | तो न विकासे वा संकोचे, तेज रवीचे भ्रम दावी || ३९

कां तेजांतरें नाटोपे । कोण्हे तमें न सिंपे । तें उपमेचें जाउपें । सूर्यचि होय ॥ ४-१६ ॥

ना निस्तेजे कवणा तेजे, ना लोपे वा अंधारी | ऐसा जगती एकचि विलसे, सूर्य कुणी ना अन्य परी || ४०

स्वयंप्रकाशी स्वतेजधारी, तेजोमयचि सूर्य असे | ना निस्तेजे, उजळे अंधारी, विना सहाय्यचि आपैसे || ४१

मार्तंडा सम नसे कुणीही, उपमा त्या नच कोणाची | त्याचे सम तो एकलाची की, पूर्ण मूर्ति तो तेजाची || ४२.

म्हणोनि ज्ञानें उजळे । कां अज्ञानें रुळे । तैसें नव्हे निर्वाळें । ज्ञानमात्र जें ॥ ४-१७ ॥

झांके ना उजळे कवणेही, शुद्ध ज्ञान आत्माची असे | दुज्या न ज्ञाने, जाणीव त्याची, स्वये ज्ञानमय पूर्ण वसे || ४३

सदाचि उज्वल आत्मदेव तो, ज्ञाने अन्य न तो उजळे | स्वयंभूच तो नित्य ज्ञानघन, अज्ञाने झांके न मळे ||४४.

परी ज्ञानमात्रें निखळें । तेंचि कीं तया कळें । काई देखिजे बुबुळें । बुबुळा जेवीं ? ॥ ४-१८ ॥

जरी ज्ञानमय पूर्णचि आत्मा, आपुल्या ज्ञाना ना जाणे | बुबुळे जैशी सारे पाही, शक्य न स्वता:स बघणे ||४५.

पूर्ण ज्ञानमय असोनि तरिही, ते न कळे ब्रहमालागी | बघे सकल परि शक्य न बघणे, निजरूप ते नयनालागी || ४६.

क्रिया जाणण्याची ती घडण्या, ज्ञाता नि ज्ञेयहि लागे | परि ज्ञानमय हरि अद्वैती, कवण विषय त्यासि नलगे || ४७.

त्याच्या अस्तित्वाची जाणीव, स्वसंवेद्य ऐसी म्हणुनि असे | त्यासी केवळ ते अनुभवणे, जाणणे नि पाहणे नसे || ४८.

आकाश आपणया रिगे ? । कायी आगि आपणया लागे ? । आपला माथा वोळघें । आपण कोण्ही ?॥४-१९॥

गगन शिरेना गगनामाजी, सर्वत्रचि ते स्वये असे | जरि सक्षम तो धर्माचरणा, आपणा अग्नि न जाळितसे || ४९

चढुनि जाती डोंगर माथा, तेचि पाय परि ना चढती | आपुल्याची निज मस्तकावरी, जरि पूर्ण ती असे गती ||५०.

दिठि आपणया देखे ? । स्वादु आपणया चाखे ? । नादु आपलें आइकें ? । नादपण ॥ ४-२० ॥

आपणाशी ना दृष्टी पाही, रुचि न चाखते निज रूची | नाद आपुल्या नादपणाला, ऐकू न शकतो, ते कधीचि || ५१.

सूर्य सूर्यासि विवळे ? । कां फळ आपणया फळे ? । परिमळु परिमळें । घेपतु असे ? ॥ ४-२१ ॥

उदय अस्त पाहिले न रविने, नित्य उदितची स्वये असे | फळात बीज ते सृजनाचे तरी, स्वयेचि फळणे शक्य नसे || ५२.

जसे कर्म ते तसेचि फळही, सुख दुःखाचे लाभतसे | परी फळाला कर्मचि नसता, त्याने फळावेच कैसे ?|| ५३.

नित्य प्रकाशित सूर्याचा ना, उदय अस्त कदा होई | माझा होई उदय अस्तही, हे सूर्या ठावे नाही || ५४.

दरवळता परिमळ सुख देई, घ्राणी स्पर्शिता निज गंधे | परि परिमळ ना स्वये सुखावे, घेऊनि गंधा आनंदे || ५५.

तैसें आपणयां आपण । जाणतें नव्हे जाण । म्हणौनि ज्ञानपणेंवीण । ज्ञानमात्र जें ॥ ४-२२ ॥

तैसे आत्मा स्वरुपाचा ना, बोध कदापि घेत असे | ज्ञानपणाविण ज्ञानमात्र तो, जाणीव नेणीव त्यास नसे || ५६

पूर्ण ज्ञानमय आत्मारामचि, दुजे सर्वही तो जाणे | बोध आपुला त्या नच होई, जाणीव स्वरूपाची नेणे || ५७.

जाणुनि घेण्यासाठी कांही, ज्ञेय नि ज्ञाता द्वैत हवे | सारे कांही तोचि असता, काय तये जाणुनि घ्यावे ?|| ५८.

आणि ज्ञान ऐसी सोये । ज्ञानपणेंचि जरी साहे । तरी अज्ञान हें नोहे ? । ज्ञानपणेंचि ॥ ४-२३ ||

आत्म्याला कुणी अस्तित्वाचे, ज्ञान व्हावया साह्य करी? | आत्मा अज्ञानीच म्हणावा, ज्ञानही अज्ञानचि तरी || ५९.

आत्म्यालागी ज्ञान जाहले, कुणी ज्ञाता सांगता असे | जणु तयाला पूर्वी ऐसे, ज्ञानची मुळी कांहीच नसे || ६०.

आत्मा निश्चल निर्विकारची, स्व-बोध आवश्यकचि नसे | सदा ज्ञानघन आत्म्यालागी, 'कोऽहं' जाणीव व्यर्थ असे || ६१.

स्वये जाणतो सकल चराचर, त्यासि स्व-बोध सहज असे | जाणीव आणि नेणीव नसता, गरज तयाची कां भासे ?|| ६२.

'अमूक मी' हे असे जाणणे, ज्ञान नसे अज्ञान असे | ज्ञान जयाचा सहज भावची, त्यासि वेगळी गरज नसे || ६३.

जैसें तेज जें आहे । तें अंधारें कीर नोहे । मा तेज जऱ्ही होये । तेजासी काईं ? ॥ ४-२४ ॥

काळोखाला स्पर्श न रवीने, प्रकाशिले त्याने कवणा?| त्यासि उजेड ऐसे म्हणणे, आवश्यक ते मुळीच ना || ६४.

सूर्यस्वरुपी नित्य प्रकाशचि, अंधारा कुणी ना जाणे | जे कांही ते आहे तेथे, 'प्रकाश' त्यासी कां म्हणणे || ६५.

तैसें असणें आणि नसणें । हें नाहीं जया होणें । आतां मिथ्या ऐसें येणें । बोलें गमे ॥ ४-२५ ॥

आपुल्या स्वरूपभुत ज्ञानी ते, नसणेपण ना शिरू शके | तैसे असणेपण हि कल्पना, आत्म्या तीहि ना ठाके || ६६.

ऐसे ज्ञानाज्ञान नसेचि, असणे नसणेही नाही | अनंत व्यापक अस्तित्वचि ते, शून्य भाव निश्चल राही || ६७

ब्रह्मावर आभास जगत हे, आभासे अस्तित्व जया | लौकिक असणे, वास्तव नसणे, कारण ती केवळ माया || ६८

ब्रह्म कदापि स्वरुप न बदले, परि अश्वत्थ सदा बदले | लटके हे तर ब्रह्मावरती, आभासाला रूप दिले || ६९.

परब्रह्म ते सदैव जागृत, असणे नसणे नाही तया | खेळासाठी विश्व निर्मिले, पांघरुनी मिथ्या माया || ७०

परि होई हे सारे कांही, चैतन्याच्या शक्तीने | ब्रह्म नसे हे फोल बोलणे, खेळ कुणाच्या मर्जीने ?|| ७१.

नित्य ब्रह्म ते सदैव असता, असणे नसणे नाही तया | कुणा वाटते, ब्रह्म म्हणोनी, कांही नसे ब्रह्मांडी या || ७२.

फोल विचारीत मग त्यावरती, काय ब्रह्म ते मुळी नसे ? | त्याचे खंडन आणि उत्तर, ओवी पुढची करीत असे || ७३. .

तरी कांहीं नाहीं सर्वथा । ऐसी जरी व्यवस्था । तरी नाहीं हे प्रथा । कवणासि पां ? ॥ ४-२६ ॥

जरि सर्वथा नसेच कांही, ज्ञानही ते शून्यचि असे | झाले शून्य-ज्ञान कुणाला?, जरि येथ कांहीच नसे || ७४

नसेल जगती परब्रह्म ते, प्रकृती वर्ते कुणामुळे ? शुन्यचि होता आणि प्रकृती, क्षणात सारेची दुबळे || ७५.

ब्रह्म नसे हे, कुणाच्या बळे, ज्ञान जाहले कवणाला ?| प्रपंचपण ते कुणी प्रपंचा, त्याविण दिधले? हे बोला || ७६.

शून्यसिद्धांतबोधु । कोणे सत्ता होये सिद्धु ? । नसता हा अपवादु । वस्तुसि जो ॥ ४-२७ ॥

जरि सत्ता ती चराचराचि, शून्य सिद्ध जाहली असे | त्या शून्याला कोण प्रकाशे? फोल बोलणे मग कैसे ?|| ७७.

जे नाही ते नसणेपण कोणी, कसे कशाने जाणियले ?| शून्यत्वाचा बोध जयाला, त्या शून्यत्व कसे स्फुरले ?|| ७८.

या ब्रहमांडी एकच सत्ता, परब्रह्म चैतन्य असे | जेही जाणणे त्या सत्तेने, अन्य दुजे अस्तित्व नसे || ७९.

माल्हवितां दिवे । माल्हवितें जरी माल्हवे । तरी दीपु नाहीं हें फावे । कोणासि पां ॥ ४-२८ ॥

आपुल्या घरचा दिप मालवता, दिसणेही ते मालवते | देह दिसेना, बोध जरि नसे, कांही न झाले देहाते || ८०.

देह दिसेना जरि अंधारी, म्हणुनि काय देहची नसे ?| बोध मिटे तो प्रकाश नसता, परि अस्तित्व जसेचि तसे || ८१.

कीं निदेचेनि आलेंपणें । निदेलें तें जाय प्राणें । तरी नीद भली हें कोणें । जाणिजेल पां ?॥४-२९॥

झोपल्यावरी गाढ सुषुप्तित, देहभावचि तो गेला | शांत लागली निद्रा मजला, बोध होतसे कवणाला ?|| ८२.

निद्रा येता स्वबोध हरपे, म्हणुनि काय अस्तित्व विरे ? | निद्रा सरता, आनंदी स्थिति, ऐसा बोध कुणास स्फुरे? || ८३.

घटु घटपणें भासे । तद्भंगें भंगू आभासे । सर्वथा नाहीं तैं नसे । कोणें म्हणावें ? ॥ ४-३० ॥

घट असता असणेपण भासे, फुटता दिसतो भग्नपणा | असणे नसणे असे जाणणे, होत नसे लोचनाविना || ८४.

घटा पाहणे नयने घडते, घटाहुनी वेगळेपणे | भंगणेहि ते कळत असेचि, केवळ तेही दुजेपणे || ८५ .

घट असता वा तोचि भंगता, जेंव्हा कोणी न पाहियले | दुजेपणाविण नसे जाणणे, घडले ते न कुणा कळले || ८६ .

परब्रह्म श्री आत्मतत्व ते, शून्यावस्थेत असे | सर्वव्यापि ते असे निरंतर, त्याविण अन्य कांहीच नसे || ८७

नसणे असणे घडत असेचि, केवळ चैतन्याचि मुळे | अलिप्त राहुनि सारे घडवी, पद्मपत्र लिंपे न जळे || ८८.

निद्राधिना नसे स्वबोधचि, परि अस्तित्वा बाध नसे | विझता दीपक, देह दिसेना, परि अस्तित्व न नासतसे || ८९.

पूर्ण वृक्ष जरि बिजात असता, व्यापकपण ते गुप्त असे | तैशी क्षमता परब्रहमाची, जरि दाविणे शक्य नसे || ९०.

म्हणोनि कांहीं नाहींपण । देखता नाहीं आपण । नोहूनि असणेनवीण । असणें जें ॥ ४-३१ ॥

त्यास न कांही होणे लागे, असणे अथवा ना असणे | त्याच्या अस्तित्वाची न शंका, विश्व शून्यची तयाविणे || **९१**

असणेपण हा भाव नसे जरि, तरि असणे जेंव्हा नसणे | अभाव ऐसा तोही जाणे, जे नसणेपण दावी असणे || ९२.

सुषुप्ति मधला अभाव त्याचा, तेही तयाला कळत असे | ज्ञानाविण ना येई प्रत्यय, ते तर सत्तामात्र वसे || ९३.

परी आणिका कां आपणया । न पुरे विषो होआवया । म्हणोनि न असावया । कारण कीं ॥ ४-३२ ॥

स्वरूप न होई विषय आपुला, दूज्याचाही ना होत असे | निज अस्तित्वाची जाणीव, कदा तयाला होत नसे || ९४.

प्रत्यय त्याच्या अस्तित्वाचा, दुज्या कुणाला ना येई | ना निजस्वरूपाची आपुली जाणीव, कदापि ते करुनी देई || ९५. .

परि होई तो सकला आश्रय, निर्विकार नि निश्चल तो | ज्ञान नि अज्ञाना पलिकडला, पूर्ण ज्ञानमय तो असतो || ९६.

स्व-संवेद्यता ही खूण तयाच्या, अस्तित्वाची नित्य असे | अनुभूतिविण स्वरूप कळेना, नाही म्हणावे त्या कैसे ?|| ९७.

जो निरंजनीं निदेला । तो आणिकीं नाहीं देखिला । आपुलाहि निमाला । आठउ तया ॥ ४-३३ ॥

नीरव एकांती कुणी रानी, शांतचि तो झोपी गेला | देहभान पुरते विसरोनी, विसर आपुला त्या पडला || ९८.

देहभान त्या नसेचि कांही, तसेच अन्या कोणाला | म्हणुनि काय अस्तित्वहीन तो, कारण बोध न मुळि झाला || ९९.

नसणे बोधाचे ना करिते, बाधा त्याच्या असण्याची | असणेपण ते फुकाचि शंकित, केवळ खूण न बोधाची || १००.

आहेपण नि नाहीपणहि, असती कल्पना सापेक्ष | ज्ञानाचा जंव विषय होतसे, तरि वेधी आपुले लक्ष || १०१.

परी ज्ञान ना सृष्ट पदार्थ नि, दिसे न नयने कोणाला | सत्तामात्रची असे नित्य ते, स्व-स्थ न ज्ञातचि कवणाला || १०२..

परी जिवें नाहीं नोहे । तैसें शुद्ध असणें आहे । हें बोलणें न साहे । असेनाहींचें ॥ ४-३४ ॥

सुषुप्तीत विसरे असणेपण, दुज्याहि ज्ञात न होत असे | स्व-बोध नसता, परि तयाच्या, अस्तित्वाला बाध नसे ||१०३

असणेपण ते शुद्ध अबाधित, अभाव जरि बोधास असे | निद्राधिन जो अस्तित्वाचे, आहे-नाहीपणही नसे || १०४.

अस्तित्वाची ऐशी जाणीव, ना इतरा वा ना त्याला | परि अस्तित्वा नसेचि बाधा, विषय हो न हो, कोणाला ||१०५

आहेपण नि नाहीपणहि, कल्पनाचि सापेक्ष असे | जाणीवहि सृष्टचि असे जरि, ज्ञान परंतु नाही तसे || १०६.

आत्म्यासंगे ज्ञानाज्ञानहि, उभय भावहि नांदतसे | आहे-नाहिपण ना त्याशी, सर्वाठायी तेच वसे || १०७.

ज्ञान असे ते स्वरूप आपुले, जरि अस्तित्व कदा न दिसे | सत्तामात्रची सहज स्थिति जी, आत्मतत्व हे तेचि असे || १०८

दिठी आपणया मुरडे । तैं दिठीपणहि मोडे । परी नाहीं नोहे फुडे । तें जाणेचि ते ॥ ४-३५ ॥

दृष्टी पाही इतर पदार्था, परि निजरुप बघता ती खुंटे | अंध नसे ती त्यावेळीहि, परि निजस्थानीचि प्रगटे || १०९.

कां काळा राहे काळवखा । तो आपणया ना आणिका । न चोजवे तऱ्ही आसिका । हा मी बाणे ॥ ४-३६ ॥

अवसेच्या काळोखी बसला, काळाकुट्ट असा कोणी | कुणालाही ना दिसे परि तो, जाणे मी आहे लपुनी || ११०.

काळा माणूस अंधारी वा उजेडातही तो पुरता | त्या आहेपण नित्य जाणवे, दिसे, ना दिसे जरि जगता ||१११.

तैसे असणें कां नसणें । हें कांहींच मानुसवाणें । नसोनि असणें । ठाये ठावो ॥ ४-३७ ॥

कळो नाकळो कुणा जरिही, आहे-नाहीपण तरिही | स्वभावसिद्ध असणे ना विचलित, असे शुद्ध आपुल्या ठायी || ११२.

निर्मळपणीं आपुला । आकाशाचा संचु विराला । तो स्वयें असे पुढिला । कांहीं ना कीं ॥ ४-३८ ॥

आकाशी जो खेळ ढगांचा, तो विरता त्याचे ठायी | त्या खेळे नभ कदा न विचलित, नित्य स्व-स्वरूपी राही || ११३.

कां आंगीं कीं निर्मळपणीं । हारपलिया पोखरणीं । हें आणिकावांचूनि पाणी । सगळेंचि आहे ॥ ४-३९ ॥

विहिर खोदिता पाणी लागे, परी नव्हती ती खोदियली | तरीही असे आपुले ठायी, शुद्ध जळचि जमिनीखाली || ११४.

भूमीमधले जल स्वस्थानी, दिसे मुळी ना जरि वरुनी | भूमीलागी दिसे खोदिता, स्वच्छचि जल ते पुष्करणी || ११५.

आपणा भागु तैसें । असणेंचि जें असे । आहे नाहीं ऐसें । सांडोनिया ॥ ४-४० ॥

ज्ञानाठायि स्वभावभुत जे, सत्तामात्र असे असणे | कुणा ज्ञात हो, वा न हो तरि, आपुल्या ठायी स्थित होणे || ११६.

या देहाचे विहित कार्य जे, त्यास्तव हरि अंतरी वसे | सोडुनिया मीपण रंगावे, मीच अनंत हरी असे || ११७.

दृग्गोचार ना परब्रह्माचे, असणेपण जरि कुणासही | सत्तामात्रे नित्य असे ते स्वस्थचि ते आपुले ठायी || ११८.

निदेचें नाहींपण । निमालियाहि जागेंपण । असिजे कां नेण । कोणी न होऊनि जैसें ॥ ४-४१ ॥

झोप संपता, येत जागृती, निद्रा जागृति उभय स्फुरे | पूर्ण जागृती येते तेंव्हा, निखळ जागृति मात्र उरे || ११९.

जागृति निद्रा संधिकाली, उभय स्पर्शी जी स्थिति असे | सांडुनी दोही, शुन्यी रंगणे, निजस्वरूपचि ते तेथं वसे ||१२०.

निद्रारंभी वा ओसरता, रात्री वा ब्राह्मी काली | सहजी स्फुरते आत्मप्रभा ती, स्थिर बसुनी या समकाली || १२१.

ब्राहम मुहूर्ती निद्रा सरता, अजुनि इंद्रिये ना उठली | रात्र दिनाच्या संध्याकाली, सृष्टी धूसरता ल्याली || १२१

या समकाली समचि करुनिया, प्राण अपानहि स्थिर व्हावे | विसरुनि आपुले ते असणेपण, शून्यी रंगुनिया जावे || १२२.

देहभाव पुरता विसरोनी, आज्ञाचक्री दंगावे | ये शून्याची सहज अनुभुती, शांत न कांही चिंतावे || १२३.

अनुभव घ्यावा स्व-स्वरूपाचा, निराकार व्याप्ती त्याची | नुरे ज्ञान नि ज्ञाता दर्शन. निखळ अनुभूति श्री हरीची || १२४.

सारी असे ती, एकचि सत्ता, अद्वैती रंगुनी जावे | स्वानंदाचे अमृत असता, कडु विषया कां प्राशावे ?|| **१२५**

तेच असे निजस्वरूप आपुले, त्यांत विरावे पूर्णपणे | परि 'जाणे मी, वा ना जाणे', स्मृति सोडूनि एकपणे ||१२६.

अशा स्मरण नि विस्मरणाविण, आत्मरुपी तल्लीन व्हावे | सहज असावे निजरूपीची, शांत न कांही चिंतावे || १२७.

कां भूमि कुंभ ठेविजे । तैं सकुंभता आपजे । तो नेलियां म्हणिजे । तेणेंवीण ॥ ४-४२ ॥

कुंभ ठेविता भूमीवरती, सकुंभता सहजी येई | कुंभ काढिता, कुंभरहित ती, खेळचि शब्दांचा पाही || १२८.

परी दोन्ही हे भाग । न शिवति भूमीचें आंग । ते वेळीं भूमि तैसें चांग । चोख जें असणें ॥ ४-४३ ॥

भूमी मृत्तिका, कुंभ मृत्तिका, उभय मृत्तिका असताही | येणे जाणे ते कुंभाचे, मृत्तिका न विचलित होई || १२९

एक मृत्तिका येथे तेथे, भूमी विचलित ना तेणे | असणे नसणे पैल तयांच्या, ब्रह्म असे ते पूर्णपणे || १३०

सारी असे की, एकचि सत्ता, आत्मरूप त्या श्रीहरीची | आत्मारामी पूर्ण विरावे, हीच प्रतीति ब्रह्माची || १३१.

व्यष्टि म्हणुनि न संकोचावे, देह चौकटी वृथा असे | निजरूपाला ओळख सत्वरी, ब्रह्माविण तू अन्य नसे || १३२.

स्वानंदाचे अमृत असता, विषय चिखल कां आवडतो | अंतर्मुख ते होई झडकरि, तूच दिव्य रे श्रीहरी तो || १३३ .

- श्री राजाराम बुवा ब्रह्मचारी यांनी अध्यायाचा केलेला उपसंहार [ओव्या-१३४ ते १३९]

आत्म्याची व्यापकता देहातील, व्यष्टिरूपाने विलसतसे | अखिल जगत जे व्यापुनि राही, समष्टीरूपे तेचि असे ||१३४

व्यष्टि मानुनी असे जीव तो, ईश्वर सकलाठायी असे | आकारांच्या पैल अनंते, आत्मा सकला व्यापितसे ||१३५

ईशतत्व ते सकला जाणे, त्याविण ती सारी माया | निद्रा जागृती संध्याकाली, निजरुप येई भेटाया ||१३६

मायातीतचि होऊनि सहजे, स्वानंदी रमुनी जावे | एक्केचाळीस म्हणुनि लिहिली, जेणे स्वरूपी दंगावे ||१३७ [४१व्या ओवीचे महत्व]

निद्रादौ जागरस्यांते यो भाव उपजायते | तं भावं भावितं साक्षात् जीवन्मुक्तो भवेत्सदा |४४|| {राजाराम बुवा रचित }

निद्रारंभी वा तिज अंती, सहज भाव अंतरि स्फुरतो | तेचि असे निजरूप आपुले, समरसता हरि अनुभवतो ||१३८ .

बोध येई जो त्या समयाला, स्मृतीत त्यासि ठेवावे | शांत मनाने आठवूनी त्या, अद्वैती रमुनि जावे ||१३९. [अनुभव अमृत रहस्य]

श्री. अमृतानुभव अमृत गंगा - कुंड चवथे समाप्त

(५) श्री. अमृतानुभव अमृत गंगा –

कुंड पाचवे –

{सच्चिदानंद निरूपण}

सत्ता प्रकाश सुख । या तिहीं तिहीं तीं उणे लेख । जैसें विखपणेंचि विख । विखा नाहीं ॥ ५-१ ॥

अस्तित्व-ज्ञान आणि आनंदे, श्रुति निर्देशिती श्रीहरीशी | हे तीनही जरि हरिठायी, ज्ञात नसे हे परि त्याशी || १.

सत्ता सर्वत्रची हरीची, बोध स्रोत तो ज्ञानाचा | समरस होता सहज अनुभूति, प्रत्यय ये स्वानंदाचा || २.

म्हणुनी सत्ता प्रकाश नि सुख, तिन्ही वेगळे कदा नसे | एका हरीशी समरस होता, प्रत्यय सहजी येत असे || ३

सर्वत्रचि अस्तित्व हरीचे, अनुभूति होता सुख दाटे | आपुली सत्ता प्रकाश नि सुख, हरीला ही जाणीव कुठे ?|| ४.

हरीमय सारे विश्व जाहले, पूर्ण ज्ञानमय तो विलसे | जेथे हरी, आनंदही तेथे, स्वानंदी तो नित्य असे || ५.

सत् चित् नि आनंद यातुनि, श्रुति निर्देशिती ब्रह्माशी | पावन असती तीन पदे ही, एकरूपे ये प्रतीतीशी || ६.

एकचि सत्ता, प्रकाश आणि, सहजची तो स्वानंद असे | अनुभूतीने प्रत्यय त्याचा, जाणीव ही परि हरीस नसे || ७.

जरि वीष ते मारक घेता, प्राशितसे तोची जाणे | विषास परि हे ज्ञात कदाना, जाणे जेणे अनुभविणे || ८.

जैसे वीष विनाशा करीते, जोही धारण करि त्यांते | निज परिणामा वीष न जाणे, नच नाशी निजरूपाते || ९

जैसे वीष बाधक देहाला, समजे अनुभव घेताचि | विषा न जाणीव परि तयाची, ती अनुभूती अन्याची || १०.

विषा वीष ना मारक कधिही, सत्ता प्रकाश सुख तैसे | हरी ना जाणे स्वगुण आपुले, निजस्वरूपि तो स्व-स्थ असे || ११.

पदे तीन ज्या अनुभूत झाली, गुणवर्णन त्या प्रतीतिचे | हरीशी समरसताचि सहजी, प्रत्यय हे अनुभूतीचे || १२.

स्व-स्वरूपी जे नित्यचि असती, आली तया जी अनुभूति | थोर महात्मे निजानंदी जे, शब्दे वर्णिली ही प्रतीति || १३

साधकास हे मार्ग प्रदीपन, कैसे अथवा जाणावे | योग्य मार्ग हा कैवल्याचा, पुढती पुढतीची जावे || १४.

थोर असती उपकार तयांचे, शब्दे ब्रह्मा व्यक्तविले | सुलभ पानचि अनुभव अमृत, प्रतीति खुणांना दावियले || १५.

कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक एक । द्राव गोडी पीयुख । पीयुखचि जेवीं ॥ ५-२ ॥

सुवर्णत्व, काठिण्य, कांतिही, सुवर्णी वसती एकरूपे | पातळपण गोडी नि अमृत, वेगळे न अमृती रुपे || १६.

नित्यानंदी सदा श्रीहरी, प्रकाश दे आनंदाचा | प्रकाश हीचि त्याची सत्ता, बोध असा हा स्वरुपाचा ||१७

उजाळ दृति मार्दव । या तिन्हीं तिहीं उणीव । हें देखिजे सावेव । कापुरीं एकीं ॥ ५-३ ॥

उजळपणा परिमळ नि मृदुता, कर्पुर ठायी एकपणे | तीन धर्म ना असती वेगळे, एकरूपे अनुभूत होणे || १८.

आंगें कीर उजाळ । कीं उजाळ तोचि मवाळ । कीं दोन्ही ना परिमळ । मात्र चि जें ॥ ५-४ ॥

ऐसें एके कापुरपणीं । तिन्ही इये तिन्ही उणी । इयापरी आटणी । सत्तादिकांची ॥ ५-५ ॥

मृदुत्व शोभवी शुभ्रपणाला, गंधे सहजी अनुभूती | पाहताचि एकत्वे प्रतीति, एक दुज्याहुनी अलग न ती || १९०

उजाळ मार्दव आणि द्रुती ही, विषय वेगळालेचि जरि | कापुरपणी ते एकचि तैसे, त्रिपदे भुषवित एक हरी || २०.

जरी कापुरी धर्म वेगळे, एकत्वे अनुभूती त्यांची | तैसे पद सच्चिदानंद हे, प्रतीति तयाची अभिन्नचि || २१.

सत्ता ज्ञान आनंद प्रगटती, एकरुपे अभिन्नपणे | अनुभूति येता सहजी जाणवे, मांगल्यचि ते एकपणे || २२.

येऱ्हवीं सच्चिदानंदभेदें । चालिलीं तिन्ही पदें । परि तिन्हीं उणीं आनंदें । केलीं येणें ॥ ५-६ ॥

अस्तित्व नि सुख ज्ञानची जगती, क्षणिक अनुभूति येत असे | शाश्वत तीनही श्रीहरी माजी, परि तो त्यांच्या पैल वसे || २३.

निजठायी हरी अनुभविता, एकत्वे प्रत्यय त्यांचा | श्रुती सांगती प्रत्यय हाचि, सत् चित् नि आनंदाचा || २४.

जरी ब्रह्म ते भावातीतचि, विषय न होई शब्दांचा | या शब्दांच्या पैल जाऊनी, अनुभव घ्यावा श्री हरीचा || २५.

अस्तित्व ज्ञान आनंद, वाटती, जरी वेगळालीच पदे | परब्रह्माचे ठायी येई, एकचि प्रतीति स्वानंदे || २६.

सत्ता आणि प्रकाश यांची, एकचि गति ती आनंदी | पूर्णत्वाने एकवटे तो, प्रतीत हो परमानंदी || २७.

सत्ताचि कीं सुख प्रकाशु । प्रकाशुचि सत्ता उल्हासु । हें न निवडे मिठांशु । अमृतीं जेवीं ॥ ५-७ ॥

सकलाठायी एक श्रीहरी, ज्ञानमात्रचि स्वानंदे | सत्ता-ज्ञान नि सुख न वेगळे. अनुभूति ती परमानंदे || २८.

हरीची सदृपता, चिद्रूपता तोचि नि आनंद असे | जशी अमृती नित्य अशी ती, अभिन्न गोडी सहजी वसे || २९.

प्रकाशरूपे सत्ता विलसे, प्रकाशात उल्हास वसे | गोडी दे आनंद अमृती, गोडी नि अमृत भिन्न नसे || ३०.

शुक्लपक्षींच्या सोळा । दिवसा वाढती कळा । परि चंद्र मात्र सगळा । चंद्रीं जेवीं ॥ ५-८ ॥

तिथीप्रवाही चंद्र कला त्या, विकसती सोळा प्रती दिवशी | पुनवेला तो पूर्ण चंद्रमा, दिसे न अवसेच्याचि निशी || ३१

कलेकलेने वर्धन होई, भानुसमोरी पूर्ण दिसे | कलेकलेने उणिव निजपणी, भानूजवळी शून्य असे || ३२

आत्मज्ञानाची अनुभूति, कलेकलेने वाढतसे | ज्ञानाची जंव पूर्ण पुर्णिमा, अमृत वर्षत विलसतसे || ३३.

हरिसमीपता वाढे जैशी, ज्ञान मीपणा उभय विरे | आणि हरीशी तद्रूप होता, एक हरिविणा कांही नुरे || ३४.

वर्धन उणिवा हे चंद्राचे, दृष्टीला आभास असे | स्वरूपि न वर्धन उणिवा कांही, नित्य हरिरुपे विलसतसे || ३५.

कला बदलती नभांगणी त्या, परी चंद्रमा पूर्ण असे | कोर कोर वाढणे नि विरणे, रवी तेजाने आभासे || ३६.

पुनवेला जो पूर्ण प्रकाशे, कलेकलेने वाढुनिया | अवसेला रवी समीप जाता, लपवि आपुली तो काया || ३७.

थेंबीं पडतां उदक । थेंबीं धरूं ये लेख । परि पडिला ठायीं उदक । वांचूनि आहे ? ॥ ५-९ ॥

थेंबे थेंबे पडता पाणी, किती थेंब, शक्यचि गणती | जेथे सांचे, थेंब रुपाने, थेंब नुरे, पाणी म्हणती || ३८.

सत्ता ज्ञान नि सौख्य वेगळे, जरी वाटती तीन पदे | तिन्ही पूर्णत्वे समरसती ती, श्रीहरी ठायी स्वानंदे || ३९.

आत्मा प्रगटे घटाघटातुनी, वेगवेगळ्या भिन्न रुपे | त्या रूपांची शक्यचि गणती, निर्मुनि त्यांसि हरी लपे || ४०.

तैसें असताचिया व्यावृत्ती । सत् म्हणों आलें श्रुति । जडाचिया समाप्ती । चिद्रूप ऐसें ॥ ५-१० ॥

असत्-पणाचा अभाव ज्यासी, श्रुति निर्देशिती सत् ऐसे | जड नाही हे बिंबविण्यास्तव, हरीला चिद्रूप म्हणती तसे || ४१.

विनाशी जडा हरी खेळवी, नित नवरुपे विलसतसे | हरि अस्तित्व नि ज्ञान अभंगचि, स्वानंदे तो नित्य वसे || ४२.

जरि अज्ञानी आणि विनाशी, दुःखी जीवातहि वसे जरी | नित्य परि तो सदा अलिप्तची, स्वानंदी रममाण हरी || ४३.

त्या ना अस्तित्वाची जाणीव, निज ज्ञप्तिचे ज्ञान नसे | निर्विकार तो नित स्वानंदी, ज्ञात होई इतरास कसे ?|| ४४.

म्हणुनि श्रुतींनी मार्ग काढला, कैसे हरीला जाणावे | सद्भाग्ये येण्याशी प्रतीति, ज्ञान खुणांचे ते व्हावे || ४५.

भाव तीनही एकरुपाने, प्रतीत होती तोचि हरी | अखंड सत्ता, सदा ज्ञानमय, स्वानंदाचे पान करी || ४६.

निजरूपावर खेळवी सृष्टी, सत्ता हरीची विलसतसे | चैतन्यासह आनंदाने, निज अस्तित्वा दावितसे || ४७.

दुःखाचेनि सर्वनाशें । उरलें तें सुख ऐसें । निगदिलें [बोलिले] निश्वासें । प्रभूचेनि ॥ ५-११ ॥

सकल दुःख ते पूर्ण नासता, शुद्ध सौख्यचि निखळ उरे | त्या स्वानंदी रंगुनी जाता, सुख अनुभूतीविण कांही नुरे || ४८.

निज-निश्वासी हरी कथितसे, 'सोहं' ओळखी मजठायी | दुःखाचा लवलेश उरेना, स्वानंदी रमुनी जाई || ४९.

सोहं सांगे श्वासोश्वासी, हरी म्हणे तू मीचि असे | उणीवेत ते दुःख असेचि, पूर्णब्रहम स्वानंदी वसे || ५०.

ऐसीं सदादि प्रतियोगियें । असदादि तिन्ही इयें । लोटितां जाली त्राये । सत्तादिकां ॥ ५-१२ ॥

क्षणीक सत्ता, ज्ञान नि सुखहि, विषय भोगिता जीवा मिळे | विषयानंदा पूर्ण सोडिता, अंतर्दृष्टीस हरी कळे || ५१.

आभासात्मक या जगताच्या, विपरित लक्षण श्रीहरीचे | अखंड सत्ता, सहजी ज्ञान नि आनंदचि लक्षण त्याचे || ५२.

हे सांगुनिया श्रुति निर्देशिति, फोलपणा तो विषयांचा | क्षणिक रूप नि मायिक ज्ञाने, संग न विषयानंदाचा || ५३.

स्वर्गसुखहि ते गौण ज्यापुढे, आत्मसुखाशी ईच्छावे | विषयानंदा त्यागुनि इथल्या, स्वानंदी रमुनि जावे || ५४.

या ओवीने कर्मकांडहि, निषेध करुनि, श्रुति म्हणति | विवेक वैराग्यामार्गेचि, येई हरीची अनुभूती || ५५.

एवं सच्चिदानंदु । आत्मा हा ऐसा शब्दु । अनन्यावृत्ति सिद्धु । वाचक नव्हे ॥ ५-१३ ॥

म्हणुनि सच्चिदानंद शब्द हा, नसेच वाचक आत्म्याचा | केवळ सांगे हरी न वेगळा, भौतिक सुख आनंदाचा || ५६.

गाऊनि केवळ त्रिपादाने या, अनुभूति हरीची होत नसे | श्रुति निर्देशिति केवळ त्याने, प्रत्यय त्याचा येत असे || ५७.

सूर्याचेनि प्रकाशें । जें कांहीं जड आभासें । तया तो गिंवसें । सूर्यु कायी ? ॥ ५-१४ ॥

सूर्य प्रकाशे बोधित होती, देहादि त्या जड गोष्टी | सूर्या बोधित त्या न करू शके, सूर्ये नयनांना दृष्टी || ५८.

तेवीं जेणें तेजें । वाचेसि वाच्य सुजें । ते वाचा प्रकाशिजे । हें कें आहे ? ॥ ५-१५ ॥

वाचा गोचर होई जेणे, व्यक्त तेज कैसे बोले ?| तेजाचे वर्णन शब्दांनी, शक्य कदापि ना झाले || ५९.

वाचेला ज्या तेजानेचि, येई बोलता बोलांनी | कैसे तिजने वर्णावे ते, श्रीहरीलाचि शब्दांनी || ६०.

म्हणुनि शब्द हे सत्ता सुख नि, आनंदहि जे वाचेचे | समर्थ ते ना, असती कदापि, वर्णन करण्या श्रीहरिचे || ६१.

विषो नाहीं कोण्हाहि । जया प्रमेयत्वचि नाहीं । तया स्वप्रकाशा काई । प्रमाण होय ॥ ५-१६ ॥

सकल चराचर स्वये जाहला, विषय नसे तो कवणाला | प्रमाण कसले त्यालागी लागे. स्वयंभूचि जगदिशाला || ६२.

विषया स्पर्शुनि मना करविती, बोध इंद्रिये मग त्याचा | हरि न विषय इंद्रिया म्हणोनी, बोध न होई ब्रहमाचा || ६३.

सर्वादि नि स्वयंप्रकाशी, स्वयंभूच जो विलसतसे | त्यासाठी ते प्रमाण कसले, त्याविण जगती कांही नसे || ६४.

प्रमेयपरिच्छेदें । प्रमाणत्व नांदे । तें कायि स्वत:सिद्धें । वस्तूच्या ठायीं ? ॥ ५-१७ ॥

जगती नांदती विषय घटादि, ज्ञात होत प्रमाणाने | परब्रह्म नच विषय कदापि, स्वयंसिद्ध ते ज्ञानाने || ६५.

ब्रह्म असे ते पूर्ण ज्ञानमय, स्वयंप्रकाशित अपरोक्ष | प्रमाण त्यांते ना उपयोगी, कार्य कांही ना प्रत्यक्ष || ६६.

चार प्रमाणे असे सिद्धता, ज्ञान जयाने विषयाचे | प्रत्यक्ष, शब्द, उपमा, अनुमानहि, ब्रह्मा नच उपयोगाचे || ६७.

ब्रह्म इंद्रियातीत, विषय ना, प्रत्यक्ष न त्या लागू पडे | शब्द प्रमाणहि नच उपयोगी, ते तर शब्दापलिकडे || ६८.

अनंतास त्या कसली उपमा, तयासारखे तेच असे | निराकार नि निर्गुण त्यासि, अनुमानाला वाव नसे || ६९.

एवं वस्तूसि जाणों जातां । जाणणेंचि वस्तु तत्वता । मग जाणणें आणि जाणता । कैचें उरे ? ॥ ५-१८ ॥

ब्रह्म वस्तुशी जाणो जाता, स्वये ब्रह्म तो होत असे | कुणी कुणाला काय जाणणे, ज्ञेय नि ज्ञाता अलग नसे || ७०.

स्वसंवेद्यचि आत्मदेव तो, अंतर्मुख दृष्टी करिता | आज्ञाचक्री वृत्ती स्थिरावे, पूर्ण येतसे समरसता || ७१.

निद्रा जागृती संधिकाली, देहबुद्धी जाते विलया | निराकारी ते सुस्थिर होता, ज्ञाता समरसतो ज्ञेया || ७२.

म्हणोनि सच्चित्सुख । हे बोल वस्तुवाचक । नव्हती हे शेष । विचाराचे ॥ ५-१९ ॥

म्हणुनि सत्-चित्-आनंद शब्द हे, नच वाचक ते ब्रह्माचे | हरि शब्दांच्या नित्य पैल चि, त्यासि वर्णावे कैचे || ७३.

तीनच शब्दे हरी वर्णिता, अनंत मर्यादित होई | जेही चराचरी – सारे तोचि, अंश मात्र व्यापुनी राही || ७४.

हरी कैसा हे स्वये जाणण्या, अनंत होऊनी जाणावे | त्यासी जाणणे हे अनुभवणे, हरीत विरुनीची जावे || ७५. .

ऐसेनि इयें प्रसिद्धे । चालिलीं सच्चिदानंद पदें । मग द्रष्ट्या स्वसंवादें । भेटती जेव्हां ॥ ५-२० ॥

ऐसी सच्चिदानंद पदे ही, वेद श्रुतींनी गौरविता | भेटविती ती निजसंवादे, द्रष्टा हरीरूप होता || ७६.

ते वेळीं वरिसोनि मेघु । समुद्र होउनि वोघु । सरे दाऊनि मागु । राहे जैसा ॥ ५-२१ ॥

सिंधू जलची मेघ होऊनी, वर्षे वाहुनी सिंधू बने | सारी कार्ये होती वाहता, तैसे जीवन हे जाणे || ७७.

निज अस्तित्वा करुनी समर्पण, स्वयेचि सागररुप घेई | मार्ग दाविण्या जलौघ राहे, तैसा बोध पदे होई || ७८.

बोल सच्चिदानंद ओघ हा, सिंधूस मिळता, ओघ नुरे | जळ स्वयेचि ते होता सिंधू, पदाचेही त्या कार्य सरे || ७९.

निजरुप स्वानंदे अनुभवता, पदे अंतरी ती स्फुरती | इतराशी तो मार्ग दाविण्या, नित्यचि उपयोगा येती || ८०.

पदे हि उज्वल, श्रुति निर्देशित, अर्थ आशये उमगावी | नच गाऊनि वा आळवुनीहि, हरि मार्गाते ती दावी || ८१.

वर्षल्या जळे, ओघ बनुनिया, सत्ता, प्रकाश वेधावे | निजरुप आनंदा अनुभवुनी, सागराकडे झेपावे || ८२.

सारी एकच त्याची सत्ता, ब्रह्मरूप ते वंदावे | सकल श्रीहरी तया सेवुनी, आनंदाने वर्तावे || **८३.**

मी जलबिंदू न, ओहळ सरिता, पूर्ण रुप मी सिंधू असे | जलौघ बनुनी तृषा ताप हरि, तिरी पादप ते पोशीतसे || ८४.

जीवन सरिता नसे निरर्थक, कार्य नेमिले करण्याला | येती संपर्कात तयांच्या, हितास्तव करी कार्याला || ८५

करि ज्या कार्यास्तव तू आला, गंगेसम ते वर्तावे | प्रतीति येण्यास्तव ती त्याची, स्वयेचि ते श्रीहरी व्हावे || ८६.

हरी रुपातून आपण आलो, जीवन प्रवाहे मिळे हरी | जीवनात या अलिप्त राहुनी, हरिकार्यासि सदा करी || ८७.

जेही घेतले कार्य कराया, हरी प्रतीत हो त्यामाजी | दिव्यत्वाची कार्ये प्रचिती, अन्या बोधचि त्यामाजी || ८८.

फळ विऊनि फुल सुके । फळनाशे रस पाके । तोहि रस उपखें । तृप्तिदानीं ॥ ५-२२ ॥

जन्म देऊनी फळा सुके फूल, मुके फळपणा रस भरता | रसपणाहि तो निमुनी जाई, आस्वादे प्राशन होता || ८९०

जन्म फुलाने फळा देऊनी, फुल ते सुकोनिया जाई | पूर्णचि रसमय होता फळ ते, फळपण नासे रस होई || ९० .

आणि रस स्वादिष्ट होऊनी, कवणाच्याही मुखी पडे | तृप्ति रुपे परि रसही नाशे, फुल-फळ-रसही नाम दडे || ९१ .

फळा विउनिया, फूल सुके ते, फळ वाढे रसमय होई | रसाच्या रुपे फळहि समर्पित, रसचि तृप्तिरूपे राही || ९२.

श्रुति वचनाचे फूल उमलता, आत्ममनन फळ अंकुरते | परिपक्व ते होताहि फळ, ध्यानाभ्यासे रस भरिते || ९३.

रसास्वाद तो सकल श्रीहरी, स्वसंवेद्य होऊनि ये तृप्ती | सबाह्य अभ्यंतरि एक तो, स्वानंदे त्याची प्रतीति || ९४.

कां आहुति अग्नीआंतु । घालूनि वोसरे हातु । सुख चेवऊनि गीतु । उगा राहे ॥ ५-२३ ॥

देऊनी आहुति अग्नीमाजी, अग्निहोत्रि कर परत फिरे | सुरेल गायन सुखा देऊनी, आलापाचे बोल सरे || ९५.

नाना मुखा मुख दाऊनी । आरिसा जाय निगोनि । कां निदैलें चेववुनी । चेवतिें जैसें ॥ ५-२४ ॥

किंवा दर्पणी मुखा पाहता, दर्पणास ना काम उरे | निद्रितास ते जागे करुनी, जागविणारा बाजू सरे || ९६

जीव झोपला आत्मविस्मृति, अज्ञानाच्या निद्रेत | त्रिपदे त्यासी जागे करुनी, जागृत होता झणी जात || ९७.

तैसा सच्चिदानंदा चोखटा । दाऊनि द्रष्ट्या द्रष्टा । तिन्हीं पदें लागतीं वाटा । मौनाचिया ॥ ५-२५ ॥

सच्चिदानंद तिन्हि पदे, दावित श्रीहरी कार्य सरे | तिन्ही पदे ही मौनची धरुनी, आपुल्या वाटे जात त्वरे || ९८ .

ही सच्चिदानंद त्रिपदे, आत्मबोध पथ दाखवुनी | अनुभूति वर्णुंनी समरसतेची, मौने ती जाती निघुनी || ९९.

जें जें बोलिजे तें तें नव्हे । होय तें तंव न बोलवे । साउलीवरी न मववे [मोजता येत नाही] । मवितें जैसें ॥ ५-२६ ॥

बोलुनिया निर्देश जयाचा, शक्य न होई शब्दांनी | निश्चित तो तर नसेच आत्मा, नित्यचि हे ठेवा ध्यानी || १००.

नसे इंद्रिया विषय कदा तो, सावली मोजुनी कुणीतरी | मोजमाप देहाचे सांगा, होईल कां ते कधीतरी ?|| १०१.

वर्णन होई ज्याचे शब्दे, ब्रह्म कदापि ते नाही | जे आहे ते शब्दि येईना, वाचा खुंटुनिया जाई || १०२.

जशी आपुली ऊंची मोजणे, छायेवरुनि शक्य नसे | ब्रह्म जियेला करी प्रकाशित, वर्णावे तिजने कैसे ?|| १०३.

मग आपलियाकडे । मावितया जै सापडे । तैं लाजहिला जो आखुडे । मविते जैसें ॥ ५-२७ ॥

आपुली छाया मोजू जावे, तंव तंव पुढती ती धावे | संकोचोनी खटाटोप हा, मोजणेचि सोडुनी द्यावे || १०४.

मोजमाप घेण्यास आपुले, देहावरुनिची मोजावे | रविकिरणे बदलती सावली, कां मोजुनी लज्जित व्हावे ?|| १०५.

अनुमानुनिया त्रिपदे हरीला, नाही अनुभूति श्रीहरीची | स्व-संवेद्यता ती करवी अनुभूति, अचूक त्या परब्रहमाची || १०६

जैसी सत्ताचि स्वभावें । असत्ता तंव नव्हे । मा सत्तात्व संभवे । सत्तेसि कायि ? ॥ ५-२८ ॥

साऱ्या ब्रह्मांडात एकला, सत्ता केवळ त्याची असे | दुज्या कुणाचे अस्तित्वची ना, सत् शब्दाची गरज नसे || १०७.

एकमात्र अस्तित्व हरीचे, अणुरेणूतही व्याप्त असे | अभाव ज्याचा नसे कदापि, सत्ता नामा गरज नसे ||१०८.

आणि अचिदाचेनि नाशें । आलें जें चिन्मात्रदशे । आतां चिन्मात्रचि मा कैसें । चिन्मात्रीं इये ॥ ५-२९ ॥

जडत्व जेथे पूर्ण अभावे, स्वयंभूच चिन्मात्रदशे | त्याशी चित् हे संबोधन कां?, गरज तयाची मुळी नसे || १०९.

नासुनिया ते अज्ञानासि, ज्ञान येतसे उदयासी | आत्म्याठायी शुद्ध ज्ञानचि, गरज काय चिन्मात्र अशी ? || ११०.

नीद प्रबोधाच्या ठायीं । नसे तैसें जागणेंहि । तेवीं चिन्मात्रचि मा [तरी] काई । चिन्मात्रीं ये ? ॥ ५-३० ॥

जागेपण ते पूर्णचि असता, निद्रा जागृती उभय नसे | सहजी भाव तो स्व-जागृतीचा, देहा आठवण उगा कसे ?|| १११.

सहजस्थिति ती चैतन्याची, विपरित याहुनि कदा नसे | सहजची चिन्मात्रता जयासी, संबोधे कां उगा तसे || ११२.

अचिन्मात्रता ज्यास शिवे ना, स्वयेचि जो चिन्मात्र असे | त्यासी 'मी चिन्मात्र' भाव हा, प्रत्ययास येईल कसे ? || ११३.

प्रकाश हा तर सहज धर्म तो, आत्म्याठायी नित्य असे | चैतन्येचि बोध होतसे, चित् संबोधन गरज नसे || ११४.

ऐसें यया सुखपणें । नाहीं दुःख कीर होणें । मा सुख हें गणणें । सुखासि काई ? ॥ ५-३१ ॥

दुःख स्पर्श ना कधी तयाला, नित्यचि स्वानंदात असे | आत्मदेव तो कधी न दुःखी, 'सुख' संबोधन गरज नसे || ११५.

नित्य सदा सुख ज्याचे ठायी, दुःख ठाऊके ना त्यासि | सहज अनुभूति नित्य सुखाची, सुख नामाची गरज कशी? || ११६.

सुखमयताची सहजी जेथे, समरसता अनुभव येतो | तेथे ना सापेक्ष काहीही, स्वानंदीचि हरी जातो || ११७.

विपरित कांही कदा न घडणे, म्हणुनि जेही अनुभवणे | लौकिक अनुभव इहलोकीचा, श्रुतिने सुख शब्दा देणे || ११८.

नित्यानंदे श्रीहरी विलसे, पूर्ण ज्ञानमय सदा असे | स्वानंदी तो नित्य असेचि, दुःख तया माहीत नसे || ११९.

म्हणोनि सदसदत्वें गेलें । चिदचिदत्वें मावळलें । सुखासुख जालें । कांहीं ना कीं ॥ ५-३२ ॥

असत् संगती सत् ही गेले, अचिद्त्वे चित् मावळले | असुखा संगे गेले सुखही, त्रिपदांनी ते निर्दिशिले || १२०.

सत्ता ज्ञान नि सुख ते सहजी, जेथे जेथे हरी असे | | सारे हरिमय विश्वी असता, त्रिपदांची या गरज नसे || १२१.

नित्यानंदी स्वरुप हरीचे, दुःख स्पर्श त्या करीत नसे | म्हणुनी सुखमय नित्य हरीला, सुख शब्दहि ना लागतसे || १२२.

भगवंताच्या स्वरुपामाजी, निर्विकारता नित्य असे | सत् असत् नि, चित् अचित् हि, ऐसे ते कांहीच नसे || १२३.

नसेच सुख वा दुःखहि तेथे, उगा नाव ते कां देणे | सारी लौकिक आमुचि नामे, नित प्रसन्न हरीचे असणे || १२४.

सदैवचि सुप्रसन्नता या, निजरुपासि अनुभवता | मंगल ऐसी येई प्रतीति, हीचि हरिशी समरसता || १२५.

विषयानंदी कदा न गुंते, हरिठायी मांगल्य भले | वर्षावी ती सतत मंगळी, माऊलीने ते प्रार्थियले || १२६.

आतां द्वंद्वाचें लवंचक । सांडूनि दुणीचे कंचुक । सुखमात्रचि एक । स्वयें आथी ॥ ५-३३ ॥

द्वंद्व हे फुका लोढणे, आणि सोडुनि दोनपणा | निखळ शुद्ध उल्हासचि भरला, तोचि हरीचा आत्मपणा || १२७.

वरी एकपणें गणिजे । तें गणितेनसीं ये दुजें । म्हणोनि हें न गणिजे । ऐसें एक ॥ ५-३४ ॥

ऐसे सुख ते एक गणावे, गणनारा वेगळा कसे? | सोडुनिया त्या द्वैत कल्पना, अंतर्बाहयचि सौख्य असे || १२८.

सबाह्य केवळ सुखचि असता, भोग नि भोक्ता दोन नसे | कैसी गणना एक करावी, दुजे गणाया काय असे?|| १२९.

सुख आणि त्याची अनुभूति, कदा वेगळे ते नसती | सुखा भोगीते सुखची केवळ, अनुभूती ना सहज स्थिती || १३०.

तैसें सुखा आतोनि निथणें । तें सुखीयें सुखी तेणें । हें सुखमात्रचि मा कोणें । अनुभवावें ? ॥ ५-३५ ॥

सुखांत ओतप्रोत होऊनि, सुखातचि रंगुनी जावे. | सुखचि सौख्यामाजी रंगले, कुणी कुणाला भोगावे? || १३१.

आंतुनी उसळी उल्हासाची, बाहेरही तोचि दाटे | ओसंडुनि उल्हास जातसे, भोक्ता परि उरलाची कुठे ? || १३२.

सुखमयता परिपूर्ण दाटता, निखळ सुखाविण कांही नसे | हीचि हरिची येई प्रतीति, सुखात सुखचि नांदतसे ||१३३.

क्षणा क्षणाला जी अनुभूति, घ्या प्रत्यय आनंदाचा | सारे हरीमय ही अनुभूति, प्रत्यय दे स्वानंदाचा || १३४.

जैं प्रकृति डंकु [नगारा] अनुकरे[वाजवी] । तैं प्रकृति डंकें अवतरे । मां डंकूचि तैं भरे । कोणकोणा ? ॥ ५-३६ ॥

ढोल वाजता अंगी देवी, भुत्त्याच्या त्या येत असे | परि नुसताची ढोल ठेवीता, अंगी देवी येणे कैसे ?|| १३५.

टिपरी ढोलावरी बडविता, नाद श्रवणी ये ढोलाचा | परि नुसताची ढोल ठेविता, अभाव पुरता नादाचा || १३६.

तैसें आपुलेनि सुखपणें । नाहीं जया सुखावणें । आणि नाहीं हेंही जेणें । नेणिजे सुखें ॥ ५-३७ ॥

ब्रह्मभावी समरसता सुख, आणि अनुभूती अन्य नसे | हरी ठायी तर द्वंद्व नसेचि, सुखी सुखमयता नित्य असे || १३७.

अनुभव येण्या द्वैत लागते, अनुभव आणि भोक्ता तो | असे श्रीहरी नित्य एकला, अनुभव नच त्याला येतो || १३८

तैसे हरीचे सुखमय होणे, सौख्याविण ते अन्य नसे | सुख नि अनुभूति भेद न उरता, जाण सुखाची त्यास नसे || १३९.

निखळचि सुखमय ती अनुभूति, सौख्ये सौख्यचि अनुभविता | 'सुखात मी' ना जाण वेगळी, भोगचि जेथे हो भोक्ता || १४०.

सुखावणे ना नित्य सुखातहि, आणि अभावा ना जाणे | निर्विकारचि सदैव असणे, हेचि हरीचे अनुभवणे || १४१.

आरिसा न पाहतां मुख । स्वयें सन्मुख ना विन्मुख । तेवीं नसोनी सुखासुख । सुखचि जें ॥ ५-३८ ॥

असो नसो वा दर्पण, मुख ते, कधीच सन्मुख विन्मुख ना | नित्यचि निजस्थानी ते तैसे, हरिसुख, सुखमात्रचि जाणा || १४२.

सर्व सिद्धांताचिया उजरिया । सांडोनिया निदसुरिया । आपुलिया हात चोरिया । आपणचि जो ॥ ५-३९ ॥

सकल शास्त्र सिद्धांताहाती, आत्मतत्व लागले कधी ?| स्वयेचि लपवी जे निजरूपा, येईल कैसे ते वेदी? || १४३.

श्रवणे नि वाचने येत ना, ब्रह्मसुखाची ती प्रतीति | विवेक वैराग्ये अनुभवणे, ज्यासि हवी त्याची प्राप्ती?||१४४.

न लावितां ऊंसु । तैं जैसेनि असे रसु । तेथिंचा मीठांशु । तोचि जाणे ॥ ५-४० ॥

ऊंस अजुनि ना क्षेत्री लाविला, रस अव्यक्ति परि असे | तो ज्ञानाला विदित होईना, अव्यक्ती तो विषय नसे || १४५.

कां न सज्जितां विणा । तो नादु जो अबोलपणा । तया तेणेंचि जाणा । होआवें लागे ॥ ५-४१ ॥

जुळवायाच्या वीणा तारा, नाद न येई आकलनी | नादालाची जाण तयाची, अव्यक्तातचि तो अजुनि || १४६.

नाना पुष्पाचिया उदरा । न येतां पुष्पसारा । आपणचि भंवरा । होआवे पडे ॥ ५-४२ ॥

पुष्प अजुनि ना कळी जाहले, कैसी मकरंदी गोडी | मकरंदाने भृंग होऊनि, स्वयेचि सेवावी थोडी || १४७.

नाना न रांधितां रससोये । ते गोडी पां कैसी आहे । हें पाहणें तें नोहे । आणिकाजोगें ॥ ५-४३ ॥

सारे जरि साहित्य जमविले, पक्वान्ने घडली नाही | स्वाद तयाचा स्वादचि जाणे, स्वये होऊनि रसनाही || १४८.

अव्यक्तचि सुखपणा प्रकाशे, निज सुखरुपतेतुनि व्यक्तपणे | शब्दा ना सामर्थ्य वर्णन्या, जोवरी ते विषयचि होणे || १४९.

तैसें सुखपणा येवो । लाजे आपुलें सुख पावों । तें आणिकां चाखों सुवों । येईल काईं ? ॥ ५-४४ ॥

निजबोधाचे अवीट सुख जे, केवळ स्व-संवेद्य असे | अनुभूतिविण ते न जाणवे, शब्दि ते येईल कैसे ? || १५०.

रमले जेहि विषयानंदी, त्यासि प्रगटण्या ते लाजे | जेहि कापडी या मार्गीचे, तयाचि अनुभूति ती साजे || १५१.

ऐसे ते सर्वोच्च सुख असे, सुपात्र तेचि अनुभवती | ज्याची त्याची ही अनुभूति, इतरा शब्द थिटे पडती || १५२.

दिहाचिया दुपारीं । चांदु जैसा अंबरीं । तें असणें चांदाचिवरी । जाणावें कीं ॥ ५-४५ ॥

हरिसुखमुखी परि, विषय अंतरी, दिवसा चंद्र जणू नभिचा | कसे चांदणे अमृत वर्षे, येईल ना अनुभव त्याचा || १५३

हे सारेचि केवळ वर्णन, सुखमयता ही अनुभूति | म्हणुनि त्या स्व-संवेद्य म्हणोनि, गाई माऊली ती महती ||१५४.

ऊंस लावण्या आधी गोडी, वर्णन वाणी-विलास असे | ब्रह्मपदि कुणि भाग्यवंत तो, त्याविण कोणा गम्य नसे || १५५.

नुसते वाचुनि वा ऐकोनि, ब्रह्मसुखाची ना प्रतीति | विवेक वैराग्ये अनुभवणे, ज्यासि हवी त्याची प्राप्ती || १५६.

रूप नाहीं तैं लावण्य । अंग नुठी तैं तारुण्य । क्रिया न फुटे तैं पुण्य । कैसें असे ॥ ५-४६ ॥

आकाराविण नच सुंदरता, नच यौवन जन्मल्याविणा | सत्कर्माविण पुण्य न गाठी, नच फल ते पक्वतेविणा || १५७.

जैं मनाचा अंकूर नुपजे । तेथिलेनि मकरध्वजें । तोचि हन माजे । तरीचि घडे ॥ ५-४७ ॥

मदनांकुर ना मनी उपजला, कामहि सुप्तचि तो राही | क्षुब्ध कदा ना मनोभावहि, विषय इंद्रिया ना होई || १५८.

कां वाद्यविशेषाची सृष्टी । जैं जन्म नेघे दृष्टी । तैं नादु ऐशी गोष्टी । नादाचि जोगी ॥ ५-४८ ॥

विविध वाद्यी ती नाद विविधता, निर्मिती आधी अव्यक्ती | नादचि जाणे त्यांची रंगत, नसे कल्पना अन्या ती || १५९.

नाना काष्ठाचिया विटाळा । वोसरलिया अनळा । लागणे तैं केवळा । अंगासीचि ॥ ५-४९ ॥

अग्नि न स्पर्शी जरि इंधना, सुप्त रुपे तो निज अंगी | प्रगटीची धग जाणे तोचि, कल्पना न अन्यालागी || १६०.

अनुभुति येता भगवंताची, दिव्य सुखाची ये प्रतीति | त्या प्रतीतिला शब्दी वर्णीने, ती तर बुद्धिविलास गती || १६१.

शब्द रुपादि अनुभूतींना, ज्या स्पर्शे येई क्षमता | तोचि श्रीहरी देत प्रतीति, स्वयेचि त्यासि समरसता || १६२.

दर्पणाचेनि नियमें । वीणचि मुखप्रमे । आणिती तेचि वर्में । वर्मती येणें ॥ ५-५० ॥

दर्पणाविना निजमुख प्रतीति, ज्यास होत तोचि जाणे | वर्म काय या दृष्टांतांचे, इतरा ते भिंगुळवाणे || १६३.

दर्पण आपणा ते मुख दावी, पंचभुतांची जी किमया | ते मुख रूपा नित्य बदलते, ना ते निजमुख ती माया ||१६४.

सहस्त्र वदने ती ब्रह्मांडी, विश्वरूपाने श्रीहरीची | हरिच होत जो विश्वाकारे, त्याशी प्रतीति वदनांची || १६५.

निजरूप पाही विषय सोडुनि, देह अहंता लय करुनी | प्रणव अनुसरी नाद कंपनी, पूर्ण समर्पण हरिचरणी || १६६.

उमज त्यासिचि या दृष्टांते, हेचि सांगणे माऊलीचे | बीजरूपे त्या ठायी वसती, विषय ज्ञान अव्यक्ताचे || १६७.

शब्द रूप रस स्पर्श गंधही, ज्या योगे शिरती ज्ञानी | तेचि तत्व समरसते स्वरूपी, अनुभूती ती निजज्ञानी || १६८.

एक हरीला जाणुनि घेता, तिन्ही काळही ये हाती | स्वयेचि सर्वज्ञता येतसे, त्याची येता अनुभूति || १६९. .

न पेरितां पीक जोडे । तें मुडाचि आहे रोकडें । ऐसिया सोई उघडें । बोलणें हें ॥ ५-५१ ॥

कणगीत आहे धान्य बिजरूपे, पेरताचि ये कितिक पटे | जरि नाही ते क्षेत्री पेरिले, ज्ञानदृष्टीला ते प्रगटे || १७०.

एक एक बीज बहु प्रसविते, ज्ञानदृष्टीला ते दिसते | न पेरताही ज्ञानी उमगे, भविष्यातले बहुरूप ते || १७१.

अव्यक्ती जो असे पसारा, श्रीहरी त्यासि जाणतसे | तोचि योजितो, अव्यक्ताने, पुढती व्यक्तावे कैसे || १७२.

एवं विशेष सामान्य । दोहीं नातळे चैतन्य । तें भोगिजे अनन्य । तेणेंसीं सदा ॥ ५-५२ ॥

व्यक्ताव्यक्ता स्पर्श न करिता, अस्तित्वेचि जग घडवी | न भोगताहि भोगे स्वरूपा, चैतन्ये विश्वा सजवी || १७३

आतां यावरी जे बोलणें । तें येणेंचि बोलें शहाणें । जें मौनाचेंही निपटणें । पिऊनि गेलें ॥ ५-५३ ॥

शब्द संपुनि मौनी जावे, मौनातेही विसरावे | शब्द हि नाही मौनहि नाही, विचारांत ना दंगावे || १७४.

माझे विरता पुरते मीपण, विचार शब्द नि मौन नुरे | निश्चल अनंत समरस होता, हरीविण अन्य न कांही उरे || १७५.

निर्विकार नि निश्चल होऊनि, समरस व्हावे स्व-स्फुरणी | असणे नसणे शून्य कल्पना, केवळ आश्रय श्री चरणी || १७६.

आपुलेचि ते स्वरूप निश्चल, पूर्ण त्यातचि रंगावे | व्यक्ताव्यक्ताच्या पलिकडले, निर्गुण रूप दृष्टी यावे ||१७७.

पूर्णचि निश्चल, अंतर्बाहयहि, नसे कल्पना कांही मनी | जोही येई अनुभव त्याशी, समरस पुरते होवोनी || १७८.

भावे अंतरी ॐ श्रवणाने, नादामध्ये रंगावे | नाद संपता, कंपनी समरस, त्यासंगे शून्यी जावे || १७९.

कांही नसणे केवळ सत्ता, प्रतीति नेईल स्वानंदी | पूर्णत्वाने विसरुनी सारे, निश्चल ते परमानंदी ||१८०.

स्व-संवेद्य ऐसे स्फुरण अंतरी, त्यांतही ना ते गुंतावे | अनंत अस्तित्वाची प्रतीति, निराकार निर्गुण व्हावे || १८१.

माझे विरता पुरते मीपण, विचार शब्द नि मौन नुरे | निश्चल अनंत समरस होता, हरीविण अन्य न कांही उरे || १८२..

भावे अंतरी ॐ श्रवणाने, नादामध्ये रंगावे | नाद संपता, कंपनी समरस, त्यासंगे शून्यी जावे || **१८३.**

एवं प्रमाणें अप्रमाण- । पण केलें प्रमाण । दृष्टांतीं वाइली आण । दिसावयाची ॥ ५-५४ ॥

चारी प्रमाणे हतबल झाली, करवेना हरिची सिद्धि | दृष्टांतांनी हात टेकले, चालेना त्यांची बुद्धी || १८४.

विषय कदापि हरी होईना, प्रमाण कवणाला करणे | निराकार नि निर्गुण त्यासी, दृष्टांतही कसले देणे || १८५.

अंगाचिया अनुपपत्ति । आटलिया उपपत्ती । येथें उठली पांती । लक्षणाची ॥ ५-५५ ॥

व्यक्त नि अव्यक्ता पलिकडला, भाव अभावहि कांही नुरे | रंग रूप ना निराकार तो, कवण न लक्षण त्यासि पुरे || १८६.

उपाय मागील पाय । घेऊन झाले वाय [पसार] । प्रतीति सांडिली सोय । प्रत्ययाची ॥ ५-५६ ॥

साधनादि ते उपाय थकले,ते न दाविती श्रीहरीला | आपुलीच आपणा प्रतीति, कसे दाविणे प्रश्न तिला || १८७.

येथें निर्धारिंसी विचारु । निमोनि झाला साचारु । स्वामीच्या संकटी शूरु । सुभटू जैसा ॥ ५-५७ ॥

कसे असावे निजस्वरुप ते, विचार आले साथीला | श्रुति संमत ते मार्ग दाविले, शब्दि व्यक्तिले श्री हरीला || १८८.

प्रपंच निश्चय विचार विरले, समीप येता श्रीहरीच्या | शब्द नि निश्चय अंत जाहला, यशात आहुति त्या त्यांच्या || १८९.

नाना नाशु साधूनि आपुला । बोधु बोधें लाजिला । नुसुधेपणें थोंटावला । अनुभउ जेथे ॥ ५-५८ ॥

बोधरूप प्रत्यक्ष ब्रह्मचि, मीच ब्रह्म ही वृत्ती नुरे | अनुभव होई तिथे पांगळा, प्रयास साऱ्यांचे अपुरे |१९०.

भिंगाचिया चडळा । पदरांचा पुंज वेगळा । करितां जैसा निफाळा । आंगाचा होय ॥ ५-५९ ॥

ज्ञाता ज्ञेय नि ज्ञान विविध स्तर, पारखण्या त्यासि जाता | निजबोधाच्या मंगल समयी, स्तर न एकहि ये हाता || १९१.

कां गजबजला उबा । पांघुरणें केळीचा गाभा । सांडी तेव्हेळीं उभा । कैंचा कीजे ? ॥ ५-६० ॥

गाभा केळीचा वेष्ठियला, सोपटाचिये आवरणे | सोलिताची वेष्टणे तयाची, गाभ्याचे विरुनी जाणे || १९२.

देहभावना तर्क कल्पना, अशा सोपटे वेष्टियला | निराकार निर्गुण परमात्मा, आतुर आपुल्या भेटीला || १९३.

सुखासनी बैसुनि एकाग्र, अंत:करणे स्थिर व्हावे | अनंत अनुभविता स्वानंदे, समरस हरिमाजी व्हावे || १९४.

मीच ब्रह्म परि अहंभावही, त्या निजरूपाच्या भंवती | अनंत पाहे वाट आपुली, कधी सोपटी विरतिल ती || १९५.

शब्दचि ते जे 'अहं ब्रह्म' परि, हरि शब्दाच्या पैल असे | जेथं हरीचे द्वार. त्यांत तो प्रवेश शब्दा मुळी नसे || १९६.

तैसें अनुभाव्य अनुभाविक । इहीं दोही अनुभूतिक । तें गेलिया कैचें एक । एकासिचि ॥ ५-६१॥

अनुभव ज्याचा करावयाचा, आणि जोहि तो घेणारा | उभयचि विरले अनुभवासवे, शब्दा मग कुठला थारा || १९७

हरिची अनुभूति ज्यास होतसे, स्वयेच होई तोचि हरी | हरिने अनुभूति घेता हरिची, अनुभव जाई पैलतिरी || १९८.

मीचि मजला अनुभवणे ते, कोण अनुभवी कोणाला | परंतु ऐशी सुखद अनुभूति, अनुभवणारा नच उरला || १९९.

सौख्यानेची सुखा भोगणे, निखळ सुखाची अनुभूति | परि अनुभूति तीही विरली, आली केवळ सहज स्थिति || २००.

श्रुति सांगती नेति नेति, देह, बुद्धी नि मन नाही | आत्माकारवृत्तीची कल्पना, सोपटेच हे ते नाही || २०१.

आणि सोलिता सर्व सोपटे, एक हरिविणा कांही नुरे | अनंत असता सर्वव्यापी तो, अनुभूति म्हणुनि काय उरे ? || २०२.

अनुभवो हा ठाववरी । आपुलीचि अवसरी । तेथें अक्षरांची हारी । वाईल काई ? ॥ ५-६२ ॥

जेथे अनुभव त्रिपुटी विरते, अनुभव होई पूर्ण मुका | तेथे पंक्ती त्या शब्दांच्या, ठरती उपयोगास फुका || २०३.

कां परेसी पडे मिठी । तेथें नादासाळु नुठी । मा वावरिजैल ओंठीं । हें कें आहे ? ॥ ५-६३ ॥

शब्द वसतसे नादरूपाने, परेत आणि पुढे फिरे | पुन्हा परेतचि अंती येतसे, पराचि ती परि मुळी न उरे || २०४

शब्दचि नादी, ना तो सृजिता, काय बोलणे ओठांनी | आत्मअनुभूति विषय नसेची, कसे व्यक्तणे शब्दांनी || २०५.

चेइलियाही पाठीं । चेवणयाच्या गोठी । कां धाला बैसें पाठीं । रंधनाच्या ? ॥ ५-६४ ॥

पूर्ण जागता झोपेमधुनी, जागृत ते करणार कुणा ? | जेऊनीया ती तृप्ति येता, कुणासाठी सैंपाक पुन्हा? || २०६.

उदैजलिया दिवसपती । तैं कीं दिवे सेजे येती । वांचुनि पिकला शेतीं । सुइजताती नांगर काई ? ॥ ५-६५ ॥

सूर्य उगवता, दीप झोपती, कार्य संपले ते त्यांचे | पिकली असता सारी शेती, नांगर कां घालायाचे ?|| २०७.

म्हणोनि बंधमोक्षाचें व्याज । नाहीं; निमालें काज । आतां निरूपणाचें भोज । वोळगे जहीं ॥ ५-६६ ॥

बंध मोक्ष जंववरि कल्पना, तंवचि सत्-चित्-आनंद पदे | शब्द अन्यथा ना उपयोगी, मुक्त होतं जंव स्वानंदे || २०८.

परि कधी जंव निरूपण करणे, कोड पुरविण्या चर्चेचे | पदे तीनही ये उपयोगी, हे उपयोगचि शब्दांचे || २०९.

आणि पुढिला कां आपणापें । वस्तु विसराचेनि हातें हारपें । मग शब्देंचि घेपे । आठवूनियां ॥ ५-६७ ॥

आपण किंवा दुज्या हातुनि, गोष्ट हरवली विस्मृतीने | प्राप्त होतसे आपणासी ती, शब्दांनी जंव आठवणे || २१०.

येतुलियाहि परौतें । चांगावें नाहीं शब्दातें । जहीं स्मारकपणें कीर्तीतें । मिरवी हा जगीं ॥ ५-६८ ॥

शब्द तसे पडती उपयोगी, कांही विसरता, आठवुनि | स्मारकपण हा गुण त्यामाजी, जगी गाजतो, एक गुणी || २११ .

श्री ज्ञानेश्वर अमृत गंगा- कुंड पांचवे समाप्ती

श्री ज्ञानेश्वर अमृत गंगा –

कुंड ६ वे

[शब्द खंडन]

बाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु । अमूर्ताचा विशदु । आरिसा नव्हे ? ॥ ६-१ ॥

धन्यचि शब्द असे उपयोगी, विस्मरणी दे साथ मना | जसा आरसा प्रतिमा दावुनी, अमूर्तास दावी नयना ||१०

'तत्वमसि' या शब्दांनी तो, स्मरण देतसे जीवाला | अमूर्त रूपा स्वरूपस्मृतीचा, दावी दर्पण तो त्याला ||२.

पहातें आरिसा पाहे । तेथें कांहींचि नवल नव्हे । परि दर्पणें येणें होये । न पाहतें , पाहतें ॥ ६-२ ॥

दिसते त्यासी दावी आरसा, नवल यांत परि कांही नसे | अदृश्यासहि दावी शब्द तो, हा महिमा शब्दात असे ||३.

मायेने जो अंध जाहला, जीवा लाभता गुरुकृपा | शब्दाकरवी ज्ञानदृष्टीने, पाहू शके तो निजरूपा ||.४.

आत्मरुपाला पाहू न शकती, इंद्रिये नि मन बुद्धि कदा | वेद शास्त्र नि गुरु निर्देशिती, तया वापरुनी शब्दा || ५.

जे न जाणते; काय पाहणे, शुद्धचि चेतन जे की असे | प्रतिबिंबा पाहण्या घेतसे, शब्द सृष्टीचे ते आरसे || ६.

वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योत्कारु सूर्य जैसा । येणें येके गुणें आकाशा । अंबरत्व ॥ ६-३ ॥

अव्यक्तचि आकाश सृजितसे, शब्दसूर्य जो प्रगट करी | विश्वामधले सारे कांही, नभ 'अंबर' हे सार्थ तरी || ७.

अव्यक्ताचे वडिल घराणे, मूळ पुरुष कूटस्थ असे | कुटस्थ ब्रह्मा उदरी माया, महत्तत्त्व ते प्रसवितसे || ८.

पुत्र तमोगुण त्याचे उदरी, सृजन जये आकाशाचे | असल्या वंशी जन्म घेऊनी, सार्थक होई शब्दाचे || ९.

आपण तंव खपुष्प । परि फळ ते जगद्रूप । शब्द मवीतैं उमप । कोण आहे ? ॥ ६-४ ॥

ख-पुष्प असता, शून्यामधले, दृश्यादृष्या प्रगट करी | असे जगती या कांही असेना, मोजमाप ते कठीण जरी || १०.

शब्द तसा तो आधी नव्हता, नंतरही विरुनी जाई | अभावात्मकचि असे तरीही, जगाएवढे फळ देई ||११.

या जगताचे पदार्थ सारे, रंग रूप गुण धर्म तसे | कुणास कोठे कधि वापरणे, शब्दचि ज्ञाना देत असे || १२ .

शब्द सागरा अथांग खोली, असीमची विस्तार असे | थांग काढण्या कुणी न सक्षम, व्याप ध्यानी तो येत नसे || १३ .

जरि अगोचर शब्द स्वये तो, खेळ जगती तो खेळतसे | नित्य बदलते, मांडी प्रदर्शन, मुर्तिरूपे हरि दावितसे || १४

विधिनिषेधांचिया वाटा । दाविता हाचि दिवटा । बंधमोक्ष कळिकटा । शिष्टु हाचि ॥ ६-५ ॥

विधिनिषेध वाटांना दावी, मशालजी बनुनिया स्वये | मुळात नाही तेहि निर्मिले, बंध मोक्षहि जगती तये || १५.

नित्यमुक्तचि जीव जरीहि, बद्ध भासवित तो त्याला | कर्मकांड नि साधन विधीच्या, स्तोमाने त्या गांजविला || १६.

अनासक्त जरि शिव असताही, आसक्तीने त्या पळवी | 'तुझे' नि 'माझे' वृथा बिंबवुनि, कलह फुकाचा तो लावी || १७.

हा अविद्येचा आंगीं पडे । तैं नाथिलें ऐसें विरूढे । न लाहिजे तीन कवडे । साचा वस्तु ॥ ६-६ ॥

सख्य अविद्येसि तो करिता, मिथ्याहि सत्यचि वाटे | आणि सत्य जे असेचि शाश्वत, ते परि वाटतसे खोटे || १८.

मित्थाचि जी असे अविद्या, पक्ष तियेचा हा धरितो | सत्यत्वे व्यवहार रूढवी, हरिदर्शनि परि फोलचि तो || १९.

जीवा गुंतवी देहबुद्धितचि, असत्य भासवी सत्य तया | तिन कवड्याहि त्या ना किंमत, जेंव्हा उमगे ही माया || २०.

मूल अक्षरा ॐ ला धरुनी, करवी साधना श्रुति करवी | निज महतीला सांभाळोनी, अविद्येस जागृत ठेवी || २१.

मिथ्या बंधनास घालवी, ऐसी ख्याति त्याची असे | धावे जग त्यामागुनी अन्यथा, किम्मत तिन कवड्याही नसे || २२

शुद्ध शिवाच्या शरीरीं । कुमारु हा जिउ भरी । जेवीं आंगें पंचाक्षरी । तेवींचि बोलु ॥ ६-७ ॥

शुद्ध शिवाच्या शिरुनी अंगी, बिंबवी तू तर जीव असे | नसत्या भूता, भगत जाणवी, मंत्र म्हणोनि उतरवी तसे || २३

निर्दोष नि तो शुद्ध असे शिव, कर्मफलांचे भय दावी | सोडविण्यास्तव वृथा तयाला, जन्म-मृत्यु चक्री फिरवी || २४

पिशाच्च नसता, भासवुनि त्या, जैसे मांत्रिक ते पळवी | तैसे जीव दशेस भोगवी, मुक्तीची आशा दावी || २५

योग याग विधि यांत गुंतवी, कधि सन्मार्गा परि लावी | निजांगीच ज्योतिर्लिंगाते, अहं सोडिता ते दावी || २६.

जिउ देहें बांधला । तो बोलें एके सुटला । आत्मा बोलें भेटला । आपणयां ॥ ६-८ ॥

जिवास ठेवी देहबंधनी, अहंभाव बहु जपुनि असे | शब्द शिकवी 'अहं ब्रह्मास्मि' अहंभाव त्यातही वसे || २७.

देह बुद्धिने जीव बांधिला,' तत्वमसि' गुरु त्या बोधे | आपणासी भेटताचि आपण, आत्मज्ञान तये साधे || २८.

असा चतुर हा बंध भासवी, आणि सोडवी शब्दांनी | कधी वृथा अभिमान देतसे, अडकवीत ज्ञाता म्हणुनी || २९

दिवसातें उगो गेला । तंव रात्रीचा द्रोहो आला । म्हणोनि सूर्यो या बोला । उपमा नव्हे ॥ ६-९ ॥

दिवसा उगवी, रात्र सारुनी, 'रात्र द्रोही' आरोप असे | म्हणुनी उपमा ती सूर्याची, शब्दालागी देत नसे || ३०

सूर्य उगवुनि दिवसा प्रगटे, रात्रीस आधी मारी परि | शत्रू रात्रीचा, सखा दिनाचा, आरोपचि भास्करावरी || ३१.

परी शब्द ना विषम आचरी, मित्रचि बंध नि मोक्षाचा | म्हणुनि उपमा त्या न रवीची, शब्द स्नेही तो उभयांचा || ३२

जे प्रवृत्ति आणि निवृत्ति । विरुद्धा ह्या हातु धरिती । मग शब्देंचि चालती । एकलेनि ॥ ६-१० ॥

प्रवृत्ती नि निवृत्तीही, विरोधी ती, धरुनी हाती | कैवल्याच्या वाटेवरूनी, शब्द साधका ते नेती || ३३

शब्द चालवी प्रवृत्तीला, देहबुद्धीतचि गुंतवुनी | एकलाची वैराग्य विवेके, निवृत्ती बोधा आणी || ३४

स्वधर्म वेगळाची व्यक्तींचा, कर्मी प्रवृत्ती एका | दुज्यास तीचि परि निवृत्ति, शब्द परि उभयासि सखा || ३५

सहाय आत्मविद्येचें । करावया आपण वेंचे । गोमटे काय शब्दाचें । येकैक वानूं ॥ ६-११ ॥

सहाय्य आत्मविदयेस कराया, आहुति जे देती आपुली | महती शब्दांची वर्णावी अल्पचि होई ते तितुली || ३६

शब्द देत ते सहाय्य पुरते, देण्या निजरूप अनुभूति | द्वैतद्वैता संधीपाशी, शब्द देत निज आहूती || ३७

आत्मरुपाशी समरसतांना, महावाक्यहि दूर हवे | हरि प्राप्तिस्तव वृत्ति कल्पना, शब्द भाव हि सोडावे || ३८

अशी शुद्धता, शून्यभावहि, असता सहजी समरसता | पूर्ण अनंताची अनुभूति, शब्द भाव आदि विरता || ३९

येता अंतरी पूर्ण रितेपण, सहजि निजरुप अनुभूती | हेचि केळिच्या गाभ्याभवती, सकल सोपटे गच्छंती || ४०

किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु । परी ययाही संबंधु । नाहीं येथें ॥ ६-१२ ॥

शब्द पटाईत स्मरण कराया, जरी विसरले मनी कांही | परी आत्मा तर नित्यची जागृत, स्मरणाची गरजची नाही || ४१

परंतु येथे शब्द ख्यात जो, स्मरणदानी सर्वत्र असे | त्याचा ना संबंध प्रतितीशी, स्वसंवेद्यता आत्म्यात वसे || ४२

शब्द होई कीर्ति आत्म्याची, स्मरण करुनी दे पुनःपुन्हा | ओळख आत्म्या नच शब्दाची, गौरवीत तो ब्रह्मपणा || ४३

आत्मया बोलाचें । कांहींचि उपेगा न वचे । स्वसंवेद्या कोणाचें । ओझें आथी ? ॥ ६-१३ ॥

स्व-संवेद्यचि आत्मरूप ते, प्रांत न तो तर शब्दांचा | सहाय्य कवणाचे ते नलगे, बोध आपुला आपणाचा || ४४

शब्द न उपयोगी आत्म्यासि, स्वयंसिद्ध तो ज्ञानी असे | पूर्ण ज्ञानमय आत्म्यालागी, पर-ओळखीची गरज नसे || ४५

आठवे कां विसरे । विषो होऊनि अवतरे । तरी वस्तूसी वस्तु दुसरें । असेना कीं ॥ ६-१४ ॥

सर्वव्यापी ती एकचि वस्तु, विषय दुज्याचा ना होई | आपणची हे सारे असता, विसर नि आठव त्या नाही || ४६

आठव आणि विसर संभवे, विषय-विषयी हे भाव जिथे | आत्मस्वरूपी दुजे स्वरूप ना, स्मरण नि आठव नाही तिथे || ४७.

आपण आपणयातें । आठवी विसरे केउतें ? । काय जीभ जिभितें । चाखे न चाखे ? ॥ ६-१५ ॥

कैसा विसर नि आठव आपुला, आपणाविणा अन्य नसे | काय जीभ ती निजस्वादाला, चाखे वा ना चाखितसे ?|| ४८

जागतेया नीद नाही । मा जागणें घडे काई ? । स्मरणास्मरण दोन्हीही । स्वरूपीं तैसीं ॥ ६-१६ ॥

पूर्ण जागृती सावधानता, निद्रा जागृती भाव नसे | विसर नि आठव ना स्वरूपीही, स्व-स्थ भाव हा एक वसे || ४९

पूर्ण जागता येई सजगता, जागृती निद्रा दोन्ही नसे | स्मरणास्मरणहि उभयी नसती, स्वरुपाठायी ते तैसे || ५०

परंतु येथे शब्द ख्यात जो, स्मरणदानी सर्वत्र असे | त्याचा ना संबंध प्रतितीशी, स्वसंवेद्यता आत्म्यात वसे || ५१

बोध अखंडचि निजस्वरुपाचा, सद्विद्येने जंव होई | ज्ञानजागृती लाभे तेंव्हा, स्मरण आपुले नित राही || ५२.

सूर्यो रात्री पां नेणें । मा दिवो काय जाणें ? । तेवीं स्मरणास्मरणे वीण । आपण वस्तु ॥ ६-१७ ॥

मार्तंड न रात्रीस जाणतो, दिवस काय मग तो जाणे?| तैसा स्वरूपी अभाव उभया, विना स्मरण वा विस्मरणे || ५३

अस्तांगत तो भास्कर होता, रात्रीचा अंधार पडे | परि न भास्करा रात्रचि माहित, जयामुळे दिनरात घडे || ५४

रवि नेणे तो दिवस रात्रही, नित्य स्वरुप उजेडाचे | स्मरणास्मरणा आत्मा नेणे, भान तया निजरूपाचे || ५५

श्रीहरी विसरे निजस्वरूपाशी, कदापिही ऐसे न घडे | अभाव जेथे विस्मरणाचा, आठवणीचे स्मरण दडे || ५६

एवं स्मरणास्मरण नाहीं । तरि स्मारकें काज काई ? । म्हणौनि इये ठाईं । बोलु न सरे ॥ ६-१८ ॥

उपयोगी विस्मरणी शब्द ये, स्मरण करुनिया देण्याला | स्वरूपी तर ते उभयही नाही, म्हणुनी वाव न शब्दाला || ५७

मुख्य काम जे स्मरणदानीचे, शब्द येथं निरुपयोगी | परमधामी त्या मंगल हरीच्या, शब्द म्हणुनि ना उपयोगी || ५८

आणिक येक शब्दें । काज कीर भलें साधे । परि धिंवसा न बंधे । विचारु येथें ॥ ६-१९ ॥

मनी एक उपयोग वाटतो, होईल जेणे शब्दाचा | धैर्य न येई व्यक्त विचारा, सांगावे की, नच याचा || ५९

परि शास्त्रकाराशी वाटते, एक कार्य होईल भले | समर्थता शब्दांची पाहता, विचार परि ते लटपटले || ६०

कां जे बोलें अविद्या नाशे । मग आत्मेनि आत्मा भासे । हें म्हणतखेवो पिसें । आलेंचि कीं ॥ ६-२० ॥

शब्द नाशवी अज्ञानाला, सुगम आत्मबोध हो जेणे | जे नाही ते कसे नासणे (!), वेडेपण या कुणी म्हणे || ६१

अविद्येस शब्दांनी नाशिता, आत्म्या अनुभुति स्वरुपाची | वेडेपण हे विचार करिता, कींवचि येते शब्दांची || ६२

सूर्यो राति पां मारील । मा आपणया उदो करील । हे कुडे न सरती बोल । साचाच्या गांवीं ॥ ६-२१ ||

'रात्र मारल्याविणा न भास्कर, करू शके तो निज उदया' | म्हणणे, विचारीच वेडेपण, जाणती जे याच्या आशया || ६३

चेईलें निदे रुसे । ऐसी कें नीद असे ? । कीं चेईलें चेवो बैसें । ऐसें चेणें आहे ? ॥ ६-२२ ॥

रुसल्याविण ना निद्रेवरती, काय जागृती न त्या योगे ?| जागृत असता जागेपण ते, काय जागवावे लागे || ६४

जागेपणी निद्रेवरि रुसणे, निद्रा कां ऐसी असते ?| काय जागृती ऐशी असते, संबोधुनी कां ती येते?|| ६५

जागृतीचा तो अभाव निद्रा, ती न व्यक्ति वा वस्तु कुणी | जागृती हीहि असे अवस्था, प्रत्यय केवळ अनुभवुनी || ६६

म्हणोनि नाशापुरती । अविद्या नाही निरुती । नाहीं आत्मा आत्मस्थिति । रिगे ऐसा ॥ ६-२३ ॥

अविद्या न होतसे कदापि, अडथळा ती बोधासाठी | | अविद्येस संबंध असेना, नित्य हरीची आत्मस्थिती || ६७

अविद्या न कुणी अशी अस्तित्वी, नाश जियेचा होऊ शके | व्हावे समरस जयात ऐसे, आत्मरूपहि ना परके || ६८

सदा प्रकाशित आपुले ठायी, निजस्वरूप ऐसेची असे | साधनांची ती गरज कशाला ? मजपासुनी जे अलग नसे || ६९

अविद्या तंव स्वरूपें । वांझेचें कीर जाउपें । मा तर्काचें खुरपें । खांडे कोणा ? ॥ ६-२४ ॥

अविद्येस अस्तित्व असेना, निपुत्रिकाचे पोर जसे | अस्तित्वातचि नाही तयाला, तर्के खांडणेहि कैसे ?|| ७०

इंद्रधनुष्या सितें । कवण धनवईन लाविजेतें । तें दिसें तैसें होतें । साच जरी ? ॥ ६-२५ ॥

इंद्रधनूच्या प्रत्यंचेला, कुणी लाविला बाण कधि? | दिसते तैसे जरी ते असते, असती मिळाली ती संधी || ७१

अगस्तीचिया कौतुका । पुरती जरी मृगतृष्णिका । तरी मार देतो तर्का । अविद्येसी ॥ ६-२६ ॥

समुद्र प्राशन अगस्ति मुनिचे, मृगतृष्णाचि शमवीते | तरी शब्दबल खचितचि पुरते, अविद्येस ते संहरिते || ७२

साहे बोलाची बळघी । ऐसी अविद्या असे जगीं । तरी जाळुं ना कां आगी । गंधर्वनगरें ? ॥ ६-२७ ॥

चाल करुनिया अविद्येवरि, मारिल शब्द तियेस जरि | तरी आगीने खुशाल जळु दे, गगनातिल गंधर्वपुरी || ७३

नातरी दीपाचिये सोये । आंधारु कीर न साहे । तेथें कांहीं आहे । जावयाजोगें ? ॥ ६-२८ ॥

दीपक येता सहजी जाई, वास्तुमधुनी अंधार | खरेचि गेले काय कांही ते, दारामधुनी बाहेर ? || ७४

नच अंधार ती कांही वस्तु, कांही कारणे ती जाणे | तो तर केवळ अभावचि की, उजेड असता तो नसणे || ७५

प्रकाश ना नाशी अंधारा, निज-अभाव तो दूर करी | अविद्याहि ना कांही वस्तु, ज्ञान अभावा म्हणती परी || ७६

नातरी पाहावया दिवसु । वातीचा कीजे सोसु । तेव्हढाहि उद्वसु । उद्यमु पडे ॥ ६-२९ ॥

दिवस पहाया तेल वातीचा, दीप लावणे फोल असे | उगाच श्रम कां ते शोधाया, स्वयंभूच सर्वत्र वसे || ७७

जेथें साउली न पडे । तेथें नाही जेणें पाडें । मा पडे तेथें तेव्हडे । नाहींच की ॥ ६-३० ॥

जेथं ना पडे आपुली छाया, हेचि कळे नाही तेथे | परि पडते ती जेथं कुठेही, खरेचि अस्तित्वी असते ?|| ७८

सावली न पडते ती जेथे, दावाया कांही नसते | परंतु जेथे पडते तेथे, उचलताहि ना ये तीते || ७९

जरी दिसे ती स्पष्ट लोचना, केवळ खेळ अभावाचा | जरि दृष्टीचा विषय असे ती,असे अभाव उजेडाचा || ८०

दिसतचि स्वप्न लटिकें । हें जागरीं होय ठाउकें । तेविं अविद्याकाळीं सतुकें । अविद्या नाहीं ॥ ६-३१ ॥

स्वप्नीचे ते दरिद्र-वैभव स्वप्नी भासते सर्व खरे | उमगे जागृतीत तो भासचि, तैसे अज्ञानी सारे || ८१

प्रभाव अज्ञानाचा असता, मिथ्याहि सत्यची भासे | ज्ञानप्रकाशी विरेचि विपरीत, यथार्थचि ते सकल दिसे || ८२

झोप संपता, स्वप्नचि लटिके, जागृतीत हे पूर्ण कळे | ना तैसे अस्तित्व अविद्ये, येत प्रतीति जरि त्या वेळे || ८३

वोडंबरीचिया लेणिया । घरभरी आतुडलिया । नागवें नागविलिया । विशेषु काई ॥ ६-३२ ॥

अलंकार जादू विद्येने, विविध गारुडी ते दावी | नजरबंदीचा खेळचि केवळ, काय भरुनि पेट्या ठेवी || ८४

नसेचि हार नि गोट पाटल्या, केवळ आभासास फसे | नंगा जाता जरि रस्त्याने, लुटण्या कां कुणी जात असे ?|| ८५

मनोरथाचें परियळ । आरोगिजतु कां लक्ष वेळ । परि उपवासावेगळ । आनु आथी ? ॥ ६-३३ ॥

मनोरथाचे खाऊनी मांडे, आंबेरस नि पुरणाचे | खोटा ढेकर उपवासचि तो, रिक्त हाल खाणाराचे || ८६

मृगजळ जेथ नुमंडे । तेथ असे पां कोरडें । मा उमंडे तेथें जोडे । वोल्हांसु काई ? ॥ ६-३४ ॥

मृगजळ नाही, भूमी कोरडी, परि ते भासे तेथंतरी | ओल कदा ना असेचि तेथे, दृष्टीस भासे पाणी जरी || ८७

हें दिसे तैसें असे । तरी चित्रीचेनि पाउसें । वोल्हावतु कां मानुसें । आगरा तळीं ॥ ६-३५ ॥

दिसते तैसेचि जरि असते, चित्र पाहता वर्षेचे | ओले होतील बघणारे ते, तलाव तुडुंबचि पाण्याचे || ८८

कालवूनि आंधारें । लिहों येती अक्षरें । तरी मसीचिया बोरबारें । कां सिणावें ? ॥ ६-३६ ॥

काळोखाची करुनी शाई, शक्य जरि होई लिहिणे | खटाटोप तो सारा टळला, वृथाचि ते शाई करणे || ८९

आकाश काय निळें । न देखतु हे डोळे ? । तेवीं अविद्येचि टवाळें । जाणोनि घेईं ॥ ६-३७ ॥

स्पष्ट निळेचि आभाळ दिसते, डोळे पाहती रोज तया | तैसीचि अस्तित्वी अविद्या, ही सारी केवळ माया || ९०

अविद्या येणें नांवें । मी विद्यमानचि नव्हे । हे अविद्याची स्वभावें । सांगतसे ॥ ६-३८ ॥

नांव तियेचे असे अविद्या, स्वयेचि सुचवी, मी न असे | विद्यमान जी मुळीच नाही, तिचिये असणे ते कैसे ? || ९१

आणि इये अनिर्वाच्यपण । तें दुजेंही देवांगण । आपुल्या अभावीं आपण । साधीतसे ॥ ६-३९ ॥

शपथ घेउनी देव अंगणी, सांगे नसणेपण आपुले | पुरे पुरावा इतुकाचि तो, व्यर्थ सांगणे कां बोले || ९२

नसलेपणचि नांव दर्शवी, शब्दि न वर्णन होऊ शके | हीच सिद्धता अभावतेची, भास देतसे जरि लटके || ९३

का हीच जरी आहे । तरी निर्द्धारु कां न साहे ? । वरी घटाभावें भोये । अंकित दिसे ? ॥ ६-४० ॥

जरि अविद्या अस्तित्वातचि, वस्तुगुणे यावी प्रतीति | कधीच घट तो नाही ठेविला, भूमि घटाविण कां म्हणती || ९४

अविद्या नाशी आत्मा । ऐसी नव्हे प्रमा । सुर्या आंगीं तमा । जयापरी ॥ ६-४१ ॥

नाशिल्याविणा जरि अविद्या, आत्मदेव ये उदयाला | फोल बोलणे, ना सूर्योदय, नाशिल्याविणा रात्रीला ?|| ९५

हे अविद्या तरी मायावी । परि मायावीपणचि लपवी । साचा आली अभावी । आपुला हे ॥ ६-४२ ॥

असे अविद्या ती मायावी, परि मायावीपण लपवी | अभाव हेचि असणेपण तिज, कल्पनेतुनि डोकावी || ९६

बहुतापरी ऐसी । अविद्या नाहीं आपैसीं । आतां बोलू हातवसी । कवणापरी ॥ ६-४३ ॥

ऐसा घेता हा धुंडोळा, समजे अस्तित्वची नाही | अभावरूपे असे अविद्या, नाशाची वार्ता कां ही ?|| ९७

खोल विचारे उमजे हेचि, मायेला अस्तित्व नसे | शब्द कोणते योजु सांगण्या, परि हेचि ते सत्य असे || ९८

साउलियेतें साबळें । हालयां भोय आदळे । कीं हालेनि अंतराळें । थोंटावे हातु ॥ ६-४४ ॥

सळईने सावलीला मारिता, भुमीवरली धूळ उडे | थप्पड अंतराळाशी मारिता, श्रम हाताला वृथा पडे || ९९

कां मृगजळाचा पानीं । गगनाचा अलिंगनीं । नातरी चुंबनीं । प्रतिबिंबाचा ॥ ६-४५ ॥

मृगजळपाने तृषा शमविणे, मिठी मारणे अवकाशा | निज प्रतिबिंबा चुंबन घेणे, क्रिया सर्व या व्यर्थ जशा || १००

उठावला वोथरे तवंका । तो सुनाथ पडे असिका । अविद्या नाशीं तर्का । तैसें होय ॥ ६-४६ ॥

व्यर्थची होतील ते श्रम सारे, स्फूर्ति नि यत्नहि व्यर्थचि ते | वृथा खटाटोप तर्काचे, अविद्येस नाशायाते || १०१

ऐसी अविद्या नासावी । वाहेल जो जीवीं । तेणें साली काढावी । आकाशाची ॥ ६-४७ ॥

अशी अविद्या नाशीन मीचि, पैज मारुनी जो बोले | त्याने खुशाल काढावी की, आकाशाची ती साले || १०२

तेणें शेळीगळां दुहावीं । गुडघां वास पाहावी । वाळवोनि काचरी करावी । सांजवेळेची ॥ ६-४८ ॥

ऐसे करण्या जो सरसावे, अजागळाला दोहे तो | की गुढघ्याने मार्ग पाहतो, सांजवेळ जणु सुकवितो || १०३

जांभई वांटूनि रसु । तेणें काढावा बहुवसू । कालवूनि आळसू । मोदळा पाजावा । ६-४९ ॥

पाट्यावर जांभया वाटुनी, उत्तम रस तो काढावा | कालवुनी त्या आळसामाजी, पुतळ्याला तो पाजावा || १०४

तो पाटा पाणी परतु । पडली साउली उलथु । वारयाचे तांथु । वळु सुखें ॥ ६-५० ॥

जलओघा उलटे फिरवावे, सावलीस की उलथावे | झुळुक वायुची हाती धरुनी, त्याचे तंतु वाळावे || १०५

तो बागुलातें मारू । प्रतिबिंब खोळे भरू । तळहातींचे विंचरू । केंस सुखें ॥ ६-५१ ॥

बागुलास त्याने मारावे, प्रतिबिंबा बांधी पदरी | तळहातीचे केंस विंचरुनि, छान तया मालीश करी || १०६

घटाचें नाहींपण फोडू । गगनाची फुलें तोडू । सशाचें मोडू । शिंग सुखें ॥ ६-५२ ॥

नसत्या घटास फोडुनी टाकू, फुले तोडू आभाळाची | ससा पकडुनी आरामाने तुकडे करूया शिंगाची || १०७

तो कापुराची मसी करू । रत्नदीपीं काजळ धरू । वांजेचें लेंकरूं । [अरणु सुखें ॥ ६-५३ ॥

कापुर जाळुनि शाई करितो, रत्नदीपि धरि काजळ तो | नि वांझेच्या कन्येसंगे, विवाह आनंदे करितो || १०८

तो अंवसेनेचि सुधाकरें । पोसू पाताळीची चकोरें । मृगजळींचीं जळचरें । गाळूं सुखें ॥ ६-५४ ॥

अंवसेच्या शशिकिरण अमृते, चकोर पोसु पातळीचे | फेकुनी जाळे आरामाने, मासे धरूया मृगजळीचे || १०९

अहो हें किती बोलावें । अविद्या रचिली अभावें । आतां काई नाशावें । शब्दें येणें ॥ ६-५५ ॥

अभावेची ती असे अविद्या, फोलचि कां ते बोलावे | जी नाहीची अशी अविद्या, शब्दे कैसे नाशावे || ११०

किती सांगु मी अशाच गोष्टी, अभावातचि फक्त वसे | अशी अविद्या नसेचि जगती, शब्दे सांगू मी कैसे ? || १११

नाहीं तयाचे नाशें । शब्द न ये प्रमाणदशे । अंधारीं अंधारा जैसें । नव्हे रूप ॥ ६-५६ ॥

जे नाही त्या नाशुनी कैसे, येईल शब्द प्रमाणदशे | अंधाराचे वर्णन करण्या रूप तयाचे सांगू कसे?|| ११२

अस्तित्वचि ज्या नसे तयाचा, नाश शब्द तो करी कसे | कैसे गौरविता शब्दाला, केले नसत्या नाहीसे || ११३

जरि दिसे अंधार लोचना, तरि तो कांही वस्तू नसे | अविद्याहि ती अभावरूपि, कोण तिला मारिल कसे ?|| ११४

अविद्येची नाहीं जाती । तेथें नाहीं म्हणतया युक्ती । जेवी दुपारीं कां वाती । आंगणींचिया ॥ ६-५७ ॥

जन्म न झाला, तिज नाशास्तव युक्ति शोधणे व्यर्थ जसे | ऐन दुपारी दीप लावणे, अंगणात ते व्यर्थ असे || ११५

अविद्याचि ती मुळि न जन्मली, कैसा नाश तिचा होई | शब्दांनी ते तिला मारिले, या बोला अर्थचि नाही || ११६

जे नाही ते कसे नाशणे, असंभवा कां गौरविणे | अंधारासम असे अविद्या, नसे जन्म कैसे मरणे || ११७

विद्या नसणे हे सांगाया, नाम अविद्या जिचे असे | वेगळे न अस्तित्व तियेला, स्वयंभू विद्या हृदयी वसे || ११८

मायेनेचि प्रगट न विद्या, माया जाता ती प्रगटे | गुरुकृपेने माया विरता, जणु विद्येची पहाट फुटे || ११९

न पेरितां शेती । जे कीं सवगणिया जाती । तयां लाजेपरौति । जोडी आहे ? ॥ ६-५८ ॥

नाही पेरिला एकही दाणा, शेतामध्ये केंव्हाही | जाती शेता धान्य काढण्या, पडेल पदरी ते कांही ? || १२०

रित्याची गाड्या ये माघारी, लाजेने ना मुख दावी | कुणा सांगणे काय सुचेना, खटपट कां ही उगा हवी ? || १२१

खवणियाच्या आंगा । जेणें केला वळघा । तो न करितांचि उगा । घरीं होता ॥ ६-५९ ॥

नग्नापाशी जाऊनिया ते, भीक मागणे त्यापाशी | फुकाचि श्रम हे, त्याहूनी बरवे, घरी करी आरामाशी || १२२

पाणियावरी वरखु । होता कें असे विशेखु । अविद्यानाशी उन्मेखु । फांकावा तैसा ॥ ६-६० ॥

वृथा सागरावरी ती वर्षा, मर्यादा तो ना सोडी | उगाच कां उत्साह अंगी तो, अविद्येस शस्त्रे तोडी || १२३

नाश अविद्येचा करणे वा, नच करणे हे व्यर्थ तसे | जी नाही ती असणे नसणे, करावेच कां यत्न असे ?|| १२४

माप मापपणें श्लाघे । जंव आकाश मवूं न रिघे । तम पाहतां वाउगें । दीपाचें जन्म ॥ ६-६१ ॥

मोजायाचे ना आकाशा, तोवरी शोभा मापाची | जोवरी अंधारा घालविणे, शोभा तोवरी दीपाची || १२५

गगनाची रससोये । जीभ जैं आरोगु जाये । मग रसना हें होये । आडनांव कीं ॥ ६-६२ ॥

रसनेने आकाश चाखणे, उल्लंघन मर्यादेचे | ते केले तर रसना हे तर, आडनांव होईल तिचे || १२६

स्वाद नभाचा जिंव्हा घेता, शब्दाविण जिथं कांही नसे | रस समजेना, म्हणुनि रसना नाम व्यर्थचि होत असे || १२७

नव्हतेनि वल्लभे । अहेवपण कां शोभे । खातां केळीचे गाभे । न खातां गेले ॥ ६-६३ ॥

वल्लभ जाता, ना अहेवपण, नसेचि ती सौभाग्यवती | पोकळ गाभा खात केळीचा, उपवासी परि श्रम होती || १२८

स्थूळ सूक्ष्म कवण येकु । पदार्थ न प्रकाशी अर्कु । परि रात्रीविषयीं अप्रयोजकु । जालाचि कीं ॥ ६-६४ ॥

सूर्या त्रिभुवनी सारे दिसते, स्थूल असो वा सूक्ष्म जरी | आम्ही पाहतो रोज रात्र ती, त्यास दिसेना तीच परि || १२९

स्थूल सूक्ष्म ते असो कसेही, सूर्य प्रकाशीत तो सकला | जिला पाहिले नाही कदापि, दाखवी न त्या रात्रीला || १३०

दिठी पाहतां काय न फावे । परि निदेतें तंव न देखवे । चेता ते न संभवे । म्हणोनियां ॥ ६-६५ ॥

दृष्टी पाहते सारे जगती, परि नच पाही निद्रेला | जागृत तोवरी तिचे पाहणे, निद्रा नच ये दृष्टीला || १३१

चकोराचिया उद्यमा । लटिकेपणाची सीमा । जरि दिहाचि चंद्रमा । गिंवसूं बैसे ॥ ६-६६ ॥

अमृत प्राशन करिण्यासाठी, दिवसा शोधीत चंद्राला | तरि चकोर श्रम व्यर्थचि जाती, उद्यम फोलचि तो गेला || १३२

नुसुधियेचि साचा । मुका होय वाचरुकाचा । अंतराळीं पायांचा । पेंधा होय ॥ ६-६७ ॥

कोरा कागद दिला वाचण्या, मुकाच तो वाचक होतो | वेगवान जरि उत्तम चाले, अवकाशी चालू न शकतो || १३३

तैसीं अविद्येसन्मुखें । सिद्धचि प्रतिषेधकें । उठलींच निरर्थकें । जल्पें होतीं ॥ ६-६८ ॥

शब्दांनी नाशणे अविद्या, फोलचि श्रम होती तैसे | नसेच ती तर जगती अविद्या, तिज मग मारणेहि कैसे ?|| १३४

अस्तित्वचि ते नसे जियेला, व्यर्थ बोलणे तिज विषयी | नाशास्तव कां तयार होणे, मुळात जी कोठे नाही || १३५

अंवसे आला सुधाकरु । न करीच काय अंधकारु ? । अविद्यानाशीं विचारु । तैसा होय ॥ ६-६९ ॥

अंवसेच्या रात्रीस चंद्रमा, अंधकार न परी सरे | तैसा विचार तो नाशाचा, अविद्येसहि फोल ठरे || १३६

नाना न निफजतेनि अन्नें । जेवणें तेंचि लंघनें । निमालेनि नयनें । पाहणाचि अंधु ॥ ६-७० ॥

अजुनी ना सैंपाक जाहला, जेवणे न परि लंघन ते | दृष्टी जाता बघणे नयने, अंध पाहणे ते होते || १३७

कैसीही वस्तु नसे । जैं शब्दाचा अर्थ हों बैसे । तैं निरर्थकपणें नासे । शब्दहि थिता ॥ ६-७१ ॥

जे नाही ते शब्दि वर्णने, वृथा बोलणे ते होई | बोल निरर्थक, शब्दासंगे, सारेची वाया जाई || १३८

आतां अविद्याचि नाहीं । हें कीर म्हणो काई । परी ते नाशितां कांहीं । नुरेची शब्दाचें ॥ ६-७२ ॥

सकल सांगणे सार हेचि की, अविद्येस अस्तित्व नसे | तरि शब्दांना स्फूर्ति नाशण्या, तेचि लयासि जात असे || १३९

यालागि अविद्येचिया मोहरां । उठलियाहि विचारा । आंगाचाची संसारा । होऊनि ठेला ॥ ६-७३ ॥

म्हणुनि अविद्या नाश विचारहि, शब्दाद्वारे तो उठता | नसे अविद्या म्हणुनी तोही, जात असेचि लयपंथा || १४०

म्हणोनि अविद्येचेनि मरणें । प्रमाणा येईल बोलणें । हें अविद्याचि नाहींपणें । नेदी घडों ॥ ६-७४ ॥

जेथं नसेचि अविद्या तिला, फुका बोल मारायाचे | अस्तित्वचि ते नसे तियेला, कैसे ते नाशायाचे || १४१

आणि आत्मा हन आत्मया । दाऊनी बोलु महिमेया । येईल हें साविया । विरुद्धचि ॥ ६-७५ ॥

शब्दा नसेचि सामर्थ्यहि ते, वर्णे आत्मदेव महिमा | आत्मा स्वयंसिद्ध असेची, त्याचा स्वयंभूचि गरिमा || १४२

आत्म्याला आत्माचि दाविणे, समर्थ शब्दचि ते होती | श्रुतिसंगत ना असे बोलणे, अद्वैता गणणे द्वैती || १४३

तदाकार होणे आत्म्याशी, स्वसंवेद्यता वा जाणुनिया | श्रुति सांगती दोन मार्ग हे, स्वरुपाची प्रतीति याया || १४४

आपणया आपणपेंसी । लागलें लग्न कवणे देशीं । कीं सूर्य अंग ग्रासी । ऐसें ग्रहण आहे ? ॥ ६-७६ ॥

कोणता असे देश असा तो, लग्न होत ते आपणाशी? | कधीतरी ते सूर्यानेची, ग्रासियले ते आपणाशी? || १४५

गगन आपणया निघे ? । सिंधु आपणा रिघे ? । तळहात काय वळघे । आपणयां ? ॥ ६-७७ ॥

आकाशी आकाश शिरे कां, डुंबे सागरी सागर तो | आपुलाची तळहात कधीही, आपणावरी चढेल तो? || १४६

कधि आपुल्या तळहाताने, घट्ट धरियले आपणाशी | तरीच आत्मा प्रकाशील तो, स्वयेचि कि हो आत्म्याशी || १४७

सूर्य सूर्यासि विवळे ? । फळ आपणया फळें ? । परिमळु परिमळें । घेपता ये ? ॥ ६-७८ ॥

सुर्यचि प्रकाशवी कां सूर्या, फळास कां फळ ये दुसरे | किंवा परिमल निज गंधाला, स्वयेचि हुंगी सौख्यभरे ?|| १४८

चराचरा पाणी पाजणी । करूं येईल येके क्षणीं । परि पाणियासि पाणि । पाजवे कायी ? ॥ ६-७९ ॥

क्षणात एका चराचराला, देता येईल ते पाणी | परि पाण्याला पाणी पाजणे, शक्य करिल कां काय कुणी ?|| १४९

साठीं तिशा दिवसां । माजीं एखादा ऐसा । जे सूर्यासीच सूर्य जैसा । डोळा दावी ॥ ६-८० ॥

अखिल विश्वहि करित प्रकाशित, पाहतसे त्रैलोक्याला | वर्षामाजी एक दिवस तरि,पाहिल दिनकर आपणाला ?|| १५०

कृतांत जरी कोपेल । तरी त्रैलोक्य हें जाळील । वांचूनि आगी लावील । आगीसि काई ? ॥ ६-८१ ॥

कृतांत जरि कोपला असा की, जाळिल या त्रैलोक्याला | सांगा जाळिल तोचि काय ते, पुरते तेचि अग्नीला ?|| १५१

आपणपें आपणया । दर्पणेवीण धात्रेया । समोर होआवया । ठाकी आहे ? ॥ ६-८२ ॥

शक्य असे कां दर्पणाविना, चतुर्वदन त्या ब्रह्म्यासी | स्वयेचि नेत्री निरखुनिया ते, आपुली मुखे बघण्याशी || १५२.

दिठी दिठीतें रिघों पाहे ? । रुचि रुचीतें चाखों सुये ? । कीं चेतया चेतऊं ये ? । हें नाहींच कीं ॥ ६-८३ ॥

दृष्टी पाहिना निज दृष्टीला, जीभ न चाखी निज स्वादा | जागृत असताहि आपणाला, कुणीहि जागृत करील कदा? || १५३.

चंदन चंदना लावी ? । रंगु रंगपणा रावी । मोतींपण मोतीं लेववी । ऐसें कैंचें ? ॥ ६-८४ ॥

चंदन लेपा लावी चंदन, रंग रंगवी रंगाला | स्वये लेववी निज मोतीपण, शोभा मोती देण्याला ?|| १५४.

सोनेंपण सोनें कसी । दीपपण दीप प्रकाशी । रसपणा बुडी ते रसीं । तें कें जोडे ? ॥ ६-८५ ॥

सुवर्ण आपुले सोनेपण कां, कसा लावुनि निरखितसे | निज प्रकाशी दीप निरखी कां, दीपपणा मम कसा असे ?|| १५५

अनुभवण्या ते रसपण आपुले, बुडेल रस आपुल्या रसी | ज्ञाते जाणती कदा घडेना, कदापिही ती गोष्ट अशी || १५६.

आपुलिये मुकुटीं समर्था । चंद्र बैसविला सर्वथा । परि चंद्र चंद्राचिये माथा । वाऊं ये काई ? ॥ ६-८६ ॥

शिव शंभूने निज सामर्थ्ये, शिरी धारिले चंद्राला | परी चंद्रमा निज शिरावर, बैसविल कां आपणाला ?|| १५७

तैसा आत्मराजु तंव । ज्ञानमात्रचि भरींव । आतां ज्ञानें ज्ञानासि खेंव । कैसें दीजे ? ॥ ६-८७ ॥

आत्मराज तर पूर्ण ज्ञानमय, अनंतात तो एक असे | जाणीव नेणीव त्यासि नसता, स्वरुप जाणणे त्या कैसे ?|| १५८

ज्ञानमये त्या निजज्ञानस्तव, दुजे ज्ञान कां शोधावे ?| ज्ञान तयाचे होण्या कां ते, ज्ञान दुजे आलिंगावे ?|| १५९

तयासि 'प्रज्ञानं ब्रहमा'ने श्रुतिमाजि ते वर्णियले | ज्ञानघनाने त्याचि अनंते, कां अन्याने जाणावे ?|| १६०.

आपुलेनि जाणपणें । आपणयातें जाणों नेणे । डोळ्या आपुलें पाहाणें । दुवाड जैसें ॥ ६-८८ ॥

ज्ञेय नि ज्ञाता स्वयेचि आत्मा, ज्ञानमात्र तो पूर्ण असे | नेत्रचि नेत्रा जसे पाहिना, निजरूप निरखिल तो कैसे? || १६१.

आरसा आपुलिये । आंगीं आपण पाहे । तरी जाणणें जाणों लाहे । आपणयातें ॥ ६-८९ ॥

दर्पणीच प्रतिबिंब तयाचे, दर्पणेचि ते पाहियले?| तरि ज्ञानघन आत्म्यानेही, आपणा आपण जाणियले || १६२.

दिगंतापैलीकडेचें । धांवोनि सुरिया खोंचे । मा तियेका तियेचें । आंग फुटे ? ॥ ६-९० ॥

दूरवरिचे असेल जरिही, धावुनि त्या खुपसेल सुरी | काय सुरी ती खुपसुनि घेईल, स्वये आपुल्याच उदरी ?|| १६३.

रसवृत्तीसी उगाणें । घेऊनि जिव्हाग्र शाहाणें । परि कायी कीजे नेणे । आपणापें चाखों ॥ ६-९१ ॥

सारे षड्रस जाणे रसना, यास्तव चतुर न अन्य असे | आपुलीच परि रुचि जाणण्या, समर्थ ती तर कदा नसे || १६४.

तरि जिव्हे काई आपलें । चाखणें हन ठेलें ? । तैसे नव्हे संचलें । तेंचि तेकीं ॥ ६-९२ ॥

तरीहि तियेचे कार्य न थांबे, योग्य निवाडा दे चवीचा | अवयव म्हणुनि न सोडी स्वभावा, त्याग नसे निज कार्याचा || १६५

तैसा आत्मा सच्चिदानंदु । आपणया आपण सिद्धु । आतां काय दे शब्दु । तयाचें तया ॥ ६-९३ ॥

असे सच्चिदानंदचि आत्मा, पूर्ण ज्ञानघन नित्य असे | शब्द काय दे नवीन ज्ञाना, स्वये ज्ञानमय उणीव नसे || १६६

कोणाही प्रमाणाचेनि हातें । वस्तु घे ना नेघे आपणयातें । जो स्वयेंचि आइतें । घेणें ना न घेणें ॥ ६-९४ ॥

स्वयंसिद्ध जो नित्यचि आत्मा, सिद्धासिद्ध न गरज तया | तोचि स्वामी या ब्रह्मांडाचा, मदत कुणाची ती वाया || १६७

म्हणोनि आत्मा आत्मलाभें । नांदऊनि शब्द शोभे । येईल ऐसा न लभे । उमसुं घेवों ॥ ६-९५ ॥

म्हणुनी शब्दे श्रेय न घ्यावे, त्रिपदे आत्मा दावियला | स्वयंभूच तो पूर्ण ज्ञानमय, तोचि व्यापितसे सकला || १६८

एवं माध्यान्हींची दिवी । तम धाडी ना दिवो दावी । तैसी उपभयतां पदवी । शब्दा जाली ॥ ६-९६ ॥

माध्यान्ही लाविला दीप तो, नच उजेड, घालवी तमा | शब्द् घालवी ना अज्ञाना, ना बोधाच्या ये कामा || १६९

आतां अविद्या नाहींपणें । नाहीं तयेतें नासणें । आत्मा सिद्धुचि मा कोणें । काय साधावें ? ॥ ६-९७ ॥

अस्तित्वाविण असे अविद्या, नाशाचा तो प्रश्न नसे | नित्य सिद्ध अविनाशी आत्मा, सिद्ध काय करणे कैसे ?|| १७०

ऐसा उभय पक्षीं । बोला न लाहोनि नखी । हारपला प्रळयोदकीं । वोघु जैसा ॥ ६-९८ ॥

उभयपक्षी शब्द न उपयोगी, अविद्या नि आत्म्यासाठी | सहजी नदी नाले ते विरती, जैसे प्रलय जळापोटी || १७१.

आत्मराज सर्वज्ञ असे तो, पूर्ण ज्ञानमय स्वये असे | स्वामी ब्रह्मांडाचा अद्वैती, सहाय्य लागे त्या कैसे ?|| १७२.

आतां बोला भागु कांहीं । असणें जयाच्या ठाईं । अर्थता तरि नाहीं । निपटुनियां ॥ ६-९९ ॥

यथार्थ आशय शब्द न वदती, आत्मा त्याचा विषय नसे | कैवल्याच्या वाटेवरती, शब्द निरुपयोगीच असे || १७३.

बागुल आला म्हणितें । बोलणें जैसें रितें । कां आकाश वोळंबतें । तळहातीं ॥ ६-१०० ॥

आला बागुल फोल बोलणे, त्यासि अस्तित्वचि नसे | की सारे अवकाश माझिया, तळहाती ते लोंबतसे || १७४.

तैसीं निरर्थकें जल्पें । होउनियां सपडपें । शोभती जैसें लेपे । रंगावरी ॥ ६-१०१ ॥

निरर्थकचि हे असे बोलणे, चित्रामधली लेणी जशी | सुंदर रंगे चित्री शोभती, शून्य मोल जरि नाजुकशी || १७५.

रंग वस्त्र वा अन्य गोष्टीही, जैशा लटक्या चित्राच्या | आत्मप्रतीतिला शब्द निरर्थक, पैल असे ती शब्दांच्या || १७६.

एवं शब्दैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें । साचपणें वनें । चित्रींचीं जैसीं ॥ ६-१०२ ॥

अज्ञान नि ज्ञानही शब्दिचे उपयोगी ना परमार्थी | सुरेख रंगविली जरि राने, चित्रीच शोभिवंत दिसती || १७७.

या शब्दाचा निमाला । महाप्रळयो हो सरला । अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा ॥ ६-१०३ ॥

आभाळीची जाता अभ्रे, कुंद दिवसही तो सरला | शब्दही विरता, मौनानेचि, आत्मबोध तो अनुभवला || १७८.

भ्रम विरला नि शब्द मावळे, शब्दसृष्टीहि जाई लया | ज्ञान नि अज्ञानाचा पुरता, बाजारहि गेला वाया || १७९.

शब्दांनी जगती विहरावे, आत्मप्रतीति त्या क्षेत्र नसे | शब्द इंद्रिये त्या न जाणती, आत्मदेव तो पैल असे || १८०.

श्री ज्ञानेश्वर -अमृत गंगा –कुंड सहावे संपूर्ण

(७) अमृत गंगा –

कुंड सातवे –

{अज्ञान खंडन}

येऱ्हवीं तरी अज्ञाना । जैं ज्ञानाची नसे क्षोभणा । तैं तरि काना । खालींच दडे ॥ ७-१ ॥

ज्ञानाची उठताची उर्मी, जाणीव हो अज्ञानाची | जेथं क्षोभ ना तेथे वार्ता, कुणीही करीत ना त्याची ||१.

अभाव ज्ञानाचा त्या म्हणती, सामान्यत्वे अज्ञान | सर्वव्यापी तो हरी ज्ञानघन, नित्य तयासी निजभान || २.

स्वरूप ज्ञानाच्या स्फूर्तीने, 'सोहं' जाणीव ये उदया | निजस्वरुपाची पहाट होता, सहजी अभाव जाई लया || ३.

स्फूर्ति आधी मी अज्ञानी, असा भावहि ना श्रवणी | प्रतीति येता नुरेचि सोहं, मी ज्ञानी वा अज्ञानी || ४.

एवं आश्रय तो अज्ञाना, स्फूर्ति उसळता ज्ञानाची | प्रतीति होता वा आधीहि, नच वार्ता अज्ञानाची || ५.

अडसोनि अंधारीं । खद्योत दीप्ति शिरी । तैसें लटिकेंवरी । अनादि होय ॥ ७-२ ॥

चमके अंधारीच काजवा, घालवी ना परि अंधारा | अंधारातच चमचम त्याची, तैसा अज्ञाना नखरा || ६.

काजव्याची ती चमकचि लटकी, लटके अज्ञानहि तैसे | आश्रय स्फूर्तीचा तो नसता, अस्तित्वहि ते त्यास नसे || ७.

अंधाराविण आणि प्रकाशी, काजव्यास अस्तित्व नसे | आदि नाही अज्ञानासि, म्हणुनि अनादी म्हणत असे || ८.

लहरीमाजी लपते पाणी, दूर करोनि जल उमटे | तैसे निजस्वरुपीची लपोनी, ब्रह्म स्वयेचि ते प्रगटे || ९.

लपणे नि ते स्वये प्रगटणे, परी ज्ञानघन नित्य असे | ज्ञानाज्ञाना नसेचि थारा, लपता ते विश्वचि भासे || १०.

जैसी स्वप्ना स्वप्नीं महिमा । तमी मानु असे तमा । तेवीं अज्ञाना गरिमा । अज्ञानींचि ॥ ७-३ ॥

काळोखाचा अंधारी नि, स्वप्नी स्वप्नाचा महिमा | तैसे जोवरी बोध न झाला, तंवचि अज्ञाना गरिमा || ११.

स्वप्नी वाटे, खरीच सृष्टी, गरिबी दिसो वा श्रीमंती | झोप संपता लोपे स्वप्नी, सारे नयनातची विरती || १२०

कोल्हेरीचे वारु । न येती धारकीं धरूं । नये लेणा श्रृंगारूं । वोडंबरीचा ॥ ७-४ ॥

अभ्र आकृती त्या अश्वांच्या, नभी धावती वेगाने | रणांगणी ते ना उपयोगी, फोल जसे जादू लेणे || १३.

हें जाणणेयाच्या घरीं । खोंचिलेंहि आन न करी । काई चांदिणां उठे लहरी । मृगजळाची ? ॥ ७-५ ॥

अभावरूपी असेचि जे की, ठाव न स्वरुपि अज्ञाना | चांदण्यात ना मृगजळ तैसे, स्वरूपी असणे अज्ञाना || १४.

आणि ज्ञान हें जें म्हणिजे । तें अज्ञानचि पां दुजें । येक लपऊनि दाविजे । येक नव्हे ? ॥ ७-६ ॥

ज्ञान जयासि म्हणती जगी ते, अज्ञानचि की, ते दुसरे | एक लपवुनि दुज्यास दावी, जगात त्यांचे हे नखरे || १५.

आधी 'जीवोहं' पुढे 'शिवोहं', अहंपणे मिरवी ज्ञानी | फोल असे हे ज्ञान जाहले, ते तर निव्वळ अज्ञानी || १६.

असो आतां या प्रस्तावो । आधीं अज्ञानाचा धांडोळा घेवों । मग तयाच्या साचीं लाहो । ज्ञानचि लटिकें ॥ ७-७ ॥

समुच्चयात्मक विचार केला, इथवर ज्ञानाज्ञानाचा | नीट शोधुया अज्ञानाला, विचार करुनी पैलूंचा || १७.

ज्ञान नि अज्ञानही संगती, मूळ तयांचे एक असे | मिथ्या जर अज्ञान निघाले, ज्ञानाही अस्तित्व नसे || १८.

या अज्ञान ज्ञानातें । आंगींचि आहे जितें । तरी जेथें असे तयातें । नेण कां न करी ? ॥ ७-८ ॥

पूर्ण ज्ञानमय आत्मस्वरुपी, जरी नांदते अज्ञान | त्यास नेणते कां नच केले? उरले कैचे मग ज्ञान ? || १९.

तृणापासुनी ब्रह्मदेवहि, ज्ञाने विलसत पूर्णपणे | हे सारेचि असे हरीमय, कां न झाकिले अज्ञाने ? || २०.

अज्ञान जेथ असावें । तेणें सर्व नेण होआवें । ऐसी जाती स्वभावें । अज्ञानाची ॥ ७-९ ॥

स्वभाव ऐसा, अज्ञानाचा, ज्ञाने लोपुनिया जावे | जेथे वस्ती अज्ञानाची, अज्ञाने आच्छादावे || २१.

तरी शास्त्रमत ऐसें । जे आत्माचि अज्ञान असे । तेणेचि तो गिंवसे । आश्रो जरी ॥ ७-१० ॥

कुणी शास्त्रकर्ते ते म्हणती, ब्रह्मचि आश्रय अज्ञाना | म्हणुनि लपे परब्रह्म गंवसण्या, यत्नहि करिती जन नाना || २२.

तरी नुठितां दुजें । जैं अज्ञान आहे बिजें । तैं तेचि आथी हे बुझे । कोण येथें ? ॥ ७-११ ॥

जरि अज्ञाने ब्रह्म झांकिले, तयासि केले अज्ञानी | पूर्ण लुप्त ते ज्ञानचि होता, कसे जाणले हे कोणी ?|| २३.

अज्ञानी जर असेल आत्मा, व्हावी इंद्रिये अज्ञानी | आत्मा अधिष्ठानची त्यांचा, बोध करविती ती म्हणुनी || **२४.**

अज्ञान तंव आपणयातें । जडपणें नेणे निरुतें । आणि प्रमाण प्रमाणातें । होत आहे? ॥ ७-१२ ॥

अज्ञाना तर नसे ज्ञानचि, जाणु शके ते ना कवणा | जे न जाणते कवणाशीहि, कैसे जाणील ते आपणा ?|| २५.

यालागी जरी अज्ञान । करील आपुलें ज्ञान । हें म्हणत खेंवो घेववी मौन । विरोधुचि ॥ ७-१३ ॥

जाणे अज्ञानचि आपणाला, बोलण्यात या विसंगती | वक्ता तो तर मौनच होईल, खुंटणारचि तेथं मति || २६.

आणि जाणति वस्तु येक । ते येणें अज्ञानें कीजे मूर्ख । तैं अज्ञान हे लेख । कवण धरी ? ॥ ७-१४ ॥

अज्ञाने केले अज्ञानी, नित्य ज्ञानमय ब्रह्माशी | ज्ञानचि जेथे उरले नाही, जाण आली ही कवणाशी ?|| २७.

जाग्रत स्वप्न सुषुप्ति आदि, जो प्रपंचहि विलसतसे | ब्रह्मरूप ते मीच असे जो, जाणतसे तो बद्ध नसे || २८.

प्रतिपादियले श्रुतीत ऐसे, वस्तु ज्ञानमय सर्वरुपे | अज्ञानासी स्थानचि नाही, सर्व विनटले ब्रह्मरूपे || २९.

अहो आपणयाहि पुरता । नेणु न करवे जाणता । तयातें अज्ञान म्हणतां । लाजिजे कीं ? ॥ ७-१५ ॥

स्वयंभूचि जो स्वयंप्रकाशी, नित्य ज्ञानमय असे हरी | त्यासि म्हणता ते अज्ञानी, लज्जा वाटावीच खरी || ३०.

आभाळें भानु ग्रासे । तैं आभाळ कोणें प्रकाशे ? । सुषुप्ती सुषुप्तया रुसे । तैं तेचि कोणा ? ॥ ७-१६ ॥

अभ्राने ग्रासिले भानुला, कुणामुळे ते अभ्र दिसे? | निद्राधीन जो गाढ झोपला, सुषुप्ती त्यावरी जरि रुसे || ३१.

गाढ लाभली झोप मला हो, अनुभूति ही कवणास असे ?| विचार करिता विपरित उमगे, अज्ञानाचेही तैसे || ३२.

तैसें अज्ञान असे जेथें । तेंचि जरी अज्ञान आतें । तरी अज्ञान अज्ञानातें । नेणतां गेलें ॥ ७-१७ ॥

आश्रय अज्ञाना आत्म्याचा, असता उभयची अज्ञानी | जाणणार ते कोण कुणाला?, व्यर्थची होतील ते दोन्ही || ३३.

ना तरी अज्ञान येक घडे । हें जयास्तव निवडे । तें अज्ञान नव्हे फुडे । कोणे काळीं ॥ ७-१८ ॥

आत्म्याठायी अज्ञानाचे, ज्ञान कुणाला ते झाले ?| अज्ञानाने ज्ञान व्यापिता, ज्ञानचि कोठेही नुरले || ३४.

पडळही आथी डोळा । आणि डोळा नव्हे आंधळा । तरी आथी या पोकळा । बोलिया कीं ॥ ७-१९ ॥

डोळ्यावरती आला पडदा, डोळा परि आंधळा नसे | हे तर झाले व्यर्थ बोलणे, कार्य जसे, परिणाम तसे || ३५.

इंधनाच्या आंगीं । खवळलेन आगी । तें न जळे तैं वाउगी । शक्तिचि ते ॥ ७-२०

काष्ठामध्ये अग्नि प्रगटला, काष्ठ परी ना जरा जळे | अग्नीचा आभासचि केवळ, तो नच अग्नि हेचि कळे || ३६.

तेवी जरि अज्ञान प्रगटले, ज्ञातेपण परि अभंग ते | अशासारिखे असे बोलणे, वाउगेचि गणले जाते || ३७.

आंधारु कोंडुनि घरीं । घरा पडसायी न करी । तैं आंधार इहीं अक्षरीं । न म्हणावा कीं ?॥ ७-२१ ॥

घरात अंधारास कोंडले, म्हणता उघडुनि पाहियले | उजेड केवळ दिसता कैसे, नांव त्यास अंधार दिले || ३८.

वो जावों नेदी जागणें । तये निदेतें नीद कोण म्हणे । दिवसा नाणी उणें । तैं रात्रिचि कैंची ॥ ७-२२ ॥

दिसे झोपला, हांक मारिता, ओ देई त्या झोप नसे | राखी उजेडपण दिवसाचे, रात्र म्हणावे तिज कैसे || ३९.

तैसें आत्मा अज्ञान असकें । असतां तो न मुके । तैं अज्ञान शब्दा लटिके । आलेंच कीं ॥ ७-२३ ॥

आत्म्या ग्रासियले अज्ञाने, ज्ञानपणासि परि न मुके | मिथ्याचि ते असे ग्रासणे, अज्ञानचि होई लटके || ४०.

आत्मा होताची अज्ञानी, विश्वप्रेरणा मावळली | परि ऐसे तर कांही दिसेना, मिथ्या वार्ता कुणी दिधली? || ४१.

येऱ्हवी तरी आत्मया- । माजीं अज्ञान असावया । कारण म्हणतां न्यावा । चुकी येईल कीं ॥ ७-२४ ॥

आत्म्यातची अज्ञान राहते, न्यायोचित हे बोल नसे | पूर्ण ज्ञानमय आत्म्यामाजी, राहिल अज्ञानचि कैसे ?|| ४२.

अज्ञान तम मेळणी । आत्मा प्रकाशाची खाणी । आतां दोहींची मिळणी । येकी कैसी ?॥ ७-२५ ॥

जसा दाट अंधारचि तैसे, रूप असे अज्ञानाचे | स्वयंप्रकाशी तेजोमय हे, ज्ञानरूप परि आत्म्याचे || ४३.

पूर्ण विरोधी स्वरूपे असता, ऐक्यहि कैसे संभवते? | तेजासंगे अंधाराचे, जडेल कैसे ते नाते? || ४४.

स्वप्न आणि जागरु । आठउ आणि विसरु । इयें युग्में येका हारु । चालती जरी ॥ ७-२६ ॥

स्वप्नासंगे जागेपणहि, तसेचि आठव विस्मरण | एका ओळीत जरि चालती, करण्या मार्गाचे क्रमण || ४५.

शीता तापा एकवट । वाहे वस्तीची वाट । कां तमें बांधिजे मोट । सूर्यरश्मींची ॥ ७-२७ ॥

उष्णतेसवे येऊनि थंडी, एकत्रचि राहती जरी | रविकिरणे एकत्र बांधुनी, तम त्यांची ती मोट करी || ४६.

नाना राती आणि दिवो । येती येके ठाईं राहों । तैं आत्मा जिवें जिवो । अज्ञानाचेनि ॥ ७-२८ ॥

अथवा रात्र नि दिवस उभयता, राहतील जर एक घरी | तरि अज्ञाना संगे आत्मा, राहतसे वार्ता ही खरी || ४७.

हें असो मृत्यु आणि जिणें । इयें शोभती जरी मेहुणे । तरी आत्मेनि असणें । अज्ञानेंसि ॥ ७-२९ ॥

जीवन नांदे मरणासंगे, उत्तम ती जोडी शोभे | तरि अज्ञानासंगे आत्मा, राहिल सहजी, अति सुलभे || ४८.

अहो आत्मेन जे बाधे । तेंचि आत्मेनसि नांदे ? । ऐसीं काईसीं विरुद्धें । बोलणीं इयें ॥ ७-३० ॥

पूर्ण ज्ञानमय आत्म्यापुढती, सहजी विरता अज्ञान | कैसे त्या अज्ञाना येईल, आत्म्यासमोर अवसान? || ४९.

ज्ञाना संगे अज्ञानहि ते, विरोधीच राहील कसे? | प्रकाशमय सर्वज्ञचि आत्मा, अभावात अज्ञान वसे || ५०.

उभय विरोधी एक राहतील, बोलणेची हे फोल असे | दोन विरोधी टोके असता, संगे राहतील कैसे ?|| ५१.

कैसी संगती अशी विरोधी, तर्कशास्त्रही फोलचि ते | अनुभूति ज्यांनीही अनुभविली, तया स्पष्टचि हे कळते || ५२.

अहो अंधारपणाची पैज । सांडूनी अंधार तेज । जाला तैं सहज । सूर्यचि निभ्रांत । ७-३१ ॥

सोडुनि निज अंधारपणा जरि, तम तो उजेडची झाला | तरी तो सूर्यचि निश्चित होईल, सोडुनिया काळोखाला || ५३.

दुलांकुडपण सांडलें । आणि आगीपण मांडिलें । तैं तेंचि आगी जालें । इंधन कीं ॥ ७-३२ ॥

शुष्क काष्ठपण सोडुनि आपुले, स्वीकारिल जर अग्निपणा | तरि लाकुड ते होईल अग्नि, मग ते राहील इंधन ना || ५४.

का गंगा पावत खेंवो । आनपणाचा ठावो । सांडी तैं गंगा हो । लाहे पाणी ॥ ७-३३ ॥

ओहळ नाले अन्य नद्या वा, मिळताचि जंव गंगेला | पूर्व रूप ते पुरते सोडुनि, येतील गंगा रूपाला || ५५.

तैसें अज्ञान हें अज्ञान नोहे । तरी आत्मा असकें असों लाहे । येऱ्हवी अज्ञान होये । लागलाचि ॥ ७-३४ ॥

आत्मस्वरूपी प्रविष्ट होता, नुरेच मग अज्ञानपणा | तेहि ज्ञानमय होईल तत्क्षणी, समग्र येईल ज्ञानपणा || ५६.

आत्मेनसी विरोधी । म्हणोनि नुरेचि इये संबंधीं । वेगळी तरी सिद्धि । जायेचिना ॥ ७-३५ ॥

अज्ञानाचा प्रवेश ज्ञानी, विरोध धर्मे शक्य नसे | अभाव रुपे अज्ञानचि ते, शाश्वत आत्मरूप विलसे || ५७.

अज्ञाने अन्यत्र राहणे, प्रश्नचि ऐसा ना उरला | अस्तित्वचि ज्या नसे कदापि, कुठे राहणे नच त्याला || ५८.

चराचरी सर्वत्र श्रीहरी, एकलाचि विश्वात असे | अज्ञाना अस्तित्वचि नाही, अभावाविना अन्य नसे || ५९.

लवणाची मासोळी । जऱ्ही जाली जिव्हाळी । तरी जळीं ना जळावेगळी । न जिये जेवीं ॥ ७-३६ ॥

लवणाची केली मासोळी, सजीव झाली दैवाने | जळी वा बाहेरीही तियेच्या, नशिबी एकच ना जगणे || ६०.

जें अज्ञान येथें नसे । तरीच आत्मा असे । म्हणोनि बोलणीं वायसें । नायकावीं कीं ॥ ७-३७ ॥

जेथं श्रीहरी ज्ञानही तेथे, सर्वरूपाने तो विलसे | ज्ञानमात्र सच्चिदानंदची, विश्वरूपाने प्रगट असे || ६१.

अज्ञानाला नसेचि जागा, व्यर्थ बोलणे त्याविषयी | ऐकू नयेचि असे कोटिक्रम, ज्याचे अस्तित्वचि नाही || ६२.

आत्मरमण हे नाम हरीचे, त्रिभुवनी त्याचा वास असे | त्यासी नलगे भुवन वेगळे, सबाह्य अंतरी तोचि वसे || ६३.

इहलोकी योगमायाचि हरीची, जेणे भूते वावरती | ती ना हरीच्या ठायी वसती, श्रीहरी लीला अद्भुत ती || ६४.

'एकमेवाद्वितीयंब्रह्म', श्रुति वर्म हे मुख्य असे | विलसतसे सर्वत्र श्रीहरी, अज्ञानाला ठाव नसे || ६५.

दोरीं सर्पाभास होये । तो तेणें दोरें बांधों ये ? । ना दवडणें न साहे । जयापरी ॥ ७-३८ ॥

प्रकाश अंधुक असता दोरी, नयना वाटे सर्प असे | त्याच दोरीने त्या सर्पाला, बांधताची येईल कसे ?|| ६६.

दोरी स्पर्शिता, आभास जाईल, कल्पनाही सर्पाची विरे | यथार्थ ज्ञाने अज्ञानाचा, शब्दाभासहि सहजी नुरे || ६७.

तियापरी उभयतां । अज्ञान शब्द गेला वृथा । हा तर्कावांचूनि हाता । स्वरूपें नये ॥ ७-३९ ॥

ऐसे असता, उभयपक्षीही शब्द व्यर्थ अज्ञानाचा | गेला पुरता, तर्क वृथाची आत्मत्वी अज्ञानाचा || ६८.

नाना पुनिवेचे आंधारें । दिहा भेणें रात्रीं महुरें । कीं येतांचि सुधाकरें । गिळिजे जेवीं ॥ ७-४० ॥

भय वाटे दिवसाचे म्हणुनि, तम जाई ते रात्रीकडे | दिस पुनवेचा, सौम्य चांदणे, शांत प्रकाशचि चहूंकडे || ६९.

सुधाकराचा उदय नि भानु,-अस्त होत एका समयी | संधिकालच्या सौम्य प्रकाशे, चंद्रउदय तम जात लयी || ७०.

पौर्णिमा दिनी, संधिकाल जो, दिन रात्रीचे संधीशी | तेज आपले रूप पालटे, सौम्य चांदणे पूर्ण निशी || ७१.

अंधाराला नाही नाशिता, प्रकाश बदले स्वरूपाला | प्रसन्न झाला बोधचि बोधा, अनुसरुनि सौम्यत्वाला || ७२.

प्रकाशात ना खंड होतसे ना संधि अंधाराची | अनुभवाची असे खूण ही, होई कृपा जंव श्रीगुरुची || ७३.

आत्मबोध तो होण्याआधी, सत्यचि प्रपंच भासतसे | त्या आश्रय ही आत्मदेवचि, त्यासि कदापि खंड नसे || ७४.

आत्मत्वी जंव आत्मप्रत्यये, होई पुर्णिमा ज्ञानाची | मृगजळ-प्रपंच भान विरुनिया, येत अवस्था शांतीची || ७५.

अंधाराला नसे वावचि, ना दिवसा ना रात्रीही | भान प्रपंचाचे मावळता, अहंभाव विलया जाई || ७६.

मावळताची अहंभावही, आत्मभाव तो सौम्य फुले | कार्ये देही, बोध अंतरी, स्वानंदीचि समरसले || ७७.

तरी अज्ञान स्वरूपें कैसें । काय कार्यानुमेय असे । कीं प्रत्यक्षचि दिसे । धांडोळूं आतां ॥ ७-४१ ॥

अज्ञानाचे स्वरूप कैसे, काय इंद्रिया विषय असे?| की कार्याच्या अनुमाने वाटे, गहन विचारे शोधू तसे || ७८.

अहो प्रत्यक्षादि प्रमाणीं । कीजे जयाची घेणी । ते अज्ञानाची करणी । अज्ञान नव्हे ॥ ७-४२ ॥

अहो प्रमाणे प्रत्यक्षादि, जेणे वस्तुसि बोध असे | ती तर अज्ञानाची करणी, परी कदा अज्ञान नसे || ७९.

जैसी अंकुरेंसी सरळ । वेली दिसे वेल्हाळ । तें बीज नव्हे केवळ । बीजकार्य होय ॥ ७-४३ ॥

बिजापासुनी अंकुर होई, वेलीवृद्धि त्यांतूनि होये | वेलीचा विस्तार नि अंकुर, बीज नव्हे ही बीजकार्ये || ८०.

कां शुभाशुभ रूपें । स्वप्नदृष्टी आरोपें । तें नीद नव्हे जाउपें । निदेचें कीं ॥ ७-४४ ॥

भली नि वाईट पडती स्वप्ने, निश्चित ती निद्राचि नसे | झोपेमधली स्वप्ने जीहि, निद्रेची संतती असे || ८१.

नाना चांदु एक असे । तो व्योमीं दुजा दिसे । तें तिमिरकार्य जैसें । तिमिर नव्हे ॥ ७-४५ ॥

आकाशी जरि चंद्र एकचि, अंगुली स्पर्शे दोन दिसे | ऐसे दिसणे, दृष्टीदोष ना, परंतु त्याचे कार्य असे || ८२.

तैसें प्रमाता प्रमेय । प्रमाण जें त्रय । तें अज्ञानाचें कार्य । अज्ञान नव्हे ॥ ७-४६ ॥

ज्ञाता ज्ञान नि ज्ञेय हे तिन्ही, कार्येचि अज्ञानाची | त्यासी ना अज्ञान म्हणावे, परि करणीचि ही त्याची || ८३.

म्हणोनि प्रत्यक्षादिकीं । अज्ञान कार्यविशेखीं । नेघे तें असेये विखीं । आनु नाहीं ॥ ७-४७ ॥

म्हणुनी प्रत्यक्षादि प्रमाणे, अज्ञाना ना ग्रहण करी | कारण ती तर त्याची कार्ये, मृत्तिका नि घट यांजपरि || ८४.

अज्ञान कार्यपणें । घेइजे तें अज्ञान म्हणे । तरी घेतांहि करणें । तयाचेंची ॥ ७-४८ ॥

प्रत्यक्षादि जीहि प्रमाणे, जरि कार्ये अज्ञानाची | इंद्रियेही होतिल अज्ञानी, कार्य करित जी बोधाची || ८५.

स्वप्नीं दिसे तें स्वप्न । मा देखता काय आन । तैसें कार्यचि अज्ञान । केवळ जरी ॥ ७-४९ ॥

स्वप्नी दिसे जे, स्वप्न असे ते, बघणाराही स्वप्नी असे | अज्ञानाचे कार्य जगत जरि, द्रष्टाही अज्ञान तसे || ८६.

तरी चाखिला गूळ गुळें । माखिलें काजळ काजळें । कां घेपे देपे शुळें । हालया सुळु ॥ ७-५० ॥

गुळानेच चाखिले गुळाला, काजळ काजळास लावी | स्वये शूळची शूळाशी तो, शूळावरती ते चढवी || ८७.

तैसें कारण अभिन्नपणें । कार्यही अज्ञान होणें । तें अज्ञानचि मा काय कोणें । घेपे देपे ॥ ७-५१ ॥

कारण आणि कार्य अभिन्नचि, कार्य इंद्रिये अज्ञानी | आणि करणहि ते अज्ञानचि, कुणा जाणणे कसे कोणी ?|| ८८.

जेथे उभयचि अज्ञानी ते, कुणी कुणाला जाणावे ?| आणि कोणी कोणाकडुनी, जाणलेहि ते की जावे ?|| ८९.

आतां घेतें घेइजेतें ऐसा । विचारु नये मानसा । तरी प्रमाण जाला मासा । मृगजळींचा ना ? ॥ ७-५२ ॥

अज्ञानचि सर्वत्र पसरता, ज्ञेय नि ज्ञाता कोण असे ?| प्रमाण सारे जणु असती की, मृगजळातील ते मासे || ९०.

तंव प्रमाणाचिया मापा । न संपडेचि जे बापा । तया आणि खपुष्पा । विशेषु काई ? ॥ ७-५३ ॥

प्रमाण कुठलेही ते असता, अज्ञानाला सिद्धि नसे | अभावरुपे असेचि तेही, आकाशीचे पुष्प जसे || ९१.

मा हे प्रमाणचि नुरवी । आतां आथी हें कोण प्रस्तावी । येणें बोलें ही जाणावी । अज्ञान उखी ॥ ७-५४ ॥

अज्ञानाचे अस्तित्वचि ते, सिद्ध प्रमाणे होईना | ते आहे हे फोल सांगणे, लटके समजा अज्ञाना || ९२.

एवं प्रत्यक्ष अनुमान । यया प्रमाणां भाजन । नहोनि जालें अज्ञान । अप्रमाण ॥ ७-५५ ॥

यावरुनी प्रत्यक्ष प्रमाणे, तैसेचि अनुमानाने | पात्र नसे अज्ञान सिद्धिला, हेच सिद्ध होई त्याने || ९३.

ज्ञानहि प्रत्यक्षचि दिसे ना, कार्ये वा अनुमानाने | उभय प्रमाणा पात्र नसे ते, हाचि बोध असे तेणे || ९४.

ना स्वकार्यातें विये । जें कारणपणा नये । मी अज्ञान ऐसें बिहे । मानूं साचें ॥ ७-५६ ॥

स्वये न कांही कार्य सृजेना, कवणाचेहि कारण ना | मीच असे अज्ञान असेहि, स्वये कुणाला सांगेना || ९५.

आत्मया स्वप्न दाऊं । न शके कीर बहू । परि ठायें ठाउ । निदे जो नेणें ॥ ७-५७ ॥

आत्मदेव तो सदैव जागा, झोप न ये अज्ञानाची | अभाव वस्त्रहि घालू शकेना, गोष्ट दूर ती स्वप्नांची || ९६.

हें असो जिये वेळे । आत्मपणेंचि निखळें । आत्मा अज्ञानमेळें । असे तेणें ॥ ७-५८ ॥

हरी दंग तो निजरूपीची, आत्मरंगी स्वानंदी असे | तेंव्हा बिजरूपे अज्ञानही, तयास्वरूपी सुप्त असे || ९७.

जैसें न करितां मंथन । काष्ठीं अवस्थान । जैसें कां हुताशन । सामर्थ्यांचें ॥ ७-५९ ॥

मंथन काष्ठांचे ना करिता, सुप्त अग्नि काष्ठात असे | हुताशनाची सामर्थ्येहि, सुप्त रूपाने त्यांत वसे || ९८.

तैसें आत्मा ऐसें नांव । न साहे आत्मयाची बरव । तैं कांहीं अज्ञान हांव । बांधतें कां ? ॥ ७-६० ॥

आत्मा हे नांवहि न साहे, ना शोभा मिरवी त्याची | ऐशा आत्म्याठायी होईल, वस्ती काय अज्ञानाची ?|| ९९.

काइ दीप जैं न लाविजे । तैंचि काजळी फेडिजे । कां नुगवत्या वाळिजे । रुखाची छाया ॥ ६१ ॥

दिवा लावण्याआधी कैसी, काजळी फेडाया जाणे | नाही उगवला वृक्ष, तयाची सावली टाळाया बघणे || १००.

नाना नुठितां देहदशा । कालऊनि लाविजे चिकसा । न घडितां आरिसा । उटिजे काई ॥ ६२ ॥

देहदशा ना अजुनि आली, ठेवी कालवुनी उटणे | किंवा घडण्याआधी आरसा, तयार पुसण्या त्या होणे || १०१.

कां वोहाच्या दुधीं । सायचि असावी अधीं । मग ते फेडूं इये बुद्धी । पवाडु कीजे ॥ ७-६३ ॥

अजुनि कांसेतुनी गाईच्या, दोहियले ना दुग्धाला | वृथा तयारी कशास करणे, पात्र शोधण्या सायीला || १०२.

तैसें आत्मयाच्या ठाई । जैं आत्मपणा ठावो नाहीं । तैं अज्ञान कांहीं । सारिखें कैसें ॥ ७-६४ ॥

तैसा आत्मा निर्विकार तो, ना उर्मि आत्मत्वाची | वृथा शोध तो घेईल कैसा, अनोळखी अज्ञानाचा ?|| १०३.

म्हणोनि तेव्हांही अज्ञान नसे । हें जालेंचि आहे आपैसें । आतां रिकामेंचि काइसें । नाहीं म्हणो ॥ ७-६५ ॥

आत्मदेव पुरते स्वानंदी, निजस्वरुपाचेहि ना भान | निर्विकार नि स्व-स्थचि असता, कैसे ज्ञान नि अज्ञान ?|| १०४.

सृष्टीक्रम जंव सुरू न जाहला, निजरूपी हरी दंग असे | सर्वज्ञचि ती असे अवस्था, अज्ञानासी वाव नसे || १०५.

स्थितप्रज्ञ जंव असे अवस्था, स्तब्ध इंद्रिये राहतसे | कांसव जैसा बाह्याङ्गे ती, आंत ओढुनि स्वस्थ असे || १०६.

ऐसाहि आत्मा जेव्हां । जैं नातळे भावाभावा । अज्ञान असे तेव्हां । तरी तें ऐसें ॥ ७-६६ ॥

भाव अभावा पैल दशेला, कार्य दशेच्याही पूर्वी | आत्म्याठायी अज्ञानाची, वार्ताही कैसी व्हावी ?|| १०७.

जैसें घटाचें नाहींपण । फुटोनि होय शतचूर्ण । कीं सर्वांपरी मरण । मालवलें कीं ॥ ७-६७ ॥

घट तो घडण्याआधी फुटुनी, तुकडे झाले शतावरी | मरणाशी मारून टाकिले, वार्ता ऐसी काय खरी?|| १०८.

नाना निदे नीद आली । कीं मूर्छां मूर्छें गेली । कीं अंधारी पडली । अंधकूपीं ॥ ७-६८ ॥

निद्रेला बहु निद्रा आली, मूर्च्छित मूर्च्छा की, झाली | अंधारी ती रात्रचि पुरती, अंधाऱ्या विहिरी पडली || १०९.

कां अभाव अवघडला । कां केळीचा गाभा मोडला । चोखळा आसुडला । आकाशाचा ॥ ७-६९ ॥

गाभा तुटला कां केळीचा, अभावास बंदी केले, | नित्यचि निर्मल गगन असे ते, परंतु पुरते डागळले || ११०.

कां निवटलिया सूदलें विख । मुकियाचें बांधलें मुख । नाना नुदितां लेख । पुसिलें जैसें ॥ ७-७० ॥

प्रेताचे मुखी वीष घातले, मुखचि मुक्याचे बांधियले | नव्हता लिहिला ऐशा लेखा, पुरते पुसुनी टाकीयले || १११.

तैसें अज्ञान आपुली वेळ । भोगी हेचि टवाळ । आतां तरी केवळ । वस्तु होऊनि असे ॥ ७-७१ ॥

अर्थशून्य नि पूर्ण निरर्थक, विधानेचि ही, हे जैसे | आत्मरुपी असणे अज्ञाने, विधान तैसे फोल असे || ११२.

देखा वांझ कैसी विये ? । विरूढती भाजली बियें ? । कीं सूर्य कोण्हा लाहे । अंधारातें ? ॥ ७-७२ ॥

कुणी पाहिली वंध्या प्रसूति, बीज भाजले ते उगले | अंधारातची पुरत्या ऐशा, सूर्याला कुणी शोधियले ?|| ११३.

तैसा चिन्मात्रे चोखडा । भलतैसा अज्ञानाचा झाडा । घेतला तरी पवाडा । येईल काई ? ॥ ७-७३ ॥

पूर्ण शुद्ध चिन्मात्र श्रीहरी, ज्ञानमात्रचि नित्य असे | त्या ठायी आश्रय अज्ञाना, हे ऐसे होईल कसे || ११४.

जे सायेचिये चाडे । डहुळिजे दुधाचें भांडें। ते दिसे कीं विघडे । तैसें हें पां ॥ ७-७४ ॥

येता दुग्धावरी साय ती, पळी ढवळिता ना गंवसे | तैसे होई अज्ञानाचे, किती शोधिता, मुळी न दिसे || ११५.

नाना नीद धरावया हातीं । चेउनी उठिला झडती । ते लाभे कीं थिती । नासिली होय ॥ ७-७५ ॥

झोपेमधुनी जागा झाला, शोध घेत तो झोपेचा | अभाव होता तो निद्रेचा, व्यर्थचि प्रयास कष्टांचा || ११६.

तेवीं पाहावया अज्ञान ऐसें । हें आंगीं पिसें काइसें । न पाहतां आपैसें । न पाहणेंचि कीं ॥ ७-७६ ॥

पहावयाचे अज्ञानाशी, खूळ मनी हे कां भरले?| ते तर आहे अभावरूपी, न पाहता बघणे घडले || ११७.

एवं कोण्हेही परी । अज्ञानभावाची उजरी । न पडेचि नगरीं । विचाराचिये ॥ ७-७७ ॥

पूर्ण विचारे उमगे नाहीच, अस्तित्वही अज्ञानाचे | आत्मस्वरुपी विवेक नगरीत, अधिष्ठान ते ना त्याचे || ११८.

अहो कोण्हेही वेळे । आत्मा अथवा वेगळें । विचाराचे डोळे । देखते का ? ॥ ७-७८ ॥

जर असते अज्ञान खरोखर, कुण्या काळी दिसले असते | आत्मस्वरुपी अन्यत्रहि परि, विवेक दृष्टीस ना पडते ?|| ११९.

ना निर्धाराचें तोंड न माखे । प्रमाण स्वप्नींही नाइके । कीं निरुती हन मुके । अनसाईपणा ॥ ७-७९ ॥

अज्ञाना अस्तित्वाविषयी, अल्पही संशय नच उरला | प्रमाण स्वप्नीहि न मिळाले, वाद तोंडघशी पडला || १२०.

नसे वस्तु अज्ञान म्हणोनी, विवेकास ते गंवसेना | प्रमाणांनीही हात टेकले, असणे त्याचे मुळीच ना || १२१.

इतुलियाही भागु । अज्ञानाचा तरी तो मागु । निगे ऐसा बागु । पडतां कां देवा ॥ ७-८० ॥

ज्ञात्या उमगे हेचि विवेके, अज्ञानाचा ठाव नसे | यत्न करुनिही वाट्याला ते, येईल कांही ते कैसे ?|| १२२ .

अंवसेचेनि चंद्रबिंबें । निर्वाळिलिये शोभे । कां मांडलें जैसे खांबे । शशविषाणाचे ॥ ७-८१॥

प्रकाशुनिया कधि अवसेला, शोभविले नभ चंद्राने | शिंगे काढुनिया ती सशांची, नभ धरिले त्या खांबाने || १२३.

नाना गगनौलाचिया माळा । वांझेच्या जालेया गळा । घापती तो सोहळा । पाविजेत असे ॥ ७-८२ ॥

माला बनवुनि गगन पुष्पिच्या, शोभती वंध्यापुत्रा गळा | दिसेल कां सोहळा अलौकिक, लोचनासी ऐसा सगळा || १२४.

आणून कांसवीचें तूप । भरू आकाशाचें माप । तरी साचा येती संकल्प । ऐसे ऐसे ॥ ७-८३ ॥

कांसविणीचे तूप आणुनी, माप भरू आकाशाचे | तरी सिद्धीला जातील तैसे, संकल्पहि अज्ञानाचे || १२५.

आम्हीं येऊनि जाऊनि पुढती । अज्ञान आणावें निरुती । तें नाहीं तरी किती । वतवतूं पां ॥ ७-८४ ॥

आम्ही शोधिले विवेकदृष्ट्या, तथ्य किती ते वादात | अज्ञानाचा मिळेल पत्ता, वटवट झाली परि व्यर्थ || १२६

विवेक दृष्ट्या विचार ऐसा, आम्ही पुरता तो केला | अज्ञानाच्या अस्तित्वाचा, परि न मागमूस दिसला || १२७

म्हणोनि अज्ञान अक्षरें । नुमसूं आतां निदसुरें । परी आन येक स्फुरे । इयेविषयीं ॥ ७-८५ ॥

म्हणुनी आता नच उच्चारू, नांव ही ते अज्ञानाचे | अज्ञाना संबंधी अभ्यासू, नवे पैलू विचारांचे || १२८.

आपणया ना आणिकातें । देखोनि होय देखतें । वस्तु ऐसिया पुरतें । नव्हेचि आंगें ॥ ७-८६ ॥

आत्मतत्व ना पाही निजांगा, वा पाही की, नच दुसरे | आत्मतत्वी केवळ अनुभूती, पाहणेही त्यातची विरे || १२९.

पूर्ण ज्ञानमय आत्मा असता, निजरुप वा दुसरे कांही | घडे सहजी जाणणे, जरि ना, दर्शन दृश्य नि द्रष्टाही || १३०.

तरी ते आपणयापुढें । दृश्य पघळे येव्हडें । आपण करी फुडें । द्रष्टेपणें ॥ ७-८७ ॥

ज्ञानमात्र जी आत्मवस्तू ती, जगदाकारे विस्तरली | स्वये जाहल्या विश्वरुपाला, बघण्या द्रष्टाही झाली. || १३१.

जेथं आत्मत्वाचें सांकडे । तेथ उठे हें येव्हडें । उठिलें तरी रोकडें । देखतसों ॥ ७-८८ ॥

आत्मभानहि संकट ज्यासी, तोचि विनटला विश्व असे | तोचि पाहतो सर्व पसारा, विपरित ऐसे दृश्य कसे || १३२.

भेद ज्यात ना कदापि संभव, स्वये विनटला भेद रुपे | निराकारही ये आकारा, करुनी सारे तोचि लपे || १३३.

आत्मस्वभावाहुनी वेगळे, दृश्य नि द्रष्टेपण आले | कारण शोधू आत्मस्वरूपी, ऐसे हे कैसे घडले || १३४.

न दिसे जरी अज्ञान । तरी आहे हें नव्हे आन । यया दृश्यानुमान । प्रमाण जालें ॥ ७-८९ ॥

जरि अज्ञान न कुणा दिसेना, विषय न होई प्रमाणांचा | बघता हा परि विश्वपसारा, वाटे उद्योगचि त्याचा || १३५.

जरी कुणा प्रत्यक्ष दिसेना, जगत दृश्य हे अज्ञाने | विषय नसे प्रत्यक्ष प्रमाणा, परि जाण ये अनुमाने || १३६.

ना तरी चंद्रु येक असे । तो व्योमीं दुणावला दिसे । तरी डोळां तिमिर ऐसें । मानूं ये कीं ॥ ७-९० ॥

आकाशी तो चंद्र एकचि, दुणावला नयनास दिसे | अनुमाने हे सिद्ध होतसे, तिमिर दोष नयनात असे || १३७.

भूमीवेगळीं झाडें । पाणी घेती कवणीकडे । न दिसती आणि अपाडें । साजीं असती॥ ७-९१ ॥

कुठे माळ वा डोंगराळ वा, विविध वृक्ष दिसती हिरवे | आणि बुडाशी दिसे कोरडे, कोठुनि जल ये ना ठावे || १३८.

तरी भरंवसेनि मुळें । पाणी घेती हें न टळें । तैसें अज्ञान कळें । दृष्यास्तव ॥ ७-९२ ॥

जळाविना ना येई तजेला, वृक्ष भूगर्भी शोधी जला | तैसी अज्ञानेचि दृश्यता, निश्चित येई विश्वाला || १३९.

चेइलिया नीद जाये । निद्रिता तंव ठाउवी नोहे । परी स्वप्न दाऊनि आहे । म्हणों ये कीं ॥ ७-९३ ॥

जागृती येता झोप दिसेना, नच दिसते झोपल्यावरी | स्वप्न दृश्य ते मात्र दिसेची, म्हणजे आहे झोप खरी || १४०.

म्हणोन वस्तुमात्रें चोखें । दृश्य जरी येव्हडें फांके । तेव्हां अज्ञान आथी सुखें । म्हणों ये कीं ॥ ७-९४ ॥

निर्विकार नि शुद्ध वस्तु परि, द्रश्यरुपे इतुके पसरे | ज्ञानाला जरि ना दिसले तरि, आहे अज्ञानची खरे || १४१.

अगा ऐसिया ज्ञानातें । अज्ञान म्हणणें केउतें । काय दिवो करी तयातें । अंधारु म्हणिपे ? ॥ ७-९५ ॥

सिद्धांती उत्तरती; ज्ञानाचे, द्रष्टा दर्शन दृश्य असे | त्रिविध भेद जे प्रतीत होती, अज्ञानाचे कार्य नसे || १४२.[मूळओवी ८७]

जगत् रुपे हा दृश्य विकासचि, केवळ ज्ञान प्रकाशाचा | अज्ञानाचे नसे कार्य हे, खेळ असे चैतन्याचा || १४३.

प्रकाशवी जो साऱ्या जगता, दृश्यमान करि विश्वाला | त्या कैसे अंधार म्हणावे?, जेणे प्रकाशची झाला || १४४.

‘सर्व क्षेत्रीचा क्षेत्रज्ञचि मी,’ गीतेत नारायण वदती | तोचि सारे विश्व चाळवी, कोठे अज्ञानास गती? || १४५

अगा चंद्रापासून उजळ । जेणें राविली वस्तु धवळ । तयातें काजळ । म्हणिजतसे ॥ ७-९६ ॥

ज्या योगे ये अधिक धवलता, चंद्राहुनी ही शुभ्र अशी | त्यासी काजळ कैसे म्हणणे?, शुभ्र वस्तु ती कृष्ण कशी ? || १४६.

आगीचें काज पाणी । निफजा जरी आणी । अज्ञान इया वहणी । मानूं तरी तें ॥ ७-९७ ॥

अग्नीचे जे दहनकार्य ते, जरि घडेल जलाकरवी | तरि मानू की ज्ञानकार्यही, घडेल अज्ञानाकरवी || १४७.

कळीं पूर्ण चंद्रमा । आणून मेळवी अमा । तरी ज्ञान हें अज्ञान नामा । पात्र होईजे ॥ ७-९८ ॥

सर्वचि सोळा कळा मिळवुनि, चंद्रा आणुनि उदयाला | शुभ्र प्रकाशे विश्व प्रकाशील, अवसेच्या कां रात्रीला || १४८ .

तरीच अज्ञानास पात्रता, चिद्विलास या जगताची | अशी मान्यता मिळण्यासाठी, हवी शक्यता साऱ्यांची ?|| १४९

वोरसोनि लोभें । विष कां अमृतें दुभे । ना दुभे तरी लाभे । विषचि म्हणणें ॥ ७-९९ ॥

जरि विषाने सोडुनि पान्हा, दोहविले ते आपणाशी | तरि काय अमृत लाभास्तव, सोडिल कां निजधर्माशी ?|| १५०

तैसा जाणणेयाचा वेव्हारू । जेथें माखला समोरु । तेथें आणिजे पुरू । अज्ञानाचा ॥ ७-१०० ॥

जाणीवरुपे खळाळतो जो, प्रवाह आहे ज्ञानाचा | त्यासी विसंगत कसे म्हणावे, पूरचि हा अज्ञानाचा ? || १५१.

तया नांव अज्ञान ऐसें । तरी ज्ञान होआवें तें कैसें ? । येऱ्हवीं कांहींचि असे । आत्मा काई ? ॥ ७-१०१ ॥

जरि त्यास अज्ञान म्हणावे, तरी ज्ञान मग कसे असे ? | सारी सत्ता ती आत्म्याची, शून्यरुपे अज्ञान वसे || १५२.

कांहींच जया न होणें । होय तें स्वतां नेणे । तरी शून्याचीं देवांगणें । प्रमाणासी ॥ ७-१०२ ॥

सारे कांही तोचि असता, त्याविण व्यवहार न होणे | ब्रह्मांडही ज्यांच्या अस्तित्वी,प्रमाण त्यासि कुणी देणे ?|| १५३

छायेसम जे अभाव रूपी, शून्य असे अज्ञान असे | कांही जाणणे, अन्य कार्यही, याचा त्या संबंध नसे || १५४

असे म्हणावयाजोगें । नाचरे कीर आंगें । परी नाहीं हें न लागे । जोडावेंचि ॥ ७-१०३ ॥

निर्विकार नि निश्चल श्रीहरी, त्याचे असणे दिसत नसे | म्हणुनि नसे तो, ऐसे नाही, साऱ्या कारण तोच असे || १५५.

कोणाचे असणेंनवीण असे । कोणी न देखतांचि दिसे । हें आथी तरी काईसें । हरतलेपण ॥ ७-१०४ ॥

कुणासाठी ना आत्मदेव तो, असे म्हणा, वा नसे म्हणा | त्याचे असणे सदैव असते, त्यासि शोधणे लागेना || १५६.

कुणी न पाहताहि तो असे, सदा सर्वत्रहि तोचि वसे | नित्य प्राप्तचि आत्मवस्तु ती, नाहीपण तिज कदा नसे || १५७ .

समर्थ कुणी ना तया जाणण्या, स्वयेचि जाणे आपणाशी | स्वसंवेद्यचि अनुभूति त्याची, समरस व्हावे ते त्याशी || १५८ .

मिथ्यावादाची कुटी आली । ते निवांतचि साहिली । विशेषाही दिधली । पाठी जेणें ॥ ७-१०५ ॥

‘ब्रह्म दिसेना म्हणुनि मिथ्या,’ निवांत ऐकुनी सहन करी | विशेष निजरुप जगत त्याकडे, पाठ फिरवुनि बसे हरी || १५९

‘सुवर्ण मणी सोन्यात ओविले, तैसा मी सर्वत्र असे’ | स्वये सांगतो हरी स्वमुखे, त्याविण जगती कांही नसे || १६०

जो निमालीही नीद देखे । तो सर्वज्ञ येवढें काय चुके ? । परी दृश्याचिये न टेके । सोईंजो ॥ ७-१०६ ॥

सुषुप्तीतले सौख्य अनुभवे, नित्य असा सर्वज्ञ असे | दृश्य कदा ना, अनुभूति येता, ज्ञान दृष्टीला तोचि दिसे || १६१

‘द्रष्टुम् तद् नष्टम्’ नियमाने, दृश्य कदा हरि होत नसे | म्हणुनि श्रीहरी कदा दिसेना, त्या अनुभवणे जाणणे असे || १६२

वेदु काय काय न बोले । परी नांवचि नाहीं घेतलें । ऐसें कांहीं जोडिलें । नाहीं जेणें ॥ ७-१०७ ॥

सकल ज्ञान वेदात वर्णिले, त्रिकाल वेद्यहि कथियेले | परि आत्म्याच्या वेद्यत्वाशी, पूर्ण मौनचि पाळियले || १६३.

सूर्यो कोणा न पाहे ? । परि आत्मा दाविला आहे ? । गगनें व्यापिता ठाये । ऐसी वस्तु ॥ ७-१०८ ॥

सूर्य पाहतो त्रिभुवन सारे, आत्मस्वरुप न पाहियले | विश्व व्यापुनि पैल श्रीहरी, जेणे रवीला तेज दिले || १६४.

देह हाडांची मोळी । मी म्हणोनि पोटाळी । तो अहंकारु गाळी । पदार्थु हा ॥ ७-१०९ ॥

हाडांची मोळीच देह हा, अहंमुळे दृढ ती ममता | दुर्लक्षी तो आत्मस्वरुपा, विरेची त्या जवळी जाता || १६५.

बुद्धि बोद्ध्या सोके । ते येव्हडी वस्तु चुके । मना संकल्प निके । याहीहुनि ॥ ७-११० ॥

बुद्धि कुशल ती वस्तु जाणण्या, तेणे मन संकल्प करी | परी जाणण्या आत्मरुपाला, बुद्धी पुरते मौन धरी || १६६.

विषयाची बरडी । अखंड घासती तोंडीं । तियें इंद्रियें गोडी । न घेपती हे ॥ ७-१११ ॥

बरड माळरानाचे वरती, गवत तोकडे खातांना | ढोरे घाशिती मुखास आपुल्या, तृप्ति न, क्लेशचि परि नाना || १६७

सुखा शोधिती तशी इंद्रिये, बरड विषयी त्या पुनःपुन्हा | कदा न तृप्ति सदैव दुःखी, आत्मरसाविण गोडीच ना || १६८

परी नाहींपणासकट । खाऊनि भरिलें पोट । ते कोणाही सकट । कां फावेल ? ॥ ७-११२ ॥

ग्रासुनिया ते भूत भविष्या, तृप्तची आत्माराम असे | अनंतास त्या पूर्णरूपाने, कोण कदा जाणील कसे ?|| १६९.

उंबरातले इवलेसे जीव, अशी फळे तरुशी नाना | आदी मध्य अवसान तरुचे, येइल त्या कैसे ध्याना || १७०.

जो आपणासी नव्हे विखो । तो कोणा लाहे देखो । जे वाणी न सके चाखों । आपणापें ॥ ७-११३ ॥

स्वये ज्ञानमय त्या सर्वज्ञा, जाणणेचि कांही न उरे | एकलाची तो, दुजे कुणी ना, विषयास्तव कोणीच नुरे || १७१.

त्या ना जाणीव किंवा नेणीव, आपणाशी तो विषय नसे | चव ती कैसी असे आपुली, जिंव्हा चाखील ते कैसे || १७२

आत्मा नेणे निजस्वरूपाशी, कुणी दुजे जाणीत नसे | ऐशा निर्विकार परब्रहमाला, कोण आणि जाणील कसे ?|| १७३

हें असो नामेंरूपें । पुढासून अमूपें । जेथें आलीच वासिपे । अविद्या हे ॥ ७-११४॥

नामरूपाचे नाना आरसे, आत्म्यापुढती नेण्याला | भिते अविद्या नाश टळण्या, तीही पाहिना आत्म्याला || १७४.

म्हणोनि आपुलेंचि मुख । पहावयाची भूक । न वाणे मा आणिक । कें रिघेल ? ॥ ७-११५ ॥

निजमुख बघण्याची इच्छाही, आत्म्याठायी मुळी नसे | तोचि सर्व मग कुणा पहावे, ऐसे त्या वाटेल कसे?|| १७५

नाडिले जें वादीकोडें । आंतुचि बाहेर सवडे । तैसा निर्णो सुनाथा पडे । केला जेथें ॥ ७-११६ ॥

खेळ गारुड्याचा पाहुनिया, व्यर्थ दवडिती द्रव्य खुळे | आत्मदर्शना तैसे सिद्धांती, भुलविती व्यर्थची ते सगळे || १७६.

कां मस्तकांत निर्धारिली । जो छाया उडों पाहे आपुली । तयाची फांवली । बुद्धि जैसी ॥ ७-११७ ॥

पाया पासुनी मस्तक इतुकी, मोजुनिया ती निजछाया | उल्लंघाया उडी मारी तंव, बुद्धिच गेली असे वाया || १७७.

तैसें टणकोनि सर्वथा । हे ते ऐसी व्यवस्था । करी तो चुके हाता । वस्तूचा जिये ॥ ७-११८ ॥

शोधुनी ग्रंथा, गहन विचारे, ठरवित आत्मा कसा असे ?| त्यांची बुद्धी चळली, अनंता; कोण वर्णनार कैसे ?|| १७८.

अनंतास त्या अनुमानी तो, सक्षम ऐसा कोण असे ?| कुणी कल्पना करुनी मानिती, कवणा पुरता ज्ञात नसे || १७९.

आतां सांगिजे तें केउतें । शब्दाचा संसारा नाहीं जेथें । दर्शना बीजें तेथे । जाणीव आणी ? ॥ ७-११९ ॥

आत्म्याठायी मुळी न थारा, शब्दांच्या संसाराला | दृश्य नि द्रष्ट्या विनाचि केवळ, जाणीव दर्शन स्थितीला || १८०

जयाचेनि बळें । अचक्षुपण आंधळें । फिटोनि वस्तु मिळे । देखणी दशा ॥ ७-१२० ॥

जयाचेनि सामर्थ्ये लाभे, दर्शन ते अनुभूतीने | ज्ञानदृष्टी ती अमोल लाभे, विश्व व्यापिले श्रीहरीने || १८१.

आपुलेंचि दृश्यपण । उमसो न लाहे आपण । द्रष्टत्वा कीर आण । पडली असतां ॥ ७-१२१ ॥

पूर्ण ज्ञानमय आत्मदेव तो, स्वरूपी दृश्याभाव नसे | दृश्य नसे तरि द्रष्टा कैसा, निजस्वरूपीची स्वस्थ असे || १८२

कोण कोणा भेटे | दिठी कैची फुटे | ऐक्यासकट पोटे | आटोन गेले ||१२२

द्रष्टेपण ते सुप्तचि राही, दृश्य दर्शनी तोचि असे | नसे दुजेपण आणि एकपण, त्याविण जगती कांही नसे || १८३.

जेंव्हा सारे एक तत्वचि, ओतप्रोतहि तेचि असे | कुणी कुणाला भेटायाचे, दुजे कुणीही तेथं नसे || १८४

येव्हढेंही सांकडें । जेणें सारोनि येकीकडे । उघडिलीं कवाडें । प्रकाशाचीं ॥ ७-१२३ ॥

अबाधित निज निर्विकारिता, आणि ती निर्द्वंद्व स्थिती | स्वयंप्रकाशे उघडी कवाडे, स्वसंवेद्यता नि अनुभूती || १८५.

अनंत आणि निराकार तो, दृश्य न होई कवणाला | उघडिली नरदेहीचि द्वारे, भेटण्यास ते श्रीहरीला || १८६

डॉक्टर रहाळकर [लंडन] यांनी येथून पुढील भाग जगद्रूप चिद्विलास (ज्ञान विलास) असा संबोधिला आहे.

दृश्याचिया सृष्टी । दिठीवरी दिठी । उठलिया तळवटीं । चिन्मात्रची ॥ ७-१२४ ॥

एक जरी चिन्मात्र ब्रह्म ते, दृश्य सृष्टीच्या वरी लहरी | अखंड येती जाती आश्रया, निवांत निश्चल असे हरी || १८७

दर्शनऋद्धि बहुवसा । चिच्छेषु मातला ऐसा । जे शिळा न पाहे आरिसा । वेद्यरत्नाचा ॥ ७-१२५ ॥

अनेकविध पाहता उपाधी, विलसत निज अंगावरती | जोर चढे तो चैतन्याला, नित्यचि नूतन उत्पत्ति || १८८

क्षणीं क्षणीं नीच नवी । दृश्याची चोख मदवी । दिठीकरवीं वेढवी । उदार जे ॥ ७-१२६ ॥ #

क्षणाक्षणाला नित्य नवी ती, वस्त्रे स्वरूपी दृष्याची | उदार होऊनि दृष्टीकरवी, नेसवित बहु वाणाची || १८९.

मागिलिये क्षणीचीं अंगें । पारुसी म्हणोनियां वेगें । सांडूनि दृष्टि रिगे । नवेया रूपा ॥ ७-१२७ ॥

मागिल क्षणीची दृश्ये जीहि, मानुनि सारी पारोशी | झडकरि तीही टाकुनी देई, नवीन सृजि तो साजेशी || १९०.

तैसीच प्रतिक्षणीं । जाणिवेचीं लेणीं । लेऊनि आणी । जाणतेपण ॥ ७-१२८ ॥

तैसी जगती क्षणाक्षणाला, जाणीवरूपी जी लेणी | बदलुनि तीही जाणतेपणा, नाविन्याचा तो आणी || १९१.

ज्ञान दृष्टीची व्यापक जाणीव, जाणतेपणा नवा-नवा | श्रीहरीची ती दिव्य अनुभूति, ऐश्वर्याचा साज नवा || १९२.

आणि या विश्वात नित्य तो, विलसे नित नाविन्याने | आविष्कार शिव सौंदर्याचे, निज दृष्टीची नव किरणे || १९३

आत्मबोध तो व्हावा म्हणुनी, उत्कंठा जाहली जरी | अंतरीच्या आवाजे त्यासि, सुयोग्य जाणीव देत हरी || १९४

तया परमात्मपदीचें शेष । ना काहीं तया सुसास । आणि होय येव्हढी कास । घातली जेणें ॥ ७-१२९ ॥

सदा एकल्या परब्रह्माला, वाटे बहुरुप ते व्हावे | स्वयेचि द्रष्टा दृश्य नि दर्शन, रूप घेई तो नवे नवे || १९५.

सर्वज्ञतेची परी । चिन्मात्राचे तोंडवरी । परी तें आन घरीं जाणिजेना ॥ ७-१३० ॥

सृष्टीमधल्या चैतन्यातचि, ज्ञानशक्ती जी दडली असे | हरीची सर्वज्ञता असे ती, त्या ठायीचि विलसतसे || १९६

एवं ज्ञानाज्ञान मिठी । तेंही फांकतसे दिठी । दृश्यपणें ये भेटी । आपणपयां ॥ ७-१३१ ॥

देहबुद्धी अज्ञान भेटता, प्रगल्भता ये ज्ञानाला | वासुदेव तो सर्वाठायी, दृश्य एकचि दृष्टीला || १९७.

तें दृश्य मोटकें देखें । आपण स्वयें दृष्टत्वें तोखे । तेंचि दिठीचेनि मुखें । माजीं दाटे ॥ ७-१३२ ॥

ब्रह्म पाही ती त्याची निर्मिती, संतोषे साक्षीभावे | दृष्टीमाजी दृश्य उमटते, दाटे अंतरी निजभावे || १९८.

तेव्हां घेणें देणें घटे । परी ऐक्याचें सूत न तुटे । जेवीं मुखीं मुख वाटे । दर्पणें केलें ७-१३३ ॥

देणे घेणे आदि सारे, जरी भासते द्वैताने | परि आश्रय जे परब्रह्म, ते विचलित ना होई त्याने || १९९.

आरशात पाहता मुखाला, मुखे दोन जरी दिसती | परी मुखाच्या एकत्वाला, पोहचे न जराहि क्षती || २००.

अंगें अंगवरी पहुडे । चेइला वेगळा न पडे । तया वारुवाचेनि पाडें । घेणें देणें ॥ ७-१३४ ॥

उभे राहुनि अश्व झोपतो, तसाच जागृत त्याच परे | उभेपणा ना बिघडे तैसे, ब्रह्म न विचलित व्यवहारे || २०१.

पाणी कल्लोळाचेनि मिसें । आपणपें वेल्हावे जैसें । वस्तु वस्तुत्वें खेळों ये तैसें । सुखें लाहे ॥ ७-१३५ ॥

जलासंगती जलचि खेळे, आपुल्या लाटा कल्लोळे | आपणासंगे आनंदाने, तैसे ब्रह्महि ते खेळे || २०२

गुंफिवा ज्वाळांचिया माळा । लेइलियाही अनळा । भेदाचिया आहाळां । काय पडणें आहे ? ॥ ७-१३६ ॥

अनेक विध माळा ज्वालांच्या, गळा घालता अग्निच्या | काय भिन्नता येई तयाने, माळा आणि अग्नीच्या || २०३

किं रश्मीचेनि परिवारें । वेढुनि घेतला थोरें । तरी सूर्यासि दुसरें । बोलों येईल ? ॥ ७-१३७ ॥

असंख्य किरणांच्या वसनांनी, भास्कर विलसतसे गगनी | वेगळेच ते किरण नि भास्कर, म्हणेल ऐसे काय कुणी || २०४

चांदणियाचा गिंवसु । चांदावरी पडिलिया बहुवसु । काय केवळपणीं त्रासु । देखिजेल ? ॥ ७-१३८ ॥

शुभ्र नि शीतल असे चांदणे, चंद्राभंवती ते पसरे | ऐशा कौमुदी भाराने या, चंद्र त्रासला काय बरे ?|| २०५.

दळाचिया सहस्रवरी । फांको आपुलिया परी । परी नाहीं दुसरी । भास कमळीं ॥ ७-१३९ ॥

कमळ उमलता, दळे सहस्त्रही, विकसित होती जळावरी | जरि पाकळ्या सहस्त्र दिसती, परी कमळ ते एक तरी || २०६.

सहस्त्रवरी बाहिया । आहाती सहस्त्रर्जुना राया । तरी तो काय तिया । येकोत्तरावा ? ॥ ७-१४० ॥

सहस्त्रार्जुना नरेशास ते, बाहू सहस्त्र ही होते | देह एक नि सहस्त्र बाहू, ऐशी कां गणना होते ? || २०७.

सौकटाचिया वोजा । पसरो कां बहू पुंजा । परी ताथुवीं दुजा । भाव आहे ? ॥ ७-१४१ ॥

कोष्ट्याच्या मागावर बघता, अनेक दिसती सुते किती | परि सर्व ते कापुस धागे, योजियले मागावरती || २०८.

कोडीवरी शब्दांचा । मेळावा घरीं वाचेचा । मीनला तऱ्ही वाचा । मात्र कीं ते ॥ ७-१४२ ॥

कोटी कोटी ते शब्द कितीतरी, वाणी निवासी वस्तीला | परी असे ती एकची वाणी, वाढ न होई गणतीला || २०९.

तैसे दृश्याचे डाखळे । नाना दृष्टीचे उमाळे । उठती लेखावेगळे । द्रष्टत्वेंचि ॥ ७-१४३ ॥

नानाविध जरि दिसती दृश्ये, जगतामाजी दृष्टीला | परि प्रकाशक द्रष्टा एकचि, साक्षीभावे विश्वाला || २१०.

गुळाचा बांधा । फुटलिया मोडीचा धांदा । जाला तरी नुसधा । गूळचि कीं तो ॥ ७-१४४ ॥

ढेप गुळाची फुटता होती, वेगवेगळे ते तुकडे | गूळरूपाने परि एकचि, जरि दिसताती अलग खडे || २११.

तैसें हें दृश्य देखो । कीं बहू होऊनि फांको । परी भेदाचा नव्हे विखो । तेचि म्हणोनि ॥ ७-१४५ ॥

परब्रह्म सच्चिदानंद तो, हृदयी बैसुनी पाहि लीला | नामरुपाने विविध होऊनि, दृश्य करी कि जगताला || २१२.

द्रष्टा वा तो दृश्य होऊनि, अनुभवितो तो विश्व स्वये | एकत्वाला नच ती बाधा, परि कदापि येत तये || २१३.

तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा । जऱ्ही विश्वा अशेखा । भरला आहे ॥ ७-१४६ ॥

सकल विश्व हे रूप तयाचे, विविध रूपाने विलसतसे | परि तयाच्या अखंडतेला, कदा न बाधा येत असे || २१४.

दुबंधा क्षिरोदकीं । बाणें परी अनेकीं । दिसती तरी तितुकीं । सुतें आथी ? ॥ ७-१४७ ॥

विविध रंगी वा, शुभ्र धवल ती, वस्त्रे अनेक जरि दिसती | सूत कापसाचेचि एक ते, प्रकार दिसती जरि किती || २१५.

पातयाचि मिठी । नुकलितां दिठी । अवघियाची सृष्टी । पाविजे जरी ॥ ७-१४८ ॥

न फुटतां बीजकणिका । माजीं विस्तारे वटु असिका । तरी अद्वैतफांका । उपमा आथी ॥ ७-१४९ ॥

नेत्र पापण्याही न उघडिता, सृष्टी सकल ती जरी असे | वा बीज कणिका ना उकलिता, वटवृक्ष पुरता विलसे || २१६.

तरी तयांच्या उपमा देणे, उचित जाहले ते असते | एकत्वा नच बाधा येता, विविधता ही विश्वी दिसते || २१७

मग मातें म्यां न देखावें । ऐसेही भरे हावें । तरी आंगाचिये विसवे । सेजेवरी ॥ ७-१५० ॥

जे जे श्रीहरी पाहो जाये, स्वरूपची येई नजरेला | आता पाहुनि काय करावे, विचार ऐसा तो केला || २१८.

निवांत होऊनि स्वानंदी तो, स्व-स्थचि नारायण रमला | स्वसुखातची जगन्नाथ तो, स्वरूपात तल्लीन झाला || २१९

ज्ञानदृष्टीने विविधतेत या, निजरुप पहात कधि रमतो | कधी होऊनी स्व-स्थ अंतरी, स्वरूपी तल्लीन तो होतो || २२०

विश्व रूपातील निजलीलातची, रंगुनी होई आनंदी | कधी सोडुनी सर्व उपाधी, पूर्ण विरक्तचि स्वानंदी || २२१.

पातयाचि मिठी । पडलिया कीजे दिठी । आपुलेचि पोटीं । रिगोनि असणें ॥ ७-१५१ ॥

कधी पापण्या मिटुनि दृष्टी, आंत स्थिरावे आपणची | आपुल्या ठायी सुस्थिर दृष्टी, इच्छा बाह्य न बघण्याची || २२२

कां नुदेलिया सुधाकरु । आपणपें भरे सागरु । ना कूर्मी गिळी विस्तारु । आपेंआप ॥ ७-१५२ ॥

सुधाकराचा उदय न होता, सागर अचल निवांत असे | अवयव संकोचिता आपुले, कांसव निवांतचि बैसे || २२३

अवसेचिये दिवसीं । सतराविये अंशीं । स्वयें जैसें शशी । रिगणें होय ॥ ७-१५३ ॥

मिटवुनि आपुल्या सर्व कलांना, अंवसेला ना चंद्र दिसे | कलेत आपुल्या सतराव्या तो, निजरूपी निवांत असे || २२४

तैसें दृश्य जिणतां द्रष्टे । पडले जैताचिये कुटे । तया नांव वावटे । आपणपयां ॥ ७-१५४ ॥

डोळे मिटता, दृश्य विजय तरि, नयना दृश्यचि ते सरले | साक्षीभावा अंतरी विरवुनि, श्रीहरी स्वानंदी रमले || २२५

आत्मारामे दृष्टी अंतरी, दृश्यहि बाहेरी लपले | आता दृश्य न द्रष्टा दर्शन, एक अद्वैतचि ते उरले ||

पाहणे कि, नाहीच पाहणे, शून्य भावना उरती मना | न पाहताहि, घडे पाहणे, आपण विश्वहि भेदचि ना || २२६

सहजें आघवेंचि आहे । तरी कोणा कोण पाहे ? । तें न देखणेंचि आहे । स्वरूप निद्रा ॥ ७-१५५ ॥

परब्रह्म ते सर्वचिठायी, जे जे विद्यमान जगती | येथे कोणी कुणा पाहणे?, मिटली ती लोचन पाती || २२७

चित्स्वरूपचि **विलसे जगती**, आत्मानंदी पूर्ण रमे | स्वरूपनिद्रा हीच असे ती, जेथं सृष्टीरुप ते विरमे || २२८.

जेंव्हा एकरुपेचि श्रीहरी, चिद्विलास हा विश्वाचा | वासुदेवरुप कोंदटलेले, केवळ प्रत्यय ये त्याचा || २२९.

नाना न देखणें नको । म्हणे मीचि मातें देखो । तरी आपेंआप विखो । आपैसें असे ॥ ७-१५६ ॥

विरे भाव जंव ना दिसण्याचा, स्वस्थचि हरि निजरूपाशी | केवळ शून्यचि तदाकारिता, स्पर्श नसेचि विषयाशी || २३०

कुणी न द्रष्टा, दृश्य तसेही, भान विसरुनी भंवतीचे | आपण विरता आपणातचि, जाळे फिटते द्वैताचे || २३१.

मनी कांहीची भाव नसावा, आंस एकचि स्वरूपाची | सहजी विरती विषय सर्वही, घ्यावी अनुभूति श्रीहरीची || २३२

यासाठी ना कांही साधन, स्वये न कांही चिंतियणे | एकाग्रचि त्या अंतःकरणे, सद्गुरु स्मरुनी अनुभवणे || २३३

जें अनादिच दृश्यपणें । अनादिच देखणें । हें आतां कायी कोणें । रचूं जावें ? ॥ ७-१५७ ॥

हरी अनादी दृष्यपणाने, अनादीच त्याचे बघणे | उभय अनादि निजस्वरूपीची, नवीन कांही ना रचणे || २३४.

नित्यचि अनुभूति आत्मरुपाची, लिप्तचि भौतिकाशी असणे | सहज भाव हा अनुभूतीचा, नित्यचि स्वानंदी रमणे || २३५.

प्रपंच दृश्ये नित्य बदलती, हा तर विलास द्रष्ट्याचा | आभासचि हा फक्त खेळण्या, विसर कदा ना स्वरूपाचा || २३६.

अवकाशेशीं गगना । गतीसीं पवना । कीं दीप्तीसीं तपना । संबंधु कीजे ? ॥ ७-१५८ ॥

अवकाशी आकाशे असणे, गतीमान असणे पवने | अग्नि जेथे तेथं तापणे, सहजचि हे सारे होणे || २३७.

विश्वपणें उजिवडे । तरी विश्व देखे फुडें । ना तें नाहीं तेव्हढें । नाहींची देखे ॥ ७-१५९ ॥

चिद्विलास तो होता विकसित, हरी दाटला चराचरा | ब्रह्म पाहते ते विश्वाला, आणि अभावहि सारा || २३८

विश्वाचें असे नाहीं । विपायें बुडालियाही । तऱ्ही दशा ऐसिही । देखतचि असे ॥ ७-१६० ॥

विश्वाचे अस्तित्व हि बघतो, अभावहि तैसा बघतो | असणे नसणे हेही नसता, अभाव नसणे अनुभवतो || २३९.

कापुराहि आथी चांदिणें । कीं तोचि न माखे तेणें । तैसें केवळ देखणें । ठायें ठावो ॥ ७-१६१ ॥

शुभ्रता नि शीतलता दोन्ही, स्वयेची कर्पुर अंग असे | हे न घेतले चंद्रापासून, स्वयंभूचि कापुरी असे || २४०.

तैसे हरीचे असे पाहणे, निजरुपि राहुनि ते बघणे | न पाहताही घडे पाहणे, जेकि सहजी अनुभवणे || २४१.

दुसरा आशय

कापुर आणि चंद्र उभयहि, शुभ्र नि शीतल नित्य असे | कापरातले उभय धर्म ते, त्यातचि राहुनिया विलसे || २४२.

परी शशीतुनी निघे चांदणे, शुभ्र न शीतल बाहेरी | स्वयेही त्याने वेढुनी घेणे, सारे शीतल चंदेरी || २४३.

कापरापरि हरी अनुभूति, स्व-स्वरूपी रंगुनी जाणे | स्वानंदी राहुनिया निजरुप, अनुभवणे परमात्मपणे || २४४.

किंबहुना ऐसें । वस्तु भलतिये दशे । देखतचि असे । आपणपयातें ॥ ७-१६२ ॥

ज्ञानमात्रचि असे पाहणे, स्वरूपि स्वरूपा अनुभवणे | भाव अभाव ही तो विश्वाचा, अथवा भावातीत असणे || २४५.

भावाभावरहित जी दशा, अनुभविताही निजस्वरूपि | क्रियाशून्यता कदा न भंगे, सदा हरी तो आत्मरूपी || २४६.

दृश्यपणे ना दृश्य पहावे, निजरूपि रंगुनिया जाणे | व्यष्टि समष्टी भेद विरावा, एकच ब्रह्मी समरसणे || २४७.

क्रियावीण ते असे पाहणे, ज्ञानमात्रची अनुभूति | परब्रह्मता नित्य भाव हा, सहजी श्री हरीची प्रचिती || २४८.

मनोरथांचीं देशांतरें । मनीं प्रकाशून नरें । मग तेथें आदरें । हिंडे जैसा ॥ ७-१६३ ॥

मनात चिंती विविध देश ते, आपुल्याची त्या निज छंदे | बाधा स्वपणाचि न मोडिता, विहरत स्वयेचि आनंदे || २४९.

कां दाटला डोळा डोळ्यां । डोळा चितारा होऊनियां । स्फुरे चोख म्हणौनियां । विस्मो नाहीं ॥ ७-१६४ ॥

बंद करुनिया उभय पापण्या, वरुनी दाबता बोटांनी | तेजोमय ते दर्शन दिसते, प्रगटे दडले जे नयनी || २५०.

स्वयेचि होऊनी चित्रकार तो, नेत्र चित्रितो रेषांना | तोचि सृजि नि तोचि पाहतो, रम्य कलाकृती नाना || २५१.

लष्कर-ग्वाल्हेर येथील योगीवर श्री महिपतीनाथ यांनी उकललेले रहस्य [अमृतवाहिनी][ओव्या २५२- २५५]

उभय लोचना बंद करोनी, सोडुनि भौतिक अनुभूति | पूर्ण स्व-स्थ राहुनि पहावे, मौज दिसे दृष्टीसच ती || २५२.

हळू दाबणे नयना बोटे, दृष्टीला जेही दिसते | शांत पहावे लक्ष देऊनि, मौजचि अनुभूत ती होते || २५३.

दिव्यत्वाचे होई दर्शन, दृष्टीला जेही दिसते | शांत पहावे लक्ष देऊनि, मौजचि अनुभूत ती होते || २५४.

सुंदर तेजोमय ती किरणे, आणि प्रकाशमय ज्योती | जणु रूप्याच्या तारा किंवा, चांदण्याचि येती जाती || २५५.

विविध पसारा दिव्यत्वाचा, सहजी खेळचि तेजाचा | अंतरात ही स्मृति साठवा, अनुभव हा दिव्यत्वाचा || २५६.

यालागीं एकें चिद्रूपें । देखिजे कां आरोपे । आपणयां आपणपें । काय काज ? ॥ ७-१६५ ॥

ब्रह्माठायी ना प्रवृत्ती, आणी निवृत्तीहि नसे | जे घडते ते विना क्रियाचि, बघणे वा ना बघणेही तसे || २५७

ज्ञानमयचि चिद्रूप ब्रह्माने, स्वयेचि स्वरूपा जे बघणे | ते न पाहणे परि अनुभवणे, समरसुनी एकत्वाने || २५८

किळेचें पांघरुन । आपजवी रत्न कोण ? । कीं सोने ले सोनें पण । जोड जोडूं ? ॥ ७-१६६ ॥

रत्नावर जी तेजोमयता, स्वयंभू, न कुणी निर्मियली | सुवर्णास जी सोनझळाळी, अंगभूतचि ना सृजिली || २५९.

चंदन सौरभ वेढी ?। कीं सुधा आपणया वाढी ?। कीं गूळ चाखे गोडी ?। ऐसें आथी हें ? ॥ ७-१६७ ॥

आणी न चंदन सुगंध कुठुनी, मधुरता न अमृत वाढी | गूळ चाखुनी गोडी आपुली, ना यत्ने आणी गोडी || २६०.

कीं उजाळाचे किळे । कापुरा पुटीं दिधलें ? । कीं ताऊन ऊन केलें । आगीतें काई ? ॥ ७-१६८ ॥

कर्पुरअंगी चमक असे जी, पुटे देऊनी नच आणिले | अग्नीअंगी जी दाहकता, त्यास्तव त्या ना तापविले || २६१

ना ना ते लता । आपुले वेली गुंडाळितां । घर करी न करितां । जयापरी ॥ ७-१६९ ॥

वृक्षावरी चढतांना वेली, गुंफुनी घेती त्या तरुला | आपणासाठी निवास सहजी, जणु तियेने सृजियेला || २६२.

कां प्रभेचा उभला । दीपप्रकाश संचला । तैसा चैतन्यें गिंवसला । चिद्रूप स्फुरे ॥ ७-१७० ॥

दीप प्रज्वलित प्रकाश पसरे, तेजोमय परिसरा करी | स्फुरता चैतन्याने उजळे, दृश्यमान ते सर्वपरी || २६३.

ऐसें आपणया आपण । आपुलें निरीक्षण । करावें येणेंवीण । करितुचि असे ॥ ७-१७१ ॥

नित्यचि साक्षी आत्मदेव तो, स्वयेचि बघणे स्वरूपाशी | क्रियेविण हे बघणे होई, नलगे प्रवृत्ती ती त्याशी || २६४.

जोवरी आपण आहो जगती, अलिप्त राहुनी करि कर्मे | लक्ष जयाचे निजरूपातचि, स्वानंदी तो नित्य रमे || २६५.

स्थिती सुखाची वा दुःखाची, आत्मदेव त्या लिप्त नसे | सदा रमावे स्वानंदीची, तीच स्व-स्थिती सहज असे || **२६६**

अहंकार स्वामित्व नि जगही, केवळ जागृतीत असती | निद्रेमाजी सुखद अवस्था, सारे विरुनिया जाती || २६७.

दृष्टी जाता ती बाहेरी, ममत्व भोगा निर्मितसे | तिज वळवावे अंतर्यामी, निजरूप आनंदीच असे || २६८.

आपणाशीचि आपण बघणे, देह विसरुनी अनुभवणे | साक्षीभावे होती कर्मे, परि असणे ते हरिपणे || २६९

विवेक आणि विरक्ती पथे, आणि शुद्ध अंतःकरणे | साक्षीभावे होती कर्मे, परि असणे ते हरिपणे || २७०.

निज चैतन्ये विश्व चाळवी, स्फुरणमात्रचि तो प्रगटे | सहजी दाखवी तो मार्गाला, अंतरी चित्र तसे उमटे || २७१

अंतरीचा आवाज ऐकुनी, सारी कर्मे तशीच करा | स्फूर्तीद्वारे सारे घडवी, निजमनीचे हो साकारा || २७२

ऐसें हें देखणें न देखणें । हें अंधारे चांदिणें । मा चंद्रासि उणें । स्फुरतें का ? ॥ ७-१७२ ॥

बघणे किंवा नाही बघणे, उभय सारखे त्यासि असे | अंधारी वा चांदण्यातही, उणीव चंद्री नसे जसे || २७३.

देह न आपुला, कुणी ना आपुले, आपुला तो साक्षीभावो | निजस्वरूपी ना उणे कदापि, जे जैसे होऊनि जावो || २७४.

म्हणोनि हें न व्हावे । ऐसेंही करूं पावे । तरी तैसाचि स्वभावें । आयिता असे ॥ ७-१७३ ॥

नित्य बदलत्या विश्वरुपाला, हरी कल्पने साकारी | काय कुठे कैसे बदलावे, त्या मनी ये ते आकारी || २७५.

भाग्ये विकसित ज्ञानदृष्टीला, जग नि हरिही उभय दिसे | जग वा केवळ श्रीहरीच वा, जशी भावना दिसे तसे || २७६ .

जेंव्हा वाटे दु:खरूप हा, भोग सृष्टीचा नको मला | गुंतू नकाची कदा तयाशी, सहजी अभाव द्या त्याला || || २७७.

सकली हरीला नित्य पाहता, केवळ सेवाभाव उरे | त्याने पाठविले ज्यासाठी, ते करिता ना कार्य उरे || २७८.

द्रष्टा दृश्य ऐसें । अळुमाळु दोनी दिसे । तेंही परस्परानुप्रवेशें । कांहीं ना कीं ॥ ७-१७४ ॥

क्वचितचि केंव्हा दृश्य म्हणोनी, प्रगटे श्रीहरी भाग्याने | परब्रह्म बघता सामोरे, भक्त नुरेचि द्वैतपणे || २७९.

जैसी ज्याची असे भावना, तसा दृष्टीला हरी दिसे | कुणा दिसे सर्वत्र श्रीहरी, स्थूल दृष्टीला सृष्टी असे || २८०.

तेथें दृश्य द्रष्टां भरे । । द्रष्टेपण दृश्यीं न सरे । मा दोन्ही न होनि उरे । दोहींचें साच ॥ ७-१७५ ॥

दर्शन आणि द्रष्टा दोन्ही, एकचि होती समरसता | बघणे, बघणाराही नुरतो, उरे निखळ त्याची सत्ता || २८१ .

मी माझेपण विरुनी जाता, दृश्य नि द्रष्टा नच उरले | सागरी गंगा प्रवेश करिता, एक रूपेची समरसले || २८२.

अहंकार मन बुद्धी देहही, हे सारे तर सृष्टीचे | आत्मरूप ते नित्यची माझे, दर्शन नित्यचि श्रीहरीचे || २८३.

श्री डोंगरे महाराज 'अमृतवाहिनीद्वारे' १७१ ते १७५ या ओव्यातून ज्ञानदेव मुमुक्षूला नेमके काय सूचित करतात त्याचे विवरण

हरी विलसतो विश्व रूपाने, अलिप्त परि तो नित्य असे | स्वरुपानंदा उपभोगी तो, लक्ष कदा विचलित नसे || २८४ [१७१]

सृष्टी पाहता घडे भोग नि, नच बघताही त्याग असे | सुख नि दुःखहि निपजे त्यातून, तुझा त्याशी संबंध नसे || २८५.

क्रिया नि फलहि उभया आश्रय, आणि प्रकाशक आत्माची | शुक्ल कृष्णी जरि आश्रय शशिचा तो राहे परि अलिप्तची || २८६.

तैसा आत्मा देत आश्रया, नसे लिप्त तो त्यांत कदा | घडे त्यामुळे जरि सर्वही, अलिप्तची तो असे सदा || २८७[१७२]

जेंव्हा वाटे दुःखरूप हा, भोग सृष्टीचा नको मला | गुंतु नकाची कदा तयाशी, सहजी अभाव द्या त्याला || २८८

अलिप्तता ती सहज सिद्धचि, येथे माझे कांही नसे | सुखमात्र मी सदा स्वभावे, दुःखी होणे व्यर्थ असे || २८९ [१७२-१७३]

या सृष्टीतील जे संबंधी, फुका जोडिशी कां नाते ?| क्षणिक पाहुणा जो तो येथे, स्वप्न जसे स्वप्नी विरते || २९० [१७४]

जागृतीत ये सृष्टीरूपाने, कधी हंसवी वा कधी रडवी | निद्रेमाजी सृष्टी मावळे, सुख दुःखाला ती विरवी || २९१

शरिर प्राण मन अहंकार नि, दूर सारूनी बुद्धिला | पुरते शांत नि स्व-स्थ होऊनी, अनुभवी केवळ तू हरीला || २९२[१७५]

मग भलतेथ भलतेव्हां । माझारीले दृश्य-द्रष्टाभावा । आटणी करीत खेंवा । येती दोन्ही ॥ ७-१७६ ॥

दृश्य नि द्रष्टा समरस व्हावे, अलग पाहणे वा व्हावे | कुठे कधीही पुनश्च किंवा, आत्मानंदी रंगावे || २९३.

जगी वर्तावे जगासारखे, भूमिकाचि ही, ना विसरी | जड सृष्टीची करुनि आटणी, अनुभवणे तो एक परी || २९४.

कापुरीं अग्निप्रवेशु । कीं अग्नि घातला पोतासु । ऐसें नव्हे संसरिसु । वेंचु जाला ॥ ७-१७७ ॥

कापुरासी तो अग्नि लाविला, की टाकियला अग्नित तो | एका समयी दोन्ही नाशती, नाश अलग ना तो घडतो || २९५.

येका येकु वेंचला । शून्य बिंदु शून्यें पुसिला । द्रष्टा दृश्याचा निमाला । तैसें होय ॥ ७-१७८ ॥

एकामधुनी एक वजा तर, शून्य उरे नि तेही विरे | तैसे द्रष्टा दृश्य उभयता, नाश पावती एकसरे || २९६.

देह जातसे नित्य अभावी, सोडी त्याविषयी ममता | स्वयेचि हरिपण अद्वैतातील, अनुभवी एकच ती सत्ता || २९७.

किंबहुना आपुलिया । प्रतिबिंबा झोंबिनलिया । झोंबीसकट आटोनियां । जाईजे जेवीं ॥ ७-१७९ ॥

जलातले प्रतिबिंब छेडिता, क्षणात ते विरुनी जाई | बिंब नि प्रतिबिंबीचे दोपण, नच उरते मग ते कांही || २९८.

तैसें रुसता दृष्टी । द्रष्टा दृश्य भेटी । येती तेथें मिठी । दोहींची पडे ॥ ७-१८० ॥

अनुभूतीत ते विरे पाहणे, केवळ उरते अनुभवणे | दृश्य नि द्रष्टा भाव न उरती, एकत्वे सारे होणे || २९९.

सिंधु पूर्वापर । न मिळती तंवचि सागर । मग येकतट नीर । जैसें होय ॥ ७-१८१ ॥

पूर्व नि पश्चिम सिंधु नामे, जोवरी एकत्वे मिळती | मिळता दोघे, एकची सागर, नामे ती विरुनी जाती || ३००.

बहुये हें त्रिपुटी । सहजें होतया राहटी । प्रतिक्षणीं काय ठी । करीतसे ? ॥ ७-१८२ ॥

द्रष्टा दृश्य नि दर्शन त्रिपुटि, ज्ञानप्रवाहीचि विरती | गुंतावे ना त्यामाजी कदापि, भेद कल्पनेचे असती || ३०१.

जोवरी हरीची ना अनुभूति, तोवरि त्रिपुटी कार्य करी | जेंव्हा येई दिव्य अनुभूति, सहजी सर्वत्रचि हरी || ३०२.

दोनी विशेषें गिळी । ना निर्विशिष्टातें उगळी । उघडीझांपी येकेंच डोळीं । वस्तुचि हे ॥ ७-१८३ ॥

हरी होताचि जागृत जेंव्हा, द्रष्टा दृश्यहि मावळते | आणि मिटता ज्ञाननेत्र ते, सृष्टीचक्र ते सुरू होते || ३०३

पातया पातें मिळे । कीं दृष्ट्रत्वें सैंघ पघळे । तिये उन्मळितां मावळे । नवलावो हा ॥ ७-१८४ ॥

पापणी मिटता जेंव्हा हरीने, मायामय ते विश्व दिसे | आणि जेंव्हा पुरता जागृत, हरिविण अन्य न कुणी असे || ३०४

द्रष्टा दृश्याचा ग्रासी । मध्यें लेखु विकासी । योगभूमिका ऐसी । अंगीं वाजे ॥ ७-१८५ ॥

एक वृत्ती ती पुरती विरुनी, दुजी उदया येण्याआधी | संधिकाल तो निर्विचारची, योगभुमिकेचा अवधी || ३०५.

दृश्य पाहुनी द्रष्टा जेंव्हा, नवदृश्या बघण्यापूर्वी | संधिकाल तो पावन जाणा, योगभूमिका ती बरवी || ३०६

उठिला तरंगु बैसे । पुढें आनुही नुमसे । ऐसा ठाईं जैसे । पाणी होय ॥ ७-१८६ ॥

विरता एक तरंग जलावरी, नवा अजुनि परि ना उठला | संधिकाल तैसा जाणावा, निश्चल ऐशा शांत जला || ३०७.

कां नीद सरोनि गेली । जागृती नाहीं चेयिली । तेव्हां होय आपुली । जैसी स्थिति ॥ ७-१८७ ॥

निद्रा सरली परि जागृती, अजुनि पुरती ना आली | ब्रह्मकाल हा आत्मदर्शना, अनुभूति सहजी त्या काली || ३०८.

नाना येका ठाऊनि उठी । अन्यत्र नव्हे पैठी । हे गमे तैशिया दृष्टी । दिठी सुतां ॥ ७-१८८ ॥

एक पाहुनी दृश्य दृष्टीने, अजुनी दुजे ना पाहियले | ऐसी मधली जी निश्चलता, योगभूमिका जाणियले ||३०९

कां मावळो सरला दिवो । रात्रीचा न करी प्रसवो । तेणें गगनें हा भावो । वाखाणिला ॥ ७-१८९ ॥

दिवस संपला, अस्त भानुचा, रात्र परंतु ना झाली | गगनीची ती सहजावस्था, ब्रहमाची संध्या झाली || ३१०.

घेतला स्वासु बुडाला । घापता नाहीं उठिला । तैसा दोहींसि सिवतला । नव्हे जो अर्थु ॥ ७-१९० ॥

किंवा रेचकी, श्वास सोडिला, दुज्यास ते घेण्याआधी | बाहय कुंभकी ज्ञानमात्रचि, तैसा ब्रह्मकाल अवधी || ३११.

‘अनुभवामृत रहस्य’चे कर्ते पंडित राजाराम बुवा ब्रह्मचारी यांनी या ओवीवरच्या भाष्यानुसार विवेचन

सायंकाळी वा की पहाटे, व्यवहाराशी विसरावे | मस्तक मान नि मेरूदंडही, पुरते सरळची ठेवावे || ३१२

शांत होऊनी अंतर्बाह्यहि, केवळ स्मरणी एक हरी | चित्त स्थिर नि श्वसन मंद ते, सुषुम्नेस मग ये उजरी [उदय-प्रगटपणा]||३१३

झोप संपता वा त्या पूर्वी, संधिसमयी स्थिर व्हावे | मस्तक मान नि मेरूदंडही, पुरते सरळची ठेवावे || ३१४

शांत होऊनी अंतर्बाह्यहि, केवळ स्मरणी एक हरी | चित्त स्थिर नि श्वसन मंद ते, सुषुम्नेस मग ये उजरी || ३१५.

मंद दीर्घ तो पूरक करुनी, सहजी कुंभक तो होता | आज्ञाचक्री जाणीव न्यावी, साधे हरीशी समरसता || ३१६.

आज्ञाचक्री जाणीव न्यावी, समरस हरीशी ते व्हावे | नित्य प्राप्त जो तोचि अनुभवी, स्वानंदी ते रंगावे || **३१७ .**

बाह्य कुंभकी प्राण नि मनही, सहजी निश्चल ते होती | विकल्प नि संकल्प सोडुनी, सहजी अनुभवा शांती || ३१८.

कीं अवघांचि करणीं । विषयांची घेणी । करितांचि येके क्षणीं । जें कीं आहे ॥ ७-१९१ ॥

विषयी शोधिती यत्न करोनी, इंद्रियेही ते सौख्याला | रसांचाही रस ब्रह्मसुरस जो, सहजी येतो प्रतितीला || ३१९.

अवघी इंद्रिये स्वाद न घेता, सहजी तृप्तचि ती होती | भूक मोडली त्या सर्वांची, सारे ब्रह्मरसी रमती || ३२०

सारे आनंदीचि होऊनी, विषयांचे ते नांव नसे | ऐसे रमता ते स्वानंदी, जाणीव अद्वैतीची वसे || ३२१.

विषयानंदाहुनी सुरस तो, इंद्रियेही सेवन करिता | सर्व रसांचा एकचि रस तो, सकला तृप्त करी घेता || ३२२.

तयासारिखा ठावो । हा निकराचा आत्मभावो । येणें कां पाहों । न पाहों लाभे ? ॥ ७-१९२ ॥

ऐशी निश्चल मधुर स्थिति त्या, आत्मस्थितीला अनुभवणे | पाहणे न पाहणे कांही ना, केवळ स्वानंदी असणे || ३२३.

उभय स्थितींच्या पैल ही स्थिति, 'सद्सच्चाहम्' हरी म्हणे | न पाहताही सहजी बघणे, आत्मरूप ते अनुभवणे || ३२४.

कायी आपुलिये भूमिके । आरिसा आपुलें निकें । पाहों न पाहों शके । हें कें आहे ? ॥ ७-१९३ ॥

कां समोर पाठिमोरिया । मुखें होऊं ये आरिसिया । वांचूनि तयाप्रति तया । होआवें कां ? ॥ ७-१९४ ॥

काय आरसा निज उज्वलता, जाणू शके कां ते बघूनी? | सन्मुख विन्मुख त्यास जमेना, निजरुप पाही न न्याहळुनी || ३२५

सर्वांगें देखणा रवी । परी ऐसें घडे कवीं । जे उदोअस्तूंचीं चवी । स्वयें घेपे ? ॥ ७-१९५ ॥

भास्कर पाही त्रिभुवन सारे, चौफेरचि दृष्टी त्याची | परि सुंदरता नाही पाहिली, निज उदयाची-अस्ताची || ३२६.

कीं रसु आपणिया पिये ? । कीं तोंड लपऊनि ठाये ? । हें रसपणें नव्हे । तया जैसें ॥ ७-१९६ ॥

पिता येईना निजरस म्हणुनी, रस ना तोंडाशी लपवी | स्वयेची रसमय पूर्णत्वाने, उठाठेव ही त्या न हवी || ३२७.

तैसें पाहणें न पाहणें । पाहणेंपणेंचि हा नेणे । आणि दोन्ही हें येणें । स्वयेंचि असिजे ॥ ७-१९७ ॥

तैसा श्रीहरी नित्य ज्ञानमय, बघणे अलग घडेल कसे ?| पाहणेचि वा नाही पाहणे, उभया कारण तोचि असे || ३२८.

जें पाहणेंचि म्हणौनियां । पाहणें नव्हे आपणयां । तैं न पाहणें आपसया । हाचि आहे ॥ ७-१९८ ॥

सदैव ज्ञाता श्रीहरी असता, निजरूप बघणे अलग नसे | जगत विलास त्याचाची असता, ना बघणे बघणेची असे || ३२९.

आणि न पाहणें मा कैसें । आपणपें पाहों बैसे ? । तरी पाहणें हें ऐसें । हाचि पुढती ॥ ७-१९९ ॥

एका हरीविण दुजे कांही ना, बघे ना बघे, तोचि असे | क्रिया वेगळी ती बघण्याची, हरीलागी ती अन्य नसे || ३३० .

अंतर्बाह्यहि एक श्रीहरी, तोचि आंत नि बाहेरी | पाहणे नि ना पाहणेहि जे, सारे हरीला अनुभवणे || ३३१.

न पाहताही घडे पाहणे, आणि पाहता तोच असे | बघणे वा ना बघणे ही, एक दुज्याविण अन्य नसे || ३३२ .

हीं दोन्ही परस्परें । नांदती एका हारें । बांधोनि येरयेरें । नाहीं केलें ॥ ७-२०० ॥

बघणे आणि ना बघणेही, पापणीच्याचि उभय लिला | नांदती एके ठायी तरीही, एक नाशिते दुसरीला || ३३३

पाहाणया पाहणें आहे । तरी न पाहणें हेंचि नोहे । म्हणौनि याची सोये । नेणती दोन्ही ॥ ७-२०१ ॥

स्वयेचि द्रष्टा असे ज्ञानमय, नित्य जाणणे ज्याठायी | त्यासि ते बघणे ना बघणे, उभय असे अनाठायी || ३३४.

एवं पाहणें न पाहणें । चोरूनियां असणें । ना पाहे तरी कोणें । काय पाहिलें ? ॥ ७-२०२ ॥

बघणे आणि ना बघण्या या, चोरून, हरी तो स्व-स्थ असे | बघण्याचा तो विषय नसेचि, अनुभूतिविण ज्ञात नसे || ३३५.

पाहणे न पाहणे कुणाला ? हरी तर केवळ अनुभवणे | एक हरीविण दुजे न कांही, न पाहताहि तो असणे || ३३६.

बघणे ना बघणेही लपते, दृश्य हरी तो कदा नसे | कोणी येथे काय पाहणे? जेथे तो सर्वत्र असे || ३३७.

द्रष्टयाने जंव दृश्य देखिले, पाहणेचि ते काय घडे ? | द्रष्ट्यावरती दृश्य उमटता, कोण पाही ते कुणाकडे? || ३३८

दिसत्यानें दृश्य भासे । म्हणावें ना देखिलें ऐसें । तरी दृश्यास्तव दिसे । ऐसें नाहीं ॥ ७-२०३ ॥

दृष्टी पडता दृश्य भासते, दिसे परी तो भास असे | जे नाही ते दिसेल कैसे?, केवळ दृष्टीस आभासे || ३३९.

दृश्य कीर दृष्टीसी दिसे । परी साच कीं द्रष्टा असे । आतां नाहीं तें कैसें । देखिलें होये ? ॥ ७-२०४ ॥

द्रष्ट्या वाटे दृश्य पाहतो, द्रष्ट्याहुनि जे अन्य नसे | हे तर आहे अनुभवणेची, मीच मला पाहणे कसे ? || ३४०.

मुख दिसो कां दर्पणीं । परी असणें कीं तये मुखपणीं । तरी जाली ते वायाणी । प्रतीति कीं ॥ ७-२०५ ॥

आरशात ते मुखा पाहता, जे दिसते ते मुखचि नसे | ते तर आपुल्या ठायी सदाचि, दिसते ते आभास असे || ३४१

देखतांची आपणयातें । आलिये निदेचेनि हातें । तया स्वप्ना ऐसा येथें । निहाळितां ॥ २०६ ॥

ऐसे बघणे, जणु स्वप्नी मी, आपणासीचि पाहतसे | स्वप्नीचा आभास परी तो, ते बघणे ना भास असे || ३४२.

निद्रिस्तु सुखासनीं । वाहिजे आनु वाहणीं । तो साच काय ते सणी । दशा पावे ? ॥ ७-२०७ ॥

स्वप्नी दिसते पालखीत मज, बैसवुनी कुणी नेत असे | परी असे मी निजशय्येवर, दशाहि वास्तवता ती नसे || ३४३.

कीं सिसेंवीण येक येकें । दाविलीं राज्य करिती रंकें । तैसींचि तियें सतुकें । आथी काई ? ॥ २०८ ॥

स्वप्नी दिसले शिराविनाचि, दोन भिकारी राज्य करी | ऐसे कोठे काय घडे कां, सांगा या हो धरतीवरी || ३४४.

ते निद्रा जेव्हां नाहीं । तेव्हां जो जैसा जिये ठाई । तैसाची स्वप्नी कांहीं । न पविजेचि कीं ॥ ७-२०९ ॥

झोप संपता स्वप्नीचे जे, ते स्वप्नीची ठायी विरे | जो तो आपुल्या ठायी असे तो, भासहि अवघा पुरा सरे || ३४५.

तान्हेलया मृगतृष्णा । न भेटलेया शिणु जेसणा । मा भेटलेया कोणा । काय भेटलें ॥ ७-२१० ॥

तृषार्त कोणी मृगजळ शोधी, शीण होत ते नच दिसता | ज्याला दिसले, काय तयाची, तृषा शमे तेचि बघता ?|| **३४६.**

कीं साउलीचेनि व्याजें । मेळविलें जेणें दुजे । तयाचें करणें वांझें । जालें जैसें ॥ ७-२११ ॥

सोबत आहे सावलीची मज, म्हणुनी जयाला निश्चिंती | फसवी परि ती अशी सोबती, भ्रामक समजुत ती चित्ती || ३४७.

तैसें दृश्य करूनियां । द्रष्ट्यातें द्रष्ट्या । दाऊनि धाडिलें वाया । दाविलेपणही ॥ ७-२१२ ॥

चैतन्याने साक्षीभावे, दृश्य दाविले जगताचे | निर्मिला स्वये आभास केवळ, व्यर्थही दिसणे दृश्याचे || ३४८.

जें दृश्य द्रष्टाचि आहे । मा दावणें कां साहे ? । न दाविजे तरी नोहे । तया तो काई ? ॥ ७-२१३ ॥

दृश्य नि द्रष्टा एक जेधवा, द्रष्टेपण ते ठायीचे | अवलोकन ते ना हि करिता, श्रीहरी स्व-स्थानीची असे || ३४९.

आणि पाहणे वा न पाहणे, उभया कांही अर्थ नसे | स्वरुप आपुले आपुल्या ठायी, त्यांत बदल कांही न असे || ३५०.

आरिसा पाहता न पाहे । तरी मुखचि वाया जाये ? । तेणेंवीण आहे । आपणपें कीं ॥ ७-२१४ ॥

आरशात ते मुळी न पाहता, काय नाही मुख स्व-स्थानी ?| असो नसो वा जरी आरसा, मुख अस्तित्वा नच हानी || ३५१.

तैसें आत्मयातें आत्मया । न दाविजे पैं माया । तरी आत्मा वावो कीं वायां । तेचि कीं ना ? ॥ ७-२१५ ॥

आत्मरूप ते स्वये देखणे, ज्ञानमात्रही नित्य असे | मायेने दाविणे तयासि, गरज तयाची मुळी नसे || ३५२

म्हणोनि आपणापें द्रष्टा । न करितां असें पैठां । आतां जालाचि दिठा । कां करावा ॥ ७-२१६ ॥

न पाहताही निजस्वरूपाशी, आत्मस्थित नित असे हरी | उगा तया कां दृष्टा करणे, जरी एक तो चराचरी || ३५३

नाना मागुतें दाविलें । तरी पुनरुक्त जालें । येणेंहि बोलें गेलें । दावणें वृथा ॥ ७-२१७ ॥

आधीपासुनी जे आहेचि, तया दावणे व्यर्थ असे | स्व-स्थानीचि नित्य असे स्थित, त्यांसि दाविणे फोल तसे || ३५४.

दोरासर्पाभासा । साचपणें दोरु कां जैसा । द्रष्टा दृश्या तैसा । द्रष्टा साचु ॥ ७-२१८ ॥

दोरी भासे सर्प म्हणोनी, ती दोरी हे सत्य असे | द्रष्टा भासे दृश्य म्हणोनी, द्रष्ट्याविण ते अन्य नसे || ३५५.

दर्पणें आणि मुखें । मुख दिसे हें न चुके । परी मुखीं मुख सतुकें । दर्पणीं नाहीं ॥ ७-२१९ ॥

सन्मुख केले दर्पणास ते, दिसते मुख हे जरी खरे | आभासची तो मुख निजस्थानी, हेचि सत्य ते नित्य ठरे || **३५६**

तैसे द्रष्टा दृश्या दोहों । साच कीं देखता ठावो । म्हणौनि दृश्य तें वावो । देखिलें जऱ्ही ॥ ७-२२० ॥

दृश्य नि द्रष्टा या उभयासी, द्रष्टा हा आधार असे | दृश्य दिसे तरि आभासचि तो, द्रष्ट्या वाचुनी अन्य नसे || ३५७.

वावो कीर होये । तऱ्ही दिसत तंव आहे । येणें बोलें होये । आथी ऐसें ॥ ७-२२१ ॥

भास म्हणावा, परि दिसणे हे, मिथ्या खचितचि ते नाही | म्हणुनि वाटते, आहे तेही, दिसत असे ते जैसेही || ३५८.

तरी आन आनातें । देखोन होय देखतें । तरी मानूं येतें देखिलें ऐसें ॥ ७-२२२ ॥

दिसणे होण्या बघणारा नि, दृश्य असे ते दोन हवे | जेथे असते असे दुजेपण, तरि त्या बघणे मानावे || ३५९.

येथें देखोनि कां न देखोनि । ऐक्य कां नाना होऊनि । परि हा येणेंवाचूनि । देखणें असे ? ॥ ७-२२३ ॥

आत्मा नित्यचि दंग निजरूपि, पाही अथवा ना पाही | असो एकला बहुरूपे वा, त्याविण अन्य नसे कांही || ३६०.

आरिशानें हो कां दाविलें । तऱ्ही मुखचि मुखें देखिलें । तो न दावी तरी संचलें । मुखचि मुखीं ॥ ७-२२४ ॥

जरी दर्पणे दावियले मुख, तरीच ते कां निजस्थानी? | दर्पण दावी वा ना दावी, मुख आपुल्याचि स्वस्थानी || ३६१.

तैसें दावितें नाहीं । तरी हाचि ययाचा ठाईं । ना दाविला तरीही । हाचि यया ॥ ७-२२५ ॥

तैसा आत्मा सदा स्व-स्थचि, कुणी दावो वा ना दावो | सदा ज्ञानमय निजरूपीची, आपुल्याची तो निज ठावो || ३६२.

जागृती दाविला । कां निदा हारविला । परी जैसा येकला । पुरुषपुरुषीं ॥ ७-२२६ ॥

जागृतीत जो होता तोचि, हरवुनि गेला निद्रेत | परि अवस्था दोहिमाजी, पुरुष तोचि असे स्वस्थ || **३६३.**

कां रायातें तूं रावो । ऐसा दाविजे प्रत्ययो । तऱ्ही ठायें ठावो । राजाचि असे ॥ ७-२२७ ॥

की राजा लागे सांगावे, आपण नरेश राज्याचे | तरीच होईल त्याशी जाणीव, ऐसे घडेच ना साचे || ३६४.

ना तरी रायपण राया । नाणिजे कीं प्रत्यया । तऱ्ही कांहीं उणें तया । माजी असे ? ॥ ७-२२८ ॥

अशी आठवण करुनि न देता, राणीवेत कां कांही उणे ?| राजा आपुले राज्य चालवी, स्मरण न देता योग्यपणे || ३६५.

तैसें दावितां न दावितां । हा ययापरौता । चढे न तुटे आईता । असतचि असे ॥ ७-२२९ ॥

तैसे आत्मा दृश्य दाविता, वा न दाविता स्व-स्थ असे | दाविणे न दाविणे तयाशी, थोर-सानपण देत नसे || ३६६.

तरी कां निमित्य पिसें । हा यया दाऊं बैसें । देखतें नाहीं तैं आरिसे । देखावे कोणें ? ॥ ७-२३० ॥

स्वरूप पाहण्या दृश्य कशाला, स्वये ज्ञानमय हरी असता | निजस्थानी ते स्वरूप असता, कशा आरसा तो हाता ||३६७.

जेहि सदा स्वानंदी सिद्ध ते, नित्य तयासी दिसे हरी | नलगे माध्यम उपासना वा, हरी कदा त्या नसे दुरी || ३६८.

दीपु दावी तयातें रची । कीं तेणेंची सिद्धि दीपाची । तैसी सत्ता निमित्ताची । येणें साच ॥ ७-२३१ ॥

दिवा प्रज्वलित करितो त्याचे, असणे सिद्ध न दिव्यामुळे | दिवा लाविला म्हणुनि न आले, अस्तित्वहि ते तयामुळे || ३६९.

तैसे येथे दिसे भासते, जेही सकल ते त्याचिमुळे | एकमात्र ती त्याचि सत्ता, जयामुळे हे विश्व चळे || ३७०

वन्हीतें वन्हीशिखा । प्रकाशी कीर देखा । परी वन्ही न होनि लेखा । येईल काई ? ॥ ७-२३२ ॥

अग्नि जाणवे तो ज्वाळेने, त्याचेचि तो अंग असे | वन्ही आणि ज्वाळा एकचि, तयात कांही भेद नसे || ३७१.

आणि निमित्त जें बोलावें । तें येणें दिसोनि दावावें । देखिलें तरी स्वभावें । दृश्यही हा ॥ ७-२३३ ॥

निमित्त दृश्याचे द्रष्टेपण, द्रष्ट्यानेचि दृश्य दिसे | तोचि द्रष्टा असे नि तैसे, स्वये दृश्यहि तोचि असे || ३७२.

म्हणौनि स्वयंप्रकाशा यया । आपणापें देखावया । निमित्त हा वांचुनियां । नाहींच मा ॥ ७-२३४ ॥

स्वयंप्रकाशी नित्यचि आत्मा, आपण बघणे सहजी घडे | निमित्त त्या दुसरे लागेना, कुणासाठी त्याचे न नडे || ३७३.

प्रकाश्य आणि तोचि प्रकाशक, स्वयंप्रकाशे पूर्ण असे | निज अवलोकन निमित्त तोचि, सारी आत्मप्रभा विलसे || ३७४

भलतेन विन्यासें । दिसत तेणेंची दिसे । हा वांचून नसे । येथें कांहीं ॥ ७-२३५ ॥

जेही दिसते विविधाकरे, निमित्त सकला हाचि असे | हाचि विनटे सकल रूपाने, तया वाचुनी अन्य नसे || ३७५.

क्षणभंगुर ती असे उपाधी, विविध रूपाने ती विलसे | हरीची कारण नित्यनूतना, गुप्तरूपे सकलात वसे || ३७६

लेणें आणि भांगारें । भांगारचि येक स्फुरे । कां जे येथें दुसरें । नाहींचि म्हणोनि ॥ ७-२३६ ॥

जळ तरंगीं दोहीं । जळावांचूनि नाहीं । म्हणौनि आन कांहीं । नाहीं ना नोहे ॥ ७-२३७ ॥

विविध विलसती लेणी परी ती, सुवर्णाविना अन्य नसे | तरंग नि जळ एकचि पाणी, जळावरीचि जळ विलसे || ३७७

तैसे जगती जेही दिसते, साऱ्याची हरीच्याच लिला | वेगवेगळे आभास वरवर, ज्ञानदृष्टी दावी हरीला || ३७८.

हो कां घ्राणानुमेयो । येवो कां हातीं घेवो । लाभो कां दिठी पाहों । भलतैसा ॥ ७-२३८ ॥

परी कापुराच्या ठाईं । कापुरावांचूनि नाहीं । तैशा रीती भलतयाही । हाचि यया ॥ ७-२३९ ॥

सुगंधातुनी, स्पर्शे अथवा, शुभ्रतेमुळे जोही दिसे | कर्पुर; तैसा, सकलरुपातुनी, एकमेव आत्मा विलसे || ३७९.

आतां दृश्यपणें दिसो । कीं द्रष्टा होऊनि असो । परी हां वांचूनि अतिसो । नाहीं येथें ॥ ७-२४० ॥

विश्वाच्या या विविध रुपातुनि, वा अनुभूति द्रष्टयाची | त्याहुनि अन्य नसेचि कांही, सारी प्रतीति श्रीहरीची || ३८०.

गंगा गंगापणें वाहो । कीं सिंधु होऊनि राहो । परी पाणीपणा नवलाहो । हें न देखो कीं ॥ ७-२४१ ॥

गंगा वाहो गंगा म्हणुनी, वा मिळता सागर म्हणुनी | निजरुपाला कदा न सोडी, नित्य असे एकचि पाणी || ३८१.

थिजावें कीं विघरावें । हें अप्रयोजक आघवें । घृतपण नव्हे । अनारिसें ॥ ७-२४२ ||

थंडी असता थिजुनी रहावे, पघळे उष्म्यामाजी कदा | कणीदार वा भेद अन्यहि, तूप पणाला ना बाधा || ३८२.

ज्वाळा आणि वन्हि । न लेखिजती दोन्ही । वन्हिमात्र म्हणोनि । आन नव्हेचि कीं ॥ ७-२४३ ॥

अग्नि आणि तिचिया ज्वाळा, असे एकचि तो वन्ही | प्रकाश उष्मा विविधाकारे, एकचि विलसतसे अग्नी || ३८३.

तैसें दृश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा । पाहतां येकी काष्ठा । स्फूर्तिमात्र तो ॥ ७-२४४ ||

तैसे दृश्य नि द्रष्टा दोन्ही, दशा भेद हा फोल असे | स्फूर्तीने होई बघणारा, दृश्य बनुनिया विलसतसे || ३८४.

इये स्फूर्तीकडुनी । नाहीं स्फुर्तिमात्रवांचुनि । तरी काय देखोनि । देखतु असे ? ॥ ७-२४५ ॥

स्फुरणमात्रचि आत्मभाव हा, विविध होऊन दे प्रतीति | नाही पाहणे अथवा दिसणे, एकचि विलसतसे स्फूर्ति || ३८५

पुढें फरकें ना दिसतें । ना मगें डोकावी देखतें । पाहतां येणें ययातें । स्फुरद्रुपेंचि ॥ ७-२४६ ॥

दृश्य म्हणुनि ना कांही वेगळे, द्रष्टाही वेगळा नसे | आत्मस्फुर्तीचि स्फुरण रुपाने, पाहणेही ते घडवितसे || ३८६.

कल्लोळें जळीं घातलें । सोनेंनि सोनें पांघुरलें । दिठीचे पाय गुंतले । दिठीसीचि ॥ ७-२४७ ॥

लेण्यांनी सोने पांघरले, तरंग बुडले पाण्यात | दृष्टीमाजी दृष्टी गुंतली, घडले नच कांही यांत || ३८७.

श्रुतीसि मेळविली श्रुती । दृतीसि मेळविली दृती । कां जे तृप्तीसीचि तृप्ति । वेगारिली ॥ ७-२४८ ॥

सुवासासी तो सुवास भेटे, नाद मिसळला नादात | तृप्तीने वाढिली कि तृप्ती, प्रेमे तिचिया ताटात || ३८८.

गुळें गुळ परवडिला । मेरु सुवर्णें मढिला । कां ज्वाळा गुंडाळिला । अनळु जैसा ॥ ७-२४९ ॥

ज्वाळे गुंडाळिले अग्नीला, गुळा गुळाने माखियले | सुवर्ण पर्वत मेरूचाची, सोन्याने कि मढवियले || ३८९.

हें बहु काय बोलिजे । कीं नभ नभाचिया रिगे सेजे । मग कोणें निदिजे । मग जागे तें कोणें ॥ ७-२५० ॥

आभाळाची करुनी शैय्या, आभाळचि झोपले वरी | जागे कोण नि कोण झोपले?, सांगा मजशी कोणीतरी || ३९०.

हा येणें पाहिला आइसा । कांहीं न पाहिला जैसा । आणि न पाहतांहि अपैसा । पाहणेंचि हा ॥ ७-२५१ ॥

निजरुप निरखी स्वये श्रीहरी, नाही पाहणे ते घडले | जेंव्हा त्याचे नसे पाहणे, अनुभुतिरुपे ते बघणे || ३९१.

येथें बोलणें न साहे । जाणणें न समाये । अनुभऊ न लाहे । अंग मिरौ ॥ ७-२५२ ॥

सहजी घडतसे जेंव्हा बघणे, बघणाराही तेथं नुरे | कैसे शब्दांनी व्यक्तावे, जेथं अनुभूतिमात्र उरे || ३९२.

आत्मत्वी ना प्रवेश शब्दा, त्यासी जाणणे विषय नसे | अनुभव प्रौढी मिरविता न ये, शून्य असे जाणणे असे || ३९३

म्हणोन ययातें येणें । ये परीचें पाहणें । पाहतां कांहीं कोणे । पाहिलें नाहीं ॥ ७-२५३ ॥

श्रीहरीचे पाहणे तयाशी, पाहण्याविना पाहियले | कुणी कुणाला काय पाहिले, कृतीशून्य ऐसे घडले || ३९४.

किंबहुना ऐसें । आत्मेनि आत्मा प्रकाशे । न चेतुचि चेऊं बैसे । जयासि तो ॥ ७-२५४ ॥

प्रकाशिला आत्म्याने आत्मा, ऐसे ते असते बघणे | सावधानचि सदैव असता, स्वये आपणा जागविणे || ३९५

श्री शिव कल्याण [नित्यानंदैक्यादीपिका] यांचे भाष्य[ओव्या-३९६-४००]

श्रुति सांगती ब्रह्मीभूत ते, सदा ब्रह्मचि स्वये असे | मुक्तचि होई मुक्त सदाचि, प्राप्ति अप्राप्ति कांही नसे || ३९६.

'न बंधोस्ति न मोक्षोस्ति, ब्रह्मैवास्ति निरंतर' | वशिष्ट सांगती श्रीरामाला, ब्रह्मचि सारे चराचर || ३९७.

नित्य ज्ञानमय असता आत्मा, अज्ञानासि ठाव नसे | बंध मोक्ष ते उभयचि नसती, वशिष्ट रामा सांगतसे || ३९८

नित्य नि जागृत शुद्धचि आत्मा, ना झोपे उठणे कैसे | आत्मा आपणा स्वये प्रकाशे, दुजा कुणीही अन्य नसे || ३९९.

नलगे साधन हरी अनुभवण्या, माया सरता तोचि असे | भाव समर्पण, चित्त शुद्ध नि, वासुदेवमय जगत दिसे || ४००.

स्वयें दर्शनाचिया सवा । अवघियाची जात फावां । परी निजात्मभावा । न मोडिताही ॥ ७-२५५ ॥

स्वभाव त्याचा नित्य पाहणे, उदये स्वरूपी विश्व बघे | अभंग ठेवुनी निजस्वरूपाशी, कधी स्वरूपी सहजी रिघे || ४०१ .

निजरूपाशी नित्य निरखिण्या, बहु अस्तित्वे तो प्रगटे | नसे कदापि परंतु बाधा, निजात्मभावासि कोठे || ४०२ .

माझा मीचि शोध कांसया, साध्य नि साधन कां लागे ?| काय साधणे साधकास ते, केवळ आत्मरंगी रंगे ?|| ४०३.

पूर्णातुनी जे निघे पूर्णचि, पूर्णे पूर्णा उद्धरणे | पुन्हा पूर्ण पूर्णातचि मिळता, पूर्णे पूर्णचि ते होणे || ४०४.

पूर्णासि ते नित्य पूर्णपण, म्हणुनी मौनची शब्दाशी | पूर्णे पूर्णपणा अनुभवणे, हेचि पाहणे स्वरूपाशी ||४०५

तैतरेय ती श्रुति सांगते, पूर्णब्रहम आनंद असे | आनंदातुनि तू आलासि, आनंदाहुनी अन्य नसे || ४०६.

नित्य राही तू आनंदीची, आनंदचि हा धर्म असे | पुन्हा जायचे आनंदातचि, त्याविण कांही अन्य नसे || ४०७.

न पाहतां आरिसा असो पाहे । तरी तेंचि पाहणें होये । आणि पाहणेन तरी जाये । न पाहणें पाहणें ॥ ७-२५६ ॥

दर्पणी न पाहताहि निजमुख, स्वस्थानी ये अनुभूती | अशी अनुभूती होई पाहणे, जाणीव मुख अस्तित्वाची || ४०८.

दृश्य म्हणोनि हे न पाहणे, परी केवळ त्या अनुभवणे | तेथं दृश्य वा दृष्टीविनाचि, निजमुख प्रतीति ती येणे || ४०९.

अनुभुतीने विना पाहता, सहजची ते पाहणे घडे | पाहणे नि नाहीच पाहणे, अनुभूती रूपात दडे || ४१०.

भलतैसा फांके । परी येकपणा न मुके । नाना संकोचे तरी असकें । हाचि आथी ॥ ७-२५७ ॥

विविध नामरूपातुनि विलसे, वा निजरूपी संकोचे | उभयी एकपणा अबाधित, अभंगपणचि नित्याचे || ४११.

जे जे भासे आत्मरूप ते, त्याविण नाही कांही दुजे | ऐशी अनुभूति नित्य असे तो, हरी होऊनी हरी भजे || ४१२.

सूर्याचिया हाता । अंधकारू नये सर्वथा । मा प्रकाशाची कथा । आईकता का ? ॥ ७-२५८ ॥

ना सूर्ये अंधार पाहिला, प्रकाशरुपे स्वये असे | प्रकाश वा अंधार न जाणे, त्या विषयी त्या गम्य नसे || ४१३.

अंधारु कां उजिवडु । हा एकला येकवडु । जैसा कां मार्तंडु । भलतेथें ॥ ७-२५९ ॥

उजेड किंवा अंध:कारी, मार्तंडचि तो विलसतसे | नित्य श्रीहरी तैसा विलसे, दृश्यचि वा अदृश्य असे || ४१४.

विश्वरुपाने दृश्य होऊनि, वा अदृश्यचि स्व-स्थ असे | विलसत नित्यचि हरि उभयीही, एकलेपणे शोभतसे || ४१५.

तैसा आवडतिये भूमिके । आरूढलियाही कौतुकें । परि ययातें हा न चुके । हाचि ऐसा ॥ ७-२६० ॥

व्यक्त असो अव्यक्त वा हरि, एकलेपणा ना भंगे | विश्वरूपी वा निजरूपीही, नित्यची स्वानंदी रंगे || ४१६.

सिंधूची सींव न मोडे । पाणीपणा सळु न पडे । जरी मोडूत गाडे । तरंगांचे ॥ ७-२६१ ॥

प्रचंड लाटा उफळती विरती, सागर मर्यादेत असे | नित्य चालता खेळ जरिही, जलपण स्वस्थानीच वसे || ४१७.

रश्मि सूर्यींच आथी । परी बिंबबाहेरी जाती । म्हणौनि बोधसंपत्ती । उपमा नोहे ॥ ७-२६२ ॥

प्रकाशविती ना भास्कर किरणे, कदा बिंब सोडल्याविना | म्हणुनी आत्मबोध उपमेस्तव, ती उपयोगी होती ना || ४१८.

आणि पल्हेचा दोडा । न पडतां तढा । जग तंव कापडा । न भरेचि कीं ॥ ७-२६३ ॥

सोनयाचा रवा । रवेपणाचा ठेवा । अवघेयाचि अवयवा । लेणें नोहे ॥ ७-२६४ ॥

बोंड कपाशीचे ना उकले, जगा न कापड तोवरती | लगड सोनियाची न भंगता, लेणी न अंगासी मिळती || ४१९.

न फेडितां आडवावो । दिगंतौनि दिगंता जावो । न ये मा पावों । उपमा काई ? ॥ ७-२६५ ॥

पार करुनी मार्गीचे अंतर, इष्ट स्थळी जाणे घडते | आत्मप्राप्तीच्यासाठी म्हणुनी, उपमा उपयोगी न होते || ४२०.

म्हणौनि इये आत्मलीळे । नाहीं आन कांटाळें । आतां ययाचिये तुळे । हाचि यया ॥ ७-२६६ ॥

पूर्णब्रह्म ते अभंग जवळी, नाना रुपे जरि विलसे | साऱ्या विश्वा तोचि चाळवी, निश्चलतेचा भंग नसे || ४२१.

स्व-स्थ राहुनी तो लीलाधार, खेळे नि खेळवितसे | अन्य कुणाशीही ना तुलना, तयासारिखा तोचि असे || ४२२

'अविभक्तंच भूतेषु' म्हणुनि, स्वये सांगती भगवंत | आपुल्याचि ठायी नारायण, कष्टाची नाही भ्रांत || ४२३.

स्वप्रकाशाचा घांसीं । जेवितां बहु वेगेंसी । वेंचेना परी कुसीं । वाखही न पडे ॥ ७-२६७ ॥

जेही सृजिले स्वयंप्रकाशे, वेगे भक्षी क्षर भावे | अन्न कमी ना उदर तसेचि, उदयास्ता न क्षण लावे || ४२४

युगे युगे हे भोजन चाले, वेग न त्याचा मंदावे | अन्न न संपे, तृप्ति न उदरा, क्षणाक्षणाला दिसे नवे || ४२५

एक क्षणी जे दिसते जगती, पुढल्या क्षणी नाशुनी नवे | म्हणुनी या अश्वत्थ बोलिले, रूप तयाचे नित हिरवे || ४२६

ऐसा निरुपमापरी । आपुलिये विलासवरी । आत्मा राणीव करी । आपुला ठाईं ॥ ७-२६८ ॥

ऐसा निरुपम आत्मदेव हा, आपुले ठायी राज्य करी | ज्ञानमात्र तो ज्ञान वैभवा, स्वानंदे भोगास वरी || ४२७.

जगतरुपे निरखी निजरूपा, आपणास आपण जाणे | चैतन्याचा चिद्विलास हा, स्वये भोग आपुला घेणे || ४२८

तयातें म्हणिपें अज्ञान । तरी न्याया भरलें रान । आतां म्हणे तयाचें वचन । उपसावों आम्ही ॥ ७-२६९ ॥

समर्थ नि सर्वज्ञ असा जो, आत्मदेव जगी विलसे | पूर्ण ज्ञानघन असता येथे, अज्ञानाचे कार्य कसे ?|| ४२९

अज्ञानचि जरि यांस म्हणावे, तरि न्याया थारा नाही | स्तब्ध राहुनि श्रवण करू जे, यावरती सांगो कांही || ४३०.

प्रकाशितें अज्ञान । ऐसें म्हणणें हन । तरी निधि दावितें अंजन । न म्हणिजे काई ? ॥ ७-२७० ॥

विश्व प्रकाशे ज्या ज्ञानाने, त्यासी कुणी अज्ञान म्हणे | काजळ म्हणती प्रकाशवी जे, भूमिगत द्रव्या जाणे || ४३१

काजळ काळे उजळवी दृष्टी, उजळ तयासी नाम हवे | प्रकाशवी ते काळे कैसे ?, तैसे बोलचि हे फसवे || ४३२

सुवर्णगौर अंबिका । न म्हणिजे कय काळिका ? । तैसा आत्मप्रकाशका । अज्ञानवादु ॥ ७-२७१ ॥

सोनगौरचि असे अंबिका, तिज म्हणती कालिका जसे | आत्मप्रकाशक असे तयाला, अज्ञानचि की, म्हणती तसे ? || ४३३.

येऱ्हवीं शिवोनि पृथ्वीवरि । तत्त्वांच्या वाणेपरी । जयाचा रश्मिकरीं । उजाळा येती ॥ ७-२७२ ॥

शिवापासुनी जडासहितही, अनेक जी तत्वे असती | चैतन्याच्या जये प्रकाशे, सारी प्रकाशली जाती || ४३४

जेणें ज्ञान सज्ञान होये । दृङ्मात्र दृष्टीतें विये । प्रकाशाचा दिवो पाहे । प्रकाशासी ॥ ७-२७३ ॥

ज्ञान होई सज्ञान त्यामुळे, दृष्टि पाहू शके तेणे | प्रकाशवी जो सर्व प्रकाशा, त्याचे प्रकाश योगाने || ४३५.

तें कोणें निकृष्टें । दाविलें अज्ञानाचेनि बोटें । ना तमें सूर्य मोटे । बांधतां निकें ॥ ७-२७४ ॥

अशा ज्ञानमय चैतन्यासी, बोट दावुनि मूर्ख कुणी | संबोधी अज्ञान म्हणोनी, हीन बुद्धीचा तो प्राणी || ४३६.

हे असले जे फोल बोलणे, जणु अंधारे सूर्याला | बांधुनी नेले मोटेमाजी, अशापरी वाटे मजला || ४३७.

`अ` पूर्वी ज्ञानाक्षरी । वसतां ज्ञानाची थोरी । शब्दार्थाची उजरी । अपूर्व नव्हे कीं? ॥ ७-२७५ ॥

ज्ञान शब्द जो त्याचे आधी, 'अ' अक्षर लाविले तया | वाढे शब्दार्थाची थोरवी, विलक्षणचि कि ही किमया || ४३८.

लाखेचे मांदुसे । आगीचें ठेवणें कायिसें ? । आंतु बाहेरी सरिसें । करून घाली ॥ ७-२७६

बनवुनी लाखेच्या पेटीला, अग्नि ठेविता त्यांत जरी | अग्नि घेईल रूप पेटीचे, उरेल भस्मचि अंति परी || ४३९

म्हणोनि जग ज्ञानें स्फितें । बोलतां अज्ञानवादातें । विखुरली होती आतें । वाचेचिये ॥ ७-२७७ ॥

नित्य स्फुरद्रुपस्थिति ज्ञानाची, जेणे विश्वाची प्रतीति | त्यासी जे अज्ञान बोलणे, भ्रमिष्ट केवळ वाचा ती || ४४०.

आखरीं तंव गोवधु । पुढारा अनृतवादु । मा कैसा अज्ञानवादु । कीजे ज्ञानीं ? ॥ ७-२७८ ॥

केवळ उच्चारणेचि गोवध, बोलचि मिथ्या निषिद्ध हे | जे नाही त्या अज्ञानाने, कां ज्ञानासि उगा बाहे || ४४१.

आणि अज्ञान म्हणणें । स्फुरतसे अर्थपणें । आतां हेंचि ज्ञान कोणे । मानिजे ना ? ॥ ७-२७९ ॥

ज्ञानाच्या स्फुरणेचि उमगे, वस्तुचे वास्तव ज्ञान | अज्ञाना अस्तित्वचि नाही, त्याचे ना होई स्फुरण || ४४२.

अभावातचि असे सदा जे, उमगे जे ना ज्ञानाने | ज्या अस्तित्व न ज्ञान तयासि, सांगा की, कैसे म्हणणे || ४४३.

असो हें आत्मराजें । आपणापें जेणें तेजें । आपणचि देखिजे । बहुये परी ॥ ७-२८० ॥

आत्मराज विलसे ज्ञानाने, घेत अनुभूती स्वरूपाची | आपण देखे आपणासिचि, पाही लीला बहुरुपाची, || ४४४.

निर्वचितां जें झावळे । तेंचि कीं लाहे डोळे ? । डोळ्यापुढें मिळे । तेंचि तया ॥ ७-२८१ ॥

जे नाही ते दिसेल कैसे, विवेक दृष्टीने बघता | ज्यासी मुळि अस्तित्वचि नाही, नेत्रा त्याची ना वार्ता || ४४५.

ऐसें जगज्ञान जें आहे । तें अज्ञान म्हणें मी वियें । येणें अनुमानें हों पाहे । आथी ऐसें ॥ ७-२८२ ॥

द्रष्टा दर्शन दृश्य रूपाने, प्रत्ययास जे जग येई | कार्यरूप हे अज्ञानाचे, कुणी म्हणती ते ऐसेही || ४४६

तंव अज्ञान त्रिशुद्धि नाहीं । हें जगेंचि ठेविलें ठाई । जे धर्मधर्मित्वें कंहीं । ज्ञानाज्ञान असे ? ॥ ७-२८३ ॥

अज्ञाना अस्तित्व मुळी ना, विलसत जग हे ज्ञानाने | अधर्मास कां धर्म म्हणावे, तैसे ज्ञाना अज्ञाने || ४४७

'मत्त: परतरं नास्ति, किंचिदपि धनंजय' | स्वयेचि श्रीहरी ऐसे वदती, अज्ञानाचि ना सोय || ४४८

कां जळां मोतीं वियें ? । राखोंडिया दीपु जिये ? । तरी ज्ञानधर्मु होये । अज्ञानाचा ॥ ७-२८४ ॥

मोती निर्मिल जरी जळासि, दीप प्रज्वलित राखेने | अज्ञानाचा ज्ञान धर्मचि, होईल तैसा सहजपणे || ४४९

चंद्रमा निगती ज्वाळा ? । आकाश आते शिळा ? । तरी अज्ञान उजळा । ज्ञानातें वमी ॥ ७-२८५ ॥

निघतिल चंद्रामधुनी ज्वाळा, प्रसविल की आकाश शिळा | तरि अज्ञानही निर्मिल ज्ञाना, तत्क्षणीच ते त्याच पळा || ४५०

क्षीराब्धीं काळकूट । हे एकी परीचे विकट । परी काळकूटीं चोखट । सुधा कैंची ? ॥ ७-२८६ ॥

क्षिराब्धिचे ते मंथन करिता, आले काळकूट हाती | त्याचि भयानक काळकुटातुनी येईल कां अमृत हाती ?|| ४५१

ना ज्ञानी अज्ञान जालें । तें होतांचि अज्ञान गेलें । पुढती ज्ञान येकलें । अज्ञान नाहीं ॥ ७-२८७ ॥

ज्ञानापासुनि जरि जन्मता, तेथं उरेना अज्ञान | एकलेचि ते केवळ उरते, उज्वल ऐसे ते ज्ञान || ४५२

म्हणौनि सूर्य सूर्याचि येवढा । चंद्र चंद्राचि सांगडा । ना दिपाचिया पडिपाडा । ऐसा दीपु ॥ ७-२८८ ॥

सूर्यासम तो सूर्यची केवळ, चंद्रा उपमा चंद्राची | दीपास उपमा देता येईल, केवळ ती तर दीपाची || ४५३

प्रकाश तो प्रकाश कीं । यासि न वचे घेईं चुकी । म्हणौनि जग असकी । वस्तुप्रभा ॥ ७-२८९ ॥

हरिकिरणांनी विश्व व्यापिले, जग सारेची वस्तुप्रभा | चराचरी हा हरी कोंदला, ही सारी तर हरिशोभा || ४५४

विभाति यस्य भासा । सर्वमिदं हा ऐसा । श्रुति काय वायसा । ढेंकरू देती ॥ ७-२९० ॥

श्रुति सांगती उच्च रवाने, हरी प्रकाशे जग विलसे | श्रुतीची वचने मिथ्या कैसी?, 'सर्वमिदं' हे हरिची असे || ४५५

सूर्य चंद्र वा पावक कोणी, प्रकाशविती ना आत्म्याला | स्वयंप्रकाशे प्रकाशवी त्या, आणि स्वये निजरूपाला || ४५६

यालागीं वस्तुप्रभा । वस्तुचि पावे शोभा । जात असे लाभा । वस्तुचिया ॥ ७-२९१ ॥

प्रकाशले हे विश्वचि अवघे, हरि ऐश्वर्ये विलसतसे | स्व-स्वरुपिच्या स्वानंदाने, नित्य प्रसन्नची हरि असे || ४५७

वांचून वस्तु यया । आपणपें प्रकाशावया । अज्ञान हेतु वांया । अवघेंचि ॥ ७-२९२ ॥

हरि किरणांनी विश्व विकासे, प्रकाशवि तो स्वेच्छेने | अज्ञानाचे नसे प्रयोजन, विश्व विलसते हरिस्फुरणे || ४५८

म्हणोनि अज्ञान सद्भावो । कोण्हे परी न लाहों । अज्ञान कीर वावो । पाहों ठेलियाही ॥ ७-२९३ ॥

अज्ञानाच्या अस्तित्वाचा, भाव कदा ना ग्रहण करी | जे नाही ते दिसेल कैसे, एक असे सर्वत्र हरी || ४५९

परी तमाचा विसुरा । न जोडेचि दिनकरा । रात्रीचिया घरा । गेलियाही ॥ ७-२९४ ॥

रात्रीचिया जाऊनी घरासी, भास्कर शोधी अंधारा | गंवसेना अंधार जराही, नाही लाभला कणही चुरा || ४६०

कां नीद खोळे भरिता । जागणें ही न ये हाता । येकलिया टळटळिता । ठाकिजे जेवीं ॥ ७-२९५ ॥

प्रभाव निद्रेचा ना अजुनी, जागृतीही ती ना सरता | मध्यस्थिति हीचि ज्ञानाची, अनुभवी श्रीहरी तो पुरता || ४६१

अजुनि न निद्रा, सरे जागृती, उभयांच्या संधीस्थानी | सावधान नि ज्ञानमात्र ते, व्हावे समरस हरिचरणी || ४६२.

मनी नसावे अमुक पहावे, निर्विकार नि शांतपणे | अनुभवी वासुदेवमयस्थिति, रंगुनिया स्वानंदाने || ४६३.

जेही पाहिले अनुभविले वा, दर्शन ते अद्वैताचे | हेच आत्मरुप, प्रतीति येता, सार्थक या नर देहाचे || ४६

श्री राजाराम बुवा ब्रह्मचारी यांचे भाष्य [ओव्या ४५६-४६९]

निद्रा, जागृती या उभयांच्या, संधीकाली स्थैर्य मनी | सावधान नि ज्ञानमात्र ते, व्हावे समरस हरिचरणी || ४६५

देहभाव ते विरू पाहती, बोध न पुरता मावळला | संधिकाली या ज्ञानाज्ञाना, सोडुनि जावे हरी शरणी || ४६६

निद्राधारे जागृती जिंकुनि, स्वात्मप्रकाशे अनुभूति | जाणीव नेणीव कांही न उरली, सबाह्य येई हरिप्रतीति || ४६७

मनी नसावे अमुक पहावे, निर्विकार नि शांतपणे | अनुभवी वासुदेवमयस्थिति, रंगुनिया स्वानंदाने || ४६८

जेही पाहिले अनुभविले वा, दर्शन ते अद्वैताचे | हेच आत्मरुप, प्रतीति येता, सार्थक या नर देहाचे || ४६९.

अमृत गंगा- कुंड सातवे समाप्त

(८) श्री अमृतानुभव अमृत गंगा –

कुंड आठवे

(ज्ञानखण्डन)

आत्मबोध झाला की तेथे, ना ज्ञान न अज्ञान, केवळ शुद्ध ज्ञानमय अशी ती ज्ञानघन अवस्था असते त्या अवस्थेला आता ज्ञानदेव आलेले आहेत. ती अवस्था शब्दातीत आणि ज्ञानाज्ञानातीत असते. त्याचेच वर्णन या अध्यायात आहे.

तैसें आमुचेनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे । आम्हांलागीं गुरुदेवें । आम्हीच केलों ॥ ८-१ ॥

ॐ नमिले सद्गुरूराया, सार्थचि केले नामाला | पूर्णत्वे ज्ञानेश्वर आम्ही, स्वरुपि मिळविले आम्हाला || १.

ज्ञानाज्ञानाच्याहि पैल ते, आणिले तू निजस्वरुपाशी | पूर्ण ज्ञानमय हरी जाहलो, काय दिव्य तंव कृपा अशी || २.

परी आम्हा आम्ही आहों । तें ऐसे पाहो जावों । तंव काय कीजे ठावो । लजिजे ऐसा ॥ ८-२ ॥

आम्ही निजस्वरूपाशी पाहता, बघणे आत्मत्वा लाजे | येथे स्वानंदा अनुभवणे, एकचि आत्मरूप साजे || ३.

हा ठावोवरी गुरुरायें । नांदविलों उवायें । जे आम्ही न समाये । आम्हांमाजीं ॥ ८-३ ॥

आम्हास गुरुने अनंत केले, आम्हात आम्ही मावेना | नसेच आम्हा आम्हीपणाही, अस्तित्वा या सीमा ना || ४.

अहो आत्मेपणीं न संटो । स्वसंविति न घसवटो । आंगीं लागलिया न फुटों । कैवल्यही ॥ ८-४ ॥

सीमित नाही आत्मपणाने, स्व-संवेद्यचि अनुभूति | पूर्णत्वे स्वानंदी दंगे, केवळ कैवल्य प्रतीति || ५.

आमुची करवे गोठी । ते जालीचि नाहीं वाक्सृष्टी । आमुतें देखे दिठी । ते दिठीचि नव्हे ॥ ८-५ ॥

आम्हास वर्णील जी वाक्सृष्टी, अजुनि न जन्माला आली | पाहिल आम्हा ऐसी दृष्टी, कोठे हि ती नच सृजिली || ६.

आमुतें करूनि विखो । भोगूं शके पारखो । तैं आमुतें न देखों । आम्हीपण ॥ ८-६ ॥

सर्वव्यापी नि अनंत आम्ही, एकलेच असता ऐसे | विषय आमुचा करुनी भोगणे, वेगळेपणे शक्य नसे || ७.

आम्ही देखणेमात्रचि असता, देखणे न देखणेविणा | दृश्य नव्हे ना द्रष्टेपणहि, ना कर्मी ना उगेपणा || ८.

भोग्य न भोक्तेपणहि नाही, स्वरुपमात्रचि जे आम्ही | प्रत्यय मात्रचि केवळ असता, नसे पाहण्याची उर्मी || ९.

उष्मामात्रचि असे हुताशन, नसे उष्णतेचा भोक्ता | तेवी आम्हासि जे आम्हीपण, कैसे येइल स्वीकारिता || १०.

प्रगटो लपो न लाहो । येथें नाहीं नवलावो । परी कैसेनिही विपावो । असणयाचा ॥ ८-७ ॥

प्रगटणे नि लपणे वा प्राप्ती, हा तर भागची विषयांचा | अद्वैती या नसणे किंवा, नसुनी केवळ असण्याचा || ११.

उदय अस्त नसुनी ना भास्कर, प्रकाशरुपे नांदतसे | प्रगटलियाविणचि अस्तित्वे, नित्यचि स्वानंदात असे || १२.

किंबहुना श्रीनिवृत्तीं । ठेविलों असों जया स्थितीं । ते काय देऊं हाती । वाचेचिया ? ॥ ८-८ ॥

सद्गुरू श्री निवृत्तींनी, ठेवीलियेही जया स्थिति | वाचेच्याहि पैल असे ही, अनुभवेची ये प्रतीति || १३.

सूर्य चंद्र वा वाणी देवता, अग्नि न प्रकाशवी आम्हा | स्वयंप्रकाशी अस्तित्वाचा, असे आमुचा तो गरिमा || १४.

तेथ समोर होआवया । अज्ञानाचा पाडू कासया । केउते मेलिया माया । होऊं पाहिजे ॥ ८-९ ॥

सन्मुख आमुच्या होण्यासाठी, ना प्राज्ञा अज्ञानाची | मृत मायेच्या पोटी येणे, कैसी शक्यता हो त्याची || १५.

अज्ञानचा प्रवर्तु । नाहीं जया गांवाआंतु । तेथें ज्ञानाची तरी मातु । कोण जाणे ? ॥ ८-१० ॥

आमुच्या चिन्मय नगरीमाजी, शक्यता न अज्ञानाची | वार्ता येईल कैसी मग ती, सापेक्षचि त्या ज्ञानाची? || १६.

राती म्हणोनि दिवे । पडती कीं लावावे । वांचूनि सूर्यासवें । शिणणें होय ॥ ८-११ ॥

रात्र म्हणुनीचि दिवे लावणे, निवृत्ती ती अंधाराची | दिवे लावणे असता भास्कर, फुका शीण ते करण्याची || १७.

म्हणोन अज्ञान नाहीं । तेथेंचि गेलें ज्ञानही । आतां निमिषोन्मेषा दोहीं । ठेली वाट ॥ ८-१२ ॥

अज्ञानाचे संगे ज्ञानही, आत्मस्वरुपातुनि गेले | स्व-स्वरूपभूत ज्ञानमात्रचि, आता केवळ ते उरले || १८

येऱ्हवीं तरी ज्ञान अज्ञानानें । दोहींचि अभिधानें । अर्थाचेनि आनानें । विप्लावलीं ॥ ८-१३ ॥

आत्मवस्तू ती सदा ज्ञानमय, ज्ञान नि अज्ञानही नसे | भौतिक दृष्टी असता तेची, एक पालटुनी दुजे असे || १९.

जैसीं दंपत्यें परस्परे । तोडोनि पालटिलीं शिरें । तेथें पालटु ना पण सरे । दोहींचें जिणें ॥ ८-१४ ॥

स्त्रीचे मस्तक पुरुषा लावुनि, पुरुषाचे लावी स्त्रिने | बदल न कांही होता सरले, उभयांचेही परि जीणे || २०.

कां पाठी लाविला होये । तो दीपुचि वायां जाये । दिठी अंधरें पाहे । तैं तेचि वृथा ॥ ८-१५ ॥

दिवा लाविला आपुले पाठी, व्यर्थचि तो वाया गेला | व्यर्थचि होई बघणे जरि ती, दृष्टी बघे अंधाराला || २१.

तैसें निपटून जें नेणिजे । तें अज्ञान शब्दें बोलिजे । आतां सर्वही जेणें सुजे । तें अज्ञान कैसें ? ॥ ८-१६ ॥

कांहीचि ना जाणणे तयासी, म्हणती जगती अज्ञान | पूर्ण ज्ञानमय असता आत्मा, अज्ञाना नाही स्थान || २२.

ऐसें ज्ञान अज्ञानीं आलें । अज्ञान ज्ञानें गेलें । ये दोहीं वांझौलें । दोन्ही जाली ॥ ८-१७ ॥

मिळता अज्ञानाशी ज्ञान वा, ज्ञान मिळे अज्ञानाशी | शुद्ध ज्ञानचि उरते केवळ, नाशुनिया अज्ञानाशी || २३.

ज्ञानाज्ञानातीतचि उरते, उभयहि म्हणुनी फोल असे | उभय नाशिती एक दुज्याला, अर्थ तत्क्षणी पालटसे || २४.

आणि जाणे तोचि नेणें । नेणे तोचि जाणे । आतां कें असे जिणें । ज्ञानाज्ञाना ? ॥ ८-१८ ॥

जाणियले जे ऐसे वदती, शुद्ध ज्ञान त्या ना झाले | आणि जोही असे नेणता, तया जाणतेपण आले || २५.

ज्ञान नि अज्ञानाचे ऐसे, स्थान कदापि सत्य नसे | आमुचे ठायी म्हणुनि उभया, स्थान नाहीचि ते तैसे || २६.

एवं ज्ञानाज्ञानें दोन्ही । पोटीं सूनि अहनी । उदैला चिद्गगनीं चिदादित्यु हा ॥ ८-१९ ॥

आत्मबोध हा चित्सूर्य उगवला, शुद्ध जाणिवेच्या गगनी | तये प्राशिली ज्ञान दिवस नि, रात्रही जी कि अज्ञानी || २७.

अमृत कुंड आठवे समाप्त

(९) अमृत गंगा-

कुंड ९ वे. –

[सिद्धाचार लक्षण]

आतां आमोद सुनास जालें । श्रुतीसि श्रवण रिघाले । आरिसे उठले । लोचनेसी ॥ ९-१ ॥

सुगंध हेचि नाक जाहले, श्रवणचि झाले शब्दचि ते | आरसाच ते नेत्र होऊनि, भोग स्वये भोक्ता झाले | १.

विषयांचा संबंधही येता, दिसे तयाशी ब्रह्मची ते | कर्तेपण नेणोनी क्रिया ही, सहजी त्यागी विषयाते || २.

आपुलेनि समीरपणें । वेल्हावती विंजणें । कीं माथेचि चांफेपणें । बहकताती ॥ ९-२ ॥

जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकाशे । चकोरचि जैसे । चंद्रमा जाळी || ॥ ९-३ ॥

फुलेंचि जालीं भ्रमर । तरुणीची झाली नर । जालें आपुलें शेजार । निद्राळुचि ॥ ९-४ ॥

पंखे शोभती वायुपणे नि, चाफा मस्तकचि झाले | रसरुप झाली जिंव्हा आणि, चंद्रा चकोरपण आले || ३

सूर्य होऊनि कमळ विकासे, भ्रमर जाहली स्वये फुले | पुरुष स्वये जाहला कामिनी, निद्राधिन शय्या बनले || ४

दिठीवियाचा रवा । नागरु इया ठेवा । घडिला कां कोरिवां । परी जैसा ॥ ९-५ ॥

चूतांकूर झाले कोकिळ । आंगच झाले मलयानीळ । रस झाले सकळ । रसनावंत ॥ ९-६ ॥

तैसे भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता । हें सरलें अद्वैता । अफुटामाजीं ॥ ९-७ ॥

लगडेवरी कनकाच्याचि ते, विविध शोभती ती लेणी | आम्रपर्ण कोकीळ जाहले, देह होत चंदन उटणी || ५.

जिंव्हा झाली स्वये सकल रस, भोग्य नि भोक्ता समरसले | द्रष्टा दर्शन एक जाहले, सिद्धचि अद्वैती झाले || ६.

सेवंतेपणा बाहेरी । न निगताचि परी । पाती सहस्त्रवरी । उपलविजे ते ॥ ९-८ ॥

फुला पाकळ्या शेवंतीच्या, सहस्त्रवरी उमलल्या जरी | आपुल्या मर्यादेत ठेवते, ऐक्यपणे आमोद तरी || ७.

तैसें नव नवा अनुभवीं । वाजतां वाधावी । अक्रियेच्या गांवीं । नेणिजे तें ॥ ९-९ ॥

अनुभव तैसे नित्यचि नूतन, जरि सिद्धाला येत असे | चैतन्यावरी भास मानुनी, अन्य त्याविना कांही नसे || ८

विविध अनुभूति जरि प्रारब्धे, सिद्ध मानी या ब्रह्मलिला | ब्रह्मचि खेळे ब्रहमावरती, नित्य अनुभवी श्रीहरीला || ९.

म्हणोनि विषयांचेनि नांवें । सूनि इंद्रियांचे थवे । सैंघ घेती धांवे । समोरही ॥ ९-१० ॥

म्हणुनि इंद्रिये विषया स्पर्शुनि, थवे आणिती बहुत जरी | सिद्ध न विचलित, जाणत पुरता, ब्रह्मचि खेळे ब्रह्मवरी || १०

परी आरिसा शिवे शिवे । तंव दिठीसी दिठी फावे । तैसे झाले धांवे । वृत्तीचे या ॥ ९-११ ॥

बघता आरशामाजी तत्क्षणी, लोचन प्रतिबिंबा पाही | विषया बघता, तैसे सिद्धा, दिसे आत्मरुप लवलाही || ११

नाग मुदी कंकण । त्रिलिंगीं भेदली खूण । घेतां तरी सुवर्ण । घेईजे कीं ॥ ९-१२ ॥

नाग अंगठी आणि कंकण, लिंग वेगळे जरी असे | सुवर्णकारा लिंग भेद ना, एकच सोने त्यांस दिसे || १२.

वेंचूनि आणूं कल्लोळ । म्हणोन घापे करतळ । तेथें तरी निखळ । पाणीच फावे ॥ ९-१३ ॥

तरंग वेचुनी आणू म्हणुनी, हात घालता जलाशयी | हाता लागे केवळ पाणी, तरंग केवळ मोहमयी || १३.

'आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति' | वचन हे असे भगवंताचे, गीतेमाजी ते वदती || १४.

हातापाशीं स्पर्शु । डोळ्यापाशीं रूपसु । जिव्हेपाशीं मिठांशु । कोण्ही एकू ॥ ९-१४ ॥

तऱ्ही परिमळापरौतें । रवेपणे नाहीं कापुरातें । तेवीं बहुतांपरी स्फुरतें । तेंचि स्फुरे ॥ ९-१५ ॥

मऊ स्पर्शाला, शुभ्र दृष्टीला, जिभेस चव आगळी असे | विषयवृत्ती जरी भिन्न तरिही, कापुराविणा अन्य नसे || १५.

कर्पुर परिमळ रव्यारव्यातुनि, क्षणात परिचय देत असे | सिद्धालागी विषय न दिसती, एक आत्मरुप मनी ठसे || १६.

म्हणोनि शब्दादि पदार्थ । श्रोत्रादिकांचे हात । घ्यावया जेथ । उजू होती ॥ ९-१६ ॥

श्रवणादि इंद्रियवृत्तीचे, सरसावती ते हात पुढे | शब्द रूप रस गंध स्पर्श हे, असतील विषयही की जिकडे || १७.

तेथे संबंधु होये न होये । तव इंद्रियांचें तें नोहे । मग असतेंचि आहे । संबंधु ना ॥ ९-१७ ॥

होताची संबंध तयांचा, लय होई तो विषयांचा | सिद्ध अनुभवी आत्मदेवची, अधिष्ठान जो सकलांचा || १८.

जिये पेरीं दिसती उसी । तिये लाभती कीं रसीं । कांति जेवीं शशीं । पुनिवेचिया ॥ ९-१८ ॥

अनेक दिसती कांडी उसाला, एक रसे भरती पुरती | कला वेगळाल्या ना दिसती, पुनवेची ती शशी कांती || १९

पडिलें चांदावरी चांदिणें । समुद्रीं झालें वरिषणें । विषयां करणें । भेटती तैशीं ॥ ९-१९ ॥

पडले चंद्रावरी चांदणे, वर्षा सागरात झाली | फोल तशी सिद्धा विषयांची, जरी अनुभूती आली || २०.

म्हणोन तोंडाआड पडे । तेंहि वाचा वावडे । परी समाधी न मोडे । मौनमुद्रेची ॥ ९-२० ॥

लौकिक विषयी बोले जरिही, सिद्धा नित्यचि आत्मस्थिती | भौतिक व्यवहारे ना बिघडे, त्याची नीरव ती शांती || २१.

व्यापाराचे गाडे । मोडतांहि अपाडे । अक्रियेचें न मोडे । पाऊल केंही ॥ ९-२१ ॥

सिद्धदेह जरि करिता कर्मे, लौकिक वाट्या जी आली | अक्रियता परि ती भंगेना, अनुभूती श्री हरीची झाली || २२.

पसरूनि वृत्तीची वावे । दिठी रूपातें दे खेवें । परी साचाचेनि नांवे । कांहींचि न लगे ॥ ९-२२ ॥

दृष्टी पसरूनि बाहु आपुले, कवेत घेई बहू रुपे | हाती वेगळे कांही येईना, सारे एकचि आत्मरूपे || २३.

तरंग लाटा कल्लोळाची, जरि वेगळी असती रुपे | कवळुनि घेता सारे जलची, तैसे सारे आत्मरूपे || २४.

तमातें घ्यावया । उचलूनी सहस्र बाहिया । शेवटीं रवी इया । हाचि जैसा ॥ ९-२३ ॥

सहस्त्र पसरूनि बाहू आपुले, रवी अंधाराते कवळे | हाती त्याच्या तोच येतसे, प्रकाशाविना ना आगळे || २५.

स्वप्नींचिया विलासा । भेटणे ईया आशा । उठिला तंव जैसा । तोचि मा तो ॥ ९-२४ ॥

विलास स्वप्नातला भोगण्या, असेल उठला जो कोणी | प्राप्ति होईना त्यास कुणाची, केवळ त्याचे वाचोनी || २६.

तैसा उदैलया निर्विषयें । ज्ञानी विषयी हो लाहे ? । तंव दोन्ही न होनी होये । काय नेणों ॥ ९-२५ ॥

आत्मबोध तो उदया येता, सारे ब्रह्मचि दिसत असे | विषय नि विषयी लोप पावती, तदा भोग घेणार कसे ?|| २७.

भोग भोगिती सिद्ध इंद्रिये, अनुभूति ब्रह्मानंदाची | भोगी लिप्त न कदा होई तो, अनुभूति ना ये विषयांची || २८.

चंद्र वेचूं गेला चांदिणें । तंव वेंचिलें काय कोणें । विऊनि वांझें स्मरणें । होतीं जैसी ॥ ९-२६ ॥

चंद्र वेचण्या जात चांदणे, त्याचेची ते अंग असे | व्यर्थ नि फोलचि कार्य असे हे, नित्य प्राप्त त्या ठायी वसे || २९.

प्रत्याहारादि अंगीं । योगें अंग टेंकिलें योगीं । तो जाला इये मार्गीं । दिहाचा चांदु ॥ ९-२७ ॥

करुनी अष्टांगे योगाने, निष्प्रभ योगचि होत असे | भक्तिप्रकाशाच्या पुढती तो, जणु दिवसाचा चंद्र दिसे || ३०.

येथं प्रवृत्ति बहुडे जिणें । अप्रवृत्तीसी वाधावणें । आतां प्रत्यङ्मुखपणें । प्रचारु दिसे ॥ ९-२८ ॥

आत्मज्ञान दिव्य प्रकाशे, देहबुद्धी मागे फिरते | सकल दिसे हरिमयचि केवळ, पाही सर्वत्रचि त्यांते || ३१.

द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगे आपण । भेद तंव तंव दुण । अभेदासी ॥ ९-२९ ॥

ज्ञात्याच्या व्यवहार अंगणी, अद्वैतचि ते नांदतसे | द्वैत लोपुनी ब्रह्मभावचि, अभेद प्रत्यय दिसत असे || ३२.

कैवल्याही चढावा । करीत विषयसेवा । झाला भृत्यु भज्य कालोवा । भक्तीच्या घरीं ॥ ९-३० ॥

करि विषयांचे सेवन ज्ञानी, ये कैवल्या रंगत ती | देव भक्त ते एक जाहले, विषय वेगळे नाकळती || ३०

शब्द स्पर्श रस गंध रूपही, पंचविध ना जाणवती | एकचि अवघा स्वाद लागतो, कैवल्याहुनी उच्च स्थिति || ३१.

सकळ रसांचा असता तो रस, कैवल्याविण अन्य नसे | जगा वाटते विषय भोगी तो, परि स्वानंदा भोगितसे || ३२.

जेही वाट्या सहजी येतसे, हरी प्रसाद या श्रद्धेने | सारे तैसे भोग भोगणे, विधी गौरव आनंदाने || ३३.

निज प्रारब्धे विविध भोग ते, सारे परि ते ब्रह्म असे | ब्रह्म सेविते ब्रह्मालाची, ब्रहमावाचुनि अन्य नसे || ३४.

षड्रस असती विविध चवीचे, तैसे भोगही विविधचि ते | साऱ्या असती लिला तयाच्या, भोगावे स्मरुनि हरिते || ३५.

नित्य असावा ब्रह्मभाव तो, देह आपुला मुळी नसे | देहा प्रारब्धे भोगू दे, अंतरी नित्यचि हरी असे || ३६.

हीचि जीवन मुक्तावस्था, नित्य रहावे स्वानंदी | शिव होऊनिया शिवा भजावे, जीवन ते परमानंदी || ३७.

घरामाजीं पायें । चालतां मार्गुही तोचि होये । ना बैसे तरी आहे । पावणेंचि ॥ ९-३१ ॥

घरिदारी वा अन्य कुठेही, चाले विश्रामे बैसे | देहस्थिती ती कैसी असो की, सिद्ध शांत नि स्व-स्थ असे || ३८.

तैसें भलतें करितां । येथें पाविजे कांहीं आतां । ऐसें नाहीं न करितां । ठाकिजेना ॥ ९-३२ ॥

देहाकरवी कृती होतसे, सिद्ध अंतरी तृप्त असे | करणे वा कांही ना करणे, अप्राप्त त्यासी कांही नसे || ३९.

आठवु आणि विसरु । तयातेंही घेऊं नेदी पसरु । दशेचा वेव्हारु । असाधारणु ॥ ९-३३ ॥

आठव नाठव उभयही नाही, जागृती सुषुप्ति एक असे | असे नित्य ती सावधानता, हरिमाजी तो नित्य वसे || ४०.

जाला स्वेच्छाचि विधि । स्वैर झाला समाधि । दशे ये मोक्षऋद्धि । बैसों घापे ॥ ९-३४ ॥

अगा आत्मविद असे नरु हा, स्वेच्छाचारे वर्ततसे | त्याचे वर्तन नित्य समाधि, मोक्षऋद्धि ही स्थिति असे || ४१.

नाही बंधन त्यासि विधीचे, स्थितप्रज्ञ तो नित्य असे | मोक्षऋद्धिची नित्य अवस्था, ब्रह्म होऊनि ब्रह्मी वसे || ४२.

नाना कर्मे करिता दिसतो, भंगेना निजात्मस्थिति | स्वानंदे होऊनिया हरिमय, नित्य अनुभवे तो शांती || ४३.

झाला देवोचि भक्तु । ठावोचि झाला पंथु । होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हें ॥ ९-३५ ॥

भक्त देव हा भेद न उरला, मार्ग क्रमेना, परि तो पोचे | सारे विश्वहि तो झाला, सौख्य भोगी एकांताचे || ४४..

अधिष्ठान ते आसन झाले, नित्य असे तो एकांती | समाधि नि व्युत्थान बोळवण, सदा अनुभवी ब्रह्मस्थिति || ४५.

भलतेउतेनि देवें । भलतेन भक्त होआवें । बैसला तेथें राणिवें । अकर्मु हा ॥ ९-३६ ॥

कधी भक्त नि कधी देव हो, भेद न कांही तो उरला | ठायी बैसुनी निज ऐश्वर्ये, नित्यचि स्वानंदी रमला || ४६.

देवाचिया दाटणी । देऊळा झाली आटणी । देशकाळादि वाहाणीं । येईच ना ॥ ९-३७ ॥

विशाल देऊळ ब्रह्मांडाचे, अपुरे दशांगुळे उरला | अनंत देश नि त्रिकाल पूजन, अर्चनविधि परि ना सरला || ४७.

देवीं देवोचि न माये / मा देवी कें अन्वयो आहे ? । येथ परिवारु बहुये । अघडता कीं ॥ ९-३८ ॥

अनंतास त्या अपुरी जागा, माया शक्तीस स्थान कुठे ? | कैसे भक्त नि परीवारहि, पुजा अर्चना स्थान थिटे || ४८.

ऐसाहि स्वामीभृत्यसंबंधा । लागीं उठलीं श्रद्धा । तैं देवोचि नुसधा । कामविजे ॥ ९-३९ ॥

स्वामी सेवक पूजा अर्चा, हरिच कामना पुरवितसे | स्वये होऊनि सारे कांही, स्वानंदी तो नित्य असे || ४९.

गंगा शिरता स्वये सागरी, कैसी त्यासी तीच भजे | गंगा ना ती गंगा उरली, सागर म्हणुनिचि ती साजे || ५०.

भक्त होऊनि स्वयेचि पुरवी, भजन पुजन कामना हरी | तोचि पुजा सामुग्री घंटा, दीप तोचि आरती करी || ५१.

अवघिया उपचारा । जपध्यान निर्धारा । नाहीं आन संसारा । देवोवांचुनी ॥ ९-४० ॥

अवघे भजनाचे उपचार, जप ध्यान नि निर्धार | सबाह्य अभ्यंतर पुजादि, देवचि करि हे व्यवहार || ५२.

आतां देवातेंचि देवें । देववरी भजावें । अर्पणाचेनि नांवें । भलतिया ॥ ९-४१ ॥

देव भजतसे देवालाचि, होऊनि तुळशी बेल फळे | द्वैते पूजन अद्वैताचे, परि अद्वैत न जरा ढळे || ५३.

पाहें पां आघवेया । रुखा रुखचि यया । परी दुसरा नाहीं तया । विस्तार जेवीं ॥ ९-४२ ॥

खोड नि फांद्या फुले फळे वा, बहु पर्णांच्या विस्तारे | एक वृक्षची असे आघवा, भेद जरि दिसती सारे || ५४.

देव देऊळ परिवारु । कीजे कोरुनि डोंगरु । तैसा भक्तीचा व्यवहारु । कां न व्हावा ? ॥ ९-४३ ॥

डोंगर कोरुनि भव्य उभविले, देव देऊळ नि भक्तजना | तैशा भक्तीच्या व्यवहारे, अर्चन कां नच हो नाना ?|| ५५.

अहो मुगीं मूग मात्र जैसें । घेतां न घेतां नवल नसे । केलें देवपण तैसें । दोहीं परी ॥ ९-४४ ॥

मौनव्रता घेतले मुक्याने, वा न घेतले तये जरी | सदा मुका तो तैसे पूजन, सिद्ध करि वा नाही करी || ५६.

अखतांचि देवता । अखतींचि असे न पूजितां । मा अखतीं काय आतां । पुजो जावी ॥ ९-४५ ॥

अक्षतांनी रेखिली देवता, पूजन अक्षतांनी केले | सारे ब्रह्मचि, पुजी आपणाला, विधीच केवळ ते झाले || ५७.

दीप्तीचीं लुगडीं । दीपकळिके तूं वेढी । हें न म्हणतां ते उघडी । ठाके काई ? ॥ ९-४६ ॥

कुणी सांगता दिपकलिकेला, वेढी दीप्तिची लुगडी | ना करिता तैसे कलिकेने, राहील ती कां तरि उघडी ?|| ५८.

कां चंद्रातें चंद्रिका । न म्हणिजे तूं ले कां । तऱ्ही तो असिका । तियाचि कीं ना ॥ ९-४७ ॥

म्हणे चांदणे घेई मजला, पांघरुनी चंद्रालागी | स्वये कौमुदीयुक्त असे तो, ना पांघरणे त्यालागी || ५९.

आगीपण आगी । असतचि असे अंगीं । मा कासयालागीं । देणें न देणें ? ॥ ९-४८ ॥

वन्हीमाजी स्वयंभु उष्मा, नलगे दाहकपण देणे | देणे वा ते नच देणे ही, व्यर्थचि ते तैसे करणे || ६०.

म्हणोनि भजतां भजावें । मा न भजतां काय नव्हे ? । ऐसें नाहीं स्वभावें । श्रीशिवुचि असे ॥ ९-४९ ॥

तैसे सिद्धे हरीशी भजणे, ना भजणेही एक असे | तोचि श्रीहरी स्वयेच असता, अलग न भजणे लागतसे || ६१.

आतां भक्ति अभक्ति । झालें ताट एके पातीं । कर्माकर्माचिया वाती । माल्हवूनियां ॥ ९-५० ॥

भक्ति अभक्ती एक जाहली, वेगळेपणा नच उरला | कर्म अकर्माच्या वातींचा, दीपचि पुरता मालवला || ६२.

म्हणोनि उपनिषदें । दशे येति निंदे । निंदाचि विशदें । स्तोत्रें होती ॥ ९-५१ ॥

श्रुति वर्णिती ब्रह्माविषयी, ते न ब्रह्म, होई निंदा | परी सकलची ब्रह्म म्हणोनी, ती स्तोत्रेचि होत सदा || ६३.

भाषा द्वैताची ती बोलता, उपनिषदे निंदा करिती | अद्वैतातचि सारे म्हणुनी, तीच होतसे परि स्तुती || ६४.

ना तरी निंदास्तुति । दोन्हीं मौनासाठीं जाती । मौनीं मौन आथी । न बोलतां बोली ॥ ९-५२ ॥

स्तुति आणि निंदा दोहींचा, समावेश होई मौनी | लौकिकी बोले, तरी अंतरी, धरी मौन पुरते ज्ञानी || ६५.

घालिता अव्हासव्हा पाय । शिवयात्राचि होतु जाय । शिवा गेलियाही नोहे । केंही जाणें ॥ ९-५३ ॥

कोठेही चालणे तयाचे, शिवयात्राची होत असे | आणि जाता यात्रेलाही, स्वये शिवाहुनी अन्य नसे || ६६.

चालणें आणि बैसक । दोन्ही मिळोनि एक । नोहे ऐसें कौतुक । इये ठायीं ॥ ९-५४ ॥

चालणे नि बैसणे तयाचे, असताही तो ठायी असे | जीवन्मुक्ता सदा स्थैर्यचि, जाणे येणे कांही नसे || ६७.

येऱ्हवीं आडोळलिया डोळा । शिवदर्शनाचा सोहळा । भोगिजे भलते वेळां । भलतेणें ॥ ९-५५ ॥

दृष्टी जाई तेथे दर्शन, नित्य शिवाचे त्या घडते | साऱ्या वेळा मंगल त्याला, जेथे तोचि मंदिर ते || ६८.

ना समोर दिसे शिवुही । परि देखिलें कांहीं नाहीं । देवभक्ता दोही । एकुचि पाडू ॥ ९-५६ ॥

समोर शिवमूर्ति ती तरिही, जणु दिसले त्या कांही नसे | तो स्वयेचि श्री शिव असता, उपचारां नच करीत असे || ६९.

आपणचि चेंडू सुटे । मग आपणया उपटे । तेणें उदळतां दाटे । आपणपांचि ॥ ९-५७ ॥

नकळत चेंडू सुटता हातुन, उसळी घेत तो परत फिरे | सहजी घडले हे सारेहि, न खेळताही सहजी स्फुरे || ७०.

ऐसी जरी चेंडूफळी । देखिजे कां येके व्हेळीं । तरी बोलिजे हे सरळी । प्रबुद्धाची ॥ ९-५८ ॥

चेंडुफळीचा खेळ असा हा, एक वेळ जो पाहतसे | त्यासी समजे सिद्धार्चन हे, शब्दी अन्यथा शक्य नसे || ७१.

कर्माचा हातु नलगे । ज्ञानाचेंही कांहीं न रिगे । ऐसीचि होतसे आंगें । उपास्ति हे ॥ ९-५९ ॥

काया वाचा मने कर्म जे, होई त्याचे त्या ज्ञान नसे | अखंड आत्मस्थिति तयाची, स्वयेचि शिव तो नित्य असे || ७२.

निफजे ना निमे । अंगे अंग घुमे । सुखा सुख उपमे । देववेल यया ॥ ९-६० ॥

आदि अंत न असे कदापि, स्वरूपी स्वरूपचि ते खेळे | निरुपम सुख ते स्वानंदाचे, अंतरात सहजी उसळे || ७३.

कोण्ही एक अकृत्रीम । भक्तीचें हें वर्म । योगज्ञानादिविश्राम । भूमिके हे ॥ ९-६१ ॥

देव नि भक्तहि अभेद पुरता, भक्ति अकृत्रिम वर्म असे | योग ज्ञान आदि विश्रामे, स्वानंदी तो सिद्ध वसे || ७४.

चिन्मात्र नि नित्य प्राप्तचि, ऐशा स्वरूपी समरसला | जळांत जैसे मिळते जळचि, आत्मरूपी तो स्थित झाला || ७५.

योगयाग हे सारे सुटले, ज्ञान फुंज उतरे पुरता | द्रष्टा दृश्य नि दर्शन त्रिपुटी, सारेही पुरते विरता || ७६.

आंगें कीर एक झालें । परी नामरूपाचे मासले । होते तेही आटले । हरिहर येथें ॥ ९-६२ ॥

नाना नामरूपेही विरली, एक ब्रह्मचि सारीकडे | कुणी हरी ना हरही नाही, स्व-स्वरूप जिकडे तिकडे || ७७.

ना शिव रुपे निवृत्ती वा, ज्ञानेशहि ना विष्णु रुपे | एक ब्रह्मचि सकल चराचर, सकलही विनटे आत्मरूपे || ७८.

अहो अर्धनारीनटेश्वरें । गिळित गिळित परस्परें । ग्रहण झालें एकसरें । सर्वग्रासें ॥ ९-६३ ॥

अर्धनारी नि नटेश्वराने, परस्परांशी ग्रासियले | सर्व चराचर विश्व मावळे, एक ब्रह्मचि अनुभविले || ७९.

वाच्यजात खाऊनी । वाचकत्वहि पिऊनी । टाकली निदैजोनी । परा येथें ॥ ९-६४ ॥

शब्दांच्याही पैल ही स्थिति, अर्थ बोधहि मावळला | पराही विरली पुरती येई, ज्ञानभूमिका उदयाला || ८०.

शिवशिवा ! समर्था स्वामी । येवढीये आनंदभूमि । घेपे दीजे एकें आम्हीं । ऐसें केलें ॥ ९-६५ ॥

शिव रूपा श्री सद्गुरू स्वामी, अमूल्य ती आनंदभूमि | देणे घेणे स्वये एकटे, झालो स्वतंत्रची आम्ही || ८१.

चेतचि मा चेवविलें । निदैलेंचि मा निदविलें । आम्हीचि आम्हा आणिलें । नवल जी तुझें ॥ ९-६६ ॥

माझ्यातील नित जागृत ऐसा, आत्मभाव जागृत केला | विषयाची निद्रा घालवली, आणिलेस निजरूपाला|| ८२.

विषयानंदाच्या निद्रेतून, तू पुरते जागे केले | ब्रह्मभाव तो नित्य जाहला, पूर्णचि स्वातंत्र्या दिधले || ८३.

जागृतीस पुरते जागविले, अज्ञानी निद्रा खोटी | त्या निद्रेला दूर सारुनी, पाहे निज-स्वरूपची दिठी || ८४.

जागृत असुनी विषयी गुंते, ती तर निद्राची झाली | जागा असुनी झोपलाच तो, बोध जागृती ना आली || ८५.

आत्मरुपाची ना अनुभूति, व्यर्थची जीवन हो त्याचे | नरदेहाला फोलचि केले, गुलाम झाले विषयांचे || ८६.

हे जाणुनि तंव शरणा येता, मजशी जागृती खरी दिली | हरीमय केले तुवाचि पुरते, जीवन्मुक्ती तू दिधली || ८७.

आम्ही निखळ मा तुझे । वरी लोभें म्हणसी माझें । हें पुनरुक्त साजे । तूंचि म्हणोनी ॥ ९-६७ ॥

आम्हास दिधले त्वां आपुलेपण, आम्ही सर्वथा असू तुझे | वरती म्हणशी ‘मम ज्ञानोबा,’ पुनरुक्ति ही तुज साजे || ८८.

कोणाचें कांहीं न घेसी । आपुलेंही तैसेंचि न देसी । कोण जाणे भोगिसी । गौरव कैसें ॥ ९-६८ ॥

घेणे देणे कांही नेणशी, गुरु गौरव भोगशी कसा ? | तूच गुरु नि शिष्यही तूची, तूचि विनटला स्वये असा || ८९.

गुरुत्वें जेवढा चांगु । तेवढाचि तारूनि लघु । गुरु लघु जाणे जो पांगु । तुझा करी ॥ ९-६९ ॥

गुरुत्व आपुले महानचि हे, लघुत्व शिष्याचे हरिशी | गुरू शिष्यपण टाकिशी विरवून, वाटे जंव तंव चित्ताशी || ९०

शिष्यां देतां वाटे । अद्वैताचा समो फुटे । तरी काह्या होती भाटें । शास्त्रें तुझीं ॥ ९-७० ॥

देता शिष्या गुरुत्व आपुले, अद्वैताचा सिंधु फुटे | म्हणुनी शास्त्रे गौरविती तुज, भाट होती परि, शब्द थिटे || ९१.

किंबहुना ये दातारा । तूं याचा संसारा । वेंचोनि होसी सोयरा । तेणेंचि तोषें ॥ ९-७१ ॥

परम दयाळा दातारा तू, जगदुद्धारा अवतरशी | ज्यासी कळकळ या मार्गाची, हात धरोनि उद्धरशी || ९२.

निजल्याशी तू जागे करुनी, आत्मजागृती लाभविशी | यांतचि तुज संतोष दयाळा, सहजी कैवल्या नेशी || ९३.

अमृत गंगा - नवम कुंड समाप्त

.अमृत गंगा-

कुंड १० वे –

[ग्रंथ परिहार]

परी गा श्रीनिवृत्तिराया । हातातळीं सुखविलें तूं या । तरी निवांतचि मियां । भोगावें कीं तें ॥ १०-१ ॥

वंदन तुजला श्री निवृत्ती, पूज्य सद्गुरू दातारा | अमूल्य अमृतकुंभ दिलासी. पूर्ण कृपे माझिया करा || १

अक्षय ऐसा कुंभ असे हा, केवळ हे ना मजसाठी | या मार्गीचे जे जे इच्छुक, त्या सकलांच्याही साठी || २.

परी महेशें सूर्याहातीं । दिधली तेजाची सूति । तया भासा अंतर्वर्ती । जगचि केलें ॥ १०-२ ॥

भगवंताने अल्प तेज जे, कृपे भास्कराशी दिधले | त्या तेजाने गगनामधुनी, त्रिलोक सकलही उजळियले || ३.

चंद्रासि अमृत घातलें । तें तयाचि काई येतुलें । कीं सिंधु मेघा दिधले । मेघाचि भागु ॥ १०-३॥

चंद्रा लाभे अमृत तेणे, औषधी झाल्या वनस्पती | **जल सिंधुने देता मेघा, जगा तृप्त करि मेघ तसे** || ४.

दिवा जो उजेडु । तो घराचाची सुरवाडू । गगनीं आथी पवाडु । तो जगाचाची कीं ॥ १०-४ ॥

दीप प्रकाशे घरची उजळे, त्याविण ना उपयोग तया | गगनातील रवितेजाने, त्रिलोक तम ते जात लया || ५.

अगाधेंहि उचंबळती । ते चंद्रीची ना शक्ति । वसंतु करी तैं होती । झाडांचें दानीं ॥ १०-५ ॥

चंद्रा पाहुनि सिंधुस भरती, सोम शक्तीचा हा महिमा | वसंत करी ते दान सृष्टीला, नवपल्लवीचा हो गरिमा || ६.

म्हणोनि हें असंवर्य । दैविकीचें औदार्य । वांचोनि स्वातंतर्य । माझें नाहीं ॥ १०-६ ॥

म्हणोनी हे औदार्य असीम जे, जी श्री सद्गुरु कृपा तुझी | मज स्वतंत्र ना समर्थता ही, तूच असे ऊर्जा माझी|| ७.

आणि हा येवढा ऐसा । परिहारु देवू कायसा । प्रभुप्रभावविन्यासा । आड ठाउनी ॥ १०-७ ॥

जे जे लाभे, घडे जीवनी सारे तुझिया कृपेने | उपमा देऊनी कशास सांगू, तंव महिम्याला मी जाणे || ८.

आम्ही बोलिलों जें कांहीं । तें प्रगटची असे ठायीं । मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावें बोलें ?॥१०-८॥

या ग्रंथी जे आम्ही बोललो, नवे त्यांत कांही नव्हते | स्वयंप्रकाशित आत्मतत्व ते, ज्ञानी पूर्ण जाणी त्यांते || ९.

नाना विपायें आम्हीं हन । कीजे तें पां मौन । तरी काय जनीं जन । दिसते ना ? ॥ १०-९ ॥

या ग्रंथी ते नसते लिहिले, मौन पाळिले असते वा | चक्र जगाचे चालुचि असते, उदय अस्तीहि ना उणिवा|| १०.

जनातें जनीं देखतां । द्रष्टेंचि दृश्य तत्वतां । कोण्ही नहोनि आइता । सिद्धांत हा ॥ १०-१० ॥

कुणी पाहता कुणास जेंव्हा, जो द्रष्टा तो दृश्यही तो | दृश्यचि होई द्रष्टा म्हणुनी, श्रीहरीची द्रष्टा होतो || ११

ययापरौतें कांहीं । संविद्रहस्य नाहीं । आणि हें तया आधींही । असतचि असे ॥ १०-११ ॥

या परते ते नसे रहस्यहि, ज्ञानाचे ते कदा असे | या जगताच्या आदि मध्ये, अंतीहि अन्य न कांही वसे ||१२

तऱ्ही ग्रंथ प्रस्तावो । न घडे हें म्हणों वावो । तऱ्ही सिद्धानुवाद लाहों । आवडी करूं ॥ १०-१२ ॥

तरी कार्यचि व्यर्थ नसे हे, सिद्धानुवादी पंक्ती | उठवीत राही अमृत लहरी, सौख्यालागी ये भरती || १३

पढियंतें सदा तेंचि । परी भोगीं नवी नवी रुची । म्हणोनि हा उचितुचि । अनुवाद सिद्ध ॥१०-१३॥

विषय आवडीचे जरि तेची, भोग रुचीचा नवा नवा | लाभवी आनंदचि नवाही, म्हणुनि हा अनुवाद हवा || १४.

या कारणें मियां । गौप्य दाविलें बोलूनियां । ऐसें नाहीं आपसया । प्रकाशुचि ॥ १०-१४ ॥

गौप्य नाही मी येथ उकलले, ज्ञात्या सारे ज्ञात असे | सकला ठायी हरी प्रकाशित, गुप्त कांहीही यांत नसे || १५.

आणि पूर्ण अहंता वेठलों । सैंघ आम्हीच दाटलों । मा लोपलों ना प्रगटलों । कोणा होऊनी ।१०-१५॥

पूर्ण ब्रह्म जाणिवे वेढिलो,, सर्वत्रचि दाटलो आम्ही | कधी न लपलो वा की प्रगटलो, पूर्ण लोपले तू नि मी || १६.

आपणया आपणपें । निरूपण काय वोपे ? । मा उगेपणे हरपे । ऐसे आहे ? ॥ १०-१६ ॥

आपणाशी जाणियले आम्हीची, निरुपण हे पूर्णत्वाचे | पूर्णचि आधीहि होतो तर, काय प्रयोजन लिहिण्याचे ?||१७.

मौनहि धरिता, नित्यप्राप्त ते, एकलेचि ते नित्य असे | निरुपण लिहुनी दुजे कुणी ना, सांगणेही ते कुणा नसे || १८.

म्हणोनि माझी वैखरी । मौनाचेंहि मौन करी । हे पाणियावरी मकरी । रेखिली पां ॥ १०-१७ ॥

निरुपण हे रेखियले शब्दे, शब्दावली जंव जात पुढे | आणि विरता देह अहंता, शब्दहि तेथे झणी दडे || १९.

निजस्वरुपाचे भान उमलता, शब्द पुरेही ते विरती | जैसे मकरी जात जलातुनि, जलरेषा विरुनी जाती || २०.

मौनाचेही मौन असे हे, निरुपण ज्ञाते शब्द विरे | स्वानंदी मग मौनहि विरते, हरिविण तेथे कांही नुरे || २१.

एवं दशोपनिषदें । पुढारी न ढळती पदें । देखोनि बुडी बोधें । येथेंचि दिधली ॥ १०-१८ ॥

सारभूत दश उपनिषदेही, ती हि, नच यापुढती जाती | अनुभव अमृत पूर्णचि पाहुनी, स्वये यांतची ती लपती || २२.

ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत । हें अनुभवामृत । सेंवोनि जीवन्मुक्त । हेंचि होतु ॥ १०-१९ ॥

परमाश्चैर्ये श्रीमंतचि हे, अनुभव अमृत गुरुकृपा | सेऊनी जीवन्मुक्तचि करिते, अनुभवी सहजी हरिरूपा || २३.

मुक्ति कीर वेल्हाळ । अनुभवामृत निखळ । परी अमृताही उठी लाळ । अमृतें येणें ॥ १०-२०॥

चारी मुक्ति श्रेष्ठचि परि हे, अनुभव अमृत हरिच करी | या अमृत लाभास्तव उठते, लाळ अमृता जिभेवरी ||२४.

या ग्रंथीची जीहि अनुभूति, पूर्णत्वाने घेआवी | पूर्ण मुक्तिस्तव निरूपणीची, वाट निखालस चालावी || २५.

नित्य चांदु होये । परी पुनवे आनु आहे । हें कां मी म्हणों लाहें । सूर्यदृष्टी ? ॥ १०-२१ ॥

जरी चंद्रमा रोज नभी तो, पुनवेची आगळी प्रभा | मार्तंडासम पूर्णत्वाची, दिसे विशेषची शोभा || २६.

प्रिया सावायिली होये । तै अंगीचे अंगीं न समाये । येऱ्हवीं तेथेंचि आहे । तारुण्य कीं ॥ १०-२२ ॥

यौवनात वल्लभा सवे ते, कामिनिचे तारुण्य खुले | गुप्तपणे जे लपले अंगी, यौवन येताची उमले || २७.

वसंताचा आला । फळीं फुलीं आपला । गगनाचिया डाळा । पेलती झाडें ॥ १०-२३ ॥

वसंत येता सहजी बहरती, फल पुष्पांनी तरुवर ते | फांद्या चुंबिती गगनालागी, पूर्णत्वचि बहरा येते ||२८.

ययालागीं हें बोलणें । अनुभव अमृतपणें । स्वानुभूति परगुणें । वोगरिलें ॥ १०-२४ ॥

यालागी ही स्वानुभवाची पक्वाने, मी वोगरिली | सेवितील जे चकोर अमृत, इतरा स्वाद रुचि कळली || २९.

आणि मुक्त मुमुक्षु बद्ध । हें तंववरी योग्यता भेद । अनुभव अमृतस्वाद । विरुद्ध जंव ॥१०-२५॥

बद्ध मुमुक्षु मुक्त भेद जोवरी, हे अमृत ना चाखियले | अनुभव अमृत करिता सेवन, स्वयेचि श्री हरी ते झाले || ३०.

नसे मुक्त वा बद्ध मुमुक्षू, नित्यची त्यांची सहजस्थिति | तेचि जाहले सर्व चराचर, अनुभव अमृत जंव घेती ||३१.

गंगावगहना आली । पाणीयें गंगा झालीं । कां तिमिरें भेटलीं । सूर्या जैशीं ॥ १०-२६ ॥

विविध ओघ ते गंगे मिळता, जल सारे गंगा झाले | सौम्य दाट सारी अंधारे, रवीसवे पुरते विरले || ३२.

नाहीं परिसाची कसवटी । तंववरीच वानियाच्या गोठी । मग पंधरावयाच्या पटीं । बैसावें कीं ॥१०-२७॥

लोहही सोन्याच्या मोलाने, जरि घर्षण परिसा संगे | आधी लोह ते सुवर्ण झाले, स्वरूप उजळुनि ते अंगे || ३३.

तैसें जे या अखरा । भेटती गाभारां । ते वोघ जैसे सागरा । आंतु आले ॥ १०-२८ ॥

तैसे जाणती गहन आशया, स्वयेचि होती श्रीहरी ते | एकरूपची जलौघ सारे, केवळ मिळता सिंधूते || ३४.

जैशा अकारादि अक्षरा । भेटती पन्नासही मात्रा । तैसें या चराचरा । दुसरें नाहीं ॥ १०-२९ ॥

ॐ कारी ती सारी अक्षरे, ध्वनीरुपे करिती वसती | तैसे सकल चराचर नांदे, एक हरी अंगावरती || ३५ .

तैसी तिये ईश्वरीं । अंगुळी नव्हेचि दुसरी । किंबहुना सरोभरीं | शिवेसीचि ॥ १०-३० ॥

एकलाची श्रीहरी दुजी ना, अंगुली लागे मोजाया | सारे हरीमय एकतत्वची, जीव शिव नि ना माया || ३६

म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें । सणु भोगिजे सणें विश्वाचेनि ॥ १०-३१ ॥ ॥

म्हणुनि म्हणती ज्ञानदेव या, अनुभव अमृत वर्षेने | विश्वामाजी करा साजरी, दीपावली आनंदाने || ३७.

**अमृत गंगा कुंड दहावे लेखन व पूर्ण अनुभव अमृत काव्यमय भाष्य समाप्त **

अनुभव अमृत अंतरंग हे, अमृत गंगा दश कुंडी | ज्यासी रुची त्या सुलभ कराया, शब्दांच्या या उतरंडी ||

अनुभव अमृत अति महान हा, असे स्वानुभव माऊलीचा | वाचुनी आशयी रंगुनी जाता, अनुभव येईल स्वरूपाचा ||

आपण सारे परब्रह्मची, विसर पडे परी स्वरूपाचा | या ग्रंथाने बोध होतसे, प्रसाद हाचि माऊलीचा ||

माऊलीने ते अंतरी राहुनी, शब्द-शब्द हि सुचवियले | अनेक ग्रंथांचे घेऊनि ऋण, लेखकु बनता हे स्फुरले ||

तुझीच वस्तू तुझ्याच चरणी, विनम्र भावे अर्पितसे | उणीवा माझ्या क्षम्य असाव्या, नित्य माऊली हृदयी वसे ||

नम्र प्रार्थना तुला माऊली, अंतरी मम तंव वास असो | जागृत मजला सदैव ठेवी, अहंभाव अल्पही नसो ||

||हरी ॐ ||

-अण्णा

अण्णा (श्री. मधुकर सोनवणे)

यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक

क्लिक/टॅप करताच उघडेल